…स. ठाण

# तीर्थीचे सागरे

संपादिका :

डॉ. सरोजिनी बाब

REFBK-0016299

EFBK-0016299

८६०४८
23/3/09
२०६०
२०६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# तीर्थांचे सागर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२९९

# तीर्थांचे सागर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २६०८८ वि: काव्य
क्रमांक ६२१६० नों. दि. ३।७९

संपादिका

**डॉ. सरोजिनी बाबर**

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती

REFBK-0016299

REFBK-0016299

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प १४ वे

*सर्व हक्क लोकसाहित्य समितीच्या स्वाधीन*

सजावट

चित्रकार श्री. दीनानाथ दलाल

मुद्रक

वि. पु. भागवत

मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४

महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या वतीने
महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालयातर्फे प्रकाशित

# महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती

अध्यक्ष

**डॉ. सरोजिनी बाबर**

सभासद

**श्री. विनोदराव**
संपादक, इंडियन एक्सप्रेस

**श्री. सोपानदेव चौधरी**

**प्रा. वामनराव चोरघडे**

**सौ. कुमुदिनी पवार**

**प्रा. राजा महाजन**

**प्रा. गजमल माळी**

**श्री. बाजीराव पाटील**

**श्री. वि. वा. जोशी**

**डॉ. ग. मो. पाटील**

**श्री. य. ह. पिटके**
संचालक, प्रकाशन विभाग, महाराष्ट्र सरकार

**श्री. बापूराव नाईक**
उपसंचालक, मुद्रण आणि लेखन सामग्री, महाराष्ट्र सरकार

**श्री. के. जे. सावे**
सहसंचालक, उद्योग विभाग, महाराष्ट्र सरकार

चिटणीस

**श्री. वा. म. बोधनकर**
उपसंचालक, शिक्षण विभाग, महाराष्ट्र सरकार

# प्रास्ताविक

पहाटेच्या प्रसन्न वातावरणात शेंदराच्या खापा टाकीत आणि गुलाल उधळीत सूर्यदेवानं धरित्रीच्या कुशीतून मान वर करावी आणि त्या मंगल वेळी माजघरातून जात्यावर गाईले जाणारे मंगल वेद कानी पडावेत असा प्रसंग माझ्या जीवनात अनेकदा आलेला आहे. तर एकदा काय झाले की, मी एका घरात एकजणीला स्वतः दळू लागतेली. हेतू हा की, त्यायोगे ओव्यांचे माप पदरी भरून पडावं. म्हणताना निखळता घास जात्याच्या मुखी पडला मात्र न् आता जात्याला गती येणार तर तेवढ्यात ती सखूबाई सुग्रीण बोलली कशी—

*सरलं दळण माज्या सुपात येडी गंगा*
*दुरपदा ववी गाते तुला पिरतीच्या पांडुरंगा*
*सरलं दळण सरलं मी म्हणू कशी*
*सासरी म्हायारी भरल्या ग दोनी राशी*

तर त्यासरशी माझ्या मनात आले की, सासरमाहेरचा विषय एक वेळ महाराष्ट्राच्या लोकसाहित्य समितीनं ग्रंथरूपाने जुळविला असला तरीही या

गीतातील दोन्ही राशींचे मोजमाप करता आले तर पाहावे. म्हणून थोडा वारकाईने विचार केला आणि सर्वांच्या संमतीने ठरविले की, चालू वर्षाच्या ग्रंथासाठी आईवडिलांच्या विषयी सखोल विचार केला जावा. आईवडील म्हणजेच सासरमाहेरच्या दोन राशी. हेच मानवी जीवनातील प्रेमसागर. पतिपत्नींचे विसाव्याचे ठिकाण. म्हणून लोकसाहित्याला उपमा दृष्टांत लक्षात घेऊन या ग्रंथाचे नाव **"तीर्थांचे सागर"** असे पक्के करण्यात आले.

त्यानंतर नेहमीप्रमाणे निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून आणि महाराष्ट्रातील आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरून ही वार्ता प्रकाशित करण्यात आली. अनेकांना वैयक्तिक पत्रेही धाडण्यात आली. या विषयावर लोकसाहित्य जमा करण्यात आले, मागविण्यातही आले. त्यासाठी ओळखीच्या व अनोळखीच्या असा अनेकांचा हातभार लागला. त्या सर्वांनी अपार मेहनत घेतली. त्यांचे मनःपूर्वक आभार !

आईवडिलांचा विषय फार जिव्हाळ्याचा. पण त्यांचे संबंधी बोलावयाचे तर फार माफक, बेताचे, वरच्या दर्जाचे, घराण्याचे असे. त्यामुळे लोकगीते व लोककथा नेहमीप्रमाणे पोत्यांच्या मापाने न येताना किलो दोन किलोच्या गतीनेच आल्या. हरकत नाही. मजकूर थोडा आला असला तरी अव्वल दर्जाचा असल्याने त्या विषयातील अपूर्वाई आगळी आहे. हा आविष्कार चित्तवेधक आहे, विलक्षण भूल पाडणारा आहे. मानवी जीवनामधील सर्व भावभावनातील श्रेष्ठता दर्शविणारा आहे. माणसाला माणूस म्हणून जिवंत ठेवणारे सारे काही इथे प्रकट झालेले आहे. इथे ही भावभावना प्रकट होत असताना काळजाने काळजाचे माप घेतलेले आहे. म्हणन हा ग्रंथ त्याच्या नावाला साजेसाच झाल्याची ग्वाही मराठी माणूस खात्रीने देईल असे वाटते.

हा ग्रंथ तयार होत असताना ज्या ज्या मंडळींनी आपला वाटा उचलला आहे त्या त्या सर्वांची ही समिति ऋणी आहे.

फेब्रुवारी १९६७
वसंत पंचमी, शके १८८८

—सरोजिनी बाबर

## अनुक्रमणिका



| | |
|---|---|
| गंगासागर | तेरा |
| खजिन्याची पेटी (आई) | १ |
| बाप्पाजी समींदर (वडील) | १७३ |
| दवण्याची रोपं (आईवडील) | २६३ |
| दौलतीच्या भिंती (सासूसासरे) | ३३९ |
| वडीलधारी (गणगोत) | ३८१ |
| चंद्रहार (विविध लेख) | ४१३ |

## या ग्रंथातील संग्राहक

१ श्रीमती बयाबाई पाटील
२ श्रीमती गिरजाबाई केळकर
३ सौ. कुमुदिनी पवार
४ सौ. सजाताई सावंत
५ सौ. गंगूबाई बाबर
६ सौ. सिंधू वारनूळकर
७ सौ. शरदिनी मोहिते
८ सौ. यशोदा पाटील
९ प्रा. गजमल माळी
१० सौ. निर्मला धारप
११ डॉ. सरोजिनी बाबर
१२ डॉ. विमल चोरघडे
१३ सौ. पुष्पा घाटगे
१४ सौ. शांताबाई शिरनामे
१५ सौ. शांतादेवी बाबर
१६ सौ. राजाक्का देसाई
१७ श्री. बाजीगव पाटील
१८ श्री. ना. रा. शेंडे
१९ श्री. बा. शि. पाटील
२० सौ. मालतीबाई दांडेकर
२१ सौ. कमलाबाई बडवे
२२ सौ. नवलबाई शहा
२३ श्री. वि. वा. जोशी
२४ सौ. शशिकला पाटील
२५ प्रा. सौ. विमल थत्ते
२६ प्रा. दा. गो. बोरसे

२७ सौ. जैबुन्निसा खान
२८ श्री. रामकृष्ण आ. कदम
२९ श्री. न. शे. पोहनेरकर
३० सौ. हव्वाबी खान
३१ श्री. राजाराम माने
३२ श्री. वसंत झांबरे
३३ श्री. गो. ल. जमदाडे
३४ श्री. हरिहर मातेकर
३५ श्री. रावसाहेब जगताप
३६ श्रीमती पार्वतीबाई जोशी
३७ श्री. प्रभाकर शिळणकर
३८ श्री. ना. ना. शिंदे
३९ श्री. शं. बा. राजभोज
४० श्री. विठ्ठल भि. वाघ
४१ सौ. इंदिरा कुलकर्णी
४२ सौ. शालिनी घोटे
४३ सौ. सुमन नलावडे
४४ श्री. स. र. बिल्लर
४५ कु. उषादेवी वागल
४६ श्री. ए. आ. गुंजाळ
४७ श्री. प्रल्हाद रं. त्र्यंबके
४८ श्री. पं. ख. नागपुरे
४९ श्री. ना. वि. पांडे
५० श्री. प्रभाकर रा. भामरे
५१ श्री. मा. ल. सोमवंशी
५२ सौ. शुभा वाजपेयी

५३ श्री. रामदास थाकरे
५४ सौ. सिंधू भालेराव
५५ श्री. मा. कृ. कोकाटे
५६ प्रा. प्रभाकर मांडे
५७ सौ. सुमन मराठे
५८ श्री. सु. बा. कुलकर्णी
५९ कु. विद्या देसाई
६० श्रीमती जानकीबाई पाटील
६१ श्रीमती राधाबाई देसाई
६२ श्री. ए. के. घोरपडे
६३ श्री. भाऊ भालेराव
६४ श्रीमती आनंदीबाई शिर्के
६५ सौ. लीलावती पवार
६६ श्रीमती ताई रानडे
६७ कु. चांदबिबी शेख
६८ श्री. रा. श्री. कदम
६९ श्री. बाळासाहेब बारमुख
७० श्री. रमजान खान
७१ सौ. लीलाराजे पटवर्धन
७२ श्रीमती कमलाबाई सावंत
७३ सौ. सावित्रीबाई सावंत
७४ श्री. रा. दा. पाटील
७५ श्री. मारुतराय शं. गवंडे
७६ श्री. के. जे. सावे
७७ श्री. अनंत काणेकर
७८ डॉ. सौ. सविता जाजोदिया




१८२११

सासरमाहेरच्या गोष्टी करीत त्या दिवशी रुक्मिणी आमच्याजवळ घटकाभर बसलीवती. म्हणताना तिनं कोणत्या तेगाऱ्यानं हे बोलणं करावं याचा अंदाज मी आपल्या मनाशी घेत बसलेवते. माझ्या मनी त्या घटकेला गंगेच्या धारेला चमकणाऱ्या पवित्र हिऱ्यागत आणि सागराप्रमाणं पोटात मायेचा साठव करणाऱ्या देसाई नानारायागत वडील घोळतेले. आणि त्रिवेणीचं गोड दूध देणाऱ्या हळदीच्या वेलागत दिसतेल्या आईएकी बेलफूल, तुळशीपान, नारळी असल्या उपमा खेळतेल्या. तर चंदनासारख्या बाप्पाजींच्या आणि गोंधनासारख्या माताभाऊलीच्या सावलीत बसून ह्या रुक्मिणी सुंदरीनं द्रौपदीच्या थाळीगत सरता सरू नये असं बोलणं करावं अशी माझी कल्पना. म्हणून एखाद्या लेंडोरीला पूर आल्यावर तिनं भदाभदा वाजत नर्मदेशी चढाओढ करावी त्याप्रमाणं सगळ्यांच्या वरचढ हिनं बोलावं अशी मी आपल्या मनाशी खूणगाठ बांधली. आणि काशीविश्वेश्वरांच्या या अमरावती बनात सावलीला बसून बाळपणी आईनं दिलेला अमृताचा पान्हा जिभेवर घोळवीत मी आपल्या कवतिकाच्या गोण्या उसवल्या. त्या नादात आपल्या टापाटिपी पदराचा बंदोबस्त केला न् ही नाजुक नार काय बोलतेय ते नीट कान देऊन ऐकावं म्हटलं.

तशी मग रुक्मिणीनं म्हटलं कसं, "काय सांगू गडणी माझा डामडौल. माझ्या जोडव्याला साडे तीनशे मोती गुंफलेत न् बांगडीला एक लाख चंद्रज्योति जडविल्यात ! शप्पथ ! विठूरायाच्या नगरीला भारूभार सोन्याचा कळस आहे न् त्यांच्या पगडीच्या तुऱ्याला नऊलाख मोत्यांचा गुंफा केलाय ! रत्नजडित चंद्रहारानं माझी मान वाकलीय न् माझ्या घराला फुलांची कवलं बसवलीत.

गवंडीदादा न् सोनारदादा आळसलेत एवढ्या हिऱ्यामाणकांची जडणघडण राऊळाच्या कळसावर झालीय! उगीच नाही." ते ऐकून तिच्या पित्या दौलताला कवतीक वाटलं. त्याच्या पोटात तिच्या एकीची माया दाटली न् तो भिम्मकराजा बोलला कसा, "बाळ, मी तुला समींदर आंदण दिलाय!" त्यासरशी आमचं सगळ्यांचं मन मोहरलं न् अंगावर मूठभर मास चढलं. म्हणताना या मायेनं गहिवरलेल्या माझ्यासारख्या लेकीबाळीनं चट्दिशी बोलणं केलं हं—

*फुलामंदी फूल सये उत्तम चाफ्यायाचं*
*सुख भोगावं पित्यायाचं*

त्यासरशी लाखमोलाच्या करवंदी मोत्यांची नथ ल्यालेल्या रुक्मिणीनं हसतमुखानं मान वर केली. पैस मैदान बघून पंढरी वसवून दिलेल्या आणि हळदकुंकवाला म्हणून आळंदी लिहून दिलेल्या बाप्पाजींकडे तिनं अभिमानानं पाहिलं. त्यावेळी जडभारीतोड्यांनी वाकलेल्या तिच्या कोवळ्या हातातील बांगड्या चमकल्या आणि तोडीच्या वाक्यांनी शोभणाऱ्या दंडभुजा सावरीत तिनं त्यांना नमस्कार घातला. तशी तिच्या बाप्पाजींनी तिला गाढ आलिंगन दिलं न् ती पण सुंदरी हसतमुखानं बोलली कशी—

*जाईन माहेरी बाप्पाजींच्या घरा*
*घुसळीन डेरा अमृताचा*

हे ऐकून भिमकराजांचा जीव एवढा झाला. त्यांच्या तोंडावर आनंदाचा मळा फुलला. त्यांचं क्षात्रतेज समाधानानं असं न्हाऊन उठलं की—

*आकाशात तारे त्यांचे ओठ का हालती*
*संगीत गाणी गाती बाळराजा*

हा देखावाच नजरेनं पारखून घ्यावा. तर तो आनंद बघून आमच्या पण आनंदाला उधाण आलं. आणि सांगायचं म्हणजे आम्हाला बघून—

*थुई थुई उडे का ग कारंजे उसळे*
*तुझ्यामुळे उचंबळे तान्ह्या बाळा*

या भावनेनं आम्हाला पोटाशी धरणाऱ्या आमच्या आईपाशी आम्ही मनानं केव्हाच जाऊन बसलो. तिनं बाळपणापासून आमचं केलेलं कवतीक आमच्या मनात घोळायला लागलं आणि आम्ही खुळ्यागत—

*सीतळ सावलीला मी का उतरीते वज्जं*
*विसाव्याचं झाड माजं मायबाई*

आईचा पदर आमच्या श्रीमुखावर ओढला! त्यासरशी त्या मायेच्या उबेनं आमची तहानभूक हरपली न् आईच्या कुशीत शिरत आम्ही तिला बजावलं कसं—

*आई नको धाडू कधी दुसऱ्याच्या घरी*
*बये तुझ्या ग हातची गोड कोरडी भाकरी*

म्हणताना मग आमच्या तोंडावर भावनांचा मळा फुलला आणि आमचे नेत्र—

*काजवे फुलले फुलले लाखलाख*
*पहाया श्रीमुख तान्हीयाचं*

हे सृष्टिसौंदर्य टिपून घेत समाधानानं न्हाऊन उठले....आम्हाला बघून आईच्या नेत्रांची तृप्ती झाली. आणि आमच्या तान्हुल्यांच्या दर्शनानं आम्ही धन्य झालो! त्यावेळी असा आनंद झाला की, माहेरच्या अंगणात जाऊन पोटभर खेळावं न् नाचावं हा मोह अनावर होऊन गेला....वयाचं भान उरलंच नाही जणू! स्थळकाळही लक्षात आला नाही. म्हणताना आपल्या उंच सुरांनी गात आम्ही माहेरघरच्या निरशा दुधाच्या घागरी मनानंच भरल्या देखील आणि सडा रांगोळी करून धरित्रीला आळवीत म्हटलं कसं—

*" कापूस सूताच्यो वाती येद्यो वळीयाले वाती येद्यो*
*वळीयाल्यो वाती येद्यो*
*धरतरी मायेच्या हाती येद्यो पाचा वातीचा दिवा येद्यो*
*पाचा वातीचा दिवा द्यो*
*वळी बाये वळी येद्यो हळदीच्यो वळी येद्यो*
*हळदीच्यो वळी एद्ये*
*धरतरीमाते वळी येद्यो खेळांक आमकां मळी येद्यो*
*खेळांक आमकां मळी द्यो "*

माहेरी जायचं मनात यायचा अवकाश की, लेकी सुंदरीचं आमचं मन हारखून टुम्म होतं. मनाचा पारवा भल्या पहाटेचाच घुमायला लागतो आणि वाऱ्याचे पंख लावून मन केव्हाच आईकडे जाऊन पोहोचतं देखील. अशावेळी त्याला पाखराचे पाय फुटतात आणि ते चिरेबंदी वाड्याच्या कमानी दरवाजावर जाऊन उतरतं. तुझ्या माहेरची वाट कोणती ग ? असा प्रश्न कुणी जर या धांदलीत केलाच तर—

*माहेराची वाट कोण पुसती येसवदा*
*माडी दिसं कळसासुद्धा*

असं उत्तर हे गुंजावणी डोळ्याचं पाखरू देऊउ मोकळं होतं. आणि मग आपल्या भावनेला दृष्ट लागू नये म्हणून लगेच—

*कामा मागं काम लावावी ग कामाची माळ*
*बंधवाची मला ढाल*

हाही खुलासा त्याला करावासा वाटतो. त्या कारणानं वडील म्हणजे डौलदार आंबा आणिक आई म्हणजे गोंडेदार झपाईल तुळस मानून त्या दोघांच्या सावलीत मिळणाऱ्या गडदाबाज झोपेचं सुख भोगायला ते उतावीळ होऊन बसतं. त्यामुळं आपल्याला माहेरी नेणारी धनदौलत—

*नारायणा देवा आगाशी तुझी छाया*
*अमृत द्यावं प्याया भाईराज माझा*

त्याच्या मुखी अशापरीनं गुंजारवते. हे गुज मग निथंच घुटमळतं आणि एखादा दमाचा येणाराजाणारा भेटला तर उंची बदामाच्या झाडाप्रमाणं न् विसाव्याच्या पानमळ्यागत वाटणाऱ्या भाऊरायाला सांगावा जातो—

*दिवस मावळला खाइल्या मळ्याच्या बोरीवरी*
*यावं सारंगी घोडीवरी दादाराया*

त्यासरशी ह्या भाऊरायाला प्रवासात वेळ झाली तर—

*दिवस मावळला माळाच्या कोरनीला*
*चिंता लागली हरनीला*
*मावलीची माया बोरीबाभळीचा पाला*
*करवत लागतो जिवाला*

मातामावलीची अशी गत होऊ नये असं त्याला मनापासून वाटतं. म्हणून लाडक्या लेकीला त्याचक्षणी वाचा फुटते—

*तुझ्या जीवासाठी जीव माझा मी विकीन*
*सावळ्या बंधुराया तुला ताजवा जोखीन*

आणि तिच्या नजरेत त्या घटकेला—

*केवडा केवडा वास दरवळत गेला*
*देसाई बंधुराया देव धावत का आला*

हेही सुख विसावतं. त्यासरशी ही लेकबाळ केव्हाच माहेरी जाऊन पोचते आणि रुणझुणतं पाखरू तिच्या आगमनाची वार्ता गावभर सांगून मोकळं होतं.

*गडणींच्या मेळाव्यात कोण उठून दिसली*
*हिरवा शालू नेसली मैना माहेरी ग आली*

म्हणंताना धुण्याची मोट मोकळी करावी नाहीतर बळताचं तोंड मोकळं होताच हजारो दाणे खाली घसरावते त्या परीनं हिचं मन मोकळं व्हायला लागतं....

"अगबाई ! माहेरी यायचं म्हणजे पदराची नीट बंदोबस्ती हवी गडे. लोक काय म्हणतील ?" माहेरच्या पाणंदीच्या दर्शनानंही माझ्यासारख्या लेकीबाळीचा जीव एवढा होतो. आणि माहेरघरच्या घराण्याच्या चालरीती धा धावून पुढं येतात. आपल्याला बघून जर कोणी—

*हाती कंगण्या दाटल्या जवे दोरे गजरे गोट*
*सुभेदारिणी तुझा थाट मैनाबाई*

असं बोललं तरी देखील—

*उभ्या गल्लीनं जाईन खडा हालेना भुईचा*
*येल शीतळ जाईचा*
*उभ्या गल्लीनं जाईन पदर माजा काकनात*
*आयना माझा दुकानात*
*उभ्या गल्लीनं जाईन मी ग सोडीना पासवा*
*कुण्या गरतीचा कुसवा*

हा डामडौल मला हवा असतो. "अमक्या अमक्यांच्या लेकीचं हे वळण घेण्याजोगं हं" असंच कुणी पण बोलल असा मी आपल्याला धाक लावलेला असतो. जातीसाठी माती खाऊन दिवस काढावेत पण कुळाला बट्टा लागता कामा नये असा आमच्या घरचा शिरस्ता. बाप्पाजीरायांच्या कुळशीलाला कुणी नावं ठेवू नये म्हणून मी आपल्याला चंदनासारखं झिजवीन म्हणते. भरल्या सभेत सारा जाच सोशीन, वर पापणीदेखील उचलायची नाही पण वडील घराण्याला कलंक नाही लागू द्यायची. अंहं ! उलट अशी पण वेळ आली तर मी आपल्या आईला सांगीन की—

*माझे ग मायबाई नको करूस माझी चिंता*
*दिलीस भाग्यवंता लेकं तुझी*

आणीक याउप्पर जर कुठं खटकलंच तर मात्र—

*सासरचे बोल जशा रेशमाच्या गाठी*
*सैल कर माझ्यासाठी भाईराया*

माझ्या भावाजवळ मी मोकळं मन करीन.

पण देवा तेवढीदेखील वेळ आणू नकोस. वेळच्यावेळेला काम करून ऐस. कुणाची बोलणी खाऊ नकोस असं माझ्या आईनं शिकवलंय. तर मी माझ्या लोखंडाच्या बाह्यांना शिणू नकाच म्हणेन. आणि वागेन पण कशी ठाऊक आहे?—

*नाकीच्या नथनीला लावू नये ग टीक फुली*
*आपुन कुळवंताच्या मुली चंद्रभागे*

अशी अशी वागेन. देवाशपथ!

म्हणजे मग माझी आई भेटली की आम्ही दोघी पोटभर बोलू. बसू. आमची प्रीत उफाळून अशी वर येईल मग की—

*भरली किष्णाबाई जशा दुधाच्या उकळ्या*
*ह्या ग मनाच्या मोकळ्या मायलेकी*

जनलोकांनी आमची अश्शी तारीफ करावी. खोटं नाही सांगत. आई भेटली रे भेटली की लगेच—

*उगवला नारायण किरीट किरणांचा*
*पाखरा फुटे वाचा झाडावरी*

असं घडून येईल! माझं भरलं काळीज भावनांच्या गोण्या उसवीत बसेल न् रात्रीचा चंद्र कलता होईपर्यंत देखील आमच्या गुजाचा झाडा होणारच नाही! त्यामुळं मग आमचं बोलणं—

*पावसावाचून कसा भरारेल मळा*
*कंथा ग वाचून कामिनीला न्हाई कळा*

असं हावशा कांतापासून तो पार नणंदाभावजईच्या गोष्टी काढीपर्यंत आपलं चालतच राहिलं....

पण हा सगळा मनाचा खेळ अवचितच उलगला! माझ्या तान्हुल्याचे पैंजणवाळे झणकारले न् मी एकदम या समाधीमधून उठले....अजून माझे दादाराया न्यायला यायचे होते आणि मग माहेरी जाण्याच्या गोष्टी पुढं यायच्या होत्या, याची जाणीव झाली. त्यासरशी माझं अंग एकदम शहारलं. सासूबाई परवानगी देतील तरच सगळी गोष्ट होती ना! म्हणताना खरं सांगायचं तर—

*कारल्याचं आळं लाव ग जू*
*मंग जा तू तुपल्या माहेरा*
*कारल्याचं आळं लावलं व फुईजी*
*बंधु आले न्यायजी*
*मी जाते मपल्या माहेरा...*

हे गीत कारल्याचं बी लावून तो पार कारल्याची भाजी करून ती खाऊन होईपर्यंत माहेरी जायला परवानगी न देणाऱ्या सासूबाई नजरेपुढं उभं करतं झालं न् मेली एकदम हाबकीच बसली! डोळे एकदम पाणावले आणिक—

*समींदर उचंबळे होता चंद्राचे दर्शन*
*लेकवाळ हेलावते होता मातेचं सुंवरान*

*किती ओव्या गाऊ मी ग मावलीचं रीण*
*हे ग कुणा मोजवती वाळवंटातील कण*

*किती किती गाऊ मावलीच्या त्या प्रेमाला*
*कोण प्रदक्षिणा घाली आकाशाच्या त्या सीमेला*

ह्या कल्पनेनं जीव पार म्हणजे पारच उडून गेला....अंधारात दिवा असावा न्

प्राणाला हवा लागावी त्याप्रमाणं मला हव्या वाटणाऱ्या आईला केव्हा भेटेन असं झालं....पण बोलायचं कुणी न् कसं इथं देवा !

सासरच्या वाटेला कुचूकुचू काट्यांचं रान आणि माहेरच्या वाटेला मऊ रेशमी हिरवळ ही भावना बाळपणापासूनच भोंडल्याच्या गीतानं आम्हाला शिकवलेली. आणि तेव्हापासूनच सुग्रिणीचा हात शिणगारत जाऊन—

*अक्कण माती चिक्कण माती ओटा तो मळावा*
*अस्सा ओटा सरस बाई जातं ते रोवावं*

*अस्सं जातं सरस बाई गहू ते दळावे*
*अस्से गहू सरस बाई करंज्या कराव्या*

*अश्शा करंज्या सरस बाई दुरडी भराव्या*
*अश्शा दुरड्या सरस बाई माहेरी धाडाव्या*

असल्या भावनेनं आमच्या मनात तेगारानं ठाण मांडलेलं. त्या कारणानं सासूबाईंनी न् मामासाहेबांनी माहेरचं मूळ परत धाडू नये म्हणून दारी श्रावणाची पागोळी ठिपकल्या पासूनच मी तरी देवाला नवस बोलले बाई. म्हटलं की, यावेळी संक्रांतीला चांगलं वाण वाटीन सवाष्णींना न् घरच्या चुड्याला उदंड आयुष्य मागीन. त्यासाठी मी वेळ पडली तर सासूबाईंचे पाय लोणी लावून रोज चोळीन ! हो, पण माहेरी जाईन तरच नावची ! !

पण आमच्या सासूबाई स्वभावानं इतरांच्यापेक्षा थोड्या बऱ्याच म्हणाव्या लागतील. कारण—

*सासूचा सासुरवास नणंदा तुम्ही हळू बोला*
*माझा दमून भागून कंथ बाहेरून आला*

या आमच्या भावनेची त्यांना कदर आहे. शिवाय—

*लगीनसराई कापडाची महागाई*
*नेस नेस सूनबाई माझा पीतांबर*

अशी देखील त्यांना हौस आहे. त्यामुळं एखादेवेळी—

*माझ्या घरी ग पाहुणी  जिलबी केली ग साईची*
*भैन लाडकी आईची  मावशीबाई*

*आम्ही दोघी घरी  जावाजावांचा ग जोडा*
*कोथिंबीरी चुडा  भरीयेला*

*साखरेचे लाडू  घरामधल्या पाहुण्यांना*
*बाप्पाजी देसायांना  करीयेले*

अशा कवतिकालाही त्या मागंपुढं पाहात नाहीत. त्या कारणानं त्यांचा राग येत नाही. उलट कधी कधी—

*काय मी पुण्य केलं  आईपरी सासूबाई*
*कमळी अंबाबाई  पूजीयेली*

*काय मी पुण्य केलं  बापासारखा सासरा*
*सरीखाली ग दुसरा  चंद्रहार*

*मामंजी सासूबाई  तुम्ही तुळशीची झाडे*
*आम्ही तुमच्या उजेडे  राज्य करू*

असा दिमाख मिरवताना अभिमानही वाटतो. काही म्हणजे काही उणं वाटतच नाही. पण ह्यांना आम्ही माहेरी जायचं म्हटलं की, ह्यांचं पित्त उसळलंच म्हणावं. अगदी! मी म्हणते हा दुष्टावा काय म्हणून? कशासाठी? तुम्ही नव्हता जात आपल्या माहेरी? आठवावं की आपलंही थोडं! एकदमच सासूबाई तरी नाही झाल्यात म्हणावं तुम्ही! ह्यांच्या म्हणण्याप्रमाणं आम्ही कायम सासुरवाशिणीप्रमाणं वागावं. आणि जगानं मात्र नेहमीच—

"हसावयाचे, पण दात दिसू द्यावयाचे नाहीत; फिरावयाचे, पण ते घरातल्या घरात, उंबरठा ओलांडावयाचा नाही; पाहावयाचे, पण मुख वर न

उचलता. ही वागणूक कुलवधूंची."[१] जुन्या काळचे हे दाखले देत असं फार पूर्वीपासून चालत आल्याच्या खुणा सांगाव्यात. अशावेळी डोकं असं भडकून जातं की, सासरचं माणूस दिसलं तरी माथेशूळ उठावा! शप्पथ! आम्हाला मेला जसा जीवच नाही! छे! अशावेळी वाटतं की—

*घराचा घरधंदा मी करते*
*पाण्याला एकली जाते*

*जीव बाई करींदिरा कामानी*
*जाते माहेराला....*

*कधी मी सोडिली का घराची पायरी*
*कधी ती भेटली का आई माझी सोयरी....*

असली भाषा त्यांच्या कानावर दाबून घालावी! मग काय व्हायचं असेल होऊ दे खुशाल. नशीब तर चोरून नेत नाही कोणी? मग झालं तर.

अहो, माहेरचं मूळ दारी सारखं का येतं म्हणे! आता ग बाई! आहे म्हणून येणार कुणी पण. तुमचं काय गेलं? फार फार तर—

*शेवया बोटव्यांनी उतरंड्या आगाशी*
*भाऊ निगाला उपाशी*

*घरी वासाचे तांदूळ काय करता असून*
*सासुरवाशी भैन*

---

१ हसीअं अदिट्ठदन्तं, भमिअमणिक्कन्तदहेली देसम्।
दिट्ठमणुक्खित्तमुहं एसो मग्गो कुलवहूणम्॥ २५॥
हसितमदृष्टदन्तं भ्रमितमनिष्क्रान्तदहेलीदेशम्।
दृष्टमनुत्क्षिप्तमुखमेष मार्गः कुलवधूनाम्॥]
गाथासप्तशती. पा. १४५. श्री. स. आ. जोगळेकर.

*आंब्याच्या सावलीत कोयाळ बोले राधा*
*उपाशी गेले दादा*

अशीच पाळी येईल नाही का? येऊ दे की! असंही आहे न् तसंही आहे. भ्यायचं कुठंवर? माझे आईबाप तर खंबीर आहेत! बास मग—

*उंच उंच चोळ्या घरा मागली शेजी लेती*
*मावली बयाबाई तिच्या परास चड घेती*

अशी पुष्कळ आहेत माझी मला माणसं. बसा म्हणावं आपलाच हेका धरून! उद्या बघू तुमच्या लेकीवर हीच वेळ येईल तेव्हा!

झिणकारल्या पायांच्या नणंदबाईच्या लग्नाची भाषा निघाली तेव्हा केवढी दांडगी बोलणी निघालेली!....लेक द्यायची कुठं? तर काय म्हणे—

*बाभळ बाईचा बाईचा हिरवा पाला*
*कोण्या देशीचा देशीचा जोगी आला*
*त्याची किंगरी किंगरी नानापरी*

*लेक जायाची जायाची कोणा घरी*
*लेक जायाची जायाची बामण घरी*

*बामण घरी नको ग माय*
*सडा टाकिता पराण जाय...*

असलं काही नकोच. झाडून सगळ्या जाती अशाच कामावरून नाकारल्या आणि कुळशील बघून लेक द्यायची हा बेत पक्का करीत काम नसेल तिथं द्यावी मुलगी हा निर्णय घेतला गेला! मग? आम्ही काय हाडामासाच्या मुली नाही तर आमच्याएकी एवढा राग? बरंच्या बरं इथं तरी सुख आहे म्हणून. नाहीतर एखाद्या वेळी—

"पतिविरहामुळे क्षीण झालेली सून सासूच्या पाया पडण्यासाठी वाकली

तेव्हा बिचारीच्या दोन्ही हातातील बांगड्या गळून पडल्या. सासू खाष्ट होती तरी हे बघून तिला रडे कोसळले."[1]

हा असा प्रसंग उभा रहायचा न् आम्ही दोघी पण माहेरच्या आठवणीनं स्फुंदायच्या! तर काय? सासू झाली तरी सासुरवाशिणच की!....मालकीण झाली म्हणून काय माहेर विसरणार? छे!—

*चंद्राच्या प्रकाशी   लोपून जाती तारा*
*माहेरापुढं तोरा   मिरवू नये*

असंच कोणीही म्हणणार. आणि मग—

*पैली माझी ववी   सोळा सत्रा कोशींबीरी*
*आज माज्या घरी   भाऊबीज*

या गोष्टीतला आनंद आमच्याप्रमाणंच त्यांना पण नाही होणार? नाही कसा? होणारच. आम्ही उतावीळपणानं बोलतो न् त्या वयोमानाप्रमाणं बोलून दाखवीत नाहीत एवढंच म्हणावं फार तर. नाही का?

मला माहीत आहे की परवा रवा काढायला घरी दळण घातलं तर सासूबाईंनी—

*हौस मला मोठी   ताईबाईला आणावी*
*नवी पालखी विणावी   रेशमाची*

अशी भाषा केलीवती न् नेमक्या त्यावेळी आमच्या दारावरून—

---

१ अइ कोवणा वि सासू रुआविआ गअवईअ सोह्राए।
पाअ पडणोण्णआए दोसु वि गलिएसु वलएसु ॥ ९३ ॥
[अति कोपनापि श्वश्रू रोदिता गतपतिकया स्नुषया।
पादपतनावनतया द्वयोरपि गलितयोर्बलययोः ॥]

गाथासप्तशती. पा. ३२६. श्री. स. आ. जोगळेकर.

*माझ्या ग दारावरनं  कोण गेला झपाट्याचा*
*कुसुंबी मंदिलाचा  काका राया*

माझे चुलते चालले होते. त्यांनी ते ऐकलंवतं! हो! तर आमचं काय म्हणणं की लेकीत न् सुनेत भेदभाव करूच नाही. घरादारात उलट--

*गोटपाटल्यांच्या  ह्या ग लेकी कुणायाच्या*
*सासू ग मालनीच्या  लेकी सूना*
*माझ्या आत्याबाईंची  वडील सून कोण*
*कारल्याची खूण  चंद्राबाई*
*आले आले पटवेकरी  पटवाया काय देऊ*
*बाजूबंदा गोंडे लावू  सूनबाई*

असा प्रसंग लोकांच्या नजरेत यावा. नव्हे खरं का खोटं? त्यात जो आनंद आहे तो या धुस्वासात नाही बाई. आमच्या कानावर—

*दारी आला वैराळ  टाका बसाया घोंगडी*
*चुडा भर नागमोडी  मैनाबाई*

आमच्या आईप्रमाणं ही भाषा सासूबाईंची पण व्हावी तर आम्हाला खरं भूषण! कारण चिंचेच्या पानावर आम्ही घरधन्याला चिठ्ठी धाडणाऱ्या तर आमच्यावर पण त्यांचा जीव हवाच की! अहो, तुमच्या दारी चाफा उभा राहिला म्हणूनच ना आम्ही जाईजुई होऊन आलो इकडे? मग?

पण हे बोलायचं कोणी न् कसं? ज्याचं त्यानं समजून घ्यावं हे चांगलं. आईबापांना आमच्या एकी अपयश नको, म्हणून आमचा आपला आनंद खरा असा एकच—

*सात जन्मांची ग  पुण्याई आली फळा*
*आमच्या कुंकवाची कळा  सूर्यावाणी*

आपल्या मुलाबाळांना कुणी नावे ठेवू नये म्हणून आईवडिलांनी नेहमीच काळजी घ्यावी अशी जगरहाटी आहे. या गोष्टीला प्रत्यक्ष कृष्णदेवही अपवाद नाही तर! लहानपणी आपल्या बरोबरीची अशी गौळवाड्यातील मुलं गोळा करून मनाला येईल तिकडं भटकत फिरायचा हा कृष्णदेवाचा स्वभाव. तर एकदा काय गंमत झाली की, मथुरा सोडून कृष्णदेव सागर किनाऱ्यानं आपला फिरायला गेलेला. बरोबर पेंद्या न् बाकीची सगळी. होता होता मग काय झालं की, ही मंडळी आली पार गोमांतकात. तिथं आली तर फिरून फिरून कृष्णदेव थकून गेलेला. भूक लागलेली. तशी एवढंसं तोंड करून सगळेजण जंगल तुडवीत चाललेले हं! तेवढ्यात काय चमत्कार झाला की, मथुरेच्या नंदाच्या घरी यशोदामाईला हे कळलं. त्यासरशी तिला एवढा प्रचंड पान्हा फुटला की, ते दूध पार गेलं कृष्णदेव होता तिकडे धावतपळत? इतकं की, डोंगर-कडे ओलांडीत धबधबा होऊन!! जसा काय दुधाचा लोट कृष्णदेवाच्या पुढ्यात आला न् दूधसागरात तो न्हाऊन गेला. का तर त्यानं कुणाला काही मागू नये न् त्याकारणानं त्याला कुणी नावं ठेवू नये ही आईची भावना हं त्याच्या!

आणि खरं सांगायचं तर ही गोष्ट काही कृष्णदेवाच्याच घरी घडली असं नाही. प्रत्यक्ष चंद्रसूर्यांच्या आईनंही पोरांना असं नाही असं वागावं म्हणून शिकवलं ते! खरं ना! म्हणजे त्याचं काय झालं की, चंद्र, सूर्य, अग्नि न् वायू ही घरी लहान लहान मुलं हं! घरात एकली म्हातारी आई. तर एकदा काय झालं की, एक श्रीमंत माणूस त्यांच्या घरी आला. लाखोपती असा. आणि ही म्हातारी तर अगदी गरीब. आता काय करावं? "का बाबा येणं केलंस?" म्हातारीनं त्या बाबाला आपलं विचारलं. तशी तो काय म्हटला की, मुलांना घरी जेवाय पाठवावं. अन्नकोट घातलाय. पण ही काय म्हणाली की, पोरं लई लहान तर कशाला उगीच बोलावता? तर हा म्हटला की, कसंबी करून लावून द्याच पोरांना. मग ही बरं म्हणाली. आणिक पोरं खरंच जेवायला निघाली. तशी म्हातारीनं म्हटलं कसं, "लई वचावचा खाऊ नका. दंगा करू नका.

नावं ठेवतील माणसं असं वागू नका न् आईची आठवण ठेवा." तर पोरं बराय म्हटली न् गेली.

होता होता जेवणं झाली. पोरं दाबून जेवली न् घरी आली. तर म्हातारीला सूर्यानं, अग्नीनं न् वायूनं म्हटलं कसं, "आई आई, आमी लई जेवलो. दाबून. खूप खूप उड्या मारल्या न् घर डोक्यावर घेतलं." तशी म्हातारी म्हटली, "आईची आठवण आली न्हाई?" त्यावर ह्यांनी 'अंहं!' केलं. पण चंद्र पुढं सरसावला. म्हणाला की, "मला आली तुझी आठवण. मी थोड जेवलो. सगळ्यांच्या बरोबर शांतपणे वागलो न् ही बघ तुला मिठाई आणलीय." त्या सरशी म्हातारी हारखून टुम्म झाली न् तिनं चंद्राला आशीर्वाद दिला, "दुनियेचा लडका होशील. समाधान पावतील माणसं तुला बघून. कुणाच्या डोळ्यात खुपायचा नाहीस." पोटाशी धरलं. त्याच्या अंगावर काळा भर्जरी शाल्र घातला. मग तिनं बाकीच्या तिघांना सांगितलं हं जरा रागानंच. म्हणाली, "जा! चालते व्हा. दुनियेला तुमची गरज लागेल. पण तुमच्या नजरेला नजर द्यायची कुणाची हिम्मत होणार नाही. आईचं ऐकत न्हाई म्हणजे?" झालं—सगळे चापचूप बसले, पण आईचा आशीर्वाद सगळ्यांना भोवला. अगदी ती म्हणाली तसा.

पण आई यापेक्षा जास्त रागवूच शकत नाही. अं हं! आपल्या मुलांचे अपराध पोटात घालून ती त्यांच्या उत्कर्षाचाच विचार करते. म्हणून मुलं वाईट निघाली तरी आई कधी वाईट असू शकत नाही म्हणतात.

त्यामुळे "दहा उपाध्यायांपेक्षा आचार्य श्रेष्ठ. शंभर आचर्यांपेक्षा पिता श्रेष्ठ आणि हजार पित्यांच्यापेक्षा माता श्रेष्ठ" असल्याची ग्वाही मनूने दोन हजार वर्षांमागे देऊन टाकली आहे.[१]

आईची ही थोरवी गात असताना महाभारतामध्ये असा उल्लेख आलेला आहे की, "मातेसारखी सावली नाही. मातेसारखी गती नाही. मातेसारखे

---

१ उपाध्यायान् दशाचार्य आचार्याणां शतं पिता।
सहस्रं तु पितॄन् माता गौरवेणातिरिच्यते॥ मनु. २. १४५.

छत्र नाही. मातेसारखी प्रिय दुसरी कोणतीही व्यक्ती नाही."[1] म्हणून अमूक एक गोष्ट चांगली व्हावयाची तर ती आईच्या मायेने व्हावी अशी अपेक्षा देवदेवतांचे पुढे देखील मानवाने व्यक्त केलेली दिसून येते.

त्यामुळे ऋग्वेदामध्ये "माता जशी मुलाला धारण करते तशी ही धनुष्याची दोन टोके राजाला धारण करतात."[2] आणि "माता जशी बालकाला पदराखाली झाकते तशी हे पृथ्वी तू याला झाक."[3] अशा अपेक्षा व्यक्त केल्या गेल्या आहेत.

आईप्रमाणेच वडिलांचेबद्दलही अशाच भावना प्रकट केलेल्या आढळून येतात. पण इथे लडिवाळपणापेक्षा जीवनातील भव्यतेचीच अधिक कल्पना येते. आईपेक्षा वडिलांचा धाक मुलांना म्हणून या परीच्या प्रकटीकरणातही स्वाभाविकपणेच फरक पडलेला दिसून येतो. ऋग्वेदामध्ये वडिलांसंबंधीचा प्रकट झालेला मनोभाव असा आहे—

"बाप जसा मुलांचे ऐकतो तसे हे इंद्रा, तू आमची प्रार्थना ऐक."
"पिता पुत्राला जसे धन देतो तसे हे इंद्रा, तू आम्हाला दे."
"पित्याचा सहवास मुलाला जसा सुखकर होतो तसा तुझा सहवास होवो."
"पिता जसे मुलाचे बळ वाढवितो तसे हे देवा, तू माझे बळ वाढव."[4]

---

१ नास्ति मातृसमा छाया।
नास्ति मातृसमा गतिः।
नास्ति मातृसमं त्राणं।
नास्ति मातृसमा प्रिया॥ (महाभा. १२·२६६·३१)

२ मातेव पुत्रं बिभृतामुपस्थे। (ऋ. ६·७५·४)

३ माता पुत्रं यथा सिचाऽभ्येनं भूम ऊर्णुहि (ऋ. १०·१८·११)

४ पितेव नः शृणुहि हूयमानः। (ऋ. १·१०४·९)
इन्द्र क्रतुं न आभर पिता पुत्रेभ्यः यथा। (ऋ. ७·३२·२६)
पितेव सोम सूनवे सुशेवः। (ऋ. ८·४८·४)
पितेव यस्तविषीं वावृधे शवः। (ऋ. १०·२३·५)

लोकगीतकारांनी वडील रंगविले ते आणखी काव्यात्मक नजरेने असे. वडिलांची कर्तबगारी शेतीच्या भरभराटीवरून सांगितली न् सोन्याचीं अंगठी गव्हाची रास मोजताना हातात झिजून गेल्याची अपूर्वाई ऐकविली. शिवाय—

*पाणी वरून पडतं धरी मिरची फुलोरा*
*भरायला मोतीचुरा*

असा त्यांचा लौकिक मोठ्या भक्तिभावानं आळविला. आणि आपल्या लेकी-बाळींच्या एकी—

*जावई राजइसू परसदारीचा मोगयीरा*
*माजी बाळाबाई जाई गुतली पदयीरा*

*जावई राजसाचं चिरेबंदी हाई जोतं*
*बाळाई तोंड धुती पाणी अंजीरा झाडा जातं*

अशी कवतिकाची भाषा त्यांनी केल्याचा निर्वाळा दिला.

त्यामुळं माहेरचं सुख सांगताना ही सासुरवाशीण सखुबाई साजणी बोलते कशी—

*नेणंता मुराळी ग येतो वाटेनं खेळयीत*
*ढग वळवाचा गळयीत जरी पटका लोळयीत*

*किती वाट बघू बाप्पाजींच्या ग गाडीची*
*सावली कलली उप्पर ग माळीची*

*कळी पाटल्याचा हात हात माझ्या दरोजाले*
*किती हाका मारू माता माय गिरजाले*

*गवयीऱ्याच्या गाई चरती रानायात*
*पोळ्या बांधल्या पानायात मायबापाजींले*

✤ ✤

"बागणी गावात घातलं आळं, कवठ्यात गेली मुळी, त्येची झाली तुळी, तुळीचा बांधला बंगला, चांदीचं कुलूप, सोन्याचा हात, आतल्या खोलीत जिरेसाळीचा भात, भातावर घातलं तूप, तुपासारखं रूप, रूपासारखा जोडा, चंद्रभागेला पडला वेडा, चंद्रभागेत काचेची न्हाणी, आधी होते आईबापांची तान्ही न् आता झाले अमृतराव पाटलांची राणी." अशा प्रकारचा उखाणा घालीत एखादी सासुरवाशीण आपल्या बाळपणीच्या कवतिकाच्या गोष्टी सासरी करायला लागली म्हणजे भोवतालचं वातावरण कसं खुलून जातं. आणि मग तिच्या—

*"चांदीचं ताट लाडवानं भरलं काठोकाठ बंधुजी बसले जेवायला*
*तर शिवाजीराव तुम्ही समया लावा तीनशे साठ"*

या देखण्या बोलण्याचा अर्थ आपोआप उमजू लागतो. एवढंच नाही तर—

*"गुलालाच्या राशीत पाय टाकते जपून कीर्तीरावांचं*
*नाव घेते चंद्रसूर्य गेले लपून."*

याही कल्पनेची भूल ऐकणाराला पडल्याशिवाय राहात नाही. त्या कारणानं ह्या पोरीच्या—

*जातीसाठी माती ती ग खाताना लागं वाळू*
*पित्या माज्या दवलता ढाण्या वागा मी तुमचं बाळू*

या अभिमानाचा त्याला हेवा वाटतो. आणि मग—

कण कण कुदळी, मण मण माती, चंद्र उगवला बघा तुमी मध्यान रात्री" या कोड्याचं उत्तर देत उंबराचं फूल दिसावं त्या रीतीनं खुशीत आलेल्या ह्या लाडीचं कवतिक करायचा मोह त्याला होतो. त्या नादात—

*पावना आला म्हनू नंदकामिनीचा पती*
*ह्या ग हौशाला विचारीते सोप्या समया लावू किती*

ही हौसमौज नखऱ्यानं पुढं येते आणि हिला तिच्या चुलत्यानं आंदण दिलेला

पानमळा त्या घरी मोहरून उठतो. चारी बाजूंनी फुलतो. दाट सावली घेऊन येतो. तर त्या धांदलीत ही मैनाराणी—

*पावना माजा बंदु   जिवा माज्याचा गोंदूळ*
*दारी वाळत्याती   अनारशाचं तांदूळ*
*माज्या बंदूची कदर   माजी मलाच ग ठावी*
*तुपा भरीयली वाटी   वेलदोडं तोंडी लावी*
*आंब्या मोरयाचा भात   टेवते आदान मोईनीचं*
*पावनं मला आलं   बाप्पाजींच्या ग गोंताचं*

या सुखाच्या गोष्टी करीत रहाते आणि आपल्या बाप्पाजीबयाचं एकेक आठवीत सुखावते. अशावेळी तिचा जीव आनंदानं भरून येतो न् ती माहेर-पणाच्या गोष्टी करताना म्हणते कशी, "ऐका ग ऐका गडयिनू. एकदा काय मज्जा हं! भैन गेलती भावाच्या घरी पावनी. दारात भावजरानी. तर हिला बगून ती कशी म्हणती, 'का आलाजी दिवाणसाब अशा अवचितच?' त्यावर हिनं काय उत्तर केलं की, आलेवते सगळी बघूशी वाटली तर!" आता या उप्पर हिनं तिला सरळ 'या', 'बसा' असं काय म्हणावं, बसाय घोंगडं टाकावं, पाण्याचा तांब्या हाती द्यावा; का आपलं, "काय सांगू दिवाणसाव तुमानी?....अवो, बसाय जागा दिला असता तर जागा हाय वछा न् भाकरी करीन म्हटले असते तर तवा की वो वाळून खाल्ला! आता वो?" असं बोलून पावणीची पर्वा राखू नाही? बाईच जहांबाज. म्हटली बाई तशी दाबून. त्यासरशी भावाच्या भैनीचा झाला हिरमोड न् ती आल्या पावलीच आपली गेली माघारी निघून.... निघून गेली तर भावाला हे कळलं शेतावच. काय? शेताव कळलं म्हणताना भाऊ कुरुंदानं दाटला न् आता आईबा रागाला येतील तर आपणच युक्ती करावी म्हटला. नव्हं सहा कोसावच्या आईबाला कळाय वेळ लागणार काय? छे! तर हा आपला घरला आला ते गाडीबैल जुपूनच. आणि घराजवळ आला तशी दारातूनच बोलला हं! म्हणाला कसा, "अग अग! तुज्या म्हायारच्या

घराला आग लागली म्हनत्यात!" तशी ती ऊर बडवून घेत न् आरडत वरडतच भाईर आली. तिनं सगळं घर पालथं घातलं. भांडीकुंडी, धडूतकपडा, धान्यधुन्य, काय हाय न्हवं असं आपलं सारं गोळा केलं न् गाडीवर बांधलं! तर लोकं काय म्हटली की, हे कशापाई? मग ह्येनं वायकूला म्हटलं त्येचीच पुन्हा री वडली न् गाडीबैल उधळीत निघाला. ही संगं येते म्हटली तरी नको म्हणाला.

होता होता काय झालं की, भाऊ भैनीच्या घरी आला. ऐन दुपार झालेली. ऊन रणरणतेलं. आणिक भाऊ अवचितच आलेला. तशी भैन गेली घाबरून. काय झालं गा म्हणाली. मग भाऊ गाडीवरनं खाली उतरला. भैनीच्या अंगणातील झारीनं रांजणातलं पाणी काढलं. हात पाय धुतले. चूळ भरली. जेवला खावला. सगळी बेस हाईत म्हटला न् एकदमच उठला ते पायानंच पळत सुटला!

"अगबाई!" भैनीला पडलं कोडं न् ती भावाला हाळी देत त्येच्या मागनं पळत म्हणाली कशी, "दादा, ह्या गाडीबैलांचं काय गा? घेऊन जा की!" तशी भावानं मागं वळून बघितलं न् बोलला, "असू दे सारं. तुज्या वाच्या घरचं हाय. तुजं तुला दिलंय मी!" आणिक गेला की आपला पुढंच....भैन काय समजायचं ते समजली न् तिनं बाला सांगावा दिला की, अशानं असं झालंय तर लवकर या म्हणावं म्हणून.

इकडे तोवर ह्यो भाऊ माघारी आला. तर त्येची बायकू दारात वाट बघत बसलेली. ह्याला बघून ती काय म्हटली, "बेस हाईत का वो सगळी?" तशी ह्येनं 'होय' म्हटलं. म्हणताना वाईच खुशीत येऊन तिनं काय विचारलं, "आणि गाडीबैल जी? ठिवून आला काय कुठं?"

त्यावर हा बाबा बोलला, "ऐक. काय सांगू तुला म्हणतीस? असं वारं सुटलं, असं वारं सुटलं की, बैल उडून गेले न् नदीनाल्याला असं पाणी उसळलं की, गाडी पार वाहून गेली." म्हणताना ती काय म्हणाली, "असं कुठं झालंय काय? काय बाई आक्रीतच म्हणावं तरी?" त्यासरशी ह्यानं पण तिला सुनावली, 'असंबी कुठं न्हाइ झालं. बसाय जागा दिला असता तर जागा हाय वळा न्

भाकरी करीन म्हटलं तर तवा वाळूनं खाल्ला!" आणि मग ती अशी खजील झाली की काय सांगावं देवा?"

तर अशावेळी तिचा जीव सुखावतो आणि माहेरच्या मोठेपणानं ती भारावून जाते. काय बोलू न् किती बोलू याचं तिला कोडं पडतं. म्हणून मग तिच्या सख्या साजणींना--

"बालक, तिच्या डोळ्यात अश्रू दाटले आहेत व त्यामुळे तिची नजर जड झाली आहे. सुस्त नजरेने, पण उत्कंठतेने ती पुनः पुनः तुजकडे पाहत आहे, तिच्या त्या दृष्टीने काय सांगितले नाही?"[१] असे काही बोलायचा तिला मोह होतो. आईवडिलांच्या अशा दाटल्या उमाळ्याने त्यांनाही या भावनोन्मेषाचा आस्वाद घ्यावासा वाटतो. त्यामुळे त्यांच्या मनीची ही भावभावना कल्लोळत सांगू लागते—

*माजा ग मायबाप   काशीखंडाचा केवयीडा*
*दोघांच्या सायासाचा   माजा जलम येवयीडा*
*माजा ग मायबाप   दोनी काशीचं बुरायाजू*
*माजा त्यो वंदुराया   वर पाण्याचं कारायांजू*
*चंदन चंदन   चंदनाची ती बारा नावं*
*मायबापायांच्या   मैलागिरींच्या पोटा यावं*
*तांबड्या मदिलाचा   वाटं निराळा कोण झाला*
*मावलीच्या पोटी   पुत्र गिन्यानी जलमला*
*हृदय हुंकाराचा   माज्या हुरदी झाला पेडा*
*सत्‌गुरुंनी तरी माज्या   बरमरसाचा दिला काडा*

---

१ ण अणब्भन्तर घोलन्तबाहभर मन्थराइ दिट्ठीए।
पुणरुत्त पेछिरीए बालआ! किं जं ण भणिओसि ॥ ७१ ॥
नयनाभ्यन्तरघूर्णमानबाष्पभरमन्थरया दृष्ट्या।
पुनरुक्त प्रेक्षण शीलया बालक किं यन्न भणितोऽसि ॥
गाथा सप्तशती पा. २५१ स. आ. जोगळेकर.

आणि मग—

*दिव्याला भरायान   घाला दिव्याला जोडवात*
*वडील मैनी ग   गुज बोलू या सारी रात*

अशा भावनेची घट्ट पायाभरणी होत जाते. त्या सरशी जरीमंदिलाचा भाऊ झुकत झुकत हिच्या गावी येतो. हौसेच्या मावळणीनं गौळणी काढलेल्या कशीद्याचा खण त्याच्या हाती दिसतो. चिंचेच्या पत्रावळीवर जेवणारी भाचीबाळ त्याच्या धोतराच्या घोळात घुटमळलेली दिसते. आणिक सांगावा काय येतो तर—

*अंबारीच्या हत्ती साजासकट उबा केला*
*वडील बोलत्याती बाळ अदान दिला तुला*

म्हणताना ही मैनाराणी उठते न् माहेरी जायला निघते. घरच्या लोकांची परवानगी घेत असताना दिवस मावळायला येतो आणि वाऱ्यासंगं बातमी येते की—

*गावाला गेला कुणा माज्या अंब्याचा टगळा*
*माज्या बाळीपाशी जीव लागला सगळा*

त्यासरशी घारीप्रमाणं ही लेक मायबाईला जाऊन भेटते. आणि—

*सुक्दुकाच्या हुरदी   बांदल्यात मी ग पुड्या*
*माजे तू मायबाई   बस सोडीत थोड्या थोड्या*
*सुक सांगताना   दुकाला भर आला*
*पिता राजस दौलत   नेत्राला लावी शेला*
*उजेड पडला   चांदापरीस चांदनीचा*
*माय माज्या मावलीचा   चुड्या मागल्या कंगनीचा*

या भावसागराला प्रचंड भरती येते. सारे माहेर जणू त्या कारणाने सुखावते

आणि मग बहीणभावाची दृष्टभेट होताच सुखदुःखाच्या होड्या मनी दाटलेल्या तुफान वादळातही तरंगत रहातात. आणि—

*नारायणा देवा आगाशी तुझी छाया*
*अमृत द्यावं प्याया बंधुरायाला*
*तुमच्या जिवापायी होईन वनीची हरीण*
*सावळ्या चंदुराया तुम्हाभवती चरीन*

हे बघून ह्या राजसबाळीचे आईवडीलही विलक्षण सुखावतात. त्यांचे मन एवढे संतोष पावते की त्यावेळी या आनंदाच्या भरात—

*आऊक्षाच्या दोऱ्या माझ्यावरी फेकिल्या*
*लाडक्या बाळराजा तुम्हावरी म्या झोकील्या*
*आगाशीचा चांद का ग थांबला दारापाशी*
*सांगते मैनाबाई मायलेकींना पाह्यासाठी*

या सुखाच्या राशीवर त्यांना डौलाने उभे रहायचा मोह व्हावा! त्यामुळे या तीर्थांच्या सागरांना दंडवत घालताना हे बहीणभाऊ आपल्या नेत्रातील टपोऱ्या मोत्यांची ओंजळ त्यांच्या चरणी अर्पण करीत आपल्याच मनाशी बोलतात कसे, "एक वेळ चंद्राची कांती त्याला सोडून जाईल, हिमालयावरचं बर्फ वितळून जाईल, सागर सीमा ओलांडून जाईल पण आम्ही बहीणभाऊ आमच्या मातापित्यांच्या आज्ञेचं कधीही उल्लंघन करणार नाही."[1]


---

१ लक्ष्मीश्चन्द्रादपेयाद्वा हिमवान्वा हिमं त्यजेत।
अतीयात् सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः॥
(रामायण २·११२·१८)



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि ...
क्रमांक २०१० नों दि २३/३/०९

# खजिन्याची पेटी



## (आई)

# अनुक्रम


श्रीमती बयाबाई पाटील, पेठ, सांगली ∷ श्रीमती गिरजाबाई केळकर, जळगांव
∷ सौ. कुमुदिनी पवार, चितळी, सातारा ∷ सौ. सजाताई सावंत, बागणी, सांगली
∷ सौ. गंगूबाई बाबर, पुणे ∷ सौ. सिंधू बारनूळकर, कोल्हापूर
∷ सौ. शरदिनी मोहिते, सांगली ∷ सौ. यशोदा पाटील, बागणी, सांगली
∷ प्रा. गजमल माळी, औरंगाबाद ∷ सौ. निर्मला धारप, पुणे ∷ डॉ. सरोजिनी बाबर, पुणे
∷ डॉ. विमल चोरघडे, पुणे ∷ सौ. पुष्पा घाटगे, कोल्हापूर
∷ सौ. शांताबाई शिरनामे, पुणे ∷ सौ. शांताबाई बाबर, बागणी, सांगली
∷ सौ. राजक्का देसाई, बागणी, सांगली ∷ श्री. बाजीराव पाटील, चिखलगाव, अकोला
∷ श्री. ना. रा. शेंडे, नागपूर ∷ श्री. बा. शि. पाटील, महाळुंगे, प, पुणे
∷ सौ. मालतीबाई दांडेकर, कोल्हापूर ∷ सौ. कमलाबाई वडवे, पंढरपूर, सोलापूर
∷ नवलाबाई शहा बोरगांव, सांगली ∷ श्री. वि. वि. जोशी, चंद्रपूर, चांदा
∷ सौ. शशिकला पाटील, रामानंदनगर, सांगली ∷ प्रा. सौ. विमल थत्ते, हैद्राबाद
∷ प्रा. दा. गो. बोरसे, अकोला ∷ सौ. जैबुन्निसा खान, गेवराई, बीड
∷ श्री. रामकृष्ण आ. कदम, औरंगाबाद ∷ श्री. न. शे. पोहनेकर, औरंगाबाद
∷ सौ. हव्वाबी खान, पुणे ∷ श्री. राजाराम माने ∷ श्री. वसंत झांबरे, कढोद, जळगांव
∷ श्री. गो. ल. जमदाडे, दुधोंडी, सांगली ∷ श्री. हरिहर मातेकर, औरंगाबाद
∷ श्री. रावसाहेब जगताप, औरंगाबाद ∷ श्रीमती पार्वतीबाई जोशी, पुणे
∷ श्री. प्रभाकर शिळणकर, तळेगांव, द. अमरावती ∷ श्री. नाना शिंदे, माढा, सोलापूर
∷ श्री. शं. बा. राजभोज, देवळाली, नासिक ∷ श्री. विठ्ठल भि. वाघ, हिंगणी, बु. अकोला
∷ सौ. इंदिरा कुलकर्णी, अमरावती ∷ सौ. शालिनी घोटे, किनवट, नांदेड
∷ सौ. सुमन प्र. नलावडे, भवाळी, जळगाव ∷ श्री. स. र. बिन्नर गुरुजी, समशेरपूर, नासिक
∷ कु. उषादेवी बागल, कातरखटाव, सातारा ∷ श्री. ए. आ. गुंजाळ, खडकजांब, नासिक
∷ श्री. प्रल्हाद रं. त्र्यंबके, धोंडवे, नासिक ∷ श्री. पं. ख. नागपुरे, हिवरखेड, नासिक
∷ श्री. ना. वि. पांडे, निंभोरा, बो. अमरावती
∷ श्री. प्रभाकर रा. भामरे, दरेगाव, बा. नासिक ∷ श्री. मा. ल. सोमवंशी, लांडेवाडी, पुणे
∷ शुभा वाजपेयी, धरणगाव, जळगाव ∷ श्री. रामदास खाकरे, रत्नापूर, अमरावती
∷ सौ. सिंधू भालेराव, अहमदनगर ∷ श्री. मा. कृ. कोकाटे, सांगली
∷ श्री. प्रभाकर मांडे, परभणी ∷ सौ. सुमन मराठे, खामखेडे, धुळे.

# करवंद

मधाच्या घागरीचा व्हावा तसा दाबून उपसा करीत आपली तहानभूक भागविणाऱ्या, नेत्रांचा दिवा करून आपल्यावर पाखर ठेवणाऱ्या, मांडीचा चवरंग करीत आपली जिवापाड जोपासना करणाऱ्या, तळहातांचा पाळणा हालवीत आपलं कवतिक पहाणाऱ्या आणि पतिव्रतेच्या सौभाग्यानं जन्मभर आपल्यावर सावली देणाऱ्या मातामावलीबद्दल कुणी बोलायचं म्हटलं तरी शब्दांची चवड कोणत्या परीनं उचलावी गा देवा ? सागर सुकून जास्तोवर पाणी पिऊनही तहान न भागणाऱ्या देहाची ह्या गंगेच्या एका थेंबानंही तृप्ती होते तर तिचं वर्णन कोण्या रीतीनं करावं मी म्हणते ? अगबाई, मनगटावर मागं पुढं दाटलेल्या कंगण्यांच्या न् बांगड्यांच्या मधी कुलपी थाटाचा चुडा उठून दिसावा असं जिचं रूप तिच्या पुढं आमचा काय पाड लागावा जी ? अंहं ! आमच्यासाठी सुखाच्या राशी उभ्या करीत चोवीस तास आमच्यापुढं विंझणवारा घालणाऱ्या हिच्या नावाची गोडी कशी ठाऊक आहे ? चिक्की गुळाच्या खमंग रेवडीगत ! देवाशपथ !

एखाद्या लवणातील हिरव्यागार सुंदर हरळीनं दर्शन देताच मनाला शांती मिळावी त्याप्रमाणं हिच्या सहवासातील गुजगोष्टी ऐकताना टिपूर चांदणं हरखून जातं आणि अजूनही ह्या मायलेकींच्या गुजाचा झाडा झालाच नाही वाटतं हे ध्यानात घेत सुखावलेला चांद कलता झाला तरी बघतच रहातो त्याला काय म्हणावं ? सारवलेल्या भिंतीवर पुन्हा पुन्हा पोतेरं घालीत न् नखाबोटांनी मैना काढीत जिवाची घालमेल थांबवू पहाणाऱ्या मालनीच्या मायेचा थांग कुणाला लागावा ? कसं शक्य आहे हे ? छे ! नाहीच जमायचं. अंहं ! पण तिच्या लेकीबाळीनं मात्र तिच्याबद्दल काही बोलायचा जरूर प्रयत्न केला आहे—

*वाटवेला वड त्येला पारंब्या ठाई ठाई*
*तुजा विस्तार बयाबाई*

आपल्या गणगोताचा पसारा आईकारणानं केवढा मोठा आहे त्याची साक्ष दिली आहे. आणि अशा नांदत्या घरात रहायची सवय झाल्याकारणानं—

*दंड यळा भुजा कशा चालल्या वारूवानी*
*बयाच्या दुधायाला न्हाई घातलं धारूवनी*

आपणही आईच्या कामाचा कित्ता कसा गिरवला आहे ते अशा डामडौलानं सांगून टाकलंय.

अंतराळी लोंबणाऱ्या शेवगेच्या शेंगेगत आईनं घेतलेली चोळी आपल्याला शोभते आहे असं अभिमानानं सांगणारी ही लेक देवाला देखील हेवा वाटावा एवढं आईचं प्रेम आपल्यावरं असल्याची गोष्ट चार चौघीत आनंदानं करते आहे. घरात चुलत्या मालत्या असल्या तरी आई ती आईच, तिची सर कुणाला येत नाही हे सांगताना तिचा गळा कसा खुलतोय पहा—

*माऊलीची माया काय करील चुलती*
*कोमेजून गेली पाण्याविना ती शेवंती*

*भुक्याली तान्याली मला कोन ग म्हनील*
*एक माजी माय त्वांड कोमेजं जाणील*

*अंतरीचं गूज वाई बोलावं ग बयापाशी*
*न्हाई उम्मट कुणापाशी*

*अंगनी बसल्या चुलत्या मालत्या ग सया*
*टोपपदराची माजी बया*

*वळवाचा पाऊस कड्याखुड्याला न्हाई धीर*
*बया साठाची समींदर*

आईचं नाव घेतलं तरी तोंड गोड होतं असं तिचं म्हणणं. त्यामुळं

वाभळबनात काम करताना पायाला काटा जरी बोचला तरी तिला आईची आठवण येते. दाट भिंगाच्या तिच्या चुडेलेण्यापासून तो चौपदरी भाकरीपर्यंत सारं तिला आठवतं. आणि मग आईनं घेतलेल्या जरीपदराची आपली पाठ न् दारोळ फुलागत असलेली दंडावरची चोळी नजरेनं न्याहाळीत ही खुळी मैना कावरीबावरी होते. एवढंच नाहीतर आपल्या जिवाला आता वरं नसल्याची जाणीव झाल्यामुळं ती आईच्या नावानं सारख्या घोकण्या घालीत रहाते.

त्यामुळं दारी गळलेल्या लिंबाच्या रसाच्या खुणेनं, अंगणात पडलेल्या जाईकळ्यांच्या साक्षीनं आणि साखर कडू लागल्याच्या स्वप्नानं आईनं धावतपळत यावं असं तिचं म्हणणं. त्यासाठी चिंचेच्या पानावर ती सांगावा धाडते आणि मग लगोलग—

*पड पड रे मेघराजा वड्यावघळी वदवदा*
*बया माजी गवळन आली साठ्याची नरमदा*

असा चमत्कार घडून यावा म्हणून ती आपली निरी खोचते, भूक लागलेल्या पोटावर नाड्यानं आवळते. त्यासरशी तिचा आईला साक्षात्कार घडतो आणि ती वाऱ्याच्या गतीनं लेकीकडे धाव घेते—

*जिवाला माज्या जड येळंला कोन होती*
*हाती अमृताची वाटी बया मध्यान राती येती*

मायलेकींची दृष्टभेट होते. उमाळा कल्लोळून उसळतो. आणि लेक—

*वाट मी किती बघू कडी दाराची धरूनी*
*बयाला देखताना आली नेतरं भरूनी*

अशी बोलणी करीत आईच्या कमरेला मिठी मारते. मायलेकी कडकडून भेटतात. दोघींचाही जीव विसावतो. अशावेळी ह्या प्रेमळ सावलीत सुखावलेलं गुंजावणी डोळ्याचं पाखरू कमानी दरवाजाच्या खुणेनं पुन्हा सांगावा घेऊन

जायचा बेत ह्या लेकीसुंदरीपुढं मांडीत आपल्या रुमझुमत्या पायांनी नाचतं.... आणि मग ते हळूच बोलून जातं—

*खुंटीवैला शेला दे ग वढून घाई घाई*
*बयाला भेटायला माहेरी जाते बाई*

त्यासरशी तिथलं सगळं वातावरणच भारी सुखावून जातं आणि हळूच दारीच्या पारव्याचा आवाज घुमू लागतो—

*वाटंवैली वडजाई तिची पानं रुंद रुंद*
*माय मालनी ग सये गार सावली करवंद*

१

संग्राहिका : श्रीमती बयाबाई पाटील

बया म्हणू बया बया कुणाची होईना
सरू[१] बयाची येईना

बया म्हणू बया अशा मावंच्या[२] बया किती
जन्म दिलेली भागीरती

काशी म्हणू काशी त्या काशींचा खांब डुलं
बयाबाई तुझी दरव्यात नाव चालं

वाटंवरला वड त्या वडाची पानं रुंद
माझी ती बयाबाई गार सावली करवंद

लंबं लंबं बाल[३] त्या बालाचं नाव काई
डोंगरी शिकेकाई जोपा[४] केलीया बयाबाई

शेजी घाली पाणी नाही अंगाचा गेला कोंडा
मालन घाली पाणी रासबिदीला[५] गेला लोंढा

लंबं लंबं बाल माझ्या मुठीत माईनात
बयाच्या सायासाचं[६] मला जतान व्हईनात

शेवग्याच्या शेंगा अंतराळी लोंबत्याती
बयाच्या माझ्या चोळ्या दंडाला सोबत्याती

---

१ सर, बरोबरी. २ कृत्रिम, बनावट, मानलेल्या, नात्याच्या. ३ केस. ४ जोपासना निगा राखणे. ५ वेशीपर्यंत. ६ कष्टाचे.

बांगड्या भरीयील्या बांगडी झाली थोडी
बयानं ग माज्या राजवरकीची भरली जोडी

शेजीचा उपकार मी का फेडीन भाजीपाल्या
बयाचा उपकार फिटं ना ग काशी गेल्या

दंडा येळा भुजा कशा चालल्या वारूवानी[1]
बयाच्या दुधायाला न्हाई घातलं धारूवनी[2]

न्हाई सांगून धाडीयीलं बयाला कसं कळं
दारी लिंबाचा रस गळं

२

संग्राहक : श्रीमती गिरजाबाई केळकर

शेजी घाली जेवू करी आवड निवड
बया घाली जेवू ताटी पोळ्यांची चवड

भरील्या बाजारात काय करावं किराण्याळा[3]
सयांनू किती सांगू बया असावी पराण्याला[4]

मळ्यात ग माज्या आंबाडी लुकलुकं[5]
मायलेकींची सीन एक

माहेरी ग मला लागं डोहाळं असं कसं
माय मोजून धरी मास

१ घोड्याच्या गतीने. २ धारवणी, दुधात थोडेसे पाणी मिसळणे. ३ किराणा, जिन्नस. ४ प्राण्याला, माणसाला. ५ चमकून दिसते, उठून दिसते, नजरेत भरते.

माइंचा उपकार काय फेडशी येड्या जीवा
मांडीचा चवरंग नेतराचा केला दिवा

माईची येडी माया तुज्या चड हायी देवा
माईच्या नशीबाचा तुला वाटतोया हेवा

मायबाई माजी जशी साकरेची पुडी
पुडीत जलामली येवडी माजी कुडी

माऊलीची माया काय करील चुलती
कोमेजली वाई पान्याविना ती शेवंती

वर्तामंदी वर्त वर्त[1] करावं सोमवार
सगळ्या गोतामंदी बया माजीला माया फार

दसरा सरईला दिन दिवाळी कधी येई
माय ग माऊईली वाट पाकरावानी पाई

जेवन जेवीयीते मी ग भाजी भाकरीचं
बयाच्या हातीयीचे लाडू ग साकरीचं

भुक्यालं तान्यायालं मला कोन ग म्हनील
एक माय माजी त्वांड कोमेज[2] जानील

---

१ व्रत. २ सुकलेले, कोमजून गेलेले.

::: ३ :::

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

काळी चंद्रकळा तिचा पदर मोतीजाळी
बया गवळण माजी बोलं नेसावी संध्याकाळी

बाळ जातीया सासऱ्याला काय मुराळ्या तुझी घाई
बया गवळण माझी बोले साज गौरीचा झाला न्हाई

बहिणी भावंडाचा मेळा जमला पाखरांचा
माझी ती बयाबाई पुडा सोडिती साखरेचा

नऊ महिने ग वज्जं[१] वागविलं माझं कुशी
माय माज्या हरनीला फिरूनी बोलू कशी

समुद्र सोकील्यानं जाईना माझी तान
सखी माझी मायबाई गंगा भरली आसमान[२]

जात्या ईसवरा नगं मला जड जाऊ
माय हरनीच्या दुधाचं किती तुला बळ दावू

दळण दळीयीते ज़सं हरान पळतं
माय माउलीचं दूध माझ्या मनगटी खेळतं

जात्याची भिंगोटी[३] ल्हान घागर यिना मना
माय माझ्या हरणीचा पेले बाई जिता पान्हा

दळण. दळीयीता वाह्या ग बळ माझे
वाघिणी ग दूध तुझे

---

१ ओझं. २ आभाळाएवढी मोठी. ३ भिंगारिटी. जाते हलके जावे म्हणून घातली जाणारी चकती.

चिंचेची सावली बाई चिंचेच्या बरोबर
मायबाइ तुही[1] सर काय करील सावतर[2]

चिंचेची सावली बाई चिंचेहून लहान
मायबाई तुही सर काय करील बहीन

जिवाला जड भारी द्या सांगावा जाता जाता
परसदारी माझी माता तांब्या ठेवीला तोंड धुता

जिवाला जड भारी मी का उंबऱ्या दिलं उसं
बया मालनी खाली बस जिमनी[3] लोळती माझं केस

जिवाला जड भारी न्हवं कुणाच्या जावा भावा
बया माजीला आणा जावा मग हुईल माजी सेवा

भरील्या बाजारात मायबाईंची पडली गाठ
चाटीदादा दावी ग रंग गुलाबी चोळी दाट

पाटच्या दळपाला न्हाई मी कुनाला हार गेली
बया माज्या त्या गौळणीचं दूध वाघिणीचं पेली

लगीनचिठ्ठी लिवा माझ्या त्या माहेराला
बया मालनीची मला मुंगी पैठण आहेराला

लगीनचिठ्ठी लिवा झालीया सांजवात
बया मालन बोलयीती लेकजावाई मांडवात

मायलेकीचं भांडान जशी दुधाची उकळी
बया मनाची मोकळी

जुंदळ्या परायास काय आंबाडी लांब फोक
मायलेकीची सीन एक

---

१ तुझी. २ सावत्र (आई). ३ जमिनीवर.

जिवाला जड भारी कोऱ्या कागदावरी लिवा
बया मालनीला माझ्या आधी जेऊंद्या मग दावा

उनाच्या रकामंदी[१] चिमण्या कोट्याला येती जाती
सयांनू किती सांगू मला बयाची याद[२] होती

दळान दळीयीते सारं बळ या मुठीयीत
घालिती जायफळ बया मालन घुटीयीत

दळान दळीयीते सारं बळ या दंडायाचं
माझ्या त्या मालनीचं दूध पिते मी सांडणीचं

हावस मला मोठी जावानंदात नांदायाची
बया मालन माझी माडी कौलारू बांधायाची

नागा माज्या राया तुला निवद भाताचा
संबाळ करी माज्या आईच्या गोताचा

नागा माज्या राया तुला निवद कढीचा
संबाळ करी माज्या आईच्या ध्वाडीचा[३]

नागा माज्या राया तुला वाहिल्या मी ल्हाया
तुज्या दर्शनासी आल्या मातेसंगं आयाबाया

नागा माज्या राया तुला निवद गुळाचा
पर्तिपाळ[४] करी माज्या आईच्या कुळाचा

संक्रांतीचा सण आलाया एकाएकी
आवा लुटाया जाऊ आपण मायालेकी

शेजारीण बाई बस म्हणाया व्हवं तुला
माझ्या बयाची सव मला

---

१ रखरखीत, ऐन उन्हाचे भरात. २ आठवण. ३ पुतणीचा, ४ प्रतिपाळ, सांभाळ.

संक्रांतीचा सण कुंभारा दिली गाई
आवा लुटाया जाऊ आपण बयाबाई

संक्रांतीचा सण भोगी येतीया कुन्या वारी
मालनी माज्या बाई ये ग न्हायाला माज्या घरी

सरलं दळायान उरलं सुरलं कुठं ठेवू
माजी मायबाई बोलं ऊठ बळदा[१] शिडी लावू

सरलं दळायान माज्या सोन्याच्या हातायानं
मायबाई माझ्या भाग्यीवंताच्या जात्यायानं

शेजीचा उपकार फेडीते काडी काडी
मातेचा उपकार भिनला हाडोहाडी

दळूनी दळूनी अंगाच्या झाल्या गंगा
माय माऊलीनं चारील्या येळा लवंगा

उभ्या मी गल्ली जाते खडा हालंना धरणीचा
माझ्या त्या हरणीचा[२] थंड कुसवा मालनीचा[3]

उभ्या मी गल्ली जाते हाती धरूनी पासवा
सया म्हणीयीती कुण्या साईचा[४] कुसवा

सरलं दळायान सूप झाडून एकीकडं
चित्त लागलं बयाकडं

मावलीची माया सशावाणी घोक्या[५] घाली
वाळा रातरा कुठं झाली

सरलं दळायान सरलं म्हणू कशी
माय माऊली माझी काशी

---

१ धान्य ठेवावयाचा लोखंडी पत्र्याचा हौद, मोठी कणिंग. २ आईचा, ३ आईचा. ४ माऊलीचा, गर्तीचा. ५ घोकणी, काळजी, हुरहूर, काळजी करणे.

वाटंवैला वडू त्येच्या पारंब्या ठाई ठाई
बया माज्या मालनीचा झाला इस्तार अंबामाई

वाटंवैला वडू त्येला पारंबी वावू वावू[1]
बया माज्या मालनीचा झाला इस्तार गावोगावू

कपाळीचं कुंकू तुजं घामानं पांगलं
माज्या तू बयाबाई तुजं नशीब चांगलं

शेजीची ग माया जसं तकलाचं पाणी
माजी ती बयाबाई घाली मंडळ[2] घारीवाणी

जासूदाच्या पोरा तुला जायाचं कुठवरी
मालनीचा माझ्या वाडा चौसोपी वाटवरी

अंगीची माझी चोळी तुझ्या अंगाला येती ठीक
सया म्हणीत्याती मायलेकींची सीन येक

भरल्या बाजारात चोळी देखिली गर्दाबाज
माजे तू बयाबाई तुझ्या वटीचा खुर्दा मोज

भरल्या बाजारात तुला बोटानं दावू किती
माजी तू बयाबाई चोळी वलनी झोके खाती

भरला बाजार त्यो का भरला कस्ता कस्ता[3]
बया मालन न्हाई आली कोन्या येशीचा धरू रस्ता

लुगडं घेतीयीलं सया म्हनीती आयाराला
बया मालन माजी बोलं घेती बाळीच्या म्हायाराला

मुडदुंग्या परास टाळवाल्यांचा हात हाले
बया माजी ती मालन मधी वीणेचा मोर डोले

---

१ वावभर. २ घिरट्या. ३ तिरकस, वाकडातिकडा.

दिवस उगवीला त्येला येऊ दे वरी आता
बया माजी मालन औक[1] चिती[2] जाता जाता

उभी मी अंगणी आई वाट तुझी पाही
माय माऊली ग मला चुकविशी बाई

जन्माशी येऊनी सये सार्थक झालं काही
मातेच्या सेवेला सये अंतरले बाई

तान्हीया बाळासाठी माऊली ओवी म्हणं
माऊलीसाठी माझ्या कोण करील कवनं

माऊलीची माया शेजी करायला गेली
गुळाची ग गोडी साखरेला नाही आली

खंडीभरी गोत माळावरील गवायात[3]
माझी ती बयाबाई ओली हराळी लवनात[4]

आगीच्या पुढं ते का जळतं ओलचिलं
माई ग वाचून कोण म्हणेल काम केलं

झाडा ग मंदी झाड आंब्याचं डेरेदार
सर्व गोतात आई थोर

जीवाला वाटईतं बन्सी[5] गव्हाची खावी खीर
माझ्या आईचं गाव दूर

उन्हाच्या रकामंदी कोण पावणी धावा घेती
लेकी कारणं आई येती

मांडव शोभयीतो फुलं लाविली जाईची
हौस मुलाच्या आईची

---

१ आयुष्य. २ चिंतिते. ३ गवत. ४ खोलगट जमीन. ५ बक्षी, गव्हाची एक जात.

लगनाच्या येळी भट बोलतो काईबाई
आली धर्मांची माझी आई

बंधूजी पावयीणा त्याशी म्याबी दिली जाण[१]
सांग बयाचं वर्तमान

सरलं दळण सूप झाडून उभं केलं
लक्ष बयाच्या गावा गेलं

भरल्या बाजारात मी का हिंडते चारी वेशी
मातेवीण माझ्या हट्ट करू कोणापाशी

वैराळ सादवितो खालच्या वेशीपाशी
बया राहिली परदेशी छंद सांगू कुणापाशी

मायबाई जाऊ आळंदीला कंदी मंदी
देवा ज्ञानोबाच्या समाधीपुढं नंदी

चल सये जाऊ पाहू आळंदीची हवा
सत्त्वाची बया माझी पाण्यात जळे दिवा

चल सये जाऊ आळंदी एक रात
बयाच्या सतवाची काशीला गेली मात[२]

सयांनू माज्या घरी दूर देसची आली वाळू
माजे तू बयाबाई आधी भेटू मग बोलू

माज्या घरी पावयीणी कोण आली कारणाची
बया माजी ती मालन सखी माजी पराणाची

पाऊस नाही पाणी वळचण कशानं गळती
लेकीचं दुबळंपण पाहून माता मनात जळती

१. जामीन, ओळख. २. बातमी, वार्ता.

जीवाला जपल्यानं नाही होत पेंडं दावं
माऊलीनं शिकविलं आडल्याच्या कामा यावं

उगवला सूर्य जसा आगीचा भडका
मावळाया गेला चंद्र आईचा लाडका

उगवला नारायण उगवता ऊन पडं
मायबाईच्या ग माझ्या कुंकवाला लाली चढं

उगवला सूर्य गेला अहिवेच्या आळी
बयाचं माझ्या कुंकू देखीलं कपाळी

बयाच्या माझ्या घरी पिकलाया पानमळा
जाईला आल्या शेंगा मला धाड वानावळा[1]

म्हायार मला केलं साडेबाराची करवंदी[2]
माय मालन माजी बया तिचा वाडा चिरेबंदी

जिवाला जड भारी कसं कळालं हरणीला
बया माज्या मालनीचा पाय ठरेना धरणीला

जिवाला जड भारी दिवा जळतो रात्रंदिस
माऊली माझी माय मला सपनामधी दिसं

साऊलीसुखा आला पाखरांचा ग कळप
माऊलीची माया जशी वाऱ्याची झुळूक

मोटारगाडीला पडलं हाशील देईन
मायबाई माझे तुझ्या भेटीला येईन

आगीनगाडीयीत बसले मी घाई घाई
माऊली बया माझं बोलणं झालं न्हाई

---

१ नमुना, मासला. २ करवंदी रंगाची साडीचोळी.

चवल्या पावल्या देते मोटारगाडीला
माऊलीला माझ्या जाते भेटाया लाडीला

चवल्या पावल्यांनी भरली माझी मूठ
आईच्या गावा माझ्या मोटार जाते नीट

आपण गुज बोलू लागेल एक घडी
मायबाई माझे दाराला घाल कडी

जात्या तू ईसवरा तुला वडून पाहिलं
बया मालनीचं दूध तुझ्या कारनी लावीलं

अंतरीचं गूज बोलू खाली आधी बसू
बया मालनी माझे पदरानं डोळे पुसू

गुज बोलताना चांद वाड्याच्या वर आला
बयाचा माझ्या नाही गुजाचा झाडा झाला

माय माऊलीचा पान्हा पेले सरासरी
कामात सासूबाई आले तुम्हाबरोबरी

बत्तीस धारांचा पान्हा पेले मी हासून
माय मालनी ग तुझ्या मांडीव बसून

बत्तीस धारांचा पान्हा पेले कोण्या रंगं
मायबाई चल काशीतीर्था जाऊ संगं

सरीलं दळण अंग माझं घाम्याजलं
माता माऊली ग दूध तुझं इराजलं[१]

---

१ विरजले, विरजण घातले.

:::४:::

संग्राहिका : सौ. सजाताई सावंत

चौगी आमी लेकी चारी गावांचं खेळखांब[१]
बयाच्या दुदाईला[२] न्हाई लाविला कधी जांब[३]

हावस मला मोठी बंदुसंगट जेवायाची
बया माज्या मालनीनं ताटं केल्याती सेवायाची

बंदूजी पावईना मला आल्याला ठावं नाई
बयाच्या बाळाईचा शेला वलनी झोका खाई

पंडबीरीला जाया संगं नेवावी बयाईला
चंद्रभागेच्या तासावरी पानी घालावं जाईईला

वारा दिसांची बाळातीन तुजी बारावी कुनी दिशी
माता मालनी बोलती चाफा फुलला न्हानीपाशी

माय म्हनू माय बया तोंडाला यिती गोड
बया केतकीईचं झाड

१ आधार. २ दुधाला. ३ नावे ठेविले, दोष दिला नाही.

॥५॥

संग्राहिका : सौ. गंगूबाई बाबर

जिवाला माज्या जड कोन माज्या कळकळीचं
बयाची माज्या बाळं वाघ सुटलं सकाळीच

जिवाला माज्या जड माजी दुकती नकंवोटं
बया माजी ग मालईन बाई वैदीन गेली कुठं

पाची परकाराचं ताट वर केळाची केळफणी
बाई माज्या त्या बयावानी हाक मारिली मला कोनी

सांगून धाडीयीती आल्या गेल्या मानसाला
बया माजीला म्हणावं येतो म्हनाली गनपतीला

बया मालन माजी म्हनी जेव बाळाई पोटभर
चुलती माजी म्हनी भेट बाळाई आमाबर

भावज म्हनीयीती मोत्या पवळ्यानं वटी भर
मैना मालन म्हनीयीती राकडी केवडा भांगावर

तुळशीला घाली पानी त्या तुळशीखाली झरा
बया माज्या ग मालनीचा पतीवर्ताचा नेम खरा

जिवाला माज्या जड कसं कळालं माज्या आई
अंगनी होती जाई कळ्या पडती धाई धाई

पंढरीला जाता संगं न्यावं त्या बयाला
सोन्याच्या कळशीनं पानी घालावं तुळशीला

जिवाला जड भारी कोनी येऊन काय केलं
बयाच्या बाळायांनी दूध वाघाचं पैदा केलं

उब्या मी गल्ली जाते खडा हालंना भुईचा
माज्या त्या मालनीचा येल शीताळ जाईचा

जिवाला भारी जड म्या हुंवऱ्या दिलं उसं
गौळण माजी बया तुला कळालं न्हाई कसं

जिवाला जड भारी पाय ठरंना जिमिनीला
कसं कळालं न्हाई सये माज्या त्या मालनीला

थोरल्या जात्याईचं नाव ठेविलं हात्तीरथी
माज्या त्या मालनीच्या सना दळीती भागीरथी

थोरल्या जात्याईची म्या ग केलिया भिंगरटी
बयाचं दूध पेले ते का खेळतं मनगटी

हावस मला मोठी बयासंगट जेवायाची
आजी ती मालईन दुरडी येळीती शेवायाची

शेजी ग पाशी गुज सये लावीलं वारघटी
माजी ती मायबाई सये खजीबिन्याची पेटी

बया म्हनू बया बया कुनीच हुईना
माऊलीची सर शेजी नारीला येईना

बया वाढी जेऊ दोनी कवाडं लावूनी
शेजी घाली जेवू जन लोकाला दावूनी

वया बी म्हनू बया बया नोंडाला लई ग्वाड
बया मनूबीक्याचं झाड

वया म्हनू बया आला तोंडाला पाजरू
माय मधाची घागरू

शेजी घाली न्हाऊ न्हाई भिजला माजा माथा
बया घाली न्हाऊ भरला रांजन केला रिता

खाऊशी वाटईलं हिरव्या लिंबाचं राईतं
माऊली वाचूईनी कोनी वाडीना आईतं

साऊली शीतायाळ हितं उतरिलं वज्जं
माऊली माजी वया विसाव्याचं झाड माजं

सुक सांगतानी दुक माजं उचमळं
आता माजे आई नको पान्यानी भरू डोळं

सुकादुकाच्या हुर्दी बांदल्यात म्या ग पुड्या
येईल माजी आई मंग सोडीन थोड्या थोड्या

माय म्हणता मायेशी ओठाला ओठ भिडे
मावशी म्हणताना अंतर किती पडे

माय तुझ्या घरी राज केलं मी रावनाचं
पडलं ताट न्हाई उचलिलं जेवनाचं

दोगी गूज बोलू कशाला हवा दिवा
दारी चांदण्याची हवा मायबाई

वैराळ सादवीतो चुडं लियाच्या बाया किती
माऊजी ती बयाबाई लेकी सुनांचं नाव घेती

किती ग लवशील भाताची तवईरी[1]
माजे तू बयाबाई लेकी सुनांचे गवईरी

शीताळ सावयीली बाभळ ग बाईची
माया आगळी आईची

काळी ग चंद्रकळा दोनी पदार जरीचे
रेशमानं माखले ग माझ्या आईच्या मायेचे

---

१ तवर, लोंबट.

काळी चंद्रकळा सये खसखशी काठ
आईची माझ्या माया चारचौघात नव्हं गोष्ट

काळी चंद्रकळा सये नेसावी वाटली
आईच्या मायेनं माझी हावस फिटली

खाऊशा वाटल्या मला गुळाच्या गूळपोळ्या
सोडूनी बघते आत गजनीच्या चोळ्या

माऊली वाचून कोण फेडील आसूशा[१]
आईच्या मायेनं भरल्या धाई दिशा

जिवाला जड भारी आयाबायांनी भरला वाडा
बया मायबाई आली कोयाळ[२] वाट सोडा

कोरा कागद काळी शाई वरी अक्षार लिहिलं घाई
माजी तू बयाबाई परमुलुख करू काई

जातं वडीतांना माझ्या अंगाची झाली गंगा
बयानं ग माज्या चारिल्या येळ लवंगा

जातं बी वडीताना दंड हिरीच्या बाजईवा[३]
बया माजीच्या दुधायाला न्हाई लागत ताजईवा

पाटच्या पाऱ्यामंदी तोंड पाहिलं गाईचं
जन्म दिलेल्या आईचं

जेवण जेवीयीती गुळावाचून पोळी फिक्की
बयावाचून कोण सकी

भईन भावंडांचा नित झगडा होतो राती
बया जामीन माजी होती

---

१ इच्छा, आशा, आकांक्षा. २ कोकिळा. ३ विहिरीवरील थारोळ्याला लागून असणारे दणकट लाकूड, माचाडाचा आधार.

खाऊशी वाटईलं हिरव्या लिंबाचं राईतं
माऊली वाचूईनी कोनी वाडीना आईतं

साऊली शीतायाळ हितं उतरिलं वज्जं
माऊली माजी बया विसाव्याचं झाड माजं

सुक सांगतानी दुक माजं उचमळं
आता माजे आई नको पान्यानी भरू डोळं

सुकादुकाच्या हुर्दी बांदल्यात म्या ग पुड्या
येईल माजी आई मंग सोडीन थोड्या थोड्या

माय म्हणता मायेशी ओठाला ओठ भिडे
मावशी म्हणताना अंतर किती पडे

माय तुझ्या घरी राज केलं मी रावनाचं
पडलं ताट न्हाई उचलिलं जेवनाचं

दोगी गूज बोलू कशाला हवा दिवा
दारी चांदण्याची हवा मायबाई

वैराळ सादवीतो चुडं लियाच्या बाया किती
माऊजी ती बयाबाई लेकी सुनांचं नाव घेती

किती ग लवशील भाताची तवईरी[1]
माजे तू बयाबाई लेकी सुनांचे गवईरी

शीताळ सावयीली बाभळ ग बाईची
माया आगळी आईची

काळी ग चंद्रकळा दोनी पदार जरीचे
रेशमानं माखले ग माझ्या आईच्या मायेचे

---

१ तवर, लोंबट.

काळी चंद्रकळा सये खसखशी काठ
आईची माझ्या माया चारचौघात नव्हं गोष्ट

काळी चंद्रकळा सये नेसावी वाटली
आईच्या मायेनं माझी हावस फिटली

खाऊशा वाटल्या मला गुळाच्या गूळपोळ्या
सोडूनी बघते आत गजनीच्या चोळ्या

माऊली वाचून कोण फेडील आसूशा[1]
आईच्या मायेनं भरल्या धाई दिशा

जिवाला जड भारी आयाबायांनी भरला वाडा
बया मायबाई आली कोयाळ[2] वाट सोडा

कोरा कागद काळी शाई वरी अक्षार लिहिलं घाई
माजी तू बयाबाई परमुलुख करू काई

जातं वडीतांना माझ्या अंगाची झाली गंगा
बयानं ग माज्या चारिल्या येळ लवंगा

जातं बी वडीताना दंड हिरीच्या बाजईवा[3]
बया माजीच्या दुधायाला न्हाई लागत ताजईवा

पाटच्या पाऱ्यामंदी तोंड पाहिलं गाईचं
जन्म दिलेल्या आईचं

जेवण जेवीयीती गुळावाचून पोळी फिक्की
बयावाचून कोण सकी

भईन भावंडांचा नित झगडा होतो राती
बया जामीन माजी होती

---

१ इच्छा, आशा, आकांक्षा. २ कोकिळा. ३ विहिरीवरील थारोळ्याला लागून असणारे दणकट लाकूड, माचाडाचा आधार.

माया लेकींचं भांडान जसं दूध उतू गेलं
बया माज्या मालनीनं पानी वतून गार केलं

चाव्याच्या दुकानात चोळी अंजिरी म्हागयीली
बया मालनीच्या माज्या गोष्ट जिवाला लागयीली

हिरव्या चोळीयीनं दंड करितो रसारसा
बया मालनीनं माजा छंद पुरविला व्हावा तसा

फाटली माजी चोळी दंड पडला लुगड्याला
बया मालनीला माज्या चिंता पडली सोडतीला[1]

उचकी लागयीला कर पारसा[2] काढताना
बयाला झाली सयी न्यारी बंदूला वाढीताना

आंब्याची आंबराई केळीचं शिकरन
माऊली जेवू वाढी माजी ती सुगरन

भरल्या बाजारात शिंप्याची लंका लाल
मावलीबाई माजी उभी पेटंला मकमल

बंदूजी घेतो चोळी हिरव्या मखमलीची
बया इचारती रानी कुन्या वकिलाची

फाटली माजी चोळी पाठ पकवं गेलं वाया
चोळी घेनार माजी बया

फाटली माजी चोळी न्हाई ठिगाळ लावायाची
गावा बयाच्या जायायाची

पाटानं जातं पानी उसासंगटं जाईला
सुक लेकाच्या आईला

१ सोडून जाणाऱ्या. २ सकाळी राम प्रहरातील.

उंच उंच चोळ्या घरामागली शेजी लेती
मावली बया माजी तिच्यापरास चड घेती

बुट्टीचं दळायीन दुरडीमधी आलं
बया माज्या मालनीचं दिस नाचारीत[1] गेलं

भईन भावांडं एक्या डब्यातलं मोती
माताथी मावली भरती गंगेला आली होती

पईल्या दिशी बाई चिमन्या त्वांड धुती
बाई माज्या मालनीची सय मला हुती

दुसऱ्या दिशी धाडा सोनाराला चिट्टी
बाई मालनीनं दिली चांदीची ताटवाटी

तिसऱ्या दिशी धाडा सोनाराला पत्र
बया मालनीनं दिलं सोन्याचं फुलपात्र

चवथ्या दिशी सासू घालती ऊन पानी
बया मालनीनं माज्या केलीया त्यालफनी

पाचव्या दिशी सज आला हुता माळी
मायबाई बोलं मकरी लावा केळी

सहाव्या दिशी बाई वान्याला धाडा चिट्टी
माय माजी बोलं नाऱ्याळ[2] घाला वटी

झाल्या तिनीसांजा मेळा जमला पाकरांचा
माजी ती बयाबाई पुडा सोडती साकरेचा

बंदूजी पावना पाची परकाराची ताट
बयाला सांगीयीती काय जेवनाचा थाट

---

१ गरिबीतील. २ नारळ.

अंतरीचं गुज बांधी शेल्याच्या पदरात
माज्या तू भाऊराया सोड बयेच्या हुरद्यात

उभ्या मी गल्ली जाते नीट धरूनी पासवा[१]
सया म्हनीत्याती कुन्या गरतीचा कुसवा

जात्या ईसवरा कोण्या डोंगरीचा ऋषी
बया मालनीवानी हुरदं उकलीलं तुज्यापाशी

बयानं मला दिलं मणी डोरलं कानी फुलं
कपाळीचं कुंकू चांद आकाशी ग डुलं

जिवाला माज्या जड लोकं बगती वाकूनी
माजी बयाबाई आली कामधंदा ग टाकूनी

जिवाला माज्या जड शेजी बगती सान्यातून[२]
बया मालनीच्या माज्या गंगा लोटती नेत्रातून

घरचा कामधंदा करते वेळच्या वेळेला
बया माज्या मालनीच्या होते गरतीच्या शाळेला

६

संग्राहिका : सौ. सिंधू वारनूळकर

काशी नि म्हणू काशी तीर्था काशीला नकू जाया
पाठीच्या बंधू माझ्या चल मातेच्या पडू पाया

१ पदर, चांदवा. २ लहानग्या खिडकीतून.

काशीच्या पल्याईड वनारशीची लाल भुई
बया गवळणीवाचूईनी तीरभुवनी माया न्हाई

झाडा या मंदी झाडं बाइ वेगळी बाभळीची
सयाला किती सांगू माया आगळी आईची

पानीया मंदी मासा बाई घेतूया कैसा झोप
बयाचा उपकार कसा फिटेल आपोआप

तुळशी घाली पानी काय तुळशीखाली झरा
माता माज्या त्या मालनीचा पतीवर्तांचा नेम खरा

तुळशी घाली पानी घालता आलं तुरं
तुळशीबाई बोलं माता माउली पाणी पुरं

तुळशी घाली पाणी पाणी घालता आली फुलं
बया माज्या त्या गवळणीचं पतीवर्तांचं उंच कूळ

तुळशी घाली पाणी पाणी घालता आल्या शेंगा
माता या माऊलीची मया भरूनी व्हाते गंगा

जातं मी वढीईती दंड भुजाच्या जोरावर
बया माजीनं दिली घुटी बाई पारुशा केरावर

घाम या मला आला पाट भिजुनी पदर वला
बया माझीया गवळणीच्या निरशा दुधाला कढ आला

थोरलं माजं जातं भरला पिठाचा कुंडाला
बयाबाईचं दूध पेले जोर देते मी दंडाला

जातं मी वढीईती डाव्या करंगळी आली कळ
बया माज्या त्या गवळणीनं दिलं घुटीत जायफळ

जातं मी वढीईती नखी बोटांच्या आचुतीनं[1]
बया माझीचं पेले दूध मांडी पडून निचीतीनं

शेजी ती वाढी जेवू जसा राळ्याचा डिकळा[2]
बया गौळण वाढी जेवू भात साळीचा मोकळा

जेवाण जेवीयीती तूप साळीच्या भातासंगं
जोडीली मायाभैन गुज बोलती मातेसंगं

जोडिली मायाभैन जिवाभावाला हुयासाठी
बया माज्या त्या गवळणीनं आणली पदराखाली वाटी

सासर एवढा वस करू नये ग तिनं केला
बया माज्या त्या मालनीचा जन्म भोळ्या खाली गेला

गारया सावलीला मी का बांधिती वज्जं पाजं
वंधुजीला किती सांगू मातला याड माजं

जलम घेतईला मी का मातेच्या डाव्या कुशी
उणं उत्तर बोलू कशी

माता या म्हणू माता तोंडा पडली माज्या मिटी
माता साखबीरीची पेटी

शेजारीणबाई घाल उसनी मला सोजी
बया पावणी आली माजी

भरील्या बाजारात साऱ्या किराऱ्यांमधी पेरू
साऱ्या या गोताईत माता माऊली ग थोरू

---

१ अंदाजाने, शक्तीने, आधाराने. २ ढेकळ, लहानसा भाग.

::७::

संग्राहिका : **सौ. शरदिनी मोहिते**

*सासूनं सांगीतल्या बारा कामाच्या बारा खुणा*
*बया मालनीचा शीक गतींसंगं भाऊपणा*

*हिरव्या चोळीवरी राघू काढिला कुंकाचा*
*बया मालनीची कूस बंधु मुराळी हाकेचा*

*अंगणात उभ्या चुलत्या माझ्या सया*
*त्यामधी ती उभी मालन माझी बया*

*भरल्या बाजारात काय दिसत लालीलाल*
*मालन माझी बया उभ्या पेठेला मखमल*

*लेकीच्या आईला आहे कशाचा दुक्काळ*[1]
*माझी बयाबाई पाणी हौदाला वक्कळ*[2]

*शेजी आली घरा माझ्या आईच्या वयाची*
*इशी गुज बोलाया घागर ठेविते डुईची*

*मोठं मोठं व्याही माझ्या नानाला मिळाले*
*हरणे माझ्या बये तुझे करणीला*[3] *भाळले*

*आईवाचून माहेर कंतावाचून सासर*
*पावासावाचूनी रान कसं दिसतं भेसूर*

*आईवाचूनी माया कुणाची दिसेना*
*पावसावाचूनी रान हिरवं दिसेना*

---

१ दुष्काळ. २ पुष्कळ, भरपूर. ३ व्यवहाराला देण्याघेण्याला.

व्रतामध्ये व्रत बाई करावा सोमवार
गोतामध्ये साऱ्या माऊलीला माया फार

येड्या माज्या जीवा भावड्या माज्या मना
बयाच्या गावा जाया कशाला कल्पना

बया बया म्हणू बया कोणी ती होईना
बया तुझी सर शेजी नारीला येईना

बया तुझी सर शेजी करायाला गेली
लटकी साखर शाळूच्या पाना आली

बया बया म्हणू बया मायेच्या त्या वारा
जिनं जन्म दिला तिचा उपकार खरा

बया बया म्हणू बया चिकन गोड काही
साखरबाईला जरा कडूपणा नाही

बया बया म्हणू बया तोंडाला येतं पाणी
माझी बयाबाई गोड साखरेच्या वाणी

बया बया म्हणू पडली तोंडात मिठाई
रानी बयाबाई माझी साखर पिठाई

वाणीनी ग बाई सौद्यात गोड काई
साखरेचं पोतं तशी माजी बयाबाई

बया बया म्हणू माज्या तोंडाला रसाई[1]
जिवाला वाटते बया जवळ आसाई[2]

बया बया म्हणू साऱ्या संसाराची रया[3]
मुखी दिले स्तन हरणी लाविलीस माया

---

१ रसास्वाद, गोडी. २ असावी. ३ कारभारीण, मुख्य.

बया बया म्हणू गोड चिक्कन ग काई
सारीया गोतात आमलुक[१] बयाबाई

बया बया म्हणू बया नव्हे माझी साळू
मुखी दिले स्तन तेलाने भरली टाळू

बया बया म्हणू बया साखर गोंदाई[२]
बयाचा पेले पान्हा झाला आत्मा निर्धाई[३]

बत्तीस धारांचा पान्हा पेले मोहिनीचा
मामा तू पाठीराखा तुझा गुलाब बहिनीचा

बत्तीस धारांचं मुखी झालं तारांगण
हरणी माझे बये पान्हा धर आवरून

शेजीने शिकविले सये सारं वाया गेलं
बयानं शिकविलं माझं मला कामा आलं

शेजीनं शिकविलं गूळखोबरं देऊनी
बयानं शिकविलं मला मांडीव घेऊनी

शेजी घाली जेऊ माझ्या ताटाकडे पाही
बया घाली जेऊ आड माझ्या उभी राही

शेजी घाली जेवू हिशेब करिती मनाला
बया घाली जेऊ कळू देईना कोनाला

शेजी घाली जेऊ वाढिती ग उली उली[४]
बया घाली जेऊ ताटावर शीग आली

नऊ मास होते माझ्या बयेच्या पोटात
लागेना ऊन वारा चिरेबंदीच्या कोटात

---

१ आपरूप, वैशिष्ट्य, मायेची. २ गोंदणीचे फळ. ३ निर्धास्त, शांत. ४ थोडेथोडे.

नऊ मास होते मी वयेच्या डाव्या कुशी
हरणीला माझ्या फिरुनी जाव देऊ कशी

बये तुझ्या घरी राज्य केलं भुलावानी
सैल पेले पान्हा गाईच्या ग गोऱ्ह्यावानी

बये तुझ्या घरी राज्य केले रावणाचे
उचलिले नाही ताट पुढे जेवणाचे

वहीण भावाची कशी सारकाली तोंडं
हरणे बाई जशी तुझी पळाठीची[1] बोंडं

माऊली माझी बये तू जिवाची केली राळू
आतडी वागविली पखायेखाली वाळू

माऊली ग माता तू चौदा तोळ्याचे रतन
घडी करमेना आई म्हटल्या वाचून

भूक लागली पोटाला हात घालू कोण्या जाळी
बया माझी करवंद ऐकताच झाली काळी

भूक लागली पोटाला किती भुकेला हाकारू
राणी माझी बया पाढा लागली घोकरू

भूक लागली पोटाला आळविते डाव्या निरी
कुणाच्या भावजया बया नव्हती माझी घरी

आशा नाही केली भूक कशाला लागेन
अमृत भोजन माझ्या बयेला मागेन

साजुक सोजीयीची पोळी ती चवघडी
बयाच्या भोजनाची याद होते घडूघडी

---

१ कपाशीची.

गाव वाशिंबे दिसते कसे विटांचे भुयार
राणी माझ्या बये तुझे साजरे माहेर

गाव वाशिंबे दिसते कशी विटांची बांधणी
राणी माझी बया तिथं जन्मली चांदणी

शीतळ सावलीला सारी पाखरं झाली गोळा
माय माझ्या मालनीचा विसाव्याचा पानमळा

८

संग्राहिका : **सौ. यशोदा पाटील**

आठरा बाई धारा पेले ओढोनी झराझरा
माय गवळणीचा माझ्या शिरी उपकार खरा

बया म्हणू बया माझी साखरेची पुडी
बयाचं नाव घेता उजळ झाली कुडी

शेजी घाली पाणी नाही भिजली माझी वेणी
माय घाली पाणी न्हाणी वाजते ओढ्यावाणी

बया म्हणू बया माझी मधाची घागर
बयाचं नाव घेता तोंडी सुटला पाझर

जिवाला वाटतंय खावं तूप ताजं ताजं
बया म्हणताना सये मन परतलं माजं

लांब नि लांब केस बया माझीनं वाढविलं
बयाच्या बाळाजीनं पाणी काशीचं आडविलं

तुळशीला घाली पाणी तुळशीची झाली तुळी
बया माझ्या मालनीची गरतीची वांधा माळी

मायलेकींचं गुज परसदारीचं वाळवान
बयाच्या हुरद्यात आकरी दुधाचं मुरवान[1]

वैराळ सादवितो चुडा भिंगाचा वैल्या वेशी
माझी तू मैनाबाई हट्ट घेऊ या बयापाशी

वैराळ सादवितो बारा आण्याला झाली जोडी
बयाच्या जिवावरी राजवरकी लेली थोडी

जीव माझा गेला धड वेशीत अंतरा
माझी ती बयाबाई धरणी लोळती मथुरा

साजाच्या डोरल्याला नका लावू पडदोरा
बया माझीला किती सांगू कृष्णासारखा जोडा खरा

सांगून धाडिते माझा सांगावा जाऊ राहू
बया गवळणीचं सये आडवळणी तिचं गावू

बया गवळणीच्या वाड्या नाही जायाला ग वाट
माय बाईच्या वाड्यात तुळशीमंजुळा लई दाट

बया म्हणताना तोंडाला पडते मिठी
बया साखर रायपिठी

मायलेकींचं भांडण जशी दुधाची उकळी
बया मनाची मोकळी

१ मुरवण, विरजण.

::९::

संग्राहक : प्रा. गजमल माळी

जाईन माहेरा, माहेरा मायबाई
डोईची घागर इसवा भावजय देई

माय तुह्या घरी राज केलं लेकावानी
चरूभर पानी तिनं केलं लोकावानी

मायची ग माया शेजी करायाले गेली
लटकी साखर जोंधळ्या पाना आली

भूक लागली पोटाले तोंड घालू कोन्या जाळी
आईची माज्या माया करवंद झाली काळी

भूक लागली पोटाले धुंडू कोणता डोंगर
आई माजी येसवदा आहे पिकलं उंबर

माज्या मायच्या मयात निगाला निया[1] नाग
नका मारू भाऊ राक्ीन केयी[2] बाग

माय करू माय माय मोहळाचं मध
अंतरी करा सोध ताकाचं होईना दूध

रोजी घाली जेवू महे वर वर बोट
आई घाली जेवू बुडाले मनगट

सासरी जाते येळी माय धरती पोटाशी
मयना माजे बाई कदी हरणे भेटशी

---

१ निळा. २ केळींचा.

तुळशीला घाली पाणी तुळशीची झाली तुळी
बया माझ्या मालनीची गरतीची बांधा माळी

मायलेकींचं गुज परसदारीचं वाळवान
बयाच्या हुरद्यात आकरी दुधाचं मुरवान[१]

वैराळ सादवितो चुडा भिंगाचा वेल्या वेशी
माझी तू मैनाबाई हट्ट घेऊ या बयापाशी

वैराळ सादवितो बारा आण्याला झाली जोडी
बयाच्या जिवावरी राजवरकी लेली थोडी

जीव माझा गेला धड वेशीत अंतरा
माझी ती बयाबाई धरणी लोळती मथुरा

साजाच्या डोरल्याला नका लावू पडदोरा
बया माझीला किती सांगू कृष्णासारखा जोडा खरा

सांगून धाडिते माझा सांगावा जाऊ राहू
बया गवळणीचं सये आडवळणी तिचं गावू

बया गवळणीच्या वाड्या नाही जायाला ग वाट
माय बाईच्या वाड्यात तुळशीमंजुळा लई दाट

बया म्हणताना तोंडाला पडते मिठी
बया साखर रायपिठी

मायलेकींचं भांडण जशी दुधाची उकळी
बया मनाची मोकळी

१ मुरवण, विरजण.

:::९:::

संग्राहक : **प्रा. गजमल माळी**

*जाईन माहेरा, माहेरा मायबाई*
*डोईची घागर इसवा भावजय देई*

*माय तुह्या घरी राज केलं लेकावानी*
*चरूभर पानी तिनं केलं लोकावानी*

*मायची ग माया शेजी करायाले गेली*
*लटकी साखर जोंधळ्या पाना आली*

*भूक लागली पोटाले तोंड घालू कोन्या जाळी*
*आईची माज्या माया करवंद झाली काळी*

*भूक लागली पोटाले धुंडू कोणता डोंगर*
*आई माजी येसवदा आहे पिकलं उंबर*

*माज्या मायच्या मयात निगाला निया[1] नाग*
*नका मारू भाऊ राकीन केयी[2] बाग*

*माय करू माय माय मोहळाचं मध*
*अंतरी करा सोध ताकाचं होईना दूध*

*रोजी घाली जेवू महे वर वर बोट*
*आई घाली जेवू बुडाले मनगट*

*सासरी जाते येळी माय धरती पोटाशी*
*मयना माजे बाई कदी हरणे भेटशी*

---
१ निळा. २ केळींचा.

१०

संग्राहिका : सौ. निर्मला धारप

*माऊलीची माया काय करील चुलती*
*पंढरीचा खण चोळी होईना पुरती*

*सासरी जाताना बाई भर नवा चुडा*
*मायबाईनं तुझ्या दिला कुंकवाचा पुडा*

*माहेरीची मला होते सारखी आठवण*
*माझ्या मायबाई कधी धाडशील बोलावणं*

*माहेरीची वाट पाहाते मी बाई भारी*
*मायबाई माझी राहिली फार दुरी*

*माहेरीची आठवण करिते मी नीट*
*मायबाई माझे कधी होईल तुझी भेट*

*भाऊबिजेदिशी मला भावानं काय दिलं*
*माझ्या मायबाईनं चंद्रहाराला मापलं*

*काळी चंद्रकळा वर कशिदा भिंगाचा*
*माझ्या मायबाई तुला प्रसाद गंगेचा*

*काटा बोचता पायी मला आईची होते सय*
*आई म्हणू आई माझ्या तोंडाला येते लय*

::११::

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

भरतार म्हनू हाई पूर्वीचा नामदेवू
माज्या बयाची ताकीद नको कंथाच्या आधी जेवू

शिंप्याच्या दुकानी उभी फळीला धरूयीनी
बयाच्या जिवावरी चोळी काढिते हेरूयीनी

पाची परकाराचं ताट वर केळाची केळफणी
बया मालन जेवू वाढी करी तुपाची करणी

वैराळ दादा आला बसे वाड्याच्या पायरी
बया गेलीया भाईरी हाक मारिते दुहीरी

रामाच्या मंदिराला सोन्याचा कळस
मायबाई माजी वृंदावनीची तुळस

आमी चौघी भैनी चारी गावच्या खारका
मायबाप मंदी नांदती द्वारका

आली लगीनसराई जीव होतो खाली वरी
माय म्हणे मंजू कवा होईल नवरी

आई आई म्हणू सये तोंडाला येतं पाणी
आई माझी मातोसरी खडीसाखरेच्यावाणी

बया नि म्हनू बया बया नावात कायी गोडी
बया साकरेची काडी

बया नि म्हनू बया बया मुखाला येती सजू
तिनं रक्ताचं केलं जूजू

माळीण सादविती देठासकट कारयीलं
बयाला सांगयीती साजासकट डोरयीलं

घराच्या परसात केळीबाईचा गारईवा
बया मालनीच्या जिवाव न्हाई कुनाची परईवा

शेजीपाशी गुज कसा सुटला वैलवारा
माया माऊलीवाचून न्हाई जिवाला आसरा

हातात गोंडाफणी कुठं निघाली माझे बाई
चिन्नू सावळी बाळाबाई माझी बया घरी न्हाई

रुसला भरतार जसा भित्तीवरला नाग
बया गौळण बोलती त्येच्या परमानं तू वाग

सरजाची नथ वर सोन्याची चिलीपिली
बया माज्या मालनीनं हौस माझी पुरी केली

कधी मी सोडिली का घराची पायरी
कधी ही भेटली आई माझी का सोयरी

दळण दळीताना अंग माझं घाम्याजलं
माता माऊली ग दूध तुझं इराजलं

केळीबाईची सावली बत्तीस केळांवरी
माऊलीची माया अवघ्या बाळांवरी

थोरलं येवढं जातं त्येला खुंटा चकमकी
आमी दळू मायालेकी

नदीच्या पल्याड सात रंगी एक झाड
बया तसली चोळी धाड

साधूसंताचं दरसन होत या खिन खिन[1]
काशी गवळण वाई तुझ्या कुसव्याचा गुन

मावलीची माया सये गोताला कुठून
माय मावलीचं माज्या आलं हुरदं दाटून

काम मी करीते न्हाई कामाला ग भेले
बयाचं ग माज्या वाघिनीचं दूध पेले

पंढरीला जाया संगं न्यावं ग आईला
चंद्रभागातीरी भार आला ग जाईला

पंढरीला जाया संगं न्यावं ग माईला
गोपाळपुऱ्यात कडबा सोडावा गाईला

सांगून धाडीयीते लखोट्या पोटी चिट्टी
माय माझे यावं तूच ग माझ्या भेटी

वैराळा रे दादा नको पैशाची चिंता तुला
माय माझी सांगे उंच बांगड्या भरायाला

दिवाळीच्या दिशी ताटी माझ्या मोतीसर
बया तुझा बाळ ओवाळीला सावकार

पाटच्या पाऱ्यामधी तोंड पाहिलं गाईचं
जलम दिलेल्या आईचं

गार सावली बगून म्या ग उतरिलं वज्जं
बया इसाव्या घर तुजं

भैनी ग भावंडांचा झगडा झाला राती
बया जामीन मला होती

---

१ क्षणभर

दिवाळी दसरा माझी ववाळणीची घाई
सण संक्रांतीचा मूळ धाडी बयाबाई

जावं पंढरीला संगं नियावं आईला
दहीन गावापाशी कडबा सोडावा गाईला

जावं पंढरीला संगं नियावं मावशीला
दहीन गावापाशी पाणी घालावं तुळशीला

तुळशीला घालू पाणी तुळस उजाळली
माऊली ग माझी बया पतिवर्ता आढळली

तुळशीला घालू पाणी तिला आल्यात्या शेंगा
माऊली ग माझी बया पतीवर्ता गंगा

माय माझी माऊली नित तुळशीखाली बसं
मालन माझी बया हुबेहूब गंगा दिसं

पित्या ग परास माया खरी माऊलीला
माझा जन्म झाला तिच्या निऱ्याच्या साऊलीला

बया म्हणू बया माझी केवढी जिन्नस
चांदीच्या जोडव्याला नाही लागत कानस

माझी जात कूळ काय पुशिती बामणी
गौळणबाई माझी खाशा बागेची लिंबोणी

जिवाला जड भारी बया माझीला बोलवा
खडीसाखरेचं पाणी मधाला भेटवा

जिवाला जड भारी डोकं दुखतंया केसात
मायबाई बाळ तुझी दूरल्या देशात

दूरच्या देशाचं कोणी येईना पाखरू
सुखी राही मायबाई परघरीचं लेकरू

सकाळच्या पारी सडा टाकिते ग अंगणी
गवळण माझी बया जशी सुक्कीराची चांदणी

आईवाचून माया नाही भैनीवाचून कनवळा
घालू नाही हात येड्या शिवारी पानमळा

लेक जाती सासऱ्याला आई पाती परसातून
बोलती मायबाई हरण गेली कळपातून

माऊलीची माया सर्‍या बाळांवरी
चिमणी करी कोटं जाईच्या वेलावरी

आईचे उपकार फार झाले माझ्या शिरी
नऊ मास मला वागविलं तिनं मिरी

आई आई म्हणू सर्व संसाराची आई
जिथं मोडतो काटा तिथं येते मला सई

आई आई म्हणू आई कोणीच म्हणींना
आईची माझ्या सर शेजीनारीला येईना

आई आई म्हणू आई साखरेची पुडी
त्याच पुडीमधी जलामली माझी कुडी

काम केलं थोडं परी घाम आला लई
आईच्या पोटीच्या माझी सुकुमार देही

सकाळच्या पारी हात जोडीते रामाला
माय माझी हात मग लाविते कामाला

जातं मी वडीते माज्या बाह्या लोखंडाच्या
आईनं दिल्या घुट्या जायफळ एखंडाच्या

जातं मी वडीते दंड भुजाच्या जोरानं
माझीया आईनं खारका चारिल्या शेरानं

गोरं माझं रूप पिवळी माझी काया
जन्म देऊनी गेली रुक्मिणी माझी माया

१२

संग्राहिका : डॉ. विमल चोरघडे

फुलांमध्ये फूल फूल हुंगावे जाईचे
बाळपणी बाई सुख भोगावे आईचे

मायेची माया अवघ्या बाळांवरी
गवळणीने केला खोपा अवघड जागेवरी

बत्तीस धारांचे दूध प्याले मी कोंचा रंग
काशी गिरजाच्या मांडीचा मी केलाया चौरंग

माय एवढी माया कोणाला येत नाही
समुद्र भरला तेथे पाण्याचा थांग नाही

सासुरवाशिणीने तोंड धुतले नदीला
माता माउलीला कीव[1] लेकीच्या आईला

लेकीचा जलम घालू नग देवराया
मायबाई हरणीचं केलं कष्ट गेलं वाया

दळण दळीते माज्या बाह्या लोखंडाच्या
मायबाई हरणीनं घुटी दिल्या येखंडाच्या

१ दया, माया.

शेजी घरा आली पाट देते बसायाला
हरणीचा शीक मला मायबाईचा
आईच्या मी राज्यी राज्य केलं मोंगलाई
भरला तांब्या नाही दिला माय माज्या हरणीबाई

:::१३:::

संग्राहिका : **सौ. पुष्पा घाटगे**

शेजी जेवू घाली न्हाई भरीलं माझं पोटू
बया जेवू घाली दाबून भरीलं माझं ताटू
पाची परकाराचं ताट वर केळाचं रायतं
बयावाचूनी कोण वाढील आयतं
शेजी घाली पाणी नाही अंगाचा गेला कोंडा
बया घाली पाणी पंचगंगेला गेला लोंढा
लंबं लंबं बाल जसं दांगडीचं येल
माझी तू बयाबाई गोळा करूनी लावी तेल
लंबं लंबं बाल या जी लंबाला करू काई
डोंगरी शिकेकाई सव लाविली बयाबाई
हिरवी हिरकणी दंड करिती झळा झळा
बयाच्या जिवावरी आली शिरमंतीची कळा
शेजी तूं बयाबाई दे ग उसनी मला सोजी
बया पावणी आली माजी

भरल्या बाजारात उभा पाळाला धरूईनी
बयाच्या जिवावरी चोळी काढिली हेरुईनी

वैराळ तुमी दादा देते बसाया बाकखुर्ची
बयाच्या जिवावरी घाली काकणं राजवर्खी

दळण दळीईता बाई हलंना माझी मांडी
माझ्या त्या मालनीचं दूध पेलीया सव्वाखंडी

दळण दळीईता मुठी माझ्या या लोखंडाच्या
माझ्या त्या मालनीनं घुटी दिल्यात्या वेखंडाच्या

दळण दळीईता हाय मुठीत माझ्या बळ
बया माझ्या त्या मालनीनं दिलं घुटीत जायफळ

तुळशीला घालू पाणी ते का तुळशी आलं तुरं
माझी तू बयाबाई पतिवर्ता पाणी दूर

तुळशीला घाली पाणी ते का तुळशी आली बोंडं
माझी बयाबाई पतिवरता लावी झेंडं

जिवाला जड भारी म्या उंबऱ्या दिलं उसं
माझी तू बयाबाई तुला कळालं नाही कसं

परटीन धुनं धुती तिथं लिंबं वो ताजी ताजी
बया मालन सांगती दोनी धोतरं हुरमुजी

परटीन धुनं धुती तिथं लिंबं वो फेरायाची
बया मालन सांगती दोनी धोतरं जरीयाची

जलम गेला एवढा माझ्या बयाच्या डाव्या कुशी
मी त उलटून बोलू कशी

हात भरूनी काकणं मधी कंगणी झाली दाटी
बया असावी येवढ्यासाठी

परटीन धुनं धुती तिथं लिंबं वो रसायाची
माझ्या बयाच्या बाळाची दोनी धोतरं नेसायाची

शेजीचं उसईनं आडीशेरी व पायली
बयाच्या उसन्याची याद कुणाला ऱ्हायली

शेजीचं उसनं मी का फेडीन भाजीपाल्या
बयाचं उसनं मला फिटंना काशी केल्या

सकाळी उठूईनी आधी बाहेर गेले झटू[1]
बया मालन ग माझी तुळशी घाली खेटू

लांब नि लांब केस वेणी माझी ती मोगऱ्याची
माझी तू बयाबाई फणी धाडावी घागऱ्याची

## १४

संग्राहिका : सौ. शांताबाई शिरनामे

माहेर घरी बाई सगळी माझी सोई
जेऊ वाढी बयाबाई ताट धुयाला भावजई

माहेरघरी बाई झोपबाईने वेढीले
भोजनाचे ताट बया माझीने वाढीले

मायलेकींचे भांडण जशी दुधाची उकळी
माता मनाची मोकळी

१ झटदिशी, चटकन, ताबडतोब.

आईच्या राज्यात खाली दुधावरची साई
भावजईच्या राज्यात ताकाला सत्ता नाई

शेजीचे उसने मी फेडीते काडी काडी
बयाचे उसने माझ्या भिनले हाडोहाडी

शेजीचे उसने मी फेडूनी राहिली
बयाच्या उसन्याची याद नाही ती उरली

सरलं दळण पदर घेते डोई
आऊक्षाची ओवी तुला गाते बयाबाई

जिवाला जड माझ्या सांगू नका हारणीला
बाई माझी पडेल धरणीला

गुज बोलायाला मला कशाला व्होवी शेजी
गुजाजोगी बया माजी

॥१५॥

संग्राहिका : सौ. शांतादेवी बाब्रर

जिवाला जड भारी खडीसाखर फुटंना
बया माझी ती मालन सये उशाची उठंनी

सरीलं दळायानं माज्या सुपात जाईजुई
जन्म दिलेली माजी आई

जिवाला माज्या जड कसं कळालं माझ्या आई
परसदाराला होती जाई

लुगत्रीड्याची घडी ठेविली जाईवरी
सयांनू किती सांगू माझा रुसवा आईवरी

बारीक पीठायाची होती भाकरी चवघडी
बयाच्या जेवणाची याद होतीया घडोघडी

कडू नि कारईलं चिंचबाईनं बनविलं
बया माज्या मालनीनं घर शाणीनं चालविलं

अंबारीचा हत्ती बाई बांधिला दारात
बया मालन माजी बोलं लेक लोकाच्या घरात

लांब नि लांब केस माझ्या मस्तकी राहीना
बया माज्या मालनीची सेवा हातून घडेना

संभूच्या शिखरी बया मालन कुंकू ल्याली
हळदी कुंकवाची रास खंडून मला दिली

लेकीचा जलम बाई उसाच्या पाल्यावानी
जन्मदाती आई उभी राहिली येड्यावानी

शेजीच्या गेली घरा शेजी बसली बोलायाला
बयाच्या गेली गावा ऊठ म्हणती जेवायाला

भूक लागली पोटा माझी सैलावली निरी
बया माझी ती मालन कनवाळू माई खरी

जातं वडीताना दंड देतीया तोलूनी
बयाचं पेले दूध घेते घागर झेलूनी

अंगीचा माझ्या घाम सया म्हणीती सरदी
बया माज्या मालनीनं केली घुट्टीची गरदी

बया म्हणू बया बया तोंडाला येती जाती
साता जन्माची याद होती

बया म्हणू बया बया वनीच्या पाखराला
चोचीनं घाली चारा आपुल्या लेकराला

पाटीवैली येनी जन म्हणती काळा साप
बया मालन माझी बोलं वाघिनी तुझं रूप

बसाया बसकर गादी टाकिती गुलमुसाची
बया मालन माझी आली पावनी सायासाची

सांगून धाडिते आल्या गेल्याला गाठून
बया माळनीला माझ्या लईदी झाल्यात भेटून

सांगून धाडिते आल्या गेल्या मानसाला
बयाच्या बाळाला यावं म्हणावं गनीसाला

सोप्याची सावली बाई जोत्याखाली गेली
मायबाईची ग माझ्या वाट पाह्याची सीमा झाली

वैराळ सादवितो तुझी माझी कोन जात
बया मालन बोलती चुड्याकारनं देती हात

शेजी घाली पानी नाही भिजली माझी पाठ
बया घाली पानी त्येचा येशीत गेला लोट

पुरणाची पोळी गुळावाचून लागे फिक्की
बया मालनीवाचून कोण म्हणेल जेव लेकी

बया म्हणू बया बया चंदनाची शिडी
बया तवर माझी उडी

भूक लागली म्हणू येडी झालीस भूकबाई
इथं आपली बया न्हाई

भूक लागली म्हणू भूकबाई दम धर
न्हवं बयाचं माझ्या घर

बहीण भावंडांचा मेळा भरला पाकरांचा
बया माझ्या मालनींनं पुडा फोडला साकरचा

जिवाला जड भारी ठेवा समईवरी दिवा
बया माझी ती मालन लांब पल्याची यील कवा

लाडक्या लेकीईचं तिचं जेवान अहीईचं[1]
बया मालन माजी बोलं तूप निघना वाटीईचं

उभ्या मी गल्ली जाते माझा पदराखाली हात
बयाच्या कुसव्याची तिथं कळाली चालरीत

जातं मी ओढीताना बळ साठलं मुठीयीत
बया माझ्या त्या मालनीचं जायफळ घुटीयीत

दिवस मावळीला चिमणी कोट्या येती जाती
मला बयाची याद येती

जांबी कडाडली माझी उचकी हुरदं फोडी
बया जेवताना सय काढी

सरजाची नथ वर मोराची चिलीपिली
बयाबाईनं मला दिली

अंतरीचं गुज बोलाया केली खोली
बयाजवळ तिची किल्ली

लेकीच्या आईचं डोकं कशानं झालं लाल
लेक सासरी गेली काल

जातं या वडीताना मी का करीना कच्ची बूद[2]
बया गर्तीचं पेली दूद

१ हट्टाचं, राजविलासाचं. २ हयगय, आळस.

बंधूजी घेतो चोळी भावज गुजरी खुशालीत
तुझ्या माहेरी चालीरीत बया मालन बोलईत

भरल्या बाजारात उभी पालाच्या शेजाराला
सयांनू माझी माता आली का बाजाराला

तुळशीला घाला पाणी तुळस वर गेली
बया माझ्या मालनीनं पतीव्रतानं सेवा केली

तुळशीला घाली पाणी मागं फिरूनी मारूतीला
बया माझ्या मालनीला सेवा दंडली[1] गरतीला

जिवाला जड भारी हिरी बारवी दिलं उसं
माय मातूसरी तुला कळलं नाही कसं

मेव्यामंदी मेवा चिक्की गुळाची रेवडी
बया माझ्या मालनीला लेक बाळाई तेवढी

लुगडं घेतईलं त्याला रेशमाची काडी
माझा रुसवा मातेवरी नाही नेसत घाला घडी

थोरल्या जात्यायाची वाई मी केली भिंगरटी
बया माज्या मालनीचं दूध खेळे मनगटी

वळवाचा पाऊस वड्या वगळी नाही घर
बया मालन माझी माता साठाची समींदर

बारींक पिठाची येती भाकरी चौघडी
बया मालनीची माज्या याद होती घडोघडी

बारीक बांगडी बारा आण्यांची केली होती
गावा बयाच्या गेली होती

१ शोभून दिसली.

शीतळ सावली हाये बाभळबाईची
लेकीला आशा भारी आपल्या दुबळ्या आईची

इसाचं नेसईली तिसाचं दांडीवर
बया माज्या मालनीच्या बाळ माजं मांडीवर

पाटानं जातं पानी उसासंगट खपलीला
बया मालन हाक मारी लेकासंगट सातवाला

मागं पुढं काकणं मधी कुलपी पाटली
बया मालईन माझी मधी कंगनी दाटली

बया म्हनू बया अशा उदंड रेखीईल्या
बया मालनीच्या माज्या पासंगी जोकयील्या

जासूदाच्या मुला सांग सांगावा जाता जाता
बया माज्या मालनीनं तांब्या ठेविला तोंड धुता

सात सर्जानथ मोत्यानं झाली जड
बया मालनीची लेक झाली सुरतीनं चड

हिरव्या चोळीची माजी हौस बाई फिटली
बया मालनीचा आठव होता तानभूक सुटली

शेजी जेऊ घाली तिनं मुडीची केली धोत
बया गौळन जेऊ वाढी ताटी चोपून ग भात

पाची परकाराचं ताट वर साकर निवायाला
बया माजी बोले ऊठ बाळाई जेवायाला

जेवान जेविती मी बाई खिरीवरी केळं
माज्या बयाचं राज भोळं

जेवान जेविती एका घवाच्या नऊ खिरी
आतमा निवाला बया घरी

साकरेचे लाडू करिते परात भरोनी
बया गौळण बोलती आले तयारी करोनी

जेवान जेविती बया गवळनीला साजं
केळ सोलून तूप ताजं मन फिरून गेलं माजं

पंढरीला जाता संगं नेवावी आईला
गोपाळपुरामंदी चारा घालावा गाईला

पाची परकाराचं ताट वर केळाची ती फणी
बया माजीच्या सादावानी हाक आली माज्या कानी

काळं करंद दात वाई पेटंच्या वानीनीचं
मणी बारिक दुलडीचं बया माज्या मालनीचं

दळान दळीताना जरा हालेना माजी मांडी
बया माज्या मालनीचं दूध पेले सव्वाखंडी

सांगून धाडीयीती आल्या गेल्या त्या माणसाला
बया माजीला व म्हणावं येतो म्हणाली गणपतीला

जिवाला माज्या जड कसं कळालं माज्या आई
अंगनी हुती जाई कळ्या पडती घाई घाई

जिवाला माज्या जड पाय ठरंना जमिनीला
बया माज्या त्या मालनीला कसं कळालं हरनीला

थोरल्या जात्यायाचं नाव ठेविलं हात्तीरथी
बया माज्या त्या मालनीच्या सुना दळिती भागीरथी

वाटवैला वड कुणी सजनीनं पूजा केली
मायलेकींची झुंड गेली

बयाबी म्हनू बया बया तोंडाला येती ग्वाड
बया मनूविक्याचं झाड

महादेवाच्या पिंडीवर वेल वाहिला तिकटीचा
बयाच्या जिवावरी न्हाई कुनाची परवचा

भूक लागली पोटाला भूकबाई दम धर
पाण्याच्या वाटेवर माज्या माऊलीचं घर

पाऊस पाणी न्हाई गंगा कोणीकडूनी आली
माज्या ग माऊलीची बाई अवचित भेट झाली

भरल्या बाजारात मायालेकींची गंमत
माय बोलते शिंप्यायाला सांग चोळीची किंमत

शेजी तू आई बाई दे ग उसनी मला सोजी
बया पावनी आली माजी

१६

संग्राहिका : सौ. राजाक्का देसाई

तुळशीला घाली पाणी मागं फिरुनी पिंपळाला
बया माज्या त्या गरतीच्या कुंकू शोभे कपाळाला

म्हायार मला केलं वीस पन्नासाचं सज
रेशमी पदराचं बया पाटीला झालं वज्जं

पोटीच्या परायास म्या पाठीचं राकीयीलं
बयाच्या बाळासाठी नित म्हायार देकीयीलं

मध्यान रातरीला मला उचकी लागली
बयानं माज्या सई केली

तुळशीला घाली पानी मागं फिरुनी मारुतीला
बया माज्या त्या मालनीला पूजा सोवती गरतीला

गुज बोलताना गुजाला ग आली गोडी
माजी तू बयाबाई शाळू दिस रात थोडी

पंढरीचं कुंकू काडी काडी साठविलं
बया माज्या मालनीनं सोनं म्हणून पाठविलं

समोरल्या सोप्या कोन निजली राजाराणी
बयाच्या बाळायांचा तोंडावळा माज्यावाणी

चंद्रभागेच्या वाळवंटी जागा पईस तुमी धरा
हरिकीर्तनाला कुन्या माईचा आला हिरा

सक्या बहिनीपरास गुरुभईन लई थ्वार
बयाला किती सांगू तिनं पूजिला सारंगधर

आठ धाई धारा पेले मी कुन्या रंगं
बया माज्या द्वारकानं दिला मांडीचा चवरंग

शेजीच्या उसन्याची लागलीच वरदी झाली
बयाच्या उसन्याची रिकामी वाटी दिली

शिंपीन शिवी चोळी टाकी शीप दोऱ्यायाला
बया गवळण माझी बोलं लेक निघाली सासऱ्याला

सांगून धाडीयीती ईनीबाईला दोन गोष्टी
बया मालन बोलयीती बाळ खेळून माझी होती

सांगून धाडीयीते यीवाय माज्या ग सरजाला
बया गवळन बोलयीती माज्या संभाळा गिरजाला

दिवाळीच्या दिशी ग दिवा करती कणकीचा
बया माज्या त्या गवळणीचा ल्योक ओवाळी जानकीचा

पाटच्या दळणाला नाही कोणाला हार गेली
बया गवळणीचं माज्या दूध वाविणीचं पेली

उंच उंच चोळ्या बाई वलनी झाल्या जुन्या
बयाला सांगा माज्या दोन दिवाळ्या गेल्या सुन्या

बया गवळण माजी बोलं जेव बाळाइ पोटभर
चुलती मालनी माझी बोलं भेट बाळाई आम्हावर

जिवाला माज्या जड कोण माज्या ग कळकळीचं
बयाचं ढाणं वाघ वगा सुटल्यात साकळीचं

जिवाला माज्या जड दीर जावा त्या गेल्या शेता
बया माजी ती गवळण आली सुक्कीर उगवता

माहेरीची वाट मला दिसते सपाईट
बयाचा माज्या बाळ मला दिसतो पोपईट

गंठण मला केलं झाली वरीसं त्येला नऊ
बयाला इचारता तिचा सबूद आला मऊ
माजा उदास झाला जीवू

जोडवी म्या बी केली त्येला वरीसं झाली बारा
बयाला इचारता तिचा सबूद आला न्यारा
मला सुटला वैलवारा

देऊनी घेऊनी ग कोणी बांधल्याती ओझी
बया माझी गवळण हरणी आगत मला तुझी

पाची परकाराचं ग ताट बया म्हणती कशायाला
बयाला किती सांगू इंद्रावनीच्या माशायाला

पंढरपुरामंदीं सारी पताका पिवयीळी
माज्या बयाच्या बाळायाची शीन साधूची कवयीळी

दुवळं माजं पण आता आलंया सरईत
बया माज्या त्या मालनीचं राघू झाल्याती फरईत[1]

नांदाया जाती मैना सोडी गळ्याची माझ्या मिठी
बया मालन माझी बोलं वाडा भयान लागे पाठी

वैराळ तूं बी दादा बैस पायवीरीच्या खाली
बया मालन माजी बोलं हिरा माणिक भर वाळी

चोळी नि लुगड्याला न्हाई रुसत म्हायाराला
माजी तूं बयाबाई दोन रातरा इसाव्याला

आवक मागयीती माझ्या जोडवीयाच्या बोटा
बयाला किती सांगू राजवर्कीला काय तोटा

साती नि आसईरा त्येंचा पान्यात हाई मठ
माजी तूं बयाबाई हळदी कुंकवाचं भर ताट

उभ्या मी गल्ली जाते माझा पदराखाली हातू
बयाच्या कुसव्याची लंकेला गेली मातू

पहिली माजी ओवी म्या ग आईला गायिली
बया माजी ती गवळण घरी तुळस न्हायिली

जातं मी वडिताना माजा पदर झाला वला
माझ्या माईचं दूध पेले आकरी दुधाला कढ आला

जातं मी वडीईती नखा बोटांच्या आगयींरी
बयाचं दूध पेले जशा मधाच्या घागयीरी

---

१ कर्तबगार.

॥१७॥

संग्राहक : श्री. बाजीराव पाटील

सटीनं अक्षार ल्हेलं बयानं घाई घाई
आपल्या दैवाले काय करील मायबाई

सटीनं अक्षार ल्हेलं ऐका ग अर्ध्या राती
आपल्या दैवाले काय करील भागीरती

सटीचं अक्षार बाई बरम्याची रेग
आपल्या नशीबाले माय एकली जिवलग

माहेरी जाता बाई माहेरी मायबाई
कामधंद्याला इसर सुक देते भावजाई

माहेरीचा दिवा दिसते मला कोसावून
नांदते राजरानी मायबाई समाधान

॥१८॥

संग्राहक : श्री. ना. रा. शेंडे

माय तुह्या घरी राज केलं लेकावानी
तांब्याभर पानी माये पित्याची मांगनी

माय तुह्या घरी राहून राज ग मिथ्या केलं
तांब्याभर पानी तुझ्या हाती नाई देलं

माय तुह्या घरी राज केलं रावनाचं
नाई उचललं ताट तुह्या जेवनाचं

मायबाई तुह्या घरी कामधंदा नाई केला
रांजनाचं पानी वापरता शीन गेला

तुह्या उद्री देला जल्म जल्म देऊन केलं सोनं
केली जीवाची राखन अवो माय अवो माय

नाई सांगतला धंदा केला हाताचा तू रांधा
खुला डेवलास हंडा अवो माय अवो माय

माही पाहोन व आस देलीस तोंडातला घास
केला दो दिसांचा उपास अवो माय अवो माय

जंगल पहाळी हिंडून आनलीस इंधन कुंधन
केलीस रातीचं जागरण अवो माय अवो माय

माहे पाहून हातपाय ळळत होतीस मनात
निजलीस घेऊन कुशीत अवो माय अवो माय

चिंचेची सावली बाई चिंचेहून सरशी
माय बाई तुही सर काय करील मावशी

माय इतकी माया नाही येत सजनाले
पेटला डोंगूईर पानी नाही इयोयाले[१]

कापूस येचीन माये परखाटी[२] धरून
माये तुहं गोत नाय वळकीलं दुरून

वाटंच्या वाटसरा हो रं वाटच्या आगळा
जीव लागला सगळा माय हरणीकडं

---

१ विसागला. २ पलाटी, पळकाटी.

तुज्या माज्या ग भेटीला बाई वरीस लोटलं
कसं तुला ग कंठलं मायबाई

माजे ग मायबाई करू नको माजा घोर
मला बसविलं राज्यावर देसाईरायानं

दिवाळीच्या दिशी आरतीत पाच कोंद[1]
ओवाळीला तुजा गेंद[2] माय हरणाबाई

आईवाचूनी ग माया कोणाला फुटेना
पावसावाचूनी रान हिरवं उठेना

अंबारीचा हत्ती बाई वाड्याला भिडला
मायबाईनं ग माज्या किराना धाडीला

आईसारखी ग माया येईना कुणाला
संपादत[3] नाही दूध साळीच्या भाताल

पोथींमंदी पोथी बाई भागवत भारी
गोतामंदी मातोसरी

:::१९:::

संग्राहक : श्री. बा. शि. पाटील

आई आई म्हणू आई इतकं गोड काई
साखऱ्याबाईला जरा कडूपणा नाई

---

१ लाडू. २ मुलगा, पुत्र. ३ मिळविणे.

आई आई म्हणू आई कोणीच होईना
माऊलीची सर शेजीबाईला येईना

जन जातं काशीयीला मी जाते म्हायेराला
माऊलीची मया काशीपुरीत पाहायाला

मोहराला आला माझा वेशीमंदी आंबा
दंडवत माझा बाई माऊलीला सांगा

लंबे लंबे बाल माझी कवळी केसाची
माऊली बया माझे धन तुझ्या सायासाची

माझा अंगपिंड जाईच्या फोकावाणी
माझ्या माऊलीनं निगा केली लेकावाणी

लाडकी लेक मागती आईला मलई
सोनीयाची वाटी तिला चांदीची कलई

लेक जाती सासऱ्याला मागं कशाला बघती
आई वळकीते संगं मुराळी मागती

बया म्हणू बया माझं नागीलीचं पान
जन्म दिला मला माता यमुनाबाईनं

शेजी घाली जेऊ करी आवड निवड
माऊली घाली जेवू ताटी पोळ्यांची चवड

शेजारीण बाई बरवं बोल मशी
माऊली माझी बया सये दूरल्या ग देशी

काम झालं थोडं परी घामानं केलं येडं
आईनं दिली घुटी टाकीयलं येलदोडं

जात्या या ईसवरा तुला ओढिते दगडा
माऊलीचं पेले दूध तुशी घालिते झगडा

जातीयाचं तोंड जशी खोबऱ्याची वाटी
माऊली मयाळ माझी नांदते वालेघाटी

काम करावं लेकी नाही कामानं मरत
माऊलीचं दूध नाही माघारी सरत

ल्हानसं ग जातं येईना माझ्या मना
माऊलीचं दूध सये पेले पहिला पाना

सकाळीच्या पारी मला झाडायाचा पाठ
आईनं दावीयली मला संसाराची वाट

आई आई म्हणू शेजीला करू काई
पारुशा केरावरी देव ठेवताती पायी

उगवला दिस कसा तांबडा या लाल
आई सांगते दादा याला रामराम घाल

२०

संग्राहिका : सौ. मालतीबाई दांडेकर

मायबाईच्या घरी राज केले मी सवाई
पाण्याचा तांब्या कधी भरू दिला न्हाई

समींदर सोकल्यानं जाईना व माजी तान
माजी ग बयाबाई दरव्या भरीला अस्मान

समदं माजं गोत हाई गावभर नातं
बया माजी गवळन जशी हरनी लवनात

शेजीसंगं गुज मातेसंगं अबुला
येड्या माज्या जिवा आता पसतावा[१] घडला

पाऊस पाणीयाची आली आगूट[२] रेटून
चाल माजे वाई येऊ आईला भेटून

पाऊस न्हाई पानी गंगा कुणीकडनं आली
माऊलीची माज्या वाई अवचित भेट झाली

भूक लागली पोटाला भूकबाई दम धर
पान्याच्या वाटेव माझ्या माऊलीचं घर

परनी परदेश हाय जिभेवरी गोडी
बयासारख्या सया जोडी

टिप्पूर चांदण्याचं गुज बोलूसं वाटलं
बयाबाईनं माज्या घोडं मुराळी पाठीवलं

काशी म्हनू काशी काशीला गेलं येडं
मायबाप असताना उगं पायाचं दिलं भाडं

भरल्या बाजारात वाट बघते येड्यावानी
बयावानी हाक सये मारली मला कुनी

भरल्या बाजारात हुडकते चारी येशी
सया बोलत्याती नाही आली तुझी काशी

काशी म्हनू काशी हाईत चवदा येशी
तीर्थं बयाच्या पायापाशी

भरल्या बाजारात झालं उदास माजं मन
नाही आली मायाभैन

१ पश्चात्ताप. २ पावसाळ्याची सुरुवातीची चिन्हे.

बया म्हनू बया ओठाला येती जाती
बाभळवनामंदी काटा लागला सय येती

पाटानं जातं पानी उसासंगट शेतायाला
बया मारी हाक लेकासंगट नातवाला

पालक पाळना ल्येकाच्या लेकराचा
बयाबाई झोका टाकिती कवतुकाचा

वाईट बोलन्याच्या हिरद्यात सवत्या खोल्या
जाते बयाच्या गावाला काढिते कुलपं किल्ल्या

फुलामंदी फूल नाजुक करवंदीचं
बयाचं माझ्या किती बोलतं मुखतीचं[1]

बारीक तुझा गळा जशी भवऱ्यावेली जाळी
मायबाई चल येते मी तुझ्या आळी

वळवाचा पाऊस वड्याखुड्याला नाही धीर
माझी बयाबाई साठाची समींदर

आई म्हनू आई आई साखरेचं झाड
आईचं नाव घेता तोंड झालं किती ग्वाड

माडीवर माडी उंच ग कळसाची
बया माझी गोष्ट बोलते उल्हासाची

अंतरीचं गुजू बोलावं बयापाशी
न्हाई उमट[2] कुनापाशी

अंगनी बसल्या चुलत्या मालत्या सया
टोपपदराची माजी ती बया

---

१ आदबशीर, नम्रपणाचं. २ स्पष्ट करणे, उघड करणे.

सोनसळे गहू बाई खपलीच्या पोटी
गवळन बयाबाई धीराच्या सांगी गोष्टी

देवाच्या दारावरनं पाण्याला जाती वाट
गवळन बया तुझ्या चुड्याला भिंगं दाट

चौघी आमी भैनी चार गावी चार इटा
बया मालनीच्या चोख चांदीला न्हाई बट्टा

फुलामंदी फुल दारोळ[1] किती लाल
बयानं मला चोळी धाडिली तस्सी काल

लुगडं घेतईलं घडीला[2] लई जून
नको मला बये नेसूदे तुझी सून

लुगडं घेतीयील मुंगीनी मुखानीचं
बयानं मला केलं माह्यार सुरानीचं

अंगातली चोळी अंगात दाटयीली
मायबाप तुझी शीण म्या गाठीयीली

अंगातली चोळी होईना माझ्या अंगा
माज्या बयाला जाऊन सांगा

फाटली माजी चोळी लुगडं आलं दंडा[3]
सांगनं म्या केलं बयाच्या राजपिंडा

गवरीचा सण बया बघती चारी वाटा
हिरव्या चोळीचा माज्यापायी करी साठा

काळ्या चोळीवरी कुनी काढल्या गवळनी
बयाच्या मामे भैनी सख्या आमच्या मावळणी

---

१ जास्वंद. २ काठाला. ३ अंगावरील पदराजवळ फाडून चांगले दोन भाग एकत्रित शिवणें, जोडणें.

काळ्या चोळीवर कुनी काढिल्या लवंगा
बयाला माज्या सांगा चोळ्या झाल्याती सवंगा[1]

भरल्या बाजारातु चाटीदादाची लंका लालू
गवळन गोदूबाई उभी पेठंला नागवेलू

फाटली माजी चोळी न्हाई ठिगळ दाटूनी
बयाच्या गावा जातो सये बाजार गाठूनी

जरीच्या पदरानं भरली माझी पाठ
बया घेते चोळी जांभळी जरीकाठ

चवघ्या आम्ही भैनी एका खणाच्या ग चोळ्या
याही इच्यारतो कुन्या नारीच्या चाफेकळ्या

भरला बाजार मन भरंना चोळीनं
बया माज्या चल चाट्याच्या आळीनं

जिवाला जड भारी माज्या बयाला बोलवा
साखरेचं पानी देते तोंडाला ओलावा

भरला बाजायारू किरान्यामंदी पेरू
सव्यी गोतात बया थोरू

जिवाला माज्या जडू खडीसाखर उशामंदी
बया आपुल्या देशामंदी

सांगून धाडीयीते कोरा कागद बिगी लिवा
बया आली का सांगावा

जिवाला जड भारी दंड लोळती धरनीला
न्हाई कळालं हरनीला

---

१ स्वस्त, मुबलक, भरपूर.

५

जिवाला माज्या जडू येळंला कोन होती
हाती अमृताची वाटी बया मध्यानराती येती

वाट किती बघू कडी दाराची धरूनी
बयाला देखताना आली नेतरं भरूनी

वैराळ सादवीतो वरल्या ग येशी
न्हाई घरी काशी आळू[1] करू कुनापाशी

लांबडे माझे केस पानी न्हायाचा आळस
गुजर मायबाई दारी बैसली तुळस

लांब लांब केस पानी न्हायाचा आळस
गवळन बया बोले देतो चवरंग न्हानी बैस

लांब लांब केसू इथं कुनाचं न्हाई नातं
बयाचं माज्या तिथं झिजलं तळहात

लांब लांब केस लिंबाची बागशाई
बया ग आणीयीते डोंगरी शिकेकाई

सकाळी उठून काळा कुरूंद घसीतो[2]
बयाच्या नावापायी परमुलूख कटीतो

जिवाला भारी जड खडीसाखर घोटंना
बया उशाची उटंना

नऊ मास नऊ दिस वागविलं आडकुशी
आणा बया माज्यापाशी

बारीक बांगडी हात भरून लेले होते
गावा बयाच्या गेले होते

१ हट्ट. २ अडखळतो.

जातं ओढीताना हलेना दूधमांडी
बयाचं माज्या दूध पियाले सव्वाखंडी

घरचा कामधंदा हाये मी एकली
बयाबाई तुझी सून धाडावी धाकली

पड रे मेघराजा वञ्यावघळी बदवदा
बया गवळन माजी साठ्याची नरवदा

बसाया बसकारू टाकी सतरंजी नकशीची
मायबाई राधा आलीया मोकाशाची

शेजी जेऊ घाली ऊन ऊन भात
मायाबाप माझी सये फिरविती हात

भाजी भाकरीचं जेवन माझं रूचीचं
बयाच्या जिवावर म्हायार ग सत्तेचं

पाची पक्वान्नाच्या ताटी टाकिलं केळीपान
माझ्या बयासारकं[1] हाका मारितं मला कोन

पराई पुरुषाच्या नये जाऊ आशीपाशी[2]
बोल येतो हरनीशी

जलम दिल्यादिशी बया इळाची उपाशी
उणं उत्तर देऊ कशी

बत्तीस धारा पान्हा पेले मी जाता जाता
या ग कामाची काय कता[3]

संबोरल्या सोप्या जळे चिमणी जोडवाती
बया गुजाला आली राती

१ आईसारखे. २ आसपास, जवळपास. ३ कथा, पर्वा.

राजामंदी राज मायबाईचं परवळ[1]
बया गवळण माझी बोलं जेव ग अवकळ

सरगीची वाट सये लोटता लोटईना
बयाबाई माझी सखी भेटयीना

सरगीच्या देवा तुझं काय केलं
बया मालन माझी गुजाचं झाड नेलं

आई आई करू आई सोनानी[2] परात
आईवाचूनी चित्त लागंना घरात

माय माय करू माय सोनानी पालकी
आईवाचूनी कुनी करंना आलखी[3]

खुंटीवैला शेला ओढून घाई घाई
बयाशी भेटायला माहेरी जाते बाई

उंचा वसरीला हंड्या लावल्या सवाई
भावाच्या बरोबरी मायबाईचे जावाई

माय माय करू माय मन्ही मंडोदर
नऊ मास ओझं सहा मास मांडीवर

गोरं मन्हं अंग किती लेवू धूयमाती[4]
मायबाईनं दिलं लई उनं कंथासाठी

चांदणं चटक दारी पलंग तो नवा
माझेशी चावळे मायबाई तुझा रावा

समईला तेल तेल घालजो आणिक
माझेशी चावळे मायबाईन्हं माणिक

---

१ प्रवळ. २ सोन्याची. ३ कोडकौतुक, आळ काढणे. ४ धूळमाती, सहन करणे, धुळीत काम करणे.

चल शेजी जाऊ मन्हं माह्यार तुला दावू
कमानी दरोजा तिथं माई आणि भाऊ

:::२१:::

संग्राहिका : सौ. कमलाबाई बडवे

आवाज जोडव्याचा येतो बाई माज्या कानी
माता ती माऊली मला वाटे आल्यावानी

दळण दळीताना असा दंडाला देते झोला
गौळणी ग बाई तुझ्या दुधाचा कैफ आला

थोरलं माजं जातं नको म्हणू जड जाऊ
आईच्या दुधाचं तुला किती बळ दावू

शेजी न्हाऊ घाली भिजना माजा दंड
गौळण घाली न्हाऊ ग न्हाणीत आली भोंड[1]

शेजी न्हाऊ घाली भिजंना न्हाणी धोंडा
गौळण घाली न्हाऊ रासबिदीला गेला लोंढा

शेजी जेवू वाढी वया कण्याचा डिकळा
गौळणीचा भात माज्या साळीचा मोकळा

दळण दळीताना पाची बोटाच्या कमानी
दूध बयाचं इमानी

१ भोवळ.

खंडीभर गोत[1] काय करावं गोताला
मायबाई जाई तुजा ग वास आला

उनाच्या रकामंदी सर्प हिंडतो साऊलीला
येवढ्या गोतामंदी जेपा[2] मया माऊलीला

काम मी करीते सये कामाच्या येळेला
माऊलीबाईच्या मी ग शिकले शाळेला

दळण दळीताना माज्या अंगाचं झालं पाणी
माऊलीबाईनं मला चारीलं सायलोणी

सारवल्या भिंती वर काढिल्या मईना
येवढ्या गोतामंदी कुणा आईची सर यींना

माऊली जेवू वाढी केळ सोलुनी तूप ताजं
मन तिरपती केलं माजं

फुला ग मंदी फूल बाई हुंगावं जाईचं
सुख भोगावं आईचं

॥२२॥

संग्राहिका : सौ. नवलबाई शहा

शेजी विचारती कुठं चोळी खरीदली
आई माजी भोळी तिनं अंगातली दिली

१ नातेवाईक. २ जास्त, अधिक.

भरल्या बाजारात दिसती साखरेच्या ल्हाया
सारी पिरतीमी[1] धुंडिली आईसारखी नाही माया

पिकलं सीताफळ कशी हिरवी त्याची काया
मायबाईच्या पोटात साऱ्या दुनियेची माया

शेजी जेवू वाढी तिनं मुठीची केली धोत[2]
बया जेवू वाढी ठाव[3] दडपुनिया भात

तुळशीला घाली पाणी गेला तुळशीचा काच[4]
मायबाईचा ग माज्या पतीवर्तांचा वाडा हाच

वैराळ सादवितो चुडं लियाच्या कुठं गेल्या
माय माझी बोलयीती लेकी सासरी दादा गेल्या

अंबर डाळिंबाच्या गोऱ्या हाताला झकापका
बया गौळण बोलयीती द्रिष्ट होईल घालू नका

जातं ग ओढीयीती नखा बोटाच्या जोरावर
बया माजीनं दिली घुटी बाई पारुशा केरावर

जातं ग वडीताना दंड देतात मला काव
बयाच्या जिवावरी काम निसाचं न्हाई ठावं

जातं ग वडीताना बाई दुखती माजं दंड
बया माजीच्या जिवावर सुखवासी माझा पिंड

पाटच्या पाऱ्यामंदी रवी घुमती नानापरी
बया गौळण ताक करी

भरल्या बाजारात मी का हिंडते येड्यावाणी
कोण दिसती बयावाणी

---

१ पृथ्वी. २ ओंजळ (भरून), पदर (भरून). ३ पात्र, पान. ४ जाच.

दळण दळीताना मागं सरंना माजी मांडी
बया माज्या गौळणीचं दूध पेले सव्वा खंडी
नऊ मास नऊ दिस होतो अंधार-बारयीला
बया माजीया गौळणीला कष्ट पडलं नारीयीला

::२३::

संग्राहक : श्री. वि. वा. जोशी

काशी बनारशी करती कशाला लोक येडं
माईच्या पाया पडता सये सवाई तीर्थ घडं
मायबाई माझी शाही मळ्यातली बोर
बोरीच्या सावलीत झोप घेते मी बिनघोर
मायबाई माझी जैशी साखरेची लाही
पिरतीमी धुंडल्यानं ऐसा मेवा मिळत नाही
शीतळ सावयीली पानी वड्याचं किती गोड
मायेची शिदोरी भाऊराया तू गाडी सोड
नऊ महिने वझ्झं वागविता नाही भेली
मायबाई माझी माऊली कष्टी झाली
मायबाईच्या गोष्टीनं बाई वेडं मला केलं
सुक्राच्या चांदणीचं राती कवाड उघडीलं
सांगती गोड गोष्टी माई माझी ती गुळावानी
मावळाया गेला दिस सारा ग वाऱ्यावानी

सुख सांगू सुखापाशी दुःख सांगू मी कुनापाशी
माउली जिव्हाळ्याची वाई राहिली परदेशी

वाटच्या वाटसरा काय पाहाशी खेड्यायाला
सोन्याचं कुलूप माझ्या माईच्या वाड्यायाला

माई तुझी सर नाई येत ग बंधवाले
डोंगुर चेतला ग नाई पानी विसानाले

## २४

संग्राहिका : **सौ. शशिकला पाटील**

लेकीचा जलम जसा बाभळीचा पाला
बया गौळन बोलती धनी कोणाचा कोण झाला

लेकीचा जलम जसा गाजराचा ओपा[1]
बया गौळन बोलती पाणी घालून काय नफा

जाई शेवंती शेजारी झाड बोरीचं नसावं
बयानं शिकविलं भल्या गतींत[2] बसावं

उभ्या मी गल्ली जाते टाचंपातूर पासवा[3]
बयाला म्हनीत्याती कुन्या गतींचा कुसवा

बारीक पिठाची येती भाकर चवघडी
बयाच्या जेवणाची याद होती घडूघडी

---

१ वाफा. २ सभ्य स्त्री, कुलीन स्त्री. ३ पदर.

बारीक दळान पाणी पिठात मायासाठी
बयानं शिकविलं चित्त गर्तीत ऱ्हायासाठी

गूज बोलताना घाली दिव्याला जोडवात
माझी तू बयाबाई गूज बोलूया सारी रात

गूज बोलताना त्या गुजाला आली गोडी
बया मालनी माझ्या शाळू दिवस रात्र थोडी

गूज बोलताना चंद्र माडीच्या आड गेला
बया माझीला किती सांगू गुजाचा झाडा झाला

बया म्हणू बया, बया कोणाची होईना
बया माझ्या गौळणीची सर कोणाला येईना

आंब्याची आंबराई बाई केळीचं शिकरन
मावली बाई माझी जेवू वाढिते सुगरीन

उंच उंच चोळ्या घरामागली शेजी लेती
मावली माय माझी तिच्यापरास चढ घेती

बुट्टीचं दळायान बाई दुरडीमंदी आलं
बया मालनीचं दिस नाचारपनात ग गेलं

बहीण भावंडं आमी एका डब्यातले मोती
मावलीबाई माझी भरती गंगेला आली होती

लेकीच्या आईला कुठं केली पालयीकी
नको म्हणू हालयीकी

लेकीच्या आईचं डोळं का ग लालीलाल
हिरकण गेली काल

पाची परकाराचं ताट वर सोजीची पाखरं
एका मातेची लेकरं

जिवाला जड भारी आयाबायांनी भरला वाडा
मावली आली माझी बयांनू वाट सोडा

जातं वढू वढू माझी तळातं झाली पिवळी
आईनं दिली गुटी जायफळं ती कवळी

माऊली असावी बाई वनीच्या पाखरा
चोचीनं घाली चारा बाई आपुल्या लेकरा

लळ्यामधी लळा मायबाईचा आगळा
बाळापायी दिला तिनं आपला ग गळा

आई म्हणताना तोंडाला पडं मिठी
बया माजी गौळन साखर न्हाई पिठी

जिवाला जड भारी कसं कळालं माझ्या आई
दारात होती जाई फुलं पडाया जागा न्हाई

पिकला हुंबर ढापी फुटली ठायी ठायी
बयासारखी माया नाई

दळण दळीते जरी बाजरीबाईचं
सुख म्हायेरी आईचं

२५

संग्राहिका : प्रा. सौ. विमल थत्ते

समींदर सोकल्यानं तहान ग नाही गेली
मायबाई माऊलीची गंगाची वळती केली

मायेसारखी ग माया येईना पुरुषाला
झाडामंदी वुरुक्षाला फूल येईना शेराला

गावभरी माझं गोत झाडाचा ग झाडपाला
माईबाईच्या ग माझ्या चिंचेच्या सावलीला

मायेवाचूनी माहेर कंथावाचूनी सासर
सांगते सईबाई बाळावाचून सुनं घर

पाच रुपयांची चोळी आठ आण्याचा ग दोरा
मायबाईनं ग माझ्या छंद पुरविला खरा

लांब लांब केस सडक माझी वेणी
माय मालणीनं बाई निगा केली बालपणी

लांब लांब केस माझे लोळती भुईला
माय मावलीनं पाला गव्हाचा लाईला[१]

नऊ मास वझं वागविलं मिरीआड
माझ्या मायबाईला ओवी गाते देवा चढ

नव्हती आशा केली शेजीच्या शिदोरीची
सोडीते मी गाठ माऊलीच्या पदराची

शेजीचा सावणा[२] तळहातात राहीना
मायेच्या सावणा भरल्या थाळ्या उचलंना

शेजी जेवू घाली भरंना माझं पोट
माय जेवू घाली दुधासंगं सायलोट

मला ग वाटलं मावलीला ग भेटावं
चंद्रसेनाला लुटावं

---

१ लावीला. २ तोंडी लावण्याचा पदार्थ.

शेजी जेऊ घाली बाई शिऱ्यावरी तूप
माझ्या जेवणाचं कळलं आईला सरूप

मीत मपल्या घरी नको करू माझा घोर
मायबाई माझे मला वाटतं माहेर

मी मपल्या घरी नको करू माझी चिंता
मायबाई माझे मला दिलं भागीवंता

तहान लागली मला ग आटंग्या वनात
मायबाई माझी गंगा माझीया मनात

बारीक पिठाची कशी भाकरी चवदारू
माऊलीची माझ्या जेविता याद करू

जिवाला माज्या जडू येळंला कोन होती
माय बयाबाई मध्यान राती येती

सासुरवासामंदी गेली काकनं कोपराला
बया इच्यारती काय जाचिलं लेकराला

शीतल सावलीला मी ग उतरीते वज्जं
माय हरनीची माज्या सावली गडदाबाज[1]

समींदर समींदर मोठी नावाची बढाई
आईविना माज्या कशी तहान मोडावी

शीतळ सावलीला मी त बसले टेकुनी
माय चिंच न बाईची गार सावली बघुनी

माय म्हणू माय किती सांगू आठवणी
आई मोहाच्या मधावाणी

१ गर्द, दाट.

पहिली माझी ववी गुरुरायाला गाईली
माय हरना माझी जल्म दिल्याली राहिली

नऊ म्हैने हुर्यामंदी[१] सहा म्हैने मांडीवरी
मजसाठी कष्टी झाली माय माझी मंदोदरी

लांब नि लांब केस सडक माझी येनी
माया माझ्या हरनानं निगा केली ल्हानपनी

लांब नि लांब केस चौरंगाहून भुईला
सायास ग मायेला पाला गव्हाचा लाईला

हजार माझं गोत झाडीचा झाडपाला
माईच्या ग माझ्या मी चिंचेच्या सावलीला

माझ्या जिवाला जाचनी जशी झाडाला करवत
माझीया अंतरीची माय माझीया मुरवत[२]

अंतरी गुजायाच्या हुरद्यात झाल्या गाठी
मावली ग माझ्या साठविलं तुझ्यासाठी

माझं मला दुःख मी त सोशीते दमानं
मायबाई माझे तूशी राखते इमान

माझं ग सुखदुःख मी त सोशीते एकटी
मायबाई माझे उतावीळी भेटीसाठी

सटवीचं आकशार बम्र्या लिवी घाईघाई
जवळ मायबाई तिला कळू दिलं न्हाई

सांगून धाडीईते आल्यागेल्याला गाठून
मायबाई माझे झाले लईदी[३] भेटून

---

१ हृदयामध्ये. २ किंमत. ३ पुष्कळ दिवस.

सांगून धाडीईते आल्या गेल्याच्या ग हाती
माय चांगुना ग माझी ढाळजाला[1] उभी व्हती

दूरच्या देशीची मी माझा जीव उदासला
मायबाई माझे वेगी धाड जासूदाला

कासारा रे दादा लीव शाईनं कागदा
मायबाई माझी यील येशीला एकदा

पाच रुपयाची चोळी आठ आन्याचा ग दोरा
माझ्या माऊलीबाईनं छंद पुरविला खरा

माय म्हनील्यानी माया कितीक तोंडाच्या
चाट्याच्या दुकानी चोळ्या कईक बांडाच्या

शेजीचा सावण तळहाताची चटणी
मायेचा सावणा झाली थाळ्याला दाटणी

इस्तारलं ताट वऱ्ही तुपाचं मव्हन
मह्या हारनीसारखं कोन वाढील जेवन

शेजी न्हाऊ घाली पाठ नाही वली झाली
मायबाईच्या न्हान्यानं न्हानी खंगाळून गेली

मायलेकीचं ग गूज वरसाच्या घरी गेलं
अंजनाबाई म्हने तुला कसं करमलं

आपून मायलेकी गूज बोलू गडे राती
शेजी नवल करीती तुला एवढाल्या लेकी

नव्हती आशा केली शेजीच्या शिदोरीची
सोडीते मी त गाठ मायेच्या पदराची

---

१ ढेलज, पडवी.

बारा वरुषाची लेक झाली ग आईबाई
गळ्याला गळा लावी येडी झाली मायबाई

भाग्यवंताची सई ग तुझा पदर मळला
मायबाईनं ग माझ्या कडे नातू खेळवील

अहेव चं लेनं जोडवं काळी पोत
मायबाई माझी गौळन बोलती झोकात

॥२६॥

संग्राहक : श्री. दा. गो. बोरसे

चाफ्याच्या झाडाखाली उभा ग भाऊराया
जमल्या आयाबाया आई भोती[१]

रेशमी खण फाडी आई ग घेई साडी
मावशी घाली घडी काय बाई

मिराणी जाडीजुडी रुतती माझ्या पोटी
घ्यावी पिवळी ही धट्टी[२] मायबाई

आई घे माझ्यासाठी करंडे कुंकवाचे
मणी ग सोनीयाचे आईबाई

गाठून देता नथ सोन्याचे मंगळसूत्र
आईचे भरले नेत्र काय बाई

१ भोवती. २ पिवळ्या रंगाची उत्तम साडी.

पंढरपुरीची फणी माझी ग घाली वेणी
आम्ही ग दोघी वहिणी माझे आई

पैठणी येवल्याची नेसता हर्ष वाटे
माहेर माझे मोठे आई बाई

जल्म दिधा माले जलमन धनी कोन
दोघं मातापिता तिसरा भगवान

:::२७:::

संग्राहिका : सौ. जैबुन्निसा खान

माऊलीची माया शेजी करायला गेली
गुळाची ग सर साकरेला नाही आली

नांदायला जाती लेक माईला येतं रडू
नागपंचमीला बाई तुला मुराळी ग धाडू

दिल्या घेतल्याचं काही पुरत न्हाईच
माऊली बाईचं गोड बोलणं सईचं

माऊलीची माया सये येईना आणिका
अंगीचा तो रंग चढे कोवळ्या माणिका

माऊलीची माया काय करील चुलती
धारवाडी खण चोळी होईना पुरती

फुलांमधी फूल जसं जासवंदी लाल
मायबाई चोळी शिवे मला मखमाल

मायबाई माझी गुज बोलतीया गोड
मावळाया गेला चांद ढगाच्या ग आड

माऊलीबाइनं मला शिकविलं एक
थोराघरी देऊ नाही लाडकी ती लेक

वलनी वाळते माझी काळी चवघडी
माऊलीची सय मला होते घडोघडी

शीतळ सावलीशी पाखरं झाली गोळा
माऊलीची मया इसरांतीचा पानमळा

माहेरी जाऊन बसेन मी बाजेवरी
माऊलीच्या बाई मला विसावा ग घरी

चोळीईचा खण वर कुंकवाचा मासा
माऊलीबाईनं धाडीयेला दूरदेशा

चोळीईचा खण वर कुंकवाची पुडी
माऊली मायाळ माझी जासुदा हाती धाडी

शेजी शेजाराला भुनभुन उसन्याला
माईचा आधार सये माझ्या भूषणाला

शेजीचा शेजार माझ्या जिवाला बेजार
माईचा शेजार मला पाण्याचा आधार

लेकीच्या आईला नका म्हणू भिकारीण
आईबाई माझी हिऱ्यामोत्यांची व्यापारीण

आई उनी माया सये कोणाला सुचेना
पावसा वाचूनी रान हिरवं दिसेना

जातं मी ओढिते जशी आगीन[1] पळते
माऊलीचं दूध माझ्या हुरदी गळते

शेजी जेऊ घाली इसमती[2] ती मनाला
बया जेऊ घाली ठावं होईना कोणाला

शेजीचं उसनं फेडिते देठोदेठी
बयाचं उसनं कस बोलू या ग ओठी

शेजीचं उसनं घालीन अधोली पायली
माईच्या उसन्याची सय कोनाला ऱ्हायली

शेजीचं उसनं घेते दारात बसूनी
बयाचं उसनं बारा जलमापासून

शेजीचं उसनं येई पळी दोन पळी
आईचं उसनं कितीकदा जाऊ भोळी

अठराया धारा पान्हा पेले सरोसरी
माऊली बया मी आले तुझ्या बरोबरी

बया म्हणू बया माझा मोहळाचा मधू
लागून गेला बाई माझ्या कुडीला ग वेधू

बया म्हणू बया माझी सेवंती फुलली
बये तुज्याविना आस मनीची उरली

बया तुझी सर शेजी करायाला गेली
मावंची[3] साखर पाना जवारीच्या आली

बया म्हणू बया तुझं नाव किती गोडू
तुझ्या ग नावानं पुण्य तीरथाचं जोडू

---

१ आगीनगाडी २ विस्मय वाटणे. ३ कृत्रिम.

नऊ महिने उधारी नऊ महिने पाधारी
नाही बोलली माघारी बया माझी गोदावरी

मोडला ग काटा रग लागली पायाला
नऊ मास वागविलं काय म्हणू मी बयाला

शेजी घाली जेऊ माझं पोट नाही भरे
आई फिरवी हात येती अंगावरी शारे

माऊली बाईला नको करू वाई बाई
माऊली वाचूनी दुनयेत कोणी न्हाई

आई वाचून माया भैनीवाचून कनवाळा
घालू नये हात येड्या गवऱ्याच्या गळा

आईवाचून माया भैनीवाचून कोण सख्खं
पोळ्याचं जेवण तुपावाचून ग फिक्कं

माऊलीची माया लाखाचं झालं पाणी
उपकार नाही येड्या लेकराच्या मनी

माऊली मायाळ तिनं भुईचं केलं आळं
वाढविलं तिनं पंखाखाली तिचं बाळ

माऊली मोकासा जीव झाला येडापिसा
पाखराच्या परी बया येती तुझ्या देसा

जिवाला जड भारी उशा समया जळती
बयाच्या सायासाचे केस धरणी लोळती

जिवाला जड भारी सये कुणा घालू वज्जं
मायबाई माझी तातडीनं येणं तुजं

जिवाला जड भारी वैरीयानी केली मात
माऊली ग तुझी सय झाली सारी रात

जिवाला जड भारी माझ्या बयाला बोलवा
साखरेचं पाणी देते जिभेला वलावा

दळण दळीता मनगटी माझ्या बळ
वळकट दूध माऊलीचंच कवळं

जातं ओढताना जसं भाया बळ माझं
मायबाई वाघिणी ग पेले मी दूध तुझं

जात्याची भिंगरी घाम कवटाळी माईना
माऊलीचं दूध शरण कोणाला जाईना

माऊली शिकवी तुला राग येतो बाळा
तुला रे जाणवेल चैत शिमगा उन्हाळा

आई म्हणू आई, आई चौदावं रतन
नऊ महिन्याचा केला गर्भ हो जतन

नऊ मास माझं ओझं वागविलं कुशी
मायबाई तुझे उपकार सांडू कशी

माऊलीनं केली अंगाची धूळमाती
तुला जन्म देता अस्तुरी कुठं होती

लेकीचा जलम नको घालू देवराया
माऊली बाईचे केले कष्ट गेले वाया

उंच ओसरीला बसल्यात मायलेकी
मायबाई म्हणे दृष्ट झाली एकाएकी

आईवाचूनी माहेर कंथावाचूनी सासर
झाडावाचून जंगल सये दिसतं भ्यासूर[१]

---

१ भेसूर, भयानक.

आईविना माया कोणीही करीना
पाण्याविना धार पिंडीवरही धरीना
माहेराचा देव कशानं ओळखावा
माईच्या खुणेचा मोती प्रेमाचा लावावा

:::२८:::

संग्राहक : **श्री. रामकृष्ण आ. कदम**

पहिली माझी ओवी म्या आईला गाईली
बया माझी गवळण नित तुळस न्हायीली
उभ्या मी आळी जाते माझा पदराखाली हात
बया तुझ्या कुसव्याची सरगी गेली कीर्त
शिजीचं उसईनं आडीसरी ग पायीली
बया तुझ्या उसन्याची याद कुनाला न्हायीली
शिजीच्या उसन्याची आवर्जून वर्दी आली
बया तुझ्या उसन्याची वाटी रिकामी न्हायीली
लेकीच्या आईला लेकीवाचूनी गमंना
सारीवल्या भिंतीवर काढील्या कामीना
जातं वडीताना माझा पदर झाला वला
बया तुझं दूध पेले त्येला कढ लई आला
खंडीभर गोत सये माळावईलं गवत
मायबाई लवनात जशी हराळी लवत

आठ धाई धारा पेले मांडीव वसूनी
जोपा केला माझा कशी जाऊ मी रुसूनी

पहिली माझी ओवी मायबाई गाती एक
गिरजा शंकराची लेक

॥२९॥

संग्राहक : **न. शे. पोहनेरकर**

ईळ जाई कामाखाली राती झोप नाही आली
अग माझे आईबाई तुझी मला सय झाली

जाईना मी उभ्या गल्ली पाहीना ग कोणाकडं
मायबाई देसायाला समींद्राला पानी चढं

शेजी आली घरा बस म्हणते ग तिला
मायबाईचा ग माझ्या हरनीचा शीक मला

मांडीचा ग पाळणा डोळ्याचा ग केला दिवा
मायबाईचा ग माझ्या उपकार फेडू कवा

दळणापरीईस दे ग निघळण भारी
मायबाईच्या दुधाची झडती ग देते नारी

थोरल्या ग जात्याला नार झालीया घाबरी
मायबाईच्या भ्या पेले मधाच्याच्या घागरी

बाई दिवाळीच्या दिशी तबकी ग पाच केळं
अग माझ्या मायबाई ववाळिती तुझी बाळं

::::३०::::

संग्राहिका : **सौ. हव्वाबी खान**

दूध माऊलीचं गोड अमृताचा दोणा
किती पिऊ बाई तृप्ति मनाची होईना

सुखाची सासूबाई दुःखाची मायबाई
वैद्याच्या हिंडे गावी उन्हापावसात पायी

संसाराची कथा सांगताना देवा दारी
मायबाईविना सभा झाली पाठमोरी

जगी हसून खेळून संसार केला गोड
कोण जाणे माईवीण सले अंतरात फोड

ओढत नाही मला जातं बाई एकलीला
सई होते माऊलीची घडोघडी बोलायीला

मायबाईच्या घरी सुखाचा हा गेला जीव
घरी पराव्याचे[1] किती लागे वापराचे भेव[2]

गणगोतांनी भरून मायेविना सारा गाव
कंठ पाण्यानं सोकता घेते विहिरीची धाव

आंब्याची आंबराई पिकूनिया झाला सडा
जीव मावलीचा येडा म्हणे पोरीला गाडी धाडा

मावशीपरीस माझी माऊली अधिक
मायबाई माझी शुद्ध गंगेचं उदक

---

१ परक्याचे. २ भीती.

मायेइतकी माया कुणाला येत नाही
समुद्र भरला बाई पाण्याचा ठाव नाही

सकाळच्या पारी फकीर आले दारी
माय म्हणे वाढा धर्म काही तरी

सडासारवण करिते मी घाई घाई
माऊली मायबाई आली कशापाई

आईविना कोण म्हणेल ऊठ बाई
जिवाला माझ्या जड रडते धाई धाई

काटा बोचता पायी आईची होते सई
आई म्हणू आई माझ्या तोंडाला येते लई

आईच्या सईनं मोती पिकती पापण्यात
गालावर वघळती मोतीधारा दळणात

शीतळ साऊली ग ती का बाभळबाईची
मायामधी माया सखे वेगळी आईची

नको दळू लागू तुझी मनगटं मऊ
मायबाई तुझी माया कोऱ्या अंबारीला लऊ

माऊली असावी ग वनीच्या पाखरांना
चोचीनं घाली चारा मैना आपुल्या लेकरांना

वरसं झाली बारा बाई माईच्या भेटीला
चोळी आंजिरी टांगून कशी ठेवली खुंटीला

मायबाईनं न्हाणलं सये केसो केशी लोणी
लवंगा दोड्याची[1] केली फणी

---

१ मोठ्या दातांची.

माहेरा मी जाते मायबाई भेटायाला
चार दिवस सुरवात माहेर भोगायाला

उभी माडीवरी माई दिवा जळतो लोण्याचा
आत पिवळा संदूक भरून ठेवला सोन्याचा

जलमली तुझ्या पोटी कशी म्हणू मी ओंगळ
गंगेपरीस निर्मळ तू ग केळी मी कंवळ

मातेनं न्हाणलं निवली माझी डोई
पाण्याच्या येरझारा शिणली भावजई

मातेनं न्हाणलं निवला माझा माथा
गंगेच्या पाण्याचा रांजण केला रिता

सांगून धाडीयीते मायबाई मावशीला
असं मला मूळ धाडा आकाडी बारशीला

दळण दळीताना जसं जात्याशी बोलावं
माय माऊलीबाईला परोपरी आळवावं

जाईन सभेतून दिसू देईना पासवा
माझ्या माऊलीचा बाई पवितर कुसवा

मोहऱ्यांची वाटी ठेविली बोहल्या कोना
मायबाई माझी तुझी वराला दक्षिणा

नेत्रीचा केला दिवा तळहाताचा पाळणा
नकोरे नको वाळा करू मातेची हेळणा

दिवाळीच्या दिशी दिवा केला मी भाताचा
ओवाळीला पुत मी तो माऊली माताचा

जातं मी ओढीते अंग ओढता डोलते
मनगटी माऊलीचे दूध सारखे बोलते

जातं मी ओढीते दोनी वोटांच्या चिमटी
माऊलीच्या माये मोठ्या दुधाच्या हिंमती

दळण दळीताना दंडाला आले गोळे
माता माऊलीचं माझ्या मन कळवळे

शोभे चांदीचा गडवा सोनीयाचं आचमणी
माही मायबाई घाली तुळशीला पाणी

शेजी मी जोडीयीली जातीची परजात
माऊली बाई माझी पडली इचारात

माय माऊलीची आगळी वये माया
पांघरून घाली खेळवी वरी छाया

सासुरवाशीणीच्या पाठी लागे सारा वाडा
माझ्या माय माऊलीला पत्र लिहूनी धाडा

शेजीनं मया केली मया पैशानं होत नाही
सर मायेची येत नाही

३१

संग्राहक : **श्री. राजाराम माने**

सहा महिन्यांचं सासईरं त्येला वरीस गेलं सज
बया मालन बोलईती कशी लागली तुला नीज

टिप्पूर चांदणं ग ते का पुनव बाईचं
सुख माहेरी आईचं

सांगून मी ग धाडी आल्या गेल्याला गाठूईन
बयाला माझ्या झालं वाई वरीस भेटूईन

बया मालन म्हणीईती जेव बाळाई पोटभर
चुलती गुजरी माझी बोलं भेट बाळाई आमावर

बया मालन म्हणीयीती मोत्यापवळ्यानं ओटी भरा
मैना भावज बोलईती राकी केवडा भांग भरा

जिवाला जड भारी कोण माझ्या ग कळकळीचं
बयाची माझ्या बाळं वाघ सुटलं साकळीचं

जिवाला माझ्या जड कसं कळालं हारनीला
बया मालनीचा माझ्या पाय ठरंना धरनीला

सांगून मी ग धाडी मायवाईला फार फार
तिनं ग ल्हानाची केली थोर

फाटली माझी चोळी देते ठिगाळ जायबंदी
शिंपी बयाच्या गावामंदी

३२

संग्राहक : श्री. वसंत झांबरे

तयहाताचा पायना नेतराचा करू दिवा
माय काशीना उपक र काय जानशी येळ्या जीवा

रांडचा पोऱ्या सांड खेये उना गंजीपान
माऊली तुन्हा लेकच्या दूधना पहिलवान

लेक वाहन्याईनं वसरी माही भरली
काशी मायबाई दारी भाग्याची वसली

सर्गीच्या नारायना कसं माझं चालवशी
मायेच्या घरचा जीव माझा सुखवासी

पाची पकवान भाऊ जेवले एक घास
माऊली तुन्हा लेक मोठया लोकना संगं जास

पंढरीले जाऊ माता माउलीले पुसून
आंघोंयी करू चंद्रभागात वसून

पंढरीले जाऊ मातामाईचे पुन्यानं
आंघोयी करू चंद्रभागाच्या पान्यानं

## ३३

संग्राहक : श्री. गो. ल. जमदाडे

झाडाची साऊईली बाई झाडाच्या पुरती
बयाची माजी सर काय करील चुलती

पाऊस पान्यायाची झळ लागली वाऱ्यायाची
माय माऊलीची माझ्या पासोडी निवाऱ्याची

लुगडं घेतीयीलं त्येला रेशमी काडी न्हाई
माऊली बया बोलं लेकी येवड्यानं झालं काई

भावज गुजरी तुझ्या वाड्याला चौथी फेरी
बया माजी ती गवळण आतड्याची न्हवती घरी

अंबारीचा हत्ती माज्या वाड्याला थटला
बया माज्या गवळणीनं काय जिन्नस पाठविला
बया गवळणीनं माज्या पाठीवल्या गूळपोळ्या
आत उघडूनी पाता खुतनीच्या नव्या चोळ्या
लाल पिंजरीचं कुंकू नको अत्तारा लावू जूकी
आमी लियाचू मायालेकी
काशी म्हणू काशी, काशी कुण्या खंडामंदी
बया अखंड तोंडामंदी

३४

संग्राहक : श्री. हरिहर मातेकर

शेजी जेवू घाली भरंना माझं पोट
माय तुझी पाच बोटं हैती माझ्या हुरद्यात
शेजी जेवू घाली अर्थ करूनी नवला
माता जेवू घाली कळू देईना कोणाला
शेजी जेवू घाली करी आवड निवड
माता जेवू घाली पाचा पोळ्यांची चवड
मायबाईच्या ग माझ्या फार गोष्टी गुळावाणी
मावळाया गेला शाळूदिस वाऱ्यावाणी
शिण्याच्या साताला नुसत्या दोगी तिगी
बोलली मायबाई चोळी न्हाई मनाजोगी
एवढा माझा पिंड माज्या बाईच्या मांसाचा
शिरी झुंबडा केसाचा माईच्या सायासाचा

माजी मायबाई मी ग पेली तुजं थान
तुझ्या कुशीत जल्मले पाडस मी ल्हान
माजी मायबाई तूं ग उपकारी काशी
नव मास वज्जं वागविलं डाव्या कुशी
तुझी निदरा मोडली मी ग जल्मल्या दिशी
दकासुकात ग झाली आई लई येडी पिशी

::३५::

संग्राहक : श्री. रावसाहेब जगताप

माईचं म्हायेर भावाची धर्मपुरी
सांगते वैनीबाई आशेची लंका दुरी
माऊलाची माया न ये आणिकाला
कोवळ्या माणिकाला रंग बहू
जातं वढायला नको करू कुचराई
आई तुझं दूध मी पेले चतुराई

::३६::

संग्रहिका : श्रीमती पार्वतीबाई जोशी

जातं वढू वढू हाताला झाली सरदी
आईनं दिली गुटी केली लवंगाची गरदी

जातं का वडावं चावरीच्या बैलावानी
आईच्या दुधाला नाही पडलं धारवनी

जातं कुरुंदाचं याला खुंटा चकमकी
चल माझ्या मैना आपून दळू मायलेकी

आले भरून डोळे पुनः गळा माझा दाटला
माऊलीच्या भेटीसाठी जीव माझा आटला

## ३७

संग्राहक : श्री. प्रभाकर सी. शिळणकर

नको करू माई गोरं मोरं तोंड
आलं आहेराचं दिंड मायबाई

गाडाभर तुझं गोत गोताचं तनकट
आली गाय हुंवरत मायबाई

गोताची काय गोडी मायेची घाली वेडी
तुजविण झाले वेडी मायबाई

नको करू आई वले तुझे डोळे
आहेराचे वेळी भाऊ आले तुझे

आईची माया मोठी जशी वडाची सावली
विसावली रोप वेली

मायेची ग सर कोणी करेना मावशी
पाण्यावेगळी तुळशी कोमावली

नऊ मास ओझं, वागविते कुशी
भीती नाही कशी कैकाळाची

झाडाची सावली तुटता तुटईना
आईची माया वेडी सोडता सुटईना

दळण दळीयीते गहू जवारी बाजरी
आईची माझ्या सर काय करील शेजारी

दळण दळीयीते गहू ग सेवायाचे
आईबाई पाहुणीला करते ग जेवायाचे

पाटाचा पाळणा नाही ग माझ्या कुळी
धाड जो ग सावळी मायबाई

आईची सावली राहील कुठवरी
लेकीला नियाला जावाई आले घरी

आईचं गणगोत पसरलं चारी दिशा
जशा चांदण्या आकाशा

॥३८॥

संग्राहक : श्री. ना. ना. शिंदे

माऊलीची मया मया सव्‍र्या बाळांवरी
घार फिरते गंगनी परी लक्ष पिलांवरी

*जिवाला भारी जड आयाबायांनी भरला सोपा*
*माय माजी ती वाघीण आली टाकीईत झेपा*

*जिवाला भारी जड काय दुकतं मैना तुजं*
*गवळन माय बोले शिर उतरते माजं*

*जिवाला भारी जड झालं पायथ्याचं उसं*
*माय माझी गवळन तुला कळालं न्हाई कसं*

*भूक लागयीली पोटा आवळते नाडा निरी*
*गवळन बाई माजी येळला न्हवती घरी*

*आंब्याचा आंबरस वरी केळाचं रायतं*
*माय गौळनी वाचून कुनी वाढीना आयतं*

*जिवाला भारी जड खाऊ वाटे मला खीर*
*बाईचं गाव दूर किती जिवाला देऊ धीर*

*जिवाला भारी जड खाऊ वाटे काईबाई*
*माऊलीच्या घरी तुपाला गनती न्हाई*

*जेवणाचं ताट वरी केळायाची फणी*
*गवळणीविना माज्या हाक मारिली ग कोणी.*

*जेवणाचं ताट वरी झाकिलं दोनी हात*
*मावलीबाई माजी कशी करू तूशी मात*

*पाची पक्वान्नाचं ताट वरी केळाचं शिकरण*
*गवळण बाई माजी जेवू वाढिती सुगरण*

*बोळवण केली पाचा वर पन्नासाची*
*बाई माजीनं घेतली वर चोळी जिन्नसाची*

*लुगड्याची घडी सव्वा महिना खुंटीवरी*
*गवळण कशी म्हणे बाई अबुला कुठंवरी*

सांगून धाडिते माझा सांगावा जाऊ न्हाऊ
गवळण बाई माझे आडवळणी तुजं गावू

सांगून धाडिते मी चिंचेच्या पानावरी
माय गवळणीला माझ्या कुंकू दंडतं मेणावरी

उचकी लागयेली काय उचकी तुझी धाई
माय गवळणीनं माझ्या सई केली कशापायी

उचकी लागली भर दुपार भरताना
बाई माझीनं सई केली जेवू लेकाला वाढताना

भूक लागली पोटा बाई निरी म्यां खोचली
माय गवळणीला बाई खूण माझीला पोचली

माझी जातकुळ कोण पुशितो उण्या जाती
गवळण बाई उंच खाणीची माझी माती

माझी जातकुळ मामा पंडिताला पुसा
गवळण माझी जलमली पुंड्या उसा

शेवग्याच्या शेंगा अंतराळी लोंबताती
माऊलीची चोळी माझ्या दंडाला शोभती

बारीक बांगईडी हाताला झाली थोडी
गवळण माय बोले राजवर्कीची घाल जोडी

बारीक बांगडीनं हात दिसतूंया सुना
गवळणबाई बोलं राजवरकीच्या सांग खुणा

शेजीच्या गावा जाया मन माझं आळंडिळं
माईच्या गावा जाया उभी सुटली वावटळ

दिव्याला भरान मी का घालित आगळं
गवळण माझे बाई गुज बोलूया सगळं

लोकांच्या मायलेकी गुज बोलती कोनामंदी
माझ्या माऊलीचा जीव येडा दिलगीर मनामंदी

नऊ मास नऊ दिस एक दिस देवाजीचा
पोटीच्या बाळासाठी नाही घडीचा भरवसा

जिवाला जड भारी खावी दाळीयीची वडी
माऊलीच्या घरी परान्या तुजी परवडी

लेकायापरास मला लेकीची मया येती
गौळनबाई बोले मैना जिवाला माज्या होती

माऊलीची सर शेजी करायला गेली
मावंची साखर जुंदळ्याच्या पाना आली

शेजीचा उपकार फेडू बाई हातोहाती
मायचा उपकार नऊ महिने किती राती

पैल्यांदा झाली लेक आली मातेला सोडवण
आडवं घेतीलं सारवण

नऊ मास नऊ दिस एक घटका नसावी
माय जवळी असावी

:: ३९ ::

संग्राहक : श्री. शं. बा. राजभोज

माय माय करू माय सोनानी परात
मायनावाचून माले गमंना घरात

अनुक्रम 26085 दि. 2/10/...


माय माय करू माय चांदीनी पालखी
मायना वाचून कोनी करीना अलोखी[1]

माय माय म्हनू माय मन्ही जाईवाई
जाई तुन्ह्या कळ्या ग पांगन्या गावोगाई

जीव तिचा गेला कुडी पडली जगात
माय माजी बया रिती[2] आली ग धरतीत

आई आई म्हनू आई माजी जन्मदेती
तिचं नाव घेता ग पावन झाली मती

जिवाला जड भारी कुनी येईना धावूनी
आतड्याची माय आली चिमनी घेऊनी

काळी चंद्रकळा एका धुन्यानं फाटली
सांगते आईला न्हाई हौस ग फिटली

म्हानी जीवनी आया तू चवळीनी शेंग व
आया आया बेस तुना लई आमा पिरम व

म्हाना हात म्हानी काठी सारखा तुना जीव
सुख देशी पोरासोरा होई मन सजीव

आया जंगलनी रानी ध्यान दे जो आमावरी
आसमान व्हई छाया देजो लेकरावरी

आया म्हानी बया याद ठे जो आम्हासनी
डोंगरदरी म्हानी झुळझूळ वाहे पानी

डवरना व्हाया उपकार जल्मभरी
आया तुनी गंगा वहातह दारोदारी

१ कोड कौतुक. २ रिक्तहस्ताने, मोकळी.

दा. क्र. ९६२९९ ... ग्रंथालय ... संदर्भ शाखा

माय मन्ही माय मना गळानी पुतळी
तिनासाठी दिसू पराण मन जाई उसळी

माय माय करू माय मळ्यातली बोर
तिळे वना[1] बार[2] लढनात हिरवागार

माय मनी शेती आभाळातली इज[3]
तिन्ही पाती वाट लागे दुनयानी शेज

माय माय म्हणू माय गळाना चंद्रहार
तिना संभाळासाठी मन व्हई निर्धार

माय मन्ही माय पैसाअडकानी तिजोरी
तिन्ही सेवासाठी मनी नहीं कमजोरी

माय बयाबाई सप्त शृंगनी गडवाली
तिना दर्शनले नातू पंतु सारी ग जमली

४०

संग्राहक : श्री. विठ्ठल भिकाजी वाघ

काशी करता करता काशीचे लोक येडे
मातेच्या पाया पडे त्याला काशी तीर्थ घडे

काशी करता करता लोक चालले धावत
माऊली मायबाई काशी माझ्या हिरद्यात[4]

१ आला. २ बहर, भार. ३ वीज ४ हृदयात.

माय तुझ्या घरी जेवण जेवली गोळ[1]
सासूच्या घरी जाता नाही संभाळली कळ

शेजीचं उसनं डाबल्या डुबल्यानं
मातेचं उसनं बाई खंडीच्या मापानं

धन्य मायबाई कशी तुमची व छाती
पोटचा गोळा देला परक्याच्या हाती

माझ्या मरनाले सरन जये सावलीले
येवढ्या गोतातून दुख झाले मावलीले

माह्या मरनाले माती लोटता लोटंना
काशी मावलीचा असू डोयाचा तुटंना

आंब्याची आंबराई पिकून झाला सडा
मायेचा जीव येडा मैनाले गाडी धाडा

संसारी येऊन सोय नाही संसाराची
मायेच्या मांडीव घडी गेली आनंदाची

गन माझं गोत माझं कचरा व काडी
मायबाई सरु माझी चंदनाची साडी

झाडामंदी झाड ग सेवंती जाईबाई
गोतामंदी गोत जिवाप्यारी मायबाई

सकाई उठून मले उचकई लागली
तुमी काशीबाई याद माही का वो केली

लोक जातीन जतरी मी जाईन माहेरी
मायबाप घरी मले जतरा दुहेरी

---

१ गोड.

आंबट आंबराई तुरट त्याची कई
मायबाईची सर काय करीन भावजई

माय इतली मया बाई नाही सजनाले
पेटला डोंगर पानी नाही इजोयाले

मायेनं न्हानलं मले पाची गंगायानं
लोखंडाच्या भिंती पानी जाते पवायानं

काकी म्हटल्यानं अंतर किती पळे
माय म्हटल्यानं होटासी होट मिळे

शेजीपाशी गोठ नाही सांगण्यात अर्थ
काशीबाई देते चित्त माह्या शब्दापरतं

हाताचं पायाचं सारं लेनं ग लोकाचं
कपाई गोंदन राहे मायेच्या हातचं

लेकीच्या मायले लेकीमिचूक गमेना
पोतारल्या भिंतीवर काढल्या मईना

॥४१॥

संग्राहिका : सौ. इंदिरा कुलकर्णी

फुलामधी फूल फूल शोभे कमळाचे
आईच्या मायेचे माप नाही

देवा रे ईश्वरा गोष्ट एक आईकावी
आई सावत्र नसावी तान्ह्या बाळा

माऊली माऊली माझी मायेची साऊली
बाळासाठी आली पिरतीमीवरी

तान्ह्या बाळासाठी माऊली ओव्या म्हणे
माऊलीच्या साठी कोण करील कवने

परक्याच्या साऊलीनं जाऊ नये बाई
मला मायबाई शीक तुझा

सासरी मी जाते माझी माय गडवडे
मडक्यामंदी ग जशी ल्हाई तडफडे

आई घाली जेवू दारे खिडक्या लावून
चुलती घाली जेवूं जन लोकांला दावून

गळाभर ठुशी माईनं केली मला
गळसुरीच्या खाली जागा नाही पदकाला

## ४२

संग्राहिका : सौ. शालिनी घोटे

माऊली मदन चौदा घडीचे रतन
मला करमेना माऊली म्हटल्यावाचून

नऊ मास ओझं वागविता नाही भ्याली
माझ्या माऊलीला व्यर्थ म्या कष्टविली

जातं मी ते ओढू जशी फिरकी फिरवू
माझ्या माऊलीचे दूध मनगटी मिरवू

काम करून थोडं मला घाम आला लई
मायच्या दुधाची मला होते बया सई

माय माय करू माय अमृताची कुपी
बत्तीस तुझ्या धारा पडतील माझ्या मुखी

माय माय करू माय साखरेचा खडा
तोंडात टाकल्यानं निवतील दातदाढा

माय माय करू माय साखरेची कणी
तोंडात मी घालू का बोल ग साजणी

माय माय करू मायी मावच्या बारा
जन्म दिला त्या अंब्रवतीचा[1] जीव खरा

माय माय करीत मी हिंडले सारा गाव
माझी ग माऊली अंब्रवती तुझं नाव

माय माय करू कुठं गेली माझी माई
हुंकारा देईना घरातली भावजाई

माय माय करू माय मळ्यातली जाई
जाईला घाली पाणी माझा बंधू चतुराई

माय माय करू माय मळ्यातली मका
ऐकू ना मला येई वाई वाऱ्याचा झोका

माय माय करू माय मळ्यातली बोर
बोरीला आला भर माझी डाळिंबी बिलोर

माऊलीची सर काय करील चुलती
रुपायाचा खण चोळी होईना पुरती

---

१ अमरावती, सख्खी आई, पतिव्रता.

नको पाहू सये माझ्या अंगायाचा बांधा
आईच्या राज्यात खाल्ला तुपाचा मी सांजा

पोट जसं माझं सये कवाडाची फळी
मला दिला जन्म माय माझी चाफेकळी

माय माझी माऊली बाई दैवाची नार
नातू खेळे मांडीव गळा पुतळीचा हार

अंगातली चोळी घामानं ओली झाली
मायमाऊलीनं मला सपनी भेट दिली

माय माय करू माय आंब्याची आंबराई
गहेरी पडली छाया तिथं झोप लागे बाई

पंढरीला जाय संगं आईचं लुगडं
चंद्रभागेतीरी नाही धुवाया दगड

शेजीची उसनवारी जशी घेऊ तशी देऊ
मायेची उसनवारी दलाली माप लावू

शेजी तू ग बाई मला उसनं दे ग दही
घरी पावणी आली सई

जिवा भावाचं ग आई बोलून घेऊ आज
माझी तू आईबाई जवळ टाक तुझी बाज

दुरून बाई पाहू माझा माहेराचा हुडा
त्याच हुड्याखाली माझी माऊली भरे चुडा

मरणाच्या येळी रात पडली काळंका
समजावा बायांनू माय रडती साळुंका

मरणाची गोष्ट कोणी सांगितली हरणीला
जन्मदात्री माता माझी अंग लोटी धरणीला

माझ्या ग माहेरी लाल मसूर गोंडणी
मला लागली खत[1] माझ्या आईच्या तोंडणी

माय माय करू माय अमूलिक जिन्नस
घेतलं तिनं सोनं नाही लावली कानस

आईची शिकवण तुला राग येतो लेकी
पराया पुरुषाशी बोलू नये एकाएकी

सटी मोठी खोटी हिनं अक्षर मांडलं केव्हा
माऊलीच्या मांडीव पाच दिसाची होते तेव्हा

माझे आई नाव माझं सीता तू नको ठेवू
सीतासारखे पवाडे जगी होतील ग वहु

दिवाळीचे दिवे नि संक्रांतीचे लाडू
माझी तू आईबाई माझी आस नको मोडू

माहेराला जाऊ माझं माहेर वाणीचं
किती सुख सांगू आई गिरजा राणीचं

जिवाला जड भारी शेजी आली तशी गेली
माझ्या माऊलीनं बाई दिवाबत्ती केली

घडीचं घड्याळ बाई झालंय जिवाला
निरोप धाडा माय माझ्या गंगाच्या गावाला

सांगून पाठवू ग माय माझ्या यमुनाला
हिरवा खण राहून गेला ग वलनीला

दिवाळी न् दसरा नवचांदीचा महिना
माझे ग मावली ल्योक पाठव पाहुणा

---

१ सवय.

शेजी ना सावना तळहाती डवना[1]
माय माह्या गंगाचा पाच पांडव जेवना

येवढी बातमी घेऊन जातू बया भाटनी
आईच्या हाताची अंगे चोळी ग दाटनी

येवढी बातमी लेई जासी रे वंजारा
माझ्या माऊलीच्या दारी राघूमैनांचा पिंजरा

हौसनी माय मनी हावस पुराये[2]
ठिकडानी मंदी वर घुंगरू जडाये[3]

आनसा मानसा जाणून माझ्या माऊलीसी सांगा
लेक तुझी गरवारशी सातपुड्या आंबा मागा

लेक लेकुरवाळी तुझ्या सुनेला पहिलं न्हान
माय माझी यमुना सये साखर वाटी पानं

धाकला मुराळी नको धाडू माझे माई
आंब्याची आंबराई राघूमैनांचा जीव भाई

लंबे लंबे वाल सीता माऊलीवानी काया
खोबऱ्याच्या वाटी लावता दिस गेला वाया

१ दवना. २ पुरवावी. ३ जडण करावी.

:::४३:::

संग्राहिका : सौ. सुमन प्र. नलावडे

आई उणी माया बाई कोणाला सुचेना
उन्हाळ्यात पाणी बाई गुळाला सुटेना

बया म्हणू बया गंगा काशीतीर्थी जाऊ
बयाचं नाव घेता नवखंड पिरतीमी पाहू

बया म्हणू बया माझी मोहोळाचा मध
बया तुझ्या नावाचा लागला मला वेध

माऊलीची माया लाखाचं झालं पाणी
उपकार नाही येड्या लेकराच्या मनी

जिवाला जड भारी कोणाला घालू ओझं
माझे मायबाई तातडीचं येणं तुझं

लंब लंब बाल जसं वासणीचं याल
मातेनं केलं पैदा कच्च्या खोबऱ्याचं त्याल

जिवाला जड भारी माझ्या बयाला बोलवा
दवापाणी नको मला माऊलीचा वलावा

जिवाला जड भारी उशा समया जळती
बयाची आसवं उशा पायथ्या गळती

बया म्हणू बया तुला सादविती हाक
तुझी लाडइकी लेक

⁘४४⁘

संग्राहक : श्री. स. र. भिन्नर गुरुजी

जशी माजी आई तसं मला चालायचं
सरू तुजं झाड कधी नाई हलायाचं

जशी माजी आई तशी माजी बडेजाई
भावजय नारी बोलायाचं काम नाई

घे ग आई चोळी मला उलूल्या[1] काठाची
मोहं माजं गाव वस्ती अडाण्या लोकांची

घे ग आई चोळी मला रुपायाभराची
येती मला कीव तुज्या दुबळ्यापनाची

माज्या त्या आईनं आंबे धाडील्यात वीस
सातपुड्या आंबा याचा गंधावानी रस

माज्या ग आईनं आंबे धाडीलं मोजून
एक आला कमी जाई जासूदा उजून[2]

वड गोरे जातं चावरीच्या बैलावानी
आईचं दूध पेले मी गाईच्या गोऱ्यावानी

जवर माजी नानी तोवर माजं मोठंपन
भावजई नारी तुजं चालून देतं कोन

गोरं तुजं रूप काळी चंद्रकळा ल्याली
नानीच्या ग माज्या लुगड्याला जर खाली

---

१ लहानशा. २ परतून.

नको पुता म्हणू तूं त माऊलीला वेडी
तुला जन्म देता तिची तुटली नवनाडी

आईवरी शिवी नको देऊ गुणवंता
कोणाचं काई जातं तोंडी येती तुझी माता

दिवाळी दसरा माझ्या जिवाला आसरा
मालन बया माझी मूळ धाडिती उशीरा

बारीक मुराळी नको धाडू बयाबाई
ठाणबंदी शिंगी याला आवरत न्हाई

बंधूजी पावणा माझ्या आईचा लाडका
येळीते सेवाया वर तुपाचा छिडका

सांगून धाडीते आई माझ्या मालनीला
संगमनेरी चोळी राहिली वलनीला

सांगून धाडीते आई माझ्या वंजारनी
संगमनेरी चोळ्या लेल्या माज्या शेजारनी

वाळपटी चोळी एका धुन्यामधी विरली
सांगते आईला नाही हौस माझी पुरली

भरीला बाजार मोती घेती मी उशीला
काशी माजी आई गोंडं लावीती कुंचीला

सांगून धाडिते माझ्या आईला येथून
तुझ्या अंगाची चोळी मला धाडावी बेतून

सांगून धाडिते माझ्या आईला एवढी
माझ्या चोळीवर काढ पुण्याची चावडी

:::४५:::

संग्राहिका : कु. उषादेवी बागल

*समींद्र सोकल्यानं जाईना माजी तान*
*बया माजी ती गौळण गंगासागरासमान*

*आई आई म्हणू भेटना मला आई*
*काटा मोडल्यानं बये सय तुजी होई*

*वाड्याला ग तुज्या चवथी माजी फेरी*
*गवळण माजी बया नव्हती ग घरी*

*भरल्या बाजारी दिया घेयाचं ग काई*
*बया माजे ग माऊली येनं केलं तुज्यापायी*

*पैली माजी ववी माज्या माय माऊलीला*
*गर्क घेते झोप मी बयाच्या साऊलीला*

*गार साऊयीली तिथं उतरिलं वज्जं*
*माजी ती माऊली विसाव्याचं झाड माजं*

*जातं वडीताना हार नाई कुना गेली*
*मालनीचं माज्या वाघिनीचं दूध पेली*

४६

संग्राहक : श्री. ए. आ. गुंजाळ

नऊ मास ओझं माझं अंधाऱ्या खोलीला
जन्म देती आई मला उजेड दावीला

मावलीनं बाळा वागविलं चिंदीमंदी
आला जानीमंदी मग झाला भावबंदी

मावलीनं दिला तुला जाईपत्री ओवा
आला जानीमंदी लाल डोळं तुजं सदाशिवा

आई आई म्हणू मायेच्या आई बारा
जिनं जल्म नाव तिचं इंजनवारा

बाळपणी सुख माय दावी लेकराला
मांडीव घेऊन काजळ घाली नेतराला

मावली मायाळू बोलं सावली खेळ बाळा
तुला जाणवेल मास चैताचा उन्हाळा

नको म्हणू पुत्रा मावलीला तूं त वेडी
तुला जल्म देताना ती देहाचे बंद तोडी

नको म्हणू पुत्रा मावलीला वेडी आई
तुला जन्म देता देहाची झाली ल्हाई

नको करू पुत्रा मावलीची दुरदशा
मांडीव घेऊन फार केली तुझी आशा

नको करू बाळा मावलीची तूं रे राळ
तिनं वागविलं पंखाखाली तान्हं बाळ

मोडला ग काटा कळ लागली पायाला
नऊ मास ओझं काय म्हणावं आईला

भैनभावंडाचा काही झगडा मिटेना
बसली यमुना उगी कोणाला म्हणेना

आई म्हणे लेकी माझे मक्याचे कणीस
जाशी परघरा होशी मोलाचं माणूस

माय म्हणे लेकी तुला कुठं कुठं ठेवू
नाही डाळ साळ तुला वाढी दिढी लावू

माऊली मयाची तुला आस्तुरी शेजाची
पहातील वाट माय बहीण निगाची

आस्तुरी कोणाची ताज्या घोड्याची गोमाशी
माऊलीशी बाळा का रे धरी आबुल्याशी

आस्तुरी कोणाची ताज्या घोड्याचा तबेला
माऊली मातेशी का रे धरीला अबोला

आई आई म्हणू साऱ्या संसाराची आई
येळ परसंगाला तिची येई मला सई

आई आई म्हणूनी माहेरी गेली वेडी
जाऊन दिला ठेपा तिनं बाभळीच्या बुडी

आई आइ म्हणून आई शंभर गोत्रात
साखरेसारखी कशी पसरे मुखात

बहीण भावंड एका भाकरीचा काला
दोनींचा जलम एका आईपोटी झाला

जातं मी वडीते काम खिनात[1] व्हईल
आईच्या दुधाव मी त पईज गाईल

जातं मी वडीते तुझं आठवे सरूप
तुझीया दुधानं मला आलाया हुरूप

अंगाची कमान कामाचा केला तीर
आई तुझं दूध अंगी नवतीचा भार

जात्याची भिंगरी बाई घेतली झेलून
आईच्या दुधाची नवती पाहिली तोलून

जात्याची भिंगरी मुसळाचा केला चेंडू
आई तुझ्या दुधायाची कुठं पैज मांडू

आईचा पराण गेला ढवळ्या घोड्यावरी
कुडी ती सांडली निघून गेली वाऱ्यावरी

येवढं मरान कसं तरुनपनात
आईचं सरान जळतं चंदनी बनात

माय माझी बाई सर्गी सोनीयाची दिसं
पुत्राच्या मिसानं येऊन सुनाच्या मांडी बसं

१ क्षणात, थोड्या वेळात.

:.:४७.:::

संग्राहक : श्री. प्रल्हाद र. त्र्यंबके

*मला शिकविलं माज्या माय माऊलीनं*
*नई ऊभी ऱ्हाऊ पुरुषाच्या साऊलीनं*

*पातळ पुतळ आमी आमुच्या आईच्या*
*खाली पाद्य पाप्या कळ्या खुलल्या जाईच्या*

*जात्या ईसवरा मला जड नको जाऊ*
*आईच्या दुधाला बया ठेवतील नावू*

*जात्याची भिंगारी केला मुसळाचा तीर*
*आइच्या दुधाचा अंगी नवतीचा भर*

*जातं वडायाची कळ माज्या मुठीमंदी*
*आईनं दिल्या लवंगा माज्या ग घुटीमंदी*

*आई शिकविती कडूनिंब ग खाऊनी*
*शेजी शिकविती गूळ खोबरं दावूनी*

*शेजी शिकविती गूळदाळ्या दोगी खाऊ*
*आई शिकविती जीव संसाराला लावू*

*आईला म्हणे आई शेजीला म्हणे काकू*
*उतू मातू नको बाई उघडी मांडी झाकू*

*शेजीनं शिकविलं सारं व्यर्थ गडे गेलं*
*आईनं शिकविलं माझं मला कामा आलं*

*आई आई म्हणू ग तोंडाला येतं पाणी*
*राणी बयाबाई गोड साखरेच्यावाणी*

॥४८॥

संग्राहक : श्री. पं. ख. नागपुरे

पहर रातीची मला उचकई लागली
मायबाईनं माझ्या परानीनं याद केली

माय म्हटल्यानं तोंडाला सुटे पाणी
वाण्याच्या दुकानी आंबा साखरेच्या वाणी

माय म्हणू गेले सये मावशी बोलली
आडाच्या पाण्यानं कशी तुळस खुलली

धोबी धुणं धुतो माझ्या आईचं पातळ
सोन्याचे खडक गंगा वहाते नितळ

जात्या ईसवरा पीठ उखळ्या मारतं
मायबाईचं दूध माझ्या मनगटी फिरतं

अंगाचा मी घाम नितरते मोत्यावाणी
मायबाईनं शिकविलं मला ल्हानपणी

येळा माहा जीव असा येळा[1] होऊ नको
मायच्या मिचुक कोन्या गावा जाऊ नको

आंब्याची आंबराई पिकून झाला सळा[2]
माईचा जीव येळा मैनाले गाडी धाळा[3]

माय माऊली गेली सारी दुनया बुडाली
चाट्याच्या दुकानी मैनाराणी कोमावली[4]

---

१ वेडा. २ सडा. ३ धाडा. ४ कोमेजली.

कपाळी गोंदन मायबाईच्या हातचं
अयेव मरन सोमवारच्या रातचं

मायनं न्हानलं तवा भांगोभांगी लोनी
लवंगाची फनी वास गेला मैदानी

मोठ्या जात्यावर्ती दळती मायलेकी
चंदनाचा पावा भरला ग एकाएकी

माय तुझ्या घरी होते सुकाची चांदनी
नाही घेऊ दिलं भरलं रांजनीचं पानी

मायनं न्हानलं मला पाचीय गंगाळी
लोखंडाच्या भिंती पानी गेलं का पन्हाळी

मायनं न्हानलं येशीपातुर पानी गेलं
जिले नाई पोरगी तिले नवाई[1] वाटलं

कपायींचं कुंकू बये पान्यात पाहू नाही
माय म्हणे लेकी कोणा नावं ठेवू नाही

माय म्हणे लेकी तुले शिकविलं कोनी
हिंडू फिरू नाही बये मोकयं ग रानी

मायबाय माझी संगं आणलंय काय
शेजारनी बाय मला उसनी दे ग दाय[2]

जुतला[3] ग रथ सये रथाला लावली फडकी
मायबाई बोले माझी मैना ती लाडकी

---

१ नवल. २ डाळ. ३ जुंपला.

माय म्हणे लेकी कशाला हयल्या[1] माळ्या[2]
तनाचं झोपलं त्याले सोन्याच्या मुकरळ्या

## ४९

संग्राहक : श्री. ना. वि. पांडे

पाणी टाकू टाकू झाई तुयस ठेंगणी
मायबाईच्या माह्या पतीवर्तांच्या अंगणी

पाणी टाकू टाकू तुयशीले वाहे झरा
मायबाईचा माह्या पतीवर्ताचा नेम खरा

काशीनं घेतली चोई थे नाही माझ्या मना
काशी मायबाई लेतीन तुझ्या सुना

निरोप पाठवते माय इहनाबाई रंगलीले
लेकीच्या बरोबरी सुदी वागव चमेलीले

मायले माय मनता व्होटाल व्होट भिडे
मावशीले मावशी म्हणता अंतर किती पडे

पोटाले लागली भूक धीर धर भूकबाई
निहारीची सव कशी लावली मायबाई

अड्याल माह्यं गाव पड्याल रामटेक
मायनं धाडली वज्रटीक

१ हवेल्या. २ माड्या.

*पोटाले लागली भूक जराशी धीर खाय*
*पाण्याच्या पाणघाटी मायबाईचं घर हाय*

*आंब्याची अमराई लावली मावलीनं*
*मयना खेयते सावलीनं*

## ५०

## संग्राहक : श्री. प्रभाकर भामरे

*माऊलीनी मया लेकीना बाळवरी*
*सुगरण घाली खोपा करंजनी जाळीवरी*

*माय माय करू माय तांबानी परात*
*मायना बिगर चित्त लागेना घरात*

*माय माय करू माय मळातनी बार*
*बोरले उना भार हाती डाळिंब्या बिलोर*

*चुलतीनी मया जशी कांदानी फोतर[1]*
*मायनी मया जशी मंगळसुतर*

*माय माय करू माय मळातनी मका*
*मकाले लागे धक्का चंद्रभागानं पानी फेका*

*माय माय करू माय साकरना पोत*
*मायने नाव घेता इरदी बळे जोतं*

---

१ टरफल, फोलकट.

जीव मना गया सरण जये सावलीले
शंभर गोतात दुक माझा मावलीले

जीव मना गया कोरी घागर चढे वर
नको रडू मायबाप मुकी जत्रा घडीभर

पुत्र जलमना माय गई जयी येडी
संसारना सुक सये गये परथडी

मायलेकीन भांडन गूळ तूपनी उकळी
लेकी धरस अबूला माय मननी मोकळी

माय माताले गाल्या[1] कशी देऊ
बत्तीस धारण्या झडत्या कोठे घेऊ

## ::५१::

संग्राहक : श्री. मा. ल. सोमवंशी

आई म्हणू आई माझी कुणी ती होईना
आईची माझ्या सर दुसऱ्या नारीला येईना

आई म्हणू आई तोंड माझं रसरशी
आई माझी बाई जशी साखर बनारशी

आई म्हणू आई आई माझ्या तोंडाला रसोई
माझ्या जिवाला वाटतं आई जवळी असावी

---

१ शिव्या.

आई म्हणू आई कोणीया देशात
खावीशी वाटली पोळी आंब्याच्या रसात

आई म्हणू आई तोंडाला पडली मिठी
आई माझी जशी गोड साखरेची पिठी

आई म्हणू आई तशी चिखलाची केली
आलं वळवाचं पाणी आई विरघळून गेली

पंढरीला जावं न्यावं आईचं लुगडं
भरली चंद्रभागा धुण्या नाही वा दगड

पंढरपुरामंदी चोळी घेती माझी आई
सोन्याचा सुईदोरा टीप घाली जनाबाई

पंढरीला जाया संगं न्यावं ग आईला
संतासंगं बाई म्या देव विठ्ठल गाईला

आपण गुज बोलू मायलेकी ग दारात
आली शेजारीन बोले चलावं घरात

जलम देऊनी पिता झाला रे मोकळा
नऊ मास वज्जं पडलं माझ्या मावलीला

नऊ महिने होते बाई आईच्या पोटात
ऊन वारा नाही चिरेबंदी या कोटात

नऊ मास होते ग आईच्या डाव्या कुशी
उलटून बोलू कशी नव्हं ती मावशी

बारा वरसाची लेक झाली आईबाई
काळीज धडधडं त्येला करू गत काई

राम लक्षीमण ग देवाने दिले तुला
माऊली माझ्या बये भेटाया धाड मला

जीव मना गया सरण जये सावलीले
शंभर गोतात दुक माह्या मावलीले

जीव मना गया कोरी घागर चढे वर
नको रडू मायबाप मुकी जत्रा घडीभर

पुत्र जलमना माय गई जयी येडी
संसारना सुक सये गये परथडी

मायलेकीन भांडन गूळ तूपनी उकळी
लेकी धरस अबूला माय मननी मोकळी

माय माताले गाल्या[1] कशी देऊ
बत्तीस धारण्या झडत्या कोठे घेऊ

५१

संग्राहक : श्री. मा. ल. सोमवंशी

आई म्हणू आई माझी कुणी ती होईना
आईची माझ्या सर दुसऱ्या नारीला येईना

आई म्हणू आई तोंड माझं रसरशी
आई माझी बाई जशी साखर बनारशी

आई म्हणू आई आई माझ्या तोंडाला रसोई
माझ्या जिवाला वाटतं आई जवळी असावी

---

१ शिव्या.

आई म्हणू आई कोणीया देशात
खावीशी वाटली पोळी आंब्याच्या रसात

आई म्हणू आई तोंडाला पडली मिठी
आई माझी जशी गोड साखरेची पिठी

आई म्हणू आई तशी चिखलाची केली
आलं वळवाचं पाणी आई विरघळून गेली

पंढरीला जावं न्यावं आईचं लुगडं
भरली चंद्रभागा धुण्या नाही वा दगड

पंढरपुरामंदी चोळी घेती माझी आई
सोन्याचा सुईदोरा टीप घाली जनाबाई

पंढरीला जाया संगं न्यावं ग आईला
संतासंगं बाई म्या देव विठ्ठल गाईला

आपण गुज बोलू मायलेकी ग दारात
आली शेजारीन बोले चलावं घरात

जलम देऊनी पिता झाला रे मोकळा
नऊ मास वझं पडलं माझ्या मावलीला

नऊ महिने होते बाई आईच्या पोटात
ऊन वारा नाही चिरेबंदी या कोटात

नऊ मास होते ग आईच्या डाव्या कुशी
उलटून बोलू कशी नव्हं ती मावशी

बारा वरसाची लेक झाली आईबाई
काळीज धडधडं त्येला करू गत काई

राम लक्षीमण ग देवाने दिले तुला
माऊली माझ्या बये भेटाया धाड मला

जिवाला वाटतं हितनं मारावी भरारी
मायबाईसाठी होतो जीव रानभैरी

मुंबईची मुंबादेवी कोण्या राजाला पावली
माऊली माझी बया धजा मोत्याची लावली

माता ग माऊली माझी उपकाराची साळू
माऊली ग माझी मांडीवरी भरी टाळू

मैना जातीया सासरी माय बघे परसातून
काळीज माऊलीचं बया नेलं कळपातून

मैना जातीया सासरी वाळू नदीची तापली
माऊलीची माया कशी उन्हानी सुकली

मैना जातीया सासरी मागं परतोनी बघती
माऊली बया बोलं जा ग मुराळी धाडीती

गेला माझा जीव कुडी ही झाली पाक
माऊली माझी आई नागीण टाकी झेप

गेला माझा जीव कुडी पडली पेवात
माऊली माझी आई हरणी गर्जती गावात

खाऊशी वाटे मला जिर तांदळाची खीर
होईना मन थीर आईचं ग गाव दूर

जाईल हाटाला[1] बाई मी लगबग
तिथं माझी आई भेटंल जिवलग

लेन्यामंदीं लेनं पुतळी साज सईबाई
साऱ्या गोतामंदी अमलूक[2] माजी आई

---

१ बाजारहाट. २ मूल्यवान.

माऊली मतानं चौदा तोळ्याचं रतान
घडीभर करमंना आई म्हटल्यावाचून

वाटेवैला आंबा त्याला कुऱ्हाडीचा घाव
लेकीचा सासूरवास आई ऐके येडा जीव

शेजारीण घाली जेऊ वाढिती उली उली
आई माझी घाली जेऊ ताटाला शीग आली

जिवाला जड भारी म्या उंबऱ्या दिलं उसं
माऊली मायबाई तुला उमगलं कसं

जिवाला जड भारी निरुपाया गेला सांग्या
माऊलीचा माझा बया अर्ध्या राती आला टांग्या

जिवाला जड भारी माहेरा गेला गडी
आई आली या धावत अंधारात घेई उडी

काशी म्हणू काशी काशी कोणत्या खंडात
माऊली माझी आई माझ्या सतत तोंडात

काशी म्हणून काशी काशी कुठं ती राहिली
आई माऊलीनं सये दुनीया दाविली

बारीक दळणाची भाकर होती दीड
आईनं शिकविली मला संसाराची तोड

दळण दळीताना घाम फुटला नितळ
आईनं माझ्या मला लवंगा चारिल्या शीतळ

दळण दळीयीती जसा चंदन किसावा
आईला विचारावं कसा परदेस कटावा

सुकाला गणगोत दुकाला आई रडं
आई तुझं बाळ देवाच्या पाया पडं

सुकाला गणगोत दुकाला मायबाई
आई तुझं बाळ देवा विचाराया जाई

सुकाच्या दुकाच्या कोणी दिल्यात गाठणी
आई तुझं बाळ दिसतं केविलवाणी

आपण गुज बोलू मायलेकी जात्यावर
मावळाया गेला चंद्र होता माथ्यावर

## ५२

संग्राहिका : **सौ. शुभा वाजपेयी**

माय माय करू माय साखरना रवा
मायले देरवं का हिरदे बये दिवा

माय माय करू माय मलाई चिकनी
जठे मुडना[1] काटा तठे माय याद उनी

माय माय करू माय साखर बत्तीसा
जठे लागनी ठोकर तठे ये तिना अंदीसा

माय माय करू माय लोनीयाना गोया
कुजात संतान जीव लाये जीव भोया

माय माय करू माय मयदानी लोई
दिवा करात डोयानी हातनी करी झोयी[2]

१ मोडला. २ झोळी.

माय माय म्हनू माय साखर फुटाना
मायना शब्द गोडा माले उठूशी वाटेना

माय माय म्हनू माय साखरना पोतं
माय मनाशी बोलत रात कापूरनी होत

माय माय करू माय मनथून गंभीर
हात नै पुरत उच्चा झाडले अंजीर

माय माय म्हनू नही माय दुनियामां
जिनी दिना जनम सवागी सोनियामां

मनं मामकुयं काय सोधस बाम्हना
जिनी दिन्हा जन्म उच्च कुयनी यमुना

मायना उपकार मीत इसरू ना कोठे
घुव्या दिदीसन तिना झिंजायना बोटे

खस्ता खाता खाता तुन्या दुखती दंडबाह्या
लोटांगन घाले देव तुना भक्त झाया

माय माय म्हना माय मयाना देव्हारा
जिनी दिन्हा जन्म गरुड पंखे घाल वारा

माऊलीनी सर काय करशी व वैनी
ताक पुढं करं तिटकी दपाडी दाहिनी

माऊलीनी सर कोन करीन जगात
मायना करता देव झुरत सरगात

माय माय करी मनं तोंड उनं भरी
उपाशिली झरी पानी पिनू धन भरी

बत्तीस धारासन दूध पिनू गडू गडू
मायना उपकार कोनता जनमना फेडू

माहेरी नै माय ते माहेर कसानं
आंगनपासून सारं दिखस मसान

अंबायाना बने गोसाई लाये धुनी
सर्गी गये माय नगरी लागे सूनी

नावाड्यारे भाऊ तुले सोनं देऊ बेनं
तापी थडीता माहेर माय घरी जानं येनं

गुचकी[1] लागनीं आन खाता पानी पेता
मायबाईनी लिधं[2] नाव कसांडीनं तोंड धोता

माडीवरी माडी एक माडी सासरनी
वरते उभी राहू नदी दिसे माहेरनी

दूरथून देखू मनं माहेर इंदू घाट
कमानी दरोजा वरे सोनाना कडीपाट

बारीक पीठनी भाकर चवूघडी
मावलीना सैपाकनी याद येस घडीघडी

उगना नारायन ऊन पडे झाडावर
त्यानं तेज चढे मना मायना चुडावर

माय तुनी मया शेजी लावायाले गई
लबाड बोलनं सर तुनी कही येई

शेजी चावये[3] तठे मन न रमये
माय चावयर्स चंद्र माडीव मावये

शेजी भरायनी ताकना पानीवर
मावलीना राजे हात भरा लोनीवर

---

१ उचकी. २ घेतले. ३ चाळवणे, बोलणे.

माले शेतवालाले नको देजो व माय
मी ते पह्य[1] येची येची थकी जासू व माय

माले मोटवालाले नको देजो व माय
मी ते दारा[2] धरीं घरी दमा जासू व माय

माले पैसावाले नको देजो व माय
मी ते घरमां कोंडी कोंडी झुरत ऱ्हासू व माय

माले नोकरीवालाले देजो व माय
मी ते नाचसू घागर तोली तोली व माय

॥ ५३ ॥

संग्राहक : श्री. रामदास खाकरे

पाडव्याचा सण करते करंज्याला रवा
झालं लई दिवस जाते मालनीच्या गावा

पाडव्याचा सण करते करंज्याला पिट्टी
मुराळी बोलवा जाते मालनीच्या भेटी

माय माऊलीच्या बाई भेटी परसंगाच्या
दिव्याला घाला तेल वाती लावा रेसमाच्या

१ पळाटी, कपाशी. २ शेतास पाणी देणे.

५४

संग्राहिका : सौ. सिंधू भालेराव

काटा मोडला कळ लागली पायाला
नऊ महिनं वज्जं काय म्हनावं मायला

काटा मोडला कनारली नाई देही
नऊ महिनं वज्जं धन्य तुझी मायबाई

लांब लांब बाल त्वा केलं मायबाई
परक्याच्या घरी याची निगा ऱ्हात नाई

लांब लांब बाल त्वा मायबाई केलं
उगया कारणं परायाच्या घरी दिलं

हौस मला मोठी हौसंजोगी माही माता
मोलाईची साडी पदराला रामसीता

माय घे ग चोळी मला हलक्या मोलाची
मला येती केऊ[1] तुज्या दुबळ्यापनाची

माय घे ग चोळी मला उली उली काठाची
गाव पिंपळवाडी वस्ती अडाणी लोकाची

माय घे ग चोळी मला रुपायाचा खण
तुपल्याबिगार माजी हौस फेडील कोण

माय घेती चोळी लेकबाई मागं गेली
चाट्याच्या दुकानी पावलीला कमी केली

---

१ कीव

पायीची चप्पल त्वा ग दिली मायबाई
जिथे मोडे काटा तिथे तुही सय होई

माय माजी माय जशी लावणीची बोर,
इच्या सावलीला जीव माजा बिनघोर

आपण गुज बोलू मायलेकी बरोबरी
सोनीयाचा भांग याला मोती हारोहारी

आपण गुज बोलू मायलेकींच्या मेळ्यात
सोन्याचा ताईत लेकीबाईच्या गळ्यात

समींदर सोकल्यानं तान मपली जाईना,
मायबाई माजी गंगा पोटात माईना

गंगा तुजं पाणी तसं आहे माझं मन
मायबाई माझ्या तुझ्या उदरीचा गुण

## ५५

संग्राहक : श्री. मा. कृ. कोकाटे

काशी म्हणू काशी त्या काशीला बारा वेशी
बंधूला किती सांगू तीर्थ बयाच्या पायापाशी

भरल्या बाजारात पेठ करिते झगाझगा
दिसते आई माझी चलावं लगालगा

भरल्या बाजारात मायलेकींची पडे गाठ
घेती चंद्रकळा चोळी फुठाणी रंग दाट

भरल्या बाजारात शिंपी आल्याती नामदेवू
बया मालन बोलईती बाळाला टोपी घेऊ

चाट्याच्या दुकानात पितळी दिवा जळं
बया मालन बोलती घेते जरीची पातळं

चौघी आम्ही भैनी चार दावणीच्या गाई
बया माझी मालईन ताट करुनी वाट पाही

वैराळानं पाल दिलं वाड्याला रेखुनी
मालनीच्या माझ्या लेकी सुनांना देखुनी

वैराळदादा भरी बांगड्या खालीवर
मालन बोलईती नाही शिणंचं बिलवर

समोरल्या सोप्या उभ्या राहिल्या जावा जावा
बया मालन बोलयीती द्रिष्ट होईल आत जावा

शेजारीणबाई देई उसनं मला लाडू
बया पावणी आली कळ्या कवाशी आता पाडू

दुबळं माजं पण केन्या कुंजराची भाजी
बया मालन बोलती देव जेवाया झालं राजी

लेकाच्या आईला नका म्हणू नाचारीण
बया माझी ती मालन मोत्यापवळ्यांची जवारीण

लेकाच्या आईला नाही कशाचा दुकाळ
भनीभावंडांनं सये भरलं गोकूळ

बया म्हणताना सुटे तोंडाला पाझर
माझी बयाबाई सये मधाची घागर

भरल्या बाजारात हिरा हिरकण दोन खणी
बयावाचून घील कुणी

सांगून धाडीते बया माझीच्या पिंडाला
सयांनू किती सांगू साडी आलीया दंडाला

सरगीची वाट हाळदीकुंकाचा सडा देते
बया माझ्या मालनीचा गाडा शिवारी अडविते

माहेर दिसताना माझं पाऊल बिगीबिगी
बया गौळण माझी गाव कुसवाला उभी

माहेरी दिसताना माझं पाऊल पडे जड
बया माझी ती गवळण दिसना तोंडापुढं

माहेराशी जाता आळा पेंढीला बसेना
बया माझी ती गौळण मला डोळ्यांनी दिसेना

माहेराशी गेले आळा पेंढीचा तुटला
मायबाई गेली आता जिवाळा कुठला

सरगीची वाट म्या लोटून केली पाक
बया माझी तीं गौळण सपनी दावी मुख

भरलं माझं जातं दोघी तिघींच्या वडणीचं
काशी गौळणीचं माझ्या बयाच्या वडणीचं

चौघी आम्ही भैनी चार गावच्या चार वेशी
बया माझी ती गोळण नांदते ग हृषिकेशी

चालावं झटाझट माझ्या संगतीनं बाळा
बयाच्या जेवणाला जाऊ दुपारच्या वेळा

टिप्पूर चांदणं काय पुनवच्या रातीचं
बया गौळणीचं माझ्या राज लेकाच्या मातेचं

तापत्याची चोळी सये दाराआड ल्यावी
बया माझे ग गौळणी मला तसलीच होवी

धारवाडी चोळी बाई फाटली पाठीवरी
बयाच्या जिवावरी चाटी लुटिला वाटेवरी

लुगडं घेतीयीलं घडी रुतली माझ्या पोटा
बयाला किती सांगू रंग गोकाकी आहे खोटा

बारीक बांगडी ती का फुटली काचाची
बयाच्या जिवावरी उद्या भरीन पाचाची

५६

संग्राहक : प्रा. प्रभाकर मांडे

माय माय करू माय मोहळाचा मध
अंतरी करी शोध ताकाचं व्हईना दूध

आईवाचूईनी मया भैनीशिवा कनवळा
घालू नये हात येड्या गाणाराच्या गळा

आईच्या परास मला मावशीचं याड
चंद्रभागापरीस पाणी माहेराचं ग्वाड

नको करू पुता मावलीची दुरदशा
मांडीव घेऊनी फार केली तुझी आशा

वानीयादादा सांग सौद्यामंदी गोड काई
तुह्या साखरेचं पोतं तशी माझी मायबाई

अस्तोरी[१] मिळाली लेन्या लुगड्यानं झ्याक
मिळना मायबाप रुपये दिले तरी लाक

भाजीमंदी भाजी लई मेथीईची ग्वाड
अवघ्या गोतामंदी मला मावलीचं याड

दुसऱ्या देशाचा कोनी आला नाही गेला
कारडाच्या[२] पोटी धाडे संदेसा[३] मायेला

सरलं दळण पदर घ्यावा डोईवई[४]
आनंदाच्या ओव्या तुला गाते मायबाई

उभारिल्या गुढ्या वर खिडक्या कऱ्होडी
मायबाईसाठी खेळ मांडिला गारोडी

तुळशी ग बाई वाड्यामागं उभी न्हाई
पूजा ती करती पतिवर्ता माझी आई

बारीक बांगडी मला भरूशी वाटली
पंढरपुरात मायमावशी भेटली

सुख माझं दुख हुरद्यात साठविलं
मायबाई नाव तुझं मला आठविलं

मोठं माझं जातं ल्हान घागर येईना
आईनं दिला खण माझ्या येईना ग मना

बया तुझ्या घरी राज केलं लखोपती
तांब्याभर पाण्यासाठी आली काकोलती[५]

काळी चंद्रकळा नेस माझ्या मायबाई
तुझ्या लेकाची कमाई

---

१ स्त्री, बायको. २ कार्ड, पत्र, चिठ्ठी. ३ संदेश, निरोप, सांगावा. ४ माथ्यावर.
५ काकुळती. व्याकूळ होणे, घाईला येणे.

गेला माहा जीव चिता जळे सावलीला
येवढ्या गोतात दुख झालं मावलीला

लक्ष्मीबाई आली तुझं डोंगर पातळ
आईच्या अंगावरनं रथ जाऊंदे शीतळ

शिण्याच्या साताला माझी माय पाटलीन
रुपायाचा खण पाठीवला एकलीनं

बांगड्या भरीते बंद लाविते हिरवा
आई कदरली माझा नाजुक पारवा

जीव गेला माझा पान काढा बाई
आईच्या नगरीं पुनः येणं नाही काई

मावळला दिस मला चुलाच्या वडाखाली
राही राही बाळा मायमावशी मोडा घाली

दिवाळी दसरा शेती सौंगणीची घाई
आखाजीला[१] मला मूळ धाडा मायबाई

भरला बाजार दिसतो ग रिता रिता
आली मायबाई पेठ दनानीक[२] आता

आंबे आले पाडीं झाला चिंचांचा ग सडा
माउली बोलती मूळ मैनाला व धाडा

आई इतकी मया नाही कोणत्या गोताला
जिरुनी ग गेलं तूप साळीच्या भाताला

शेजीचं उसनं किती देऊ किती घेऊ
मावलीच्या नक्षा भोळेपणावर जाऊ

---

१ आकितीला, अक्षय्य तृतीया. २ दणाणेल, गाजावाजा होईल.

पंढरपुरात चोळी घेते माझी आई
सोन्याचा सुईदोरा टीप भरे जनाबाई

लावणीचा आंबा याला साखरेचं आळं
सांगते माउलीला तुझा नवसाचा बाळ

माऊलीची माया काय करतील शेजा
माळ्याच्या मळ्यात बहू परकाराच्या भाज्या

वानीचा वानीचा म्हणेना सारा ईळ
आईच्या नावाचा नारायणा पायघोळ

साखर धन्याचा देईल तोंडाला वल्ढावा
जिवाला जड भारी आईला तार लावा

नंदाची गेली गाडी बाराचा टेम धरा
जिवाला जड भारी उशाचं पायथं करा

जिवाला जड भारी शेजी आली तशी गेली
माझ्या माऊलीनं बाई दिवाबत्ती केली

गेला माहा जीव शेजी तार लावे ताटी
माझी मायबाई सोडी हुरद्याच्या गाठी

गेला माहा जीव कुडी पडली पेयावी[1]
अंगातली चोळी माझ्या आईला देयावी[2]

खबर नका सांगू माझ्या मरणाची आता
माझी मायबाई तांब्या टाकील तोंड धुता

आईच्या माघारी माझं माहेर संपलं
मोकळं माझं केस मन झुरणी लागलं

१ पेवामध्ये. धान्य साठविण्यासाठी तयार केलेली खोल जागा. २ द्यावी, पाठवावी.

५७

संग्राहिका : सौ. सुमन मराठे

माय मना गुरु खरा
माय मना गुरु खरा
वाहे खयखय[१] झरा

माले शिकाडे[२] असं कोन
माले शिकाडे असं कोन
मना हिरदे[३] सर्व ग्यान

माय मनी दुन्या[४] सारी
माय मनी दुन्या सारी
देव दुन्यामा भिकारी

माय मनी रखुमाई
माय मनी रखुमाई
माय मनी गेवराई[५]

माय मना देव माय मनी ठेव
मायनी मव्हर[६] सारी दुनियामा सेव
माय आकास अंबर
माय पिरथीमी डवर[७]
माय दारीचं कुंदन
माय सोनानी काकन

१ खळखळ. २ शिकविणें. ३ हृदय. ४ दुनिया. ५ गौराई. ६ म्होरं, पुढे. ७ भरून राहिली.

माय मना जीवभाव
माय मना देवराव
माय आंबायानी साया

काय केलं देवराया
माय गंगा भागीरती
माय तापी सरस्वती

माय जगतनी साया
माय सीता अनुसया
माय पारवती मावली

माय सुखनी सावली
माय मनले इसावा
माय दुखमा इसावा

माय धीरना सागर
माय ग्यानना आगर
माय डोयामाना आसू
माय तोंडमाना हासू

# अनुक्रम


डॉ. सरोजिनी बाबर, पुणें

मायलेकी

सौ. शरदिनी मोहिते, सांगली

आई ती आईच

सौ. शुभा वाजपेयी, धरणगाव (जळगाव)

जयरामनी माय

श्री. सु. वा. कुळकर्णी, पुणे

मायलेक

सौ. सुमन नलावडे, भवाळी (जळगाव)

सावकाराचा मुलगा

सौ. शशिकला पाटील, रामानंदनगर (सांगली)

आशीर्वाद

# मा य ले की

निवेदिका : डॉ. सरोजिनी बाबर

असंच आपलं एक गाव होतं. तिथं एकमेकींच्यावर जीव टाकणाऱ्या मायलेकी रहायच्या. एक घास दोघींनी खावा असा त्यांचा लौकिक. कोडकवतिक करावं तर याच आईनं असा आईचा गावात गवगवा. आईनं सांगावं न् लेकीनं ऐकावं तर ह्याच लेकीनं असा ह्या लेकीचा पण बोलबाला झालेला. तर माणसं म्हणायची की, जगावेगळ्याच ह्या बायका हं! लेकीचं लगीन केलं तरी म्हातारीची माया काय सुटत नाही. रोजच्या रोज ही जाईलच लेकीकडे. काय तरी गोड-धड तिला घालील तेव्हा आपण जेवील. खुळी म्हटलं तरी वाहवा शाहाणी म्हटली तर वाहवा. ती आपल्या मनाला येईल तशीच वागायची हं!

तर एकदा गंमत झाली की, जरा मागंपुढं होईल अशा बेतानं एकाच वेळी दोघींना पण दिवस गेले. म्हातारपणी घडू नये ते आक्रित घडलं. म्हणताना लेकीच्या डोहाळ्यांची तजवीज करताना म्हातारी दुचीत पडली. आपलं काही बरं नाही म्हणाली. आणिक झाली की कावरीबावरी. खंडीभर माणसं असून करायची काय म्हटली. काळजातलं बोलावं तर लेकीपशीच म्हणाली. शब्द दिला तर तीच काय ती पाळील बोलली. आणि मग केळीच्या मखरात

बसून पाचजणी सवाष्णींच्याकडनं तिनं लेकीची ओटी भरली. तिला नवं चोळी पातळ केलं हिरवी काकणं घातली. गीतं गाईली. आणिक संध्या-काळला जरा सामसूम झाली म्हणताना दोघीजणी परसदारीच्या तुळशीकट्ट्यावर आल्या. अंगणात चांदणं पडलेलं. गार वारा वहातेला. तशी आईनं लेकीला जवळ घेतली. पोटासंगं धरली न् म्हातारी हो' ' म्हटलं. त्यासरसी हिच्या डोळ्यातून आलेलं पाणी लेकीच्या गालावर घरंगळलं. लेक एकदम दचकली. "का ग आई?" म्हणाली. आईनं मग लेकीला लईच मिठी मारली, "आता काय धडगत न्हाई दिसत माजी. तुजं तुलाच बाळातपण कराय लागल पोरी हो!"

लेकीच्या काळजानं ठाव सोडला. ती चटकिनी उठली. "आई तू असं का म्हणतीस?" म्हणाली. तर आई कशी म्हणती, "लई विचारू नगस. माजं एक ऐकशील का?"

"हे काय बोलणं झालं काय आई? न्हवं तुझ्या मनात शंकाच आली? तू सांगावंस न् मी ऐकू नाही असं झालंय काय का होणार हाय आई तर असं विचारतीस?" लेकीनं आईला उलट जबाब दिला.

झालं. लेकीच्या ह्या बोलण्यानं आई लईच खुळ्यागत कराय लागली. तिनं देवाला हात जोडले. "माजी पोरगी वानीवानची तर संभाळ बाबा" म्हटली.

पुढं मग असेच दिवस आले न् गेले. दोघीबी बाळंतीण झाल्या. दोघींना मुलगेच झाले. जरा मागंपुढं नाहीतर एकाच टिपणाला. पण बोला-फुलाला गाठ पडावी तशी या बाळंतपणात आई मरून गेली. लेकीवर भार पडला. एकवेळ पोटचं सोडीन पण पाठचं सोडणार नाही हा आईला दिलेला शब्द पाळीन तरच नावची म्हणाली. तिनं लेकाची न् भावाची जोपा सोभागती चालवली. एकवर एकाला पाजलं. न्हाणं धुणं, काजळतिटी, अंगडं टोपडं, होय नाही सारखं पाहिलं. रोज दृष्ट काढली. एका पाळण्यात दोघांना जोजवलं. दोघांना दुही अंगाला घेऊन निजली.

पण नवऱ्याच्या डोळ्यांना हे सुख खुपलं. त्यानं विचार केला. चिंतागती बसला. आणिक एक दिवस बायकोला म्हणाला कसा, "अग अग, हिकडं

ये." तशी ती "काय म्हणता?" असं विचारीत आली. दोन्ही कडेवर दोन पोरं—" तर हा म्हणाला, "नदीला परडी वहायची." तशी ही 'बराय' म्हटली न् पोळ्यांचा निवद कधी करायचा ते विचारायला लागली. त्यासरशी ह्यानं मग फाड्किनी सांगितली, "निवद नुसता नको. निवदासंगं पाठचं वहायचं नदीला. मी सबूद दिलाय."

"अगबाई!" आधीच आईच्या दुःखानं होरपळून गेलेली लेक ह्या बोलण्यानं हाबकलीच. तिचं काळीज फाटून गेलं. घाम फुटला बिचारीला. न्हवं कशी काय गत व्हावी तिची!

पण लेक धीराची. 'बराय' म्हटली न् कामाला लागली. नेत्रांच्या धारेनं तिनं ह्या पोरांची काया भिजवली मग रोज रात्रीला.

होता होता परडी वहायचा दिवस उजाडला. ही भल्या पहाटेला उठली. पुरण घातलं. निवद केला. कणकीचे पाच दिवे केले. पानसुपारी घेतली. हळद कुंकू घेतलं. फुलं आणली. खण नारळ आणला. दुरडी भरली आणिक आपली ती दुरडी डोईवरच्या चुंबळीत ठेवून निघाली. निघाली तर जाताना तिनं धोतराच्या सोग्यानं भाऊ पाठीला बांधला न् मुलगा पोटाला. चार पाच महिन्यांची ही पोरं कसं झक्कास बाळसं धरलेली. नक्षत्रागत देखणी. पण जिवाचा धडा करून आपली निघाली. मनाचा हिय्या केला न् आईला दिलेला शब्द पाळायचाच म्हटली.

पण नदी आली तसं हिचं काळीज जरा चरकलं. पोटचा गोळा आपल्या हातानं नदीत सोडावयाचा म्हणजे थट्टा होती काय? नदीचा घोळ पायाला लागला तशी ही थरथरली. काया पाक डवरून गेली घामानं. पान्हा फुटला. हिनं लेकाला पोटभर पाजलं. पोटासंगं घट्ट आवळलं न् तोंड दुखस्तोवर त्याचा मुका घेतला.

तेवढ्यात ती कमरेइतक्या पाण्यात आली. संगं नवरा. पण पुढं चाललेला. त्यानं नदीला परडी वाहिली. तोवर हिनं चलाखी केली. लेकाला पाठीवर घेतला न् भावाला पोटाशी धरलं! घट्ट डोळे मिटले. नदीला साकडं घातलं.

"माजी कूस लवकर उजू दे, घरात पाळणा हलू दे' म्हणाली. आणिक बाई तिनं लेकाला नदीच्या वटीत गातला खणा नारळासंगं! त्यासरशी पोरगं वरडलं न् हिनं किंकाळी फोडली.

मग भरल्या डोळ्यानं ही घरला आली. भावाला पोटासंगं धरला न् नवरा घरात नाही असं बगून तुळशीकट्ट्यावर आली. उगवतीकडं तोंड केलं. आईला हात जोडले न् दिला शब्द पाळला बोलली. थरथरत्या हातानं तिनं भावाला कडेवर घेतलं न् घरात आली.

भाऊ मग लहानाचा मोठा होत गेला. नवरा आपला बायकोचा भाऊच मेला ह्या खुशीत हं!

इकडे तोवर हिला तीनचार मुलं झालेली. हिची कूस उजळलेली. घरात पाळणा हाललेला.

तर एक दिवस हिनं घरात लगीन काढलं. नवऱ्याच्या पारखीनं भावजय पसंत केली. आणि मुहूर्त नजीक आलेला तर हळद दळायला लागली. पानवतांच्या सवाष्णी आल्या न् जातं पुजून गीतं गात हळद दळाय लागल्या. पण गीतं होती भावावरची. तसा हिला हिचा नवरा कसा म्हणतो, "वा! भाऊ कवाच मेला न् गीतं भावावनं कशी गातीयास?" त्यासरशी हिनं खरी गोष्ट नवऱ्याला सांगितली न् म्हणाली कशी, "घरात माझी भावजय येणार. सून नाही."

हे ऐकून नवरा भडकून गेला. त्याच्या अंगाचा आगडोंब उसळला. केलं काय न् झालं काय म्हणाला. त्यानं रागाच्या भरात हिला मुसळानं ठेचली न् घरातून चालती हो म्हटलं.

पण बाई हिच्या डोळ्यात टिप्पूसही आलं नाही. पोराला उदंड आयुष्य मागीत तिनं घर सोड़लं न् भावाचं लगीन ठरल्या मुहूर्ताला लावलं. आईला दिलेला शब्द तिनं पाळला न् मग ती भावाजवळ सुखासमाधानानं राहिली.

# आई ती आईच !

निवेदन : सौ. शरदिनी मोहिते

एका गावात एक बाई रहात होती. तिला डोहाळे लागले होते. त्याच सुमाराला एका कुत्रीला पण डोहाळे लागले होते. बाईनं कुत्रीला सांगितलं, "त्याऽ तिथल्या मळ्यात कारली लागली आहेत, थोडी तोडून आण जा. कालवण करून खाऊ आपण."

मग कुत्री मळ्यात गेली, आणि तिनं तोंडांत मावतील तेवढी कारली तोडून आणली. बाईनं मग कालवण केलं. स्वतः मोठ्या चवीनं खाल्लं. पण कुत्रीलां काही ते दिलं नाही. ते पाहून कुत्री म्हणाली, "बाई ग, मला कालवण नाही दिलंस, निदान खरकटं पाणी तरी दे मला." पण त्या बाईनं खरकटं पाणीसुद्धा उतरून टाकलं !

काही दिवस गेले, आणि मळ्यात भोपळे लागले वेलांना. तेव्हा बाईनं पुनः कुत्रीला सांगितलं, "मळ्यात भोपळे आलेत, ते आण जा."

कुत्रीनं भोपळा आणला. बाईनं कालवण केलं. स्वतः चवीनं खाल्लं. पण कुत्रीला काही दिलं नाही. याही वेळेला कुत्री म्हणाली, "मला खरकटं पाणीतरी दे." पण बाईनं हे खरकटं पाणीही उतरून टाकलं !....

कुत्रीला फार राग आला. ती मनात म्हणाली, "माझ्या पोटातला गर्भ तिच्या पोटात जावा आणि तिच्या पोटातला गर्भ माझ्या पोटात यावा."

आणि झालंही तसंच. ती बाई बाळंत झाली आणि तिला दोन कुत्र्याची पिलं झालीं आणि इकडे ती कुत्री बाळंत होऊन तिला दोन पोरी झाल्या!

मग कुत्रीनं आपल्या मुली अटिंग्या वनात नेऊन ठेवल्या. कुत्री मग रोज वनात जायची. जे तुकडे मिळतील ते साठवून मुलींना नेऊन द्यायची. लोकांनी कुंपणावर वाळत घातलेले कपडे नेऊन मुलींच्या अंगात घालायची.

फार कष्ट घेऊन कुत्रीनं मुली मोठ्या केल्या. मुली रोज पाणी आणायला ओढ्याला जायच्या. एकदा वनामध्ये राजा आणि प्रधान शिकारीला आले होते, त्यांनी त्या मुली पाहिल्या, तेव्हा मुलींजवळ जाऊन त्यांनी विचारलं, "कोण तुम्ही?....कोणाच्या मुली आहात तुम्ही?"

मुलींनी राजाला आणि प्रधानाला सर्व हकीगत सांगितली....दोन्ही मुली राजाला व प्रधानाला फार आवडल्या होत्या. त्यांनी मुलींना विचारलं, "तुम्ही आमच्या बरोबर येता का?"

मुली नाही म्हणाल्या. 'आईला सोडून कसं यायचं' म्हणाल्या....पण दोघांनी मुलींना दोन घोड्यांवर घालून पळवून नेलं....!

कुत्रीनं आपल्या मुलींच्या गळ्यात मोत्या पवळ्यांच्या माळा घातलेल्या होत्या. आणि सांगून ठेवलं होतं की, "जर तुम्हांला कोणी नेलं तर गळ्यात घातलेल्या या माळा तोडा आणि मोती पोवळे गाळीत जा. म्हणजे ते वेचत रस्ता शोधत मी येईन."

राजानं आणि प्रधानानं मुली पळवल्या, तेव्हा मुलींनी आईनं सांगितल्या-प्रमाणे केलं. गळ्यातल्या मोत्या पवळ्यांच्या माळा तोडून मोती पवळे रस्त्यावर गाळत त्या गेल्या....मोठी मुलगी प्रधानाची बायको झाली आणि धाकटी झाली राजाची राणी....

आपल्या मुलींचा काहीच पत्ता नाही म्हटल्यावर कुत्री ओढ्यावर गेली. आणि तिथं काही मोती पोवळे पडले आहेत असं तिला दिसलं. त्यावरून रस्ता

शोधत शोधत कुत्री राजधानीत आली. आधी ती आपल्या मोठ्या मुलीच्या घरी गेली. प्रधानाची बायको झाल्यानं मुलीचा थाटमाट वाढला होता. तिला गर्वही झाला होता. मोठ्या थाटात तिचं जेवण चाललं होतं. अशा वेळी कुत्री दारात आलेली पाहून तिचं डोकं उठलं. तिनं दासीकडून चुलीतलं जळकं लाकूड आणवून ते कुत्रीच्या पेकटात घातलं!....

बिचारी कुत्री आपल्या लेकीच्या या पाहुणचारामुळं विव्हळत विव्हळत धाकट्या मुलीकडे गेली....राणीनं आपल्या आईला पाहिल्यावर तिच्याकडे धाव घेतली. तिला अगत्यानं वाड्यावर आणलं. अंग चांगलं चोळून मोळून तिला न्हायला घातलं, आणि पंचपक्वान्नाचं ताट करून पाची प्रकार मोठ्या जिव्हाळ्यानं तिला खायला घातले. मग तिला एका दालनात अंथरूण घालून त्यावर निजायला लावलं.

हे सगळं होताना राजा बाहेर गेला होता. तो परत आला तेव्हा राणीनं सांगितलं, "माझी आई आली आहे."

राजा म्हणाला, "कुठं आहे तुझी आई?....दाखव तरी मला."

कुत्रीला जिथं निजवलं होतं, तिथं राणीनं राजाला नेलं. दालनाचं दार उघडून पहाते, तर कुत्रीच्या जागी तिच्याएवढाच मोठा सोन्याचा लाटा पडलेला होता!.... कुत्रीचं सोनं झालं होतं....

ही गोष्ट सर्वांना नवलाची वाटली. ज्याच्या त्याच्या तोंडी झाली. राणीच्या बहिणीला जेव्हा ही हकीगत कळली, तेव्हा तिला वाटलं, 'माझ्या बहिणीला आयतंच केवढं तरी सोनं मिळालं. आता ती नवे सुंदर दागिने घालील तऱ्हे-तऱ्हेचे.' आणि ती राणीकडे गेली. 'माझ्या वाटणीचं सोनं दे' म्हणाली.

तेव्हा राणी म्हणाली, "तुला मी सोनं देणार नाही. आपली आई आपला शोध घेत घेत किती तळमळीनं आपल्याकडे आली होती. तिची विचारपूस न करता, तिची सेवा न करता तू तिला जळकं लाकूड मारलंस....!"

मग राणीची बहीण माघारी गेली. आपल्याला सोनं मिळावं म्हणून तिनं गल्लीचं एक कुत्रं धरून आणलं, त्याला चोळून पाणी घातलं, पुनः पाची

परकारांचं ताट केलं, त्याला जेवायला घातलं आणि एका हाऱ्याखाली कोंडून घातलं. नंतर प्रधान आला त्याला तिनं सांगितलं, "माझी आई आली आहे."

प्रधान म्हणाला, "कुठे आहे तुझी आई?"

त्याची बायको म्हणाली, "या हाऱ्याखाली आहे."

प्रधानानं हारा उघडून पाहिला, तर हारा घाणत होता. कारण गल्लीचं ते कुत्रं मरून पडलं होतं. प्रधानानं ते कुत्रं बाहेर नेऊन टाकायला लावलं आणि बायकोला खूप मारलं.

ही सर्व गोष्ट राणीकडे जाऊन तिच्या बहिणीनं सांगितली. राणी म्हणाली, "आपली आई आल्यावर तू तिला जळकं लाकूड मारलंस त्याचं हे फळ.... आणि आई ती आईच! ....बाई ग, तिची सर रस्त्यावरची कुत्री कशी करेल?"

# जयरामनी माय

निवेदिका : सौ. शुभा वाजपेयी

एक व्हता गाव. त्या गावमां एक जयराम नावना मानूस व्हता. घर त्यांनी माय व्हती, बायकू व्हती. असं ते तीन जनसनं कुटुंब व्हतं.

जयराम व्हता बाइलबुधा. नवरी सांगे ते तो नेमबंद ऐकाता. जसा बायकोना भाड्या व्हई गया होता.

एक दिन सासू हुवासनी[1] लढाई झायी. जयराम खेतमां जायले व्हता. तो उना[2]. तेसनी लढाई आटपीसन धडली[3] दारशे बठेल व्हती. वारी[4] खाट-वरज जपी रायनी. तेनी बायकोले निजान कारन इचारं. तधय[5] तिनी चुगई[6] लायी. तुमनी मायनी माले गहिरं मारं. ते तुम्ही तिले आपला वावरमां फासमां बायी[7] येशात, तधय ज मी खाटवरथून उटसू.

पुरा बायल्या व्हता. त्यानी तिनं बोलनं कबूल क्यं[8] अन् धडलीलें लीसन[9] वावरमां ग्या. तिले फासमां टाकी दिधं अन् फास चेटाडाले[10] त्याना जोडे. पेटी नै व्हती. तऱ्हय आठेज[11] पडी ऱ्हायजो!' असं धडलीले बजाडी

---

१ सुवासनी, सून. २ आला. ३ म्हातारी. ४ बायको. ५ तेधवा, तेव्हा. ६ चुगली, चहाडी. ७ बांधून आलात. ८ केले. ९ घेऊन. १० चेतविणे, जाळले. ११ येथेच.

सन तो पेटी लेवासाठे घर ग्या. इबाक[१] धडलीनी जोडेना मरीमायनी[२] पराथना[३] करी. ती देवी परसन झाई. धडलीले फाथीसमान भाइर काढं. आते[४] ती धडली एक झोपाय झाडावर -हावाले लागनी.

जयराम घर ग्या. फुशारकी माराले लागना. "पुरी चेटाडी उनू मी धडलीले ! आपले भलतीं तरास देए. आते आपू[५] दोन्ही मजामां -हासूत."

इबाक धडली झाडपाया खाये. झाडवय ज-हाये. एक दिन काय झायं ? रातले चोर चोरी करीसन उनात. वाटा पाडाले लागनात. त्यास्नायान[६] गैर[७] सोनं गैरं नानं व्हतं. धडलीले युगत[८] सुचनी. तिनी वरथून बांगड्या वाजाडयात[९] चोरसना आंगवर काटा उना. "बापरे ! धत्-तिन्[१०]-भैंजू ! चुडेल[११] शेरे आठे." त्या जे पयनात,[१२] मालटाल समदा -हाई ग्या.

धडली उतरनी.[१३] समदा डागिना आंगवर घालात[१४]. पैसा पदरे बांधात न् गावमां उनी गुपचुप. कोनी वयखनार[१५] नै अशी एक खोलीमां -हाक लागनी.

असं करता करता पितरना[१६] दिन उनात. जयराम न् त्यानी बायकोनी बारा पकवान कायात. जयराम धडलीनी 'आग्यारी[१७]' टाकाले धाबावर ग्या. म्हणस कसा, "माय पोटभर जीई जाय !"

धडली धाबावरच यी बठनी[१८] व्हती. ती वरथून म्हनस कशी, हा ! मी जेवालेज येस"

त्या[१९] दचकनात.[२०] "होऊ[२१] ते धडलीना आवाज ! आपुन ते इले बाय जित्तं[२२] फासमां ! अन् हाई लदी[२३] लादी जेवाले उनी. काय गंमत शे !"

ती खाली उनी. मंग म्हनस कशी, "देवनी घर काय वैभव शे ! मनी समदी हौस पुरी होस. देनी ह्या दागदागिना....मी येतू ना[२४] पन तुमले भेटाले[२५] उनू"

---

१ इकडे. २ मरीआई, देवी. ३ प्रार्थना. ४ आता. ५ आपण. ६ त्यांच्याजवळ. ७ गहिरे, खूप. ८ युक्ति. वाजविल्या. १० हात्तीच्या ११ हडळ. १२ पळाले. १३ उतरली. १४ घातला. १५ ओळखणार. १६ पितराचे. १७ घास, नैवेद्य. १८ येऊन बसली होती. १९ ती दोघे. २० दचकले. २१ हा तर. २२ जित्तेजिवंत २३ ताजीतवानी. २४ येत नव्हते. २५ भेटावयास.

वहूनी[1] सासूले देखं. पाय पडनी. म्हनस...."मालेबी चेटाडा. फासमां ना बाप जलममां असा सोना माले दिखाऊ नही!"

नै नै म्हनता ती हटी पडनी.[2] अखेर तिले बी चेटाडं. फासमां....ती खरीज[3] शिलगी गयी.

मंग जयरामनी दुसरं लगीन कयं. मंग धडलीनी समदा दागिना, समदा पैसा जयरामले दिधात. अन् म्हनस कशी, "आते बायको ते तू आनी. आते हाऊ पैसा[4] ले आन् गाव गाव फिर. बाजारसमा जाय. आन् सोध[5] लोकसले माय मिई[6] का हो माले? माय भेटी का बजारमां?"....

---

१ बहु, सून. २ हट्टाला पेटली ३ खरोखरच जळली गेली. ४ पैसा घे. ५ लोकांकडे शोध घे. विचारपूस कर. ६ मिळेल का हो?

# मायलेक

निवेदक : श्री. सु. बा. कुळकर्णी

तिनी माय्लेका हतात्। त्याह्ला मोटी जी अड्डस् हती ती मोटी कजानी आग् हती। ती ओहोडासला आखह की भर्तारा यी सासूला ले आन् दहा पन्द्रा मोळ्या लिहीन् आग्टी लाव् आन् पेट्वीहिन् टाक्। आता ते लेकूस्ने लिदाहा आन् तिन्या म्हन्न्यापरमानी कराहा। तांव् तो आप्ला पाटूमोहर आनाहा तांव् यी भोसुक्यामाठ आनीही। घराने उडुग वड हता त्यावर् बिसनीही।

तांव रात् हिनीही। बाराने टाय्माला कातोडे लोक् गयील चोरीला। चोरी करीहिन् मोटा पयूसा लिहिन् आनाहात । तांव वडाखालच वाटूण्या करूला

---

मायलेक धरून तिघेजण होते. त्यामध्ये मोठी सून होती ती अतिशय भांडखोर होती. ती नवऱ्यास सांगू लागली, "भर्तारा, या सासूला घे आणि दहा पंधरा गवताच्या मोळ्या पेटवून जाळून टाक." तेव्हा त्या लेकाने तिला घेतली आणि बायकोच्या सांगण्याप्रमाणे केले. त्याची पाठ फिरताच म्हातारी गंजीच्या भोकातून बाहेर आली आणि घराजवळ वड होता त्यावर जाऊन बसली.

रात्र झाली तेव्हा बाराच्या सुमारास कातकरी लोक चोरीला गेले आणि चोरी करून मोठे डबोले घेऊन आले. तेव्हा वडाखालीच वाटण्या करू लागले. वाटण्या

लाग्नात्। वाट्ण्या हेहेत्। त पाच् जनाला पाच् वाट लाव्रात्। तांव् यी डोशी आखह माला र नान्या। त्याहमा हता एक् नान्या। तो आखह आपल्याला वळ्काहा कोनी। तांव्‌ ते पळूला लागनात्। डोशी उतरनीही। तिनी समृदा पय्सा डाग्दागिना हता त्यानी मोट् बान्दीहिन् घर् गहय्।

तांव् ती आखह ये र लेका उतारूला। तांव् यो ग्यांहा आन् आखह बय् मा तुला जाळी टाकी आन् तू किशी आनीस। तांव् मडूग् यी अहुस् आखह। मारी टाकी त किशी आनी माड्गाज्। लेकुस्ने ओहोडीस्ने वजा हेरा त आखह सासूबाई कठना तुमी ओडा डाग् यो आना मोट् बान्दीहिन्। त ती आकुला लागनाहा डोसा। का मोळीने गन्जामा माने घर्ना दार्ना आपत् बुहुं आहांत्। त्यामाठा आनाहात्। तिनी अहुस् हती तिला आखुला लागह। तुना आपत् तठ बुहुं आहांत्। तुला वाहराहा तुला बुंहुं द्याव्ला हिण्डहत्।

ताव् लेकूस् तिला लिहीन् ग्यांहा रुई माळाला।) त्यानी मोटी हुळी करीही गव्रंतानी। त्यामा ओहोडीस्ला टाका। आन् लावी दिनी। ती शाप् पेटी गई।

---

झाल्या. पाच जणांना पाच वाटे केले. तेव्हा ही म्हातारी म्हणाली, "मला रे नान्या!" चोरांमध्ये एक नान्या नावाचा चोर होता. तो म्हणाला, "आपल्याला कोणी तरी ओळखले!" तेव्हा ते पळावयास लागले. म्हातारी झाडावरून खाली उतरली. तिने त्या सर्व पैशांचे व दागदागिन्यांचे गाठोडे बांधले व ती घरी गेली.

तेव्हा ती म्हातारी मुलास ओझे उतरण्यास बोलावू लागली. तेव्हा तो आला आणि म्हणू लागला, "बये, मी तुला जाळून टाकली आणि तू कशी आलीस?" तेव्हा ही सूनही विचारू लागली, "मारून टाकली तर कशी आलीस?" लेकाच्या बायकोने विचारले, "सासूबाई हे गाठोडे बांधून दागिने कोठून आणलेत?" तेव्हा ती म्हातारी सांगू लागली, "मोळीच्या गंजीमध्ये माझे घरादाराचे अनेक आप्त आहेत; त्यांच्याकडून आणले!" तिच्या सुनेला ती सांगू लागली, "तुझेही अनेक आप्त तेथे आहेत, त्यांनी तुला बोलाविले आहे. तुला पुष्कळ देण्याची त्यांची इच्छा आहे.

तेव्हा लेक बायकोला घेऊन रुई माळावर गेला. तेथे त्याने गवताची मोठी होळी तयार केली. त्या होळीत बायकोस टाकले व आग लावून दिली. ती साफ पेटून तिची

तिनी भुरी हिनी। मङ्ग तो आकूला लाग्ना। बस् कर्। वजा मिळ्ना तो लिहीन् ये। लेकुस निङ्नाहा। तो घर् आनाहा। आन् आईस्ला आखह। बय् ती नाय् आनी। तिनी भुरी पड्नी।

आता आईस् आखह। सुप्लीभर् सोना ले आन् आईस् मागूला ज गावामा। त दोन्तीन् गाव् हिण्ड्ना त आईस् नाही मिळह। आता तो आनाहा आन् सोना लिहीन् परत् ओहोडीस् गुहूस्ला ग्याहा। मङ्ग् आखहत्। दहा पन्द्रा कन्या आहात् त्यामाठा तुला पटेल् ती ले। त्याने पशान् आनीही ती लिदी आन् आनाहा। मङ्ग् आईस् आखह। ओहोडीस् मिळह पन् आय्स् मिळुला नाही।

---

राख झाली. मग तो सांगू लागला, "आता पुरे कर; जेवढे ओझे मिळाले आहे तेवढे घेऊन ये." लेक निघाला आणि घरी आला. मग तो आईला सांगू लागला, "बये, ती आली नाही!" तिची राख झाली.

आता त्याची आई त्याला म्हणाली, "आता एक सुपलीभर सोने घे व आई मागायला गावात जा." तेव्हा दोन तीन गाव हिंडला तरी आई कोठे मिळाली नाही. आता तो परत आला आणि सोने घेऊन बायको शोधण्यासाठी गेला. मग लोक म्हणाले, "दहापंधरा मुली आहेत, त्यातून आवडेल ती घे." त्याच्या पसंतीस उतरली ती त्याने घेतली आणि आला. मग त्याची आई म्हणाली, "बायको मिळेल; पण आई मिळावयाची नाही!"

# सावकाराचा मुलगा

निवेदिका : **सौ. सुमन नलावडे**

एक आटपाट नगर होतं. तिथं एक सावकार रहात होता. तो मोत्या पोवळ्यांचा व्यापार करी. ठराविक नफा घेऊन सारा माल विकून टाकी. त्यामुळं दिवसानुदिवस त्याला धंद्यात बरकत आली. खूप पैसाआडका मिळविला. तो त्यानं दानधर्मात खर्चही केला. देवळं बांधली. धर्मशाळा बांधल्या. आडल्यानडलेल्याला हात दिला. त्यामुळं थोडेच दिवसात सावकाराचा नावलौकिक लांबवर पोचला.

सावकाराची बायकोही भारी सालस. तिचं सारं लक्ष देवाधर्मात आणि दानधर्मात. सावकाराच्या घरून कधी कुणी मोकळ्या हातानं परत गेला आहे असं कधी घडलं नाही. पाहुण्यापैनं, आल्यागेल्यानं घर रोज भरलेलं असायचं. पण सावकारीनबाईनं कधी टाकलीसांड केली नाही. इतक्या माणसांचं करूनही कधी तोंडावरचं हासू मावळलं नाही.

देवानं तिला काही कमी पडू दिलं नव्हतं. पोटपाणीही पिकलं होतं. पोटी एक बाळ होतं. आईबापाचं चांगुलपण त्याच्यातही उतरलं होतं. बाळ दोघांचाही जीव की प्राण होता.

एकदा सावकार व्यापारासाठी दूरदेशी गेला. मोत्यापोवळ्यांची खरेदी केली. आणि जहाज आपल्या देशाकडं हाकारलं. पण समुद्राचं लक्षण काही ठीक नव्हतं. वादळानं वारा घातला. विजांचा कडकडाट झाला. पाठोपाठ मुसळधार पाऊस पडू लागला. समुद्र महाराज खवळले. डोंगराएवढ्या लाटा उसळू लागल्या आणि एका लाटेच्या तडाख्यात सापडून जहाज समुद्राच्या तळाशी गेले. कसाबसा खलाशी वाचला. त्यानं ही बातमी घरी दिली.

सावकार गेला. व्यापार बसला. साठविलेलं पाणी किती दिवस पुरणार? त्यातच पाहुण्यारावळ्यांची भर पडली. त्यांनी होतं नव्हतं तेवढं लंपास केलं. सावकारीणबाई उघडी पडली. एकुलता एक मुलगा बरोबर घेतला; दाराला कुलुप ठोकलं न् भावाच्या घरचा रस्ता तिनं सुधारला.

भावानं बहिणीचं आगतस्वागत केलं. भाच्याला शाळेत घातलं. दोन्ही मायालेकरांना काही म्हणता काही कमी पडू दिलं नाही. मुलाला वळणही चांगलं लागलं. हळूहळू मुलगा कर्तासवर्ता झाला. त्याला बरंवाईट कळू लागलं. आईचा जीव भांड्यात पडला.

एके दिवशी आईनं मुलाला जवळ बोलावलं. त्याला जबाबदारीची जाणीव दिली. जवळचे शंभर रुपये काढले. बाळाजवळ दिले आणि व्यापार करायला त्याला देशांतराला पाठविलं. मुलानं आईला दंडवत घातला. दोघांचीही नेत्रं पाण्यानं भरून आली. मुलानं आईचा निरोप घेतला. 'यशवंत हो बाळ' आई म्हणाली, तो घराबाहेर पडला.

मजल दरमजल करीत मुलगा एका नगरापाशी येऊन ठेपला. वेशीबाहेरच गावचा मसनवाटा होता. तिथं त्यानं भलताच चमत्कार पाहिला. एक माणूस मरून पडलेला आहे. त्याची बायकामुले आक्रोश करीत आहेत आणि एक धटिंगण त्या माणसाचं प्रेत इकडून तिकडं आन् तिकडून इकडं ओढीत आहे. हा सारा जेखावा पाहून सावकाराच्या मुलाचं पित्त खवळलं. तो पुढे झाला. त्या धटिंगणला असं का करतोस म्हणून त्यानं विचारलं. पण तो मुलखाचा डांबरट. तो त्या मुलालाच अद्वातद्वा बोलू लागला. शेवटी त्या मेलेल्या माणसाच्या बायकोनेच

रडत रडत सारी हकीकत सांगितली. म्हणाली कशी, "आम्ही याचे शंभर रुपये देणं लागतो आहोत. म्हणून हा माणूस असे वेडे चाळे करीत आहे."

सावकाराच्या मुलाचा संताप अनावर झाला. त्याने मागचापुढचा विचार न करता खिशातले शंभर रुपये काढले आणि त्या माणसाच्या तोंडावर फेकले तो माणूस चालू लागला. मग सर्वांनी मिळून त्या मेलेल्या माणसाला मूठमाती दिली. सावकाराचा मुलगा निरोप घेऊन पुढं चालू लागला. रागाच्या भरात त्यानं सगळं केलं खरं पण आता त्याला आईची आठवण झाली. व्यापारासाठी दिलेले पैसे तर आपण दवडले. मग आता पुढे जाऊन तरी काय करायचं? आईला तरी तोंड कसं दाखवायचं? असा त्याच्यापुढं पेच पडला. पण काहीही असलं तरी झालेली गोष्ट आईच्या कानांवर घातलीच पाहिजे असा विचार करून तो परत फिरला.

बऱ्याच दिवसांची वाटचाल करून मुलगा घरी आला. आईला दंडवत घातला आणि खाली मान घालून दूर उभा राहिला. आपला मुलगा व्यापाराला गेला काय, परत आला काय आणि असा खजील होऊन लांब उभा राहिला काय, या कशाचाच आईला बोध होईना. तिनं बाळाच्या पाठीवरून हात फिरविला आणि असा कष्टी का झाला आहेस म्हणून विचारलं. तेव्हा खाली मान घालूनच मुलानं झालेली हकीकत आईच्या कानावर घातली आणि तिचे पाय धरले.

आईला आनंदाचं भरतं आलं. तिनं मुलास उठवलं आणि त्याला छातीशी धरीत आसवांनी न्हाऊ घातलं. म्हणाली, "बाळ, तू शंभर रुपये सार्थकी लावलेस. मला तुझा अभिमान वाटतो. आता दुनियेच्या पाठीवर कुठंही गेलास तरी तुला काही कमी पडणार नाही. आता आलाच आहेस तर काही दिवस रहा. मग जा. तू खरं बोललास यातच सारं आलं. अशीच सत्याची चाड ठेवून माणुसकीचं जतन कर."

असेच मग काही दिवस गेले. मुलानं आईजवळ जायची गोष्ट काढली. तिनं आपल्याजवळचं होतं नव्हतं तेवढं धन बाहेर काढलं. फक्त पाचशे रुपये

मुलाजवळ दिले आणि आऊक्षवंत हो बाळ असा आशीर्वाद देऊन मुलास वाटेस लावलं. आपल्या आईचे उपकार मनातल्या मनात आठवीत मुलगा चालू लागला. "सत्याची चाड ठेव आणि माणुसकीचं जतन कर." हा आईने दिलेला मंत्र तो विसरलेला नव्हता.

एक वन वलांडलं. दुसरं वन वलांडलं आणि तिसऱ्या वनाच्या मार्गाला तो लागला. एवढ्यात दिवस मावळला. अंधार पडू लागला. तरीही सावकाराचा मुलगा तसाच चालत राहिला. वाटेत एक ओढा लागला. निव्वळ-शंख पाणी पाहून तो तिथे थांबला. हातपाय धुतले आणि पोटभर पाणी पिऊन हा आता उठणार इतक्यात समोरून काही लोक येत असलेले त्याला दिसले. प्रथम बरे वाटले; पण ते लोक जसजसे जवळ येऊ लागले; तसा त्याला सारा प्रकार कळून चुकला. ते सगळेजण हत्यारबंद होते. ती एक चोरांची टोळी होती. हे पाहिल्यावर सावकारपुत्राचं धाबं दणाणलं. पण तसं न दाखवि[illegible] येईल त्या प्रसंगाला तोंड द्यायचं त्यानं ठरविलं.

टोळी जवळ आली तसा एक माणूस पुढं आला. त्याच्या हातात एक फरशी कुऱ्हाड होती. खांद्यावर बंदूक होती. त्याने सर्व शरीरभर बुरखा पांघरला होता. तो टोळीचा नायकच होता. त्यानं सावकारपुत्रास दटावूनच विचारलं, "कोण रे तू? कुठं चाललास? तुझ्याजवळ काय आहे ते काढ बघू."

मुलगा घाबरलेलाच होता. तरीही त्यानं आईनं सांगितल्याप्रमाणं खरं खरं सांगून टाकलं व जवळचे पाचशे रुपये काढून त्या बुरखाधारी गृहस्थापुढं ठेवले. मागची शंभर रुपयांची हकीकत पण त्यानं सांगितली. ती ऐकताच बुरखेवाला विरमला. त्याचा आवाज एकदम पडला. तो थोडासा गोडी गुलावी-नंच म्हणाला, "ठेव तुझे पैसे. मला त्याची गरज नाही. मात्र माझी एक अट आहे ती तुला कबूल असेल तरच तुला सोडतो."

मुलानं विचारलं, "कोणती तुमची अट?"

बुरखेवाला बोलला, "तुला जे मिळेल त्यात मला निम्मा वाटा मिळाला पाहिजे."

सावकारपुत्रानं बुरखेवाल्याची ही अट कबूल केली. मग बुरखेवाला म्हणाला, "आजपासून तुझ्या रक्षणाची मी हमी घेतली आहे. चल आमच्याच बरोबर. तुला कुठं जायचं असेल तिथं नेऊन सोडतो."

आता सावकारपुत्र त्या टोळी बरोबर चालू लागला. चोराच्या मनात एकदम असा कसा बदल झाला याचा त्याला उलगडा होईना. कदाचित् आपल्या आईच्या आशीर्वादाचंच हे फळ असेल अशी समजूत करून घेऊन तो मुकाट्यानं चालू लागला. तरीही त्याचं काळीज धडधड करीत होतंच....

रात्र बरीच झाली. वाटेत एक बारव लागली. मग सर्वांनीं तिथं मुक्काम केला. जेवणंखाणं झाली. तेव्हा तो बुरखेवाला म्हणाला, "आता तुम्ही सगळे-जण झोपा. भयाण अरण्य आहे. वेळ काही सांगून येत नाही. तेव्हा मी पहारा करतो. तुम्ही झोप घ्या."

सगळी झोपी गेली; पण सावकाराच्या मुलाला काही झोप येईना. हा बुरखेवाला आपलं काही बरं वाईट करणार नाही ना, अशी त्याला धागधूग वाटत होती. म्हणून तो फक्त डोळे मिटून पडला होता.

मध्यानरात्र झाली होती. सगळीकडं कसं सामसूम होतं. झाडाचं पान-सुद्धा हालत नव्हतं. एवढ्यात काही लोक दौडत येत असल्याची चाहूल लागली. बुरखेवाल्यानं आपली बंदूक सज्जच ठेवली होती. ती एक दरोडेखोराची टोळी आहे आणि ती आपल्यावर आता हल्ला करणार आहे असं पाहिल्यावर त्याने आपली बंदूक सरसावली. ठो ठो आवाज झाला आणि एकापठोपाठ एक अशा सूं सूं करीत गोळ्या सुटल्या. तशी दरोडेखोरांच्या प्रेतांचा खच पडला. उरलेले पळून गेले.

सावकारपुत्र हे सारे किलकिले डोळे करून पहात होता. आता त्याची भीती कुठच्या कुठं पळून गेली. तो ताड्दिशी बिछान्यावरून उठला आणि त्यानं बुरखेवाल्यास मिठी मारली. मग तो म्हणाला, "शाबास बहाद्दर. तू जसा दिलदार आहेस तसाच शूरही आहेस. तू देवमाणूस आहेस. देव तुझं सदैव रक्षण करील."

तांबडं फुटलं. तशी सगळी मंडळी जागी झाली. आंघोळी पांगोळी केल्या. जवळची शिदोरी सोडली. सर्वांनी मिळून न्यारी केली आणि मग आगेकूच सुरू झाली. जिकडं वाट फुटंल तिकडं ती मंडळी चालू लागली. दिवसभर चाल चाल चालले. तिसरा पार झाला. तरीही गावाचा काही मागमूस लागेना. भूक लागली होती. अंग गळून गेलं होतं. पण करणार काय बिचारे? जवळची चीजवस्तू संपली होती. म्हणून कुठं तरी मनुष्यवस्ती लागेपर्यंत त्यांना चालणं जरूरच होतं. चालता चालता अंधार पडला. इतक्यात लांबवर दिवें चमकू लागले. मग सगळ्यांच्या जिवात जीव आला. दिव्याच्या रोखाने सगळी मंडळी चालू लागली. घटका दोन घटका चालल्यावर एका नगरापाशीच येऊन ठेपले. पण काय करायचं नगर लागून? साऱ्या वेशी बंद. हाका मारमारून घशाला कोरड पडली. पण पहारेकऱ्यानं काही दरवाजे उघडले नाहीत. उपाशी पोटानंच झोपणं आलं.

पुनः कालचाच प्रसंग. बुरखेवाल्यानं सगळ्यांना झोपायला सांगितलं न् आपण पहारा करीत राहिला. मी पहारा करतो आपण थोडी तरी झोप घ्या असं सावकारपुत्रानं म्हणून पाहिलं. पण बुरखेवाल्यानं आपला हेका सोडला नाही. नाइलाजानंच सगळी मंडळी झोपी गेली.

रात्रीचा अंमल सुरू झाला. सगळीकडे दाट काळोख भरून राहिला. भालू कुत्रं भुंकू लागलं. अशुभ पाखरू घूं घूं असा आवाज काढू लागलं. एवढ्यात कसला तरी भयंकर आवाज झाला. बुरखेवाल्यानं आपली बंदूक भरून ठेवली होतीच. सावज टप्प्यात येताच त्यानं गोळी झाडली. एक मोठी किंचाळी मारून ते धूड जमिनीवर कोसळलं. बुरखेवाला पुढं धावला. पाहतो तर ती लावसट होती. त्यानं तिचे डोळे काढले आणि ते धूड ओढीत ओढीत दूरवर नेऊन फेकून दिलं.

वेशीच्या बुरुजावर असलेल्या पहारेकऱ्यांनी हे सारं डोळ्यांनी पाहिलं. बातमी हां हां म्हणता नगरात पसरली. दिवस उगवताच वेशीचे दरवाजे उघडले. लोकांच्या झुंडी वेशीबाहेर आल्या. लावसट ठार मारल्याचं पाहून सगळ्यांनाच हायसं वाटलं. सगळ्या गावाला तिचा त्रास सहन करावा लागत

असे. रात्री चुकून कुणी वेशीबाहेर राहिलं की केलाच त्याचा खिमा या लावसटीनं. म्हणून दिवस मावळायच्या आतच सगळे लोक आपापल्या घरी येत. मग वेशीचे दरवाजे बंद होत ते सकाळी उघडीत.

सगळ्या गावावरचं संकट टळलं म्हणून लोकांना आनंद झाला खरा. पण यातून दुसरीच भानगड निघाली. त्या नगरीचा एक राजा होता. त्याला एकुलती एक मुलगी होती. राजाचा असा पण होता की, "जो कुणी ही लावसट मारील त्याला मी माझी मुलगी आणि अर्धे राज्य देईन."

लावसट मीच मारली असे सांगणारे बरेच लोक राजवाड्यावर जमले. राजापुढं मोठा पेच पडला. इतक्यात तिकडच्या वेशीवर पहारा करणारा एक म्हातारा पहारेकरी आला. त्यानं राजाला सांगितलं की, रात्री काही व्यापारी लोकांचा वेशीबाहेरच तळ पडला होता. त्यांनाच आपण विचारलं तर सारा निवाडा होईल.

राजानं त्या व्यापारी मंडळीस बोलावणं पाठवलं. बुरखेवाल्यानं सावकार-पुत्राजवळ ते लावसटीचे दोन डोळे दिले आणि लावसट मीच मारली असे राजास तू स्वतः जाऊन सांग आणि पुरावा म्हणून हे दोन डोळे पुढे ठेव असे समजावून सांगितले. सावकारपुत्रानं थोडे आढेवेढे घेतले. पण फारच आग्रह दिसल्यावर त्याला जाणं भागच पडलं. त्यावेळी "आपल्या निम्म्या वाटणीची आठवण ठेव बरं बाबा." अशी सूचनाही बुरखेवाल्यानं सावकारपुत्रास दिली.

सावकाराचा मुलगा राजदरबारात गेला. त्याने देवडीवर वर्दी दिली. राजाने त्याला ताबडतोब आत बोलाविले. सावकारपुत्र बरीच दालनं ओलांडून दरबारात आला. राजाला लवून मुजरा केला. "महाराज, लावसट मीच मारली रात्री." असं नम्रपणानं बोलला.

"लावसट तूच मारलीस याला पुरावा काय?" राजाने जरा दटावूनच विचारले.

सावकारपुत्रानं खिशात ठेवलेले लावसटीचे डोळे काढले आणि राजापुढे ते ठेवीत म्हणाला, "सरकार, हा घ्या पुरावा."

राजाची खात्री पटली. त्याने इतर लफंग्यांना तुरुंगात टाकण्याचा हुकूम दिला आणि सावकारपुत्रास सिंहासनावर बसवून त्यास मानाचा मुजरा केला. राजाने आपले अर्धे राज्य त्यास दिले आणि आपल्या एकुलत्या एका मुलीचा स्वीकार करण्यासाठी विनंती केली.

"महाराज, माझ्या आईचा आशीर्वाद आणि मित्राचं खरंखुरं प्रेम यामुळंच मला आज हे भाग्य लाभलं आहे. त्यांना येथे आणल्याशिवाय मला आपणास होकार देता येणार नाही." सावकारपुत्र अदबीने म्हणाला.

राजाने ताबडतोब मेणा सजविला. बरंच मोठं लाव लष्कर बरोबर दिलं आणि आपल्या आईंना व इष्टमित्रांना घेऊन लग्नाला लौकर यावयास सांगितले.

सावकारपुत्र सगळं लावलष्कर बरोबर घेऊन नगराच्या बाहेर आला. लष्कर तिथंच थांबविलं. पायउतार झाला आणि जवळच्या देवळात शिरला. त्याचा मित्र त्याचीच वाट पहात बसला होता. सावकारपुत्रानं त्याला कडकडून मिठी मारली. घडलेलं वर्तमान सांगितलं. "केवळ तुझ्याच कृपेमुळे हे घडून आलं. त्यावर तुझाच हक्क आहे. तरी तू राजाकडे चल आणि तुझे तू बक्षीस घे." अशी सावकारपुत्रानं आपल्या बुरखेवाल्या मित्रास विनंती केली.

"नाही बाबा, ही सारी तुझ्या आईचीच कृपा आहे. तिच्याकडेच मला घेऊन चल म्हणजे ती योग्य तो न्यायनिवाडा करील." बुरखेवाला खुल्या दिलानं बोलला.

मग सगळी मंडळी सावकारपुत्राच्या गावी गेली. आईचे डोळे मुलाच्या वाटेकडे एकसारखे लागले होतेच. एकाएकी काही न कळविता मुलगा पुढं येऊन उभा राहिल्यावर आईला केवढा आनंद वाटला. मायलेकरांच्या डोळ्यांतून आनंदाचे आसू ओघळू लागले. बुरखेवाला हा देखावा पाहून भारून गेला.

सावकारपुत्रानं मग आपल्या मित्राची आईशी ओळख करून दिली. त्याची भेट कशी झाली, त्याने कोणता पराक्रम केला आणि त्याच्या पराक्रमाचं फळ कुणाच्या पदरात पडलं हा सारा किस्सा त्याने आईला सुनावला व तूच याचा न्यायनिवाडा कर अशी विनवणी केली.

आपल्या मुलाच्या त्या अनोळखी मित्राबद्दल आईला पण माया वाटू लागली. तिनं त्याला जवळ बोलाविलं आणि या साऱ्या गोष्टीवर तुझाच हक्क पोचतो. तेव्हा तूच राजाच्या मुलीचा आणि अर्ध्या राज्याचा स्वीकार करणं न्यायाला धरून होईल, असं तिनं सांगितलं. "चला, आपण सारेच राजाकडं जाऊन याचा सोक्षमोक्ष लावू या." असं आईनं बोलताच बुरखेवाल्याला रडू कोसळलं. तो गहिवरून म्हणाला, "आईसाहेब, तुमच्या शिकवणुकीमुळं आणि तुमच्या मुलाच्या सत्यवचनामुळं मी माणसात आलो."

"ते कसं काय?" आईनं विचारलं.

"तुम्ही व्यापारासाठी दिलेले शंभर रुपये देऊन तुमच्या मुलानं माझी अब्रू राखली माझ्या वडिलांच्या प्रेताची विटंबना थांबविली आणि माझी रिणातून सुटका केली. तोच मी कमनशिबी बापाचा कपाळकरंटा मुलगा. अवघ्या शंभर रुपड्यांसाठी माझ्या बापाचे मरणानंतरही झालेले हाल पाहून माझा माणसाच्या चांगुलपणावरचा विश्वास उडाला. सूडाच्या भावनेनं माझं काळीज पेटलं. मी दरोडेखोर बनलो. आणि योगायोग असा की, माझा उपकारकर्ताच माझी पहिला शिकार बनला. आपण पाचशे रुपये देऊन आपल्या मुलाला व्यापार करण्यासाठी पुनः पाठवून दिले आणि तो आयताच माझ्या तडाख्यात सापडला. आपली शिकवणूक हाडीमांसी खिळलेली असल्यानं आपल्या मुलानं मला सारं खरं खरं सांगितलं. मी सावरलो. माणसात आलो आणि ठरविलं की, यापुढं हा मार्ग सोडायचा आणि आपल्या उपकारकर्त्याच्या उपयोगी पडायचं. पुढं काय घडलं ते आपणास सारं ठाऊकच आहे. तेव्हा मला राज्य नको. राजाची मुलगी नको. उपकाराची फेड झाली यातच मला समाधान आहे. आता माझं काम झालं. मला जायला परवानगी द्या." बुरखेवाला कळवळून बोलला.

"बाळ, इतकं सगळं ऐकल्यावर आता मी तुला बरा जाऊ देईन? तूही माझा मुलगाच आहेस. तुझ्या भावाचं रक्षण करायला तू सदैव त्याच्या पाठीशी पाहिजेस;" असं म्हणून आईनं त्याला आपल्या पोटाशी धरलं आणि त्याला वचन मागितलं.

बुरखेवाल्यानं आईला दंडवत घातला आणि त्यांचं म्हणणं कबूल केलं. मग सर्व मंडळी मिळून राजाच्या नगरास गेली. सावकारपुत्राचं राजकन्येशी मोठ्या थाटानं लग्न लागलं. राजाराणीचा संसार सुखानं चालू झाला; तसा तो तुमचाआमचाही होवो.

# आशीर्वाद

निवेदिका : सौ. शशिकला पाटील

एक होतं आटपाट नगर. तिथं एक होता सावकार. मोठा तालेवार—मोठा तालेवार. सोन्याचांदीचं दुकान होतं. दहा गावात सावसावकारी होती. सावकाराला दोन मुलं होती. एक मुलगा नि दुसरी मुलगी. मुलगा भारी गुणी, पण थोडा नादिष्ट होता. बहिणीवर त्याची भारी माया. आईवर तर मोठी भक्ती. बापाच्या मात्र थाऱ्यालाही उभा रहायचा नाही.

बहीण उपवर झाली. चांगले स्थळ चालून आले. सावकारानं तिचं लग्न अगदी थाटामाटात करून दिलं. बहीण सासरी गेली. मग भावाला काही करमेना जेवणखाण जाईना. आईनं सांगितलं, बापानं सांगितलं. पण त्याला काही बहीणी-शिवाय गमेना. पण असं किती दिवस चालणार? हळूहळू बहिणीचा विसर पडला, मग तो चारचौघात बसूउठू लागला. उद्योगधंद्यात मन घालू लागला. आईवडिलांनाही मग बरं वाटू लागलं. मुलगा धंद्याला लागला हे पाहून आईला फार आनंद झाला. पण त्याचा छांदिष्टपणा काही गेला नाही.

एकदा काय झालं, सावकार गेले गावाला. पग दुकानात बसायची पाळी आली मुलावर. त्या दिवशी बरीच मोठी विक्री झाली. तिजोरीत चांगलीच माया

जमली. सायंकाळ झाली. हिशेब ठिशेब झाला. आता दुकान बंद करणार, इतक्यात एक फकीर आला. तो दुकानापुढं थांबला आणि "आसका बाप, निरासकी माता, होत की बेहेन और संकटका मित्र" असं काहीसं पुटपुटला. सावकाराच्या मुलानं पुनः त्याला तेच म्हणायला लावले. मग फकिराला त्यानं विचारलं, "बाबाजी, हे खरं कशावरूनं ?"

"बेटा, अनुभव घेतल्याविना ते कळणार कसं ?" फकिर बोलला. आणि चिमटा आपटीत पुढं निघाला. इतक्यात सावकाराच्या मुलाच्या मनात काय आलं, त्यानं फकिराला माघारी बोलावलं. आणि तिजोरीतले असेल नसेल ते सारं द्रव्य त्याच्या झोळीत टाकून दिलं.

"बेटा, देव तुझं भलं करो." असा आशीर्वाद देऊन फकिर पुढं निघून गेला. मुलगाही दुकान बंद करून आपल्या घरी आला. घडलेली हकीकत त्यानं आईच्या कानावर घातली. आईनं कपाळावर हात मारून घेतला. काय बोलणार बिचारी ती !

दुसरा दिवस उजाडला. सावकार गावाहून आला. त्याला अगोदरच थोडी कानकून लागली होती. त्यामुळे त्यानं आल्याबरोबर पहिला सवाल केला तो बायकोलाच, "आपल्या दिवट्या चिरंजीवानं काय प्रताप केला ? अशानं लौकरच माझं दिवाळ निघाल्याशिवाय राहणार नाही. असला उधळ्या मुलगा माझ्या घरात नको."

बाईनं परोपरीनं समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण सावकाराचा पारा काही उतरला नाही. बापापुढं कधी न बोलणारा मुलगाही हट्टाला पेटला नि आईवडिलांना नमस्कार करून घराबाहेर पडला. "माझी आठवण ठेव वरं बाळ." आई कळवळून बोलली. मग फिरून एकदा मुलानं आईला लांबूनच नमस्कार केला, आणि 'बराय' म्हणत तडक चालू लागला. "देव तुला सुखी ठेवो." असा आशीर्वाद देत जड अंतःकरणानं आई बिचारी घरात गेली.

सावकारानं हूं का चूं केलं नाही. त्यानं आपल्या जणू काळजावर दगडच

ठेवला होता. त्या रागाच्या तिरमिरीतच "तुझ्या उधळ्या भावाला आसरा देऊ नकोस." असा आपल्या मुलीलाही निरोप पाठवला.

मुलगा घराच्या बाहेर पडला. मजल दरमजल करीत तो वहिणीच्या गावी जाऊन पोचला. वेशीवरूनच त्यानं मी आलोय असा बहिणीला निरोप धाडला. "मला तुझं काळं तोंड दाखवू नकोस." असा बहिणीनं परत जबाब पाठविला.

आता हा दुसरा अनुभव आला. दुरूनच त्यानं बहिणीला नमस्कार केला आणि जिकडं पुढा तिकडं मुलूख थोडा असं करीत करीत चालू लागला. जाता जाता दाट जंगल लागलं. दिवस मावळला. अंधार पडू लागला. आता कुठं जायचं असा विचार करीत तो पुढंच चालला होता. इतक्यात त्याला पडकं देऊळ दिसलं. न सांगताच त्याची पावलं तिकडे वळली. तो गाभाऱ्यात गेला. घंटानाद केला. आत जाऊन देवदर्शन केलं आणि आईची आठवण काढीत तिथंच झोपी गेला.

मध्यान रात्र झाली असेल. इतक्यात तो खडबडून उठला. कसला तरी गलका त्याच्या कानांवर आला. म्हणून तो देवळाच्या बाहेर आला. तर काही लोक पळताहेत असे त्याला दिसले. ते लोक देवळाच्या दिशेनेच पळत पळत आले. कसलं तरी गाठोडं त्यांनी त्याच्यासमोर फेकलं आणि ते तसेच पळत सुटले. पाठोपाठ बरेच लोक आणि शिपाईही आले. त्यांनी मागचा पुढचा काही विचार न करता सावकाराच्या मुलाच्या मुसक्या बांधल्या, गाठोडं उचलून ताब्यात घेतलं आणि त्याचं काहीही न ऐकता त्याला आपल्या राजाकडं घेऊन गेले.

घर फिरल्यावर घराचे वासेही कसे फिरतात याचा चांगला अनुभव सावकारपुत्रास आला. शिपायांनी त्याला राजापुढं नेऊन उभं केलं. राजानं त्याला पाहताच तोंडात बोटं घातली. कारण हा तरुण राजा नुकताच गादीवर आला होता आणि या सावकारपुत्राला चांगलाच ओळखीत होता. मित्रच होता म्हणाना. सारा प्रकार त्याच्या ध्यानात आला. त्यानं आपल्या मित्राला मोकळं

केलं आणि तू इथंच रहा असा त्याला आग्रह केला. बाबा, झाले हे उपकार पुरे झाले असे बोलून सावकारपुत्राने आपल्या मित्राचा निरोप घेतला.

झालं, देवाच्या दारी तीन पुशी म्हणतात तसं झालं. आता हाही एक चौथा अनुभव आला. फकिराचं बोलणं त्याला पटलं. विचार करीत करीतच तो चालू लागला. आपण कुठं जातो आहोत हे त्याचं त्यालाही कळत नव्हतं. पाय नेतील तिकडं तो चालत राहिला. बऱ्याच दिवसांनी त्याला एक नगर लागलं. रात्रीची वेळ होती. नगराच्या चारी वेशी बंद होत्या. म्हणून त्यानं इकडं तिकडं शोध केला. तर जवळच एक महादेवाचं मंदिर दिसलं. समोरच मोठी बारव होती. बाजूला ऐसपैस असा मोठा बाग होता. सावकारपुत्रास ते पाहून फार आनंद वाटला. तो बारवेवर गेला. हातपाय धुतले. देवळात शिरला. देवदर्शन केले आणि मागे फिरून पहातो तर तिथं एक बैरागी धुनी लावून बसला आहे. त्यानं बैरागीबुवाला बरोबर ओळखलं. ज्याच्या झोळीत त्यानं आपल्या तिजोरीतलं सारं द्रव्य टाकलं होतं तोच तो बैरागी होता. सावकारपुत्रानं त्याचे पाय धरले. आपल्या बोलण्याचा पडताळा आला. पण आता पुढं काय करावं महाराज मी, असा त्यानं त्या वैराग्याला प्रश्न विचारला. "बेटा, तुझी साडेसाती आता संपली आहे. आता तुला चांगले दिवस येतील. बरं आता बरीच रात्र झाली आहे. त्या गाठोड्यातलं थोडसं खाऊन घे आणि दोन पाण्याचे घोट घे म्हणजे तुला बरं वाटेल." असे बोलून वैराग्यानं त्याला दिलासा दिला. त्याला भूक नव्हतीच. तरीही साधू महाराजांचा प्रसाद म्हणून त्यानं थोडं फार खाल्लं. वर पाणी पेला आणि तिथंच आडवा झाला.

दुसऱ्या दिवशी दिवस उगवला. सावकारपुत्र उठला होताच. सगळं आटोपून तो बैरागीबुवाजवळ येऊन बसला. इतक्यात "आमच्या राजकन्येच्या प्रश्नांची जो उत्तरे देईल त्याला आमची राजकन्या वरील व राजा त्याला आपलं सारं राज्य देईल" अशी दवंडी त्याच्या कानावर पडली. त्यानं बैरागीबुवाकडं पाहिलं. बैरागी म्हणाला, "बेटा, तुझ्या अनुभवातच राजकन्येच्या प्रश्नांची उत्तरे आहेत. जा सरळ राजाकडं आणि आपली तयारी आहे उत्तर द्यायची असं सांग. मात्र आईला आठव. तिचा कधीही विसर पडू देऊ नकोस."

सावकारपुत्रानं बाबांचं दर्शन घेतलं. शंकराच्या पिंडीपुढं जाऊन साष्टांग दडवत घातला. मनातल्या मनात आईचं स्मरण केलं आणि तडक राजाकडे गेला. दरवाजावर देवडीवाल्यानं अडविलं. त्याच्या हातावर थोडी चिरीमिरी ठेवून तो तसाच आत घुसला. त्यानं राजाची भेट घेतली. आपण का आलो हेही राजाला त्यानं सांगितलं. राजा हासला. सावकाराच्या मुलाकडं पाहताच का कुणास ठाऊक पण राजाच्या मनात जिव्हाळा उत्पन्न झाला. तो थोडा हळुवार शब्दातच बोलला, "भल्या माणसा, कशाला धाडस करतोस ते? आजपर्यंत असे कैक आले आणि तुरुंगाची हवा खात बसले. तुझ्यावर हा प्रसंग येऊ नये असं मला वाटतं. जा बाबा, आलास तसा परत जा."

राजकन्या मागेच चिकाच्या पडद्याआड होती. तिनं हे सारं ऐकलं. आतूनच बाहेर डोकावलं. सावकारपुत्राबद्दल तिचंही मन हेलकावं खाऊ लागलं. आपले बाबा पुढं काय करताहेत हे ती पहात बसली. इतक्यात सावकारपुत्रच बोलला, "महाराज, राजकन्येच्या प्रश्नांची उत्तरे मला देता आली नाहीत तर आपली वाटेल ती शिक्षा भोगायची तयारी आहे माझी."

राजानं मग अनमान केलं नाही. त्यानं दरबार भरविला. तिथं सावकार-पुत्राला बोलावलं. भालदाराने ती दवंडीच पुनः बोलून दाखविली. राजानं सावकारपुत्रास सावध केलं. राजकन्येला आपले प्रश्न विचारायला सांगितले. ती रूपवती राजकन्या थोडी गंभीर होऊनच प्रश्न विचारू लागली. "सर्वात जास्त आशा कुणाला असते?" तिनं पहिला प्रश्न विचारला. "बापाला," सावकारपुत्रानं ताबडतोब उत्तर दिलं. "आशा कुणाला शिवत नाही?—" दुसरा प्रश्न. "आईस," उत्तर मिळालं. "चांगलेपणी आगतस्वागत करणारी कोण?—" प्रश्न. 'बहीण' या प्रश्नाचे उत्तर. "संकटकाळी उपयोगी पडणारा कोण?" शेवटचा प्रश्न. "मित्र." उत्तर मिळालं. राजकन्येची खात्री पटली. तिचा चेहरा आनंदानं उजळला. ती लाजली आणि मागं वळली— इतक्यात राजाच पुढं आला. त्यानं सावकार पुत्रास जवळ बोलावलं आणि आपल्या कन्येचा हात त्याच्या हातात देऊन "आपण माझ्या मुलीचा पण

जिंकलात. आता आपण माझे जावई झालात." असे सर्व दरबाराला उद्देशून बोलणे केले.

सावकारपुत्रास आनंद झाला. पण तो आनंदानं हुरळून गेला नाही. त्याने आपल्या आईबापांना घेऊन येतो असे सांगितले. राजाचा निरोप घेतला आणि राजवाड्याबाहेर पडला. राजानं त्याच्याबरोबर लावलष्कर दिले. ते बरोबर घेऊन तो आपल्या देशाकडे निघाला. नगराच्या बाहेर येताच तो प्रथम त्या महादेवाच्या मंदिरात शिरला. देवाच्या पाया पडला. साधूचं दर्शन घेतलं. झालेलं सगळं कानावर घातलं. लग्नाला आशीर्वाद द्यायला आपण हजर असलं पाहिजे असा आग्रह करून तो बाहेर पडला. साधूनं दिलेला प्रसाद त्यानं बरोबर घेतला. प्रथम आपल्या मित्राच्या घरी आला. त्याला बरोबर घेतलं. मग बहिणीच्या गावी जाऊन तिलाही संगं घेतलं. आणिक मग आपल्या गावी आला. वडील थकले होते. आई खंगली होती. तिला दिसतही नव्हतं. मुलगा आल्याचं कळताच तिचं काळीज उमललं. तिनं मुलाला मिठी मारली. साधूनं दिलेला प्रसाद आईबापांना दिला. आईबाप ताजेतवाने झाले.

मग सगळं वऱ्हाड राजाच्या नगरीला गेलं. मोठ्या थाटामाटात लगीन झालं. राजराणी आनंदानं संसार करू लागली. आईचा आशीर्वाद नि साधूचा प्रसाद मिळाल्यामुळं सगळं मंगल झालं.




# ભાપજની સમીંદર



# अनुक्रम


⁞ सौ. सिंधू वारनूळकर, कोल्हापूर ⁞ श्रीमती बयाबाई पाटील, पेठ, सांगली
⁞ सौ. गंगूबाई बाबर, पुणे ⁞ सौ. कुमुदिनी पवार, चितळी, सातारा
⁞ सौ. शरदिनी मोहिते, सांगली ⁞ श्री. बाजीराव पाटील, चिखलगाव, अकोला
⁞ सौ. सजाताई सावंत, वागणी, सांगली ⁞ कु. विद्या देसाई, भिलवडी, सांगली
⁞ प्रा. गजामल माळी, औरंगाबाद ⁞ श्रीमती जानकीबाई पाटील, वागणी, सांगली
⁞ श्रीमती राधाबाई देसाई, वागणी, सांगली ⁞ श्री. वि. वा. जोशी, चंद्रपूर, चांदा
⁞ सौ. राजाक्का देसाई, वागणी, सांगली ⁞ सौ. शांतादेवी बाबर, वागणी, सांगली
⁞ सौ. हव्वाबी खान, माळवणी, बीड ⁞ सौ. कमलाबाई बडवे, पंढरपूर, सोलापूर
⁞ सौ. मालतीबाई दांडेकर, कोल्हापूर ⁞ सौ. शशिकला पाटील, रामानंदनगर, सांगली
⁞ श्री. ए. के. घोरपडे, पुणे ⁞ श्री. बा. शि. पाटील, महाळुंगे, पुणे
⁞ श्री. प्रल्हाद रंगनाथ त्र्यंबके, घोडंवे, नासिक
⁞ श्री. पं. ख. नागपुरे, हिवरखेड, अकोला ⁞ सौ. सुमन प्र. नलावडे, पुणे
⁞ श्री. शं. बा. राजभोज, देवळाली, नासिक
⁞ कु. उषादेवी बागल, कातरखटाव, सातारा
⁞ श्री. ए. आ. गुंजाळ, खडकजांब, नासिक ⁞ श्री. भाऊ भालेराव, अमरावती
⁞ श्री. ना. ना. शिंदे, माढे, सोलापूर ⁞ सौ. इंदिरा कुलकर्णी, अमरावती
⁞ सौ. नवलबाई शहा, बोरगाव, सांगली ⁞ सौ. जैबुन्निसा खान, गेवराई, बीड
⁞ श्रीमती आनंदीबाई शिर्के, पुणे ⁞ श्री. रामकृष्ण आ. कदम, औरंगाबाद
⁞ सौ. लीलावती पवार, कऱ्हाड, सातारा
⁞ श्री. रामदास खाकरे, रत्नापूर, अमरावती
⁞ श्री. स. र. बिन्नर गुरुजी, समशेरपूर, अ. नगर
⁞ सौ. शुभा वाजपेयी, धरणगाव, जळगाव ⁞ सौ. सिंधू भालेराव, अहमदनगर
⁞ श्री. मा. कृ. कोकाटे, सांगली ⁞ प्रा. प्रभाकर माडे, परभणी.




सासरी गेलेली लेक सुखासमाधानानं नांदत असली आणि आपल्या घरी ती आनंदात असल्याच्या वार्ता कानावर आल्या तरी देखील तिच्याबद्दलची काळजी तिच्या वडिलांच्या मनातून बाजूला जात नाही. आपण हिच्यासाठी कावडीनं पाणी आणून हिला बाळपणी न्हाऊ घातलं तर आता तिच्या आंघोळीला पुरतं पाणी मिळत असेल का अशी उगीचच शंका त्याच्या मनाला मधेच स्पर्श करून जाते. अशा वेळी एखाद्याच्या मुलीला भयंकर सासुरवास आहे असं ऐकलं कुणाकडून तरीही ह्याच्या जिवाला रुखरुख लागते. आपल्या मुलीचं कसं असेल या काळजीनं तो हैराण होऊन जातो न् देवाला हात जोडतो की, बाई माझी सुखात असू दे. घरात ढिगानं आंबेमोहोर असला आणि त्या दखळीनं कणगी पेव भरले असले तरी लेकीला त्यातलं कोळवंभरही अंगुपती घ्यायची सत्ता नसावी या कल्पनेनंही त्याच्या भावना कल्लोळून उठतात व तो मग रातोरात शेलका वारू घेऊन धाव घेतो. अशा वेळी

*वाटेच्या वाटसरा नको करूस उभा घोडा*
*कंथ माझा जंगलात मोजे वाघीणीच्या दाढा*

असला धाक आपल्या पोरीला असू नये असे त्याला मनापासून वाटते. त्यामुळे लेकीच्या घरी जाताना खिशात अंजिरी चोळीचा खण न्यायला तो विसरत नाही की, तिची हौस भागवायला म्हणून हसतमुखानं आपली चंची सोडीत राजवर्खी भरायला तिला हवेतेवढे पैसे द्यायलाही तो मागेपुढे पहात नाही. म्हणून शुक्राच्या चांदणीनं उगवायची वेळ साधीत तो भल्या पहाटे

लेकीच्या घरी जाऊन ठेपतो न् हसतमुखानं लेक हातात घेतलेली झारी रांजणात बुडवून पुढं आली की, सोन्याचा ढीग गवसल्याचा त्याला आनंद होतो.

त्यामुळे आपले नानाराया फार दिवस आले नाहीत असं दिसलं की, ही लेक कशी कावरीबावरी होऊन जाते. कुणाकडून तरी सांगावा पाठवू पहाते. वडिलांना भेटायला तिचा जीव उतावीळ होतो. म्हणून लोकांच्या दारीचं अंगण ओलं झालं न् तिथं शेलका वारू पाहिला की, ही आपल्या भावानं तरी यावं म्हणून ती ध्यास घेते. त्या कारणानं आपल्या माहेरी कुणी जाणार आहे असं कळलं तरीही ही मैना आपल्या मनात घोकते कशी, "आमच्या बाबांच्या वाड्याला साती आसरांचा न् चहुबाजूंच्या बुरुजांचा पहारा आहे. दारी पारवे घुमत आहेत. अंगणात गुरावासरांची भली दांडगी दावण आहे. घरी दुभत्या गाई-म्हशी आहेत. बारा बैलांचे नांगर आहेत. गडीमाणसं आहेत. सोप्यातल्या मध्यभागी चक्रीजेन टाकलेलं आहे. पानतंबाखूची चंची तिथं पडलेली आहे. खामणीवर चंद्रज्योतीचा उजेड टाकणारी चिमणी तेवते आहे आणि मला बघून हरकतेले बाप्पाजी हाती सोन्याची वात लावलेला चांदीचा कंदील घेऊन माझी वाट बघत दारी उभे आहेत. तर एवढ्या खुणेवर तुम्ही जा. म्हणावं की, मला भेटून जा न् घेऊन पण चला. मी वाट बघतेय."

आणि मग कुणी खरंच जाणारा भेटला तर ती काही खाणाखुणाही सांगून मोकळी होते. भावनेच्या भरात, "ताग तागाची, मिशी वाघाची, लेक देसायांची...." असले काही बोलून भागणार नाही हे तिला कळतं. म्हणून ती त्या जासुदाला सांगून टाकते, "ऐकलंस का, वाड्याशेजारच्या कुसवाला केळीची बाग आहे. गावंदरीला चार हिरीबारवा आहेत. तिथं केळीनारळींचा थवा बसलाय. भला दांडगा माळी सोपा आहे. चिरेबंदी वाडा आहे. झिणकारत्या पैंजण मासोळ्यांची नात उगवतीच्या वेळी सोपा लोटते आहे. चौसोपी वाड्यापुढं तुळशीवृन्दावन आहे. गुराढोरांनी दावण भरली आहे. गाईवासरं हंबरताहेत. पहाटप्रहरात वासुदेवांच्य झुंडी येताहेत. देखण्या दऊतलेखणीप्रमाणं दिसणारे भाऊ न् भावजया घरी फिरताना दिसताहेत, ओसरीवरच्या रंगीत पाळण्याला

झोका घालीत आत्ती माणवळ बसली आहे न् भीकबाळीचे तजेलदार डोळ्यांचे बाप्पाजी वाड्याला धनी म्हणून शोभताहेत तर तिथं तू जा. तोच आमचा वाडा."

पण हा उतावीळपणा एवढा कशासाठी? कुणीतरी तिला विचारतंच की? मग ती हसून बोलते कशी—

*हिरवी चोळी माज्या दंडाला उसवली*
*बाप्पाजी बोलती कुठं नागीन दिष्टावली*

तर हा सांगावा आल्यागत तिची भावना. म्हणून ही घालमेली झालेली. पण खरं कारण वेगळंच निघतं हिच्या घरी वाटेल तेवढी धनदौलत असली तरीही वडिलांच्या घरी बारा हत्ती ओळीनं झुलताहेत याच तोऱ्यात हं ही! आणखीन् आपल्याला दोन पदरांची रेशमी साडी आणायला इंदूर ग्वाल्हेरच्या खेपा करीत आपली हौस भागविणारे आपले वडील आपल्या लाडाकोडाचे धनी आहेत असंच तिचं म्हणणं. म्हणून ह्या मैनेला हवंय ते हे—

*सांगून धाडीते बाप्पाजी गुजराला*
*डाळी डोरल्याचा साज जावा लेल्या शेजाराला*

हिला पण हा साज पाहिजे आहे! नवऱ्याजवळ नाहीतर सासूसासऱ्यांच्याजवळ बोलणार कशी? आणि बोलली तरी ऐकणार कोण? म्हणताना हिला भावापेक्षाही वडिलांचीच आठवण येते. त्यासाठी ती आपल्या देसाई दयाळाला ओळखायच्या आणखी खुणा त्या जासुदाजवळ सांगून मोकळी होते--

*धडीच्या धोतराची मांडी दिसते दाणेदारू*
*माझ्या पिताजींची काय सुरत अनीवारू*

आणि मग तिला किती बोलू न् किती नको असं होतं, "ऐक हं बाबा, माझ्या बाबांचं डोंगराएवढं माझ्यावर प्रेम आहे, कन्यादानाचे वेळी म्हणतात की, त्यांनी सव्वा खंडी सोनं दांडीनं मापलंय!! तर माझ्यासारखाच त्यांचा पण तोंडवळा

आहे. जाशील तर पुढ्यात मनगटया बिंदल्यांची धाकटी भैन थेट माझ्यागत दिसणारी जेवायला बसलेली दिसेल. आणि हे बघ, कुंद्याच्या पिंडीला बारा बैलांचा नांगर घरच्या गड्यांनी धरलेला दिसेल हं! तर तिथं देखरेखीला माझे बाप्पाजी मंदील बांधून उभे असतील. त्यांच्या हातातील सोन्याची अंगठी गव्हाची रास मोजताना झिजलीय बरं का! तर त्यांना म्हणावं की, मला घेऊन चला....पण थांब....फार नको बोलूस....” मधेच ती अडखळते. वडील कडक शिस्तीचे आहेत हे तिच्या ध्यानात येतं. म्हणून ती म्हणते,

“होय, नावांचा स्वभावच कडक. उभ्या गल्लीनं कधी काळी जायचं झालंच तर खाली बघून जावं आणि पायाखाली खडा देखील न वाजता जावं म्हणतात ते. अंगी कर्तबगारी केवढी असावी तर म्हणे रोज सकाळी धनलक्ष्मीनं अमृतकलश हाती येऊन आपला वाडा कुठाय ते विचारीत यावं! तर तिला सावली असावी म्हणून गोठ्यापासून दारापर्यंत त्यांनी आंबराई लावलेली आहे. त्यांचं मेलं सगळंच निराळं. भारी करारी स्वभाव. खळं केलेल्या चंद्रानं आभाळात उठून दिसावं तशातलाच जणु ह्यांचा कारभार. तर काय!....

*उभ्या मी गल्ली जाते माती लागना अंगुठ्याला*
*पित्या माज्या दौलताच्या रंग कुसुंबी पागूट्याला*

आणि असली आमची पारख व्हायची! खरंच! खोटं नाही सांगत.”

तिची तीच मग अशी आणखी बोलत रहाते. ऐकणाराचे कान तृप्त होतात. मन समाधान पावतं. इतकं की—

*चौघी आमी भैनी चार गावच्या बारवा*
*पिता राजस दौलत मधी जोंधळा हिरवा*

अशी भावभावना त्याच्याही मनात धा धावून यावी! जेवढं प्रेम तेवढाच धाक. म्हणून दिल्या घरी न कुरकुरता सुखानं राहिलं पाहिजे असं त्यांचं म्हणणं माहीत

असूनही ही मैना आपली स्वतःशीच का होईना बोलत रहाते. जात्या देवाची पूजा बांधताना न् त्याला तिळा तांदळाचे घास भरवताना ही पोटभर बोलत सुटते. मनाला येईल त्या परीनं. अशा वेळी मग तिला कुणाचीच भीति वाटत नाही की, आपल्या उंच उंच भिंतीच्या वाड्याला कान असतील याचीही तिला पर्वा रहात नाही. ती आपली—

*हितगुज बोलयीता चंद्र ढगाच्या आड गेला*
*पित्या ग दौलताचा न्हाई गुजाचा झाडा झाला*

याच तालेवारीत हं !....

## १

संग्राहिका : सौ. सिंधू वारनूळकर

*पिकलं सीताफळ हिरवी पिवळी त्येची काया*
*पित्या माज्या दौलताची खरी पोटात ग माया*

*पिकलं सीताफळ रामफळाची चव न्यारी*
*पित्या माज्या दौलतानं दुनिया दावली मला सारी*

*राजवरकी बिलवर मी का लितीया रुपाया चार*
*पित्या माज्याच्या जिवावर राज आविंधी[१] केलं फार*

*पातबीळाची घडी मी का बघती खाली वर*
*पित्या माझ्या त्या दौलतीनं केली खरेदी हारोहार*

*पानीया पोहे मासा पान्यापरास पवन*
*पाठीचा माझा बंधू पित्यापरास लिवनार*

*नारी तू नटलीस तू का उसाच्या चिमकीला[२]*
*पित्या माज्या दौलतीचं आंबं लोळती जिमिनीला*

*हात भरुनी काकईनं चुड्या कंगण्या कुठं लेऊ*
*पित्या माज्या दौलतीचा जीव राजाचा किती घेऊ*

*हात भरुनी काकईनं गोट पाटल्या येजायात*
*डुलती मी का हौसं पित्या माज्याच्या राजायात*

---

१ उधळमाधळ. २ चोयटी.

म्हायार एवढं केलं मला पुसितो सारा गाव
पिता माझा तो दौलत म्या ग लुटिला बाजीराव

म्हायार एवढं केलं एक्या बिग्याचा वसूइल
सया त्या बोलत्याती पिता सम्रत असइल

देवा नि म्हणू देवा असा कसा न्याय तुजा
पित्यावाचून गडयींनी काय म्हायारी इलं[1] मजा

सर्गाच्या देवा एवढं तुजं म्या काय केलं
पित्या माज्या दौलतीला राज भोगूनी न्हाई दिलं

न्हाते हासून खेळून जन म्हणती सुखाची
पित्याच्या नावापायी ध्याई जळते लाकाची[2]

सरगीची वाट सये तुटता तुटईना
पिता माजा तो दौलत मला भटता भेटईना

सरगीच्या देवा तुला माजी आणभाक
पित्या माज्या दौलतीचा तुझ्या घरी मान राक

जिवाला जड भारी सांगावं जात जाता
चुलता पंडित बोलतो लावा कंदील जाऊ आत।

चवघी आमी भैनी एका रंगाच्या साड्या नेसू
पित्या त्या दौलतीच्या थोराच्या लेकी दिसू

चवघी आमी भैनी आमी एकाच चालींच्या
पिता समींदर माजा राजा एकाच बोलींचा

मोठं नि मोठं डोळं माज्या भिवया चंद्रकोरी
माज्या पित्याची कारागिरी

---

१ येईल. २ लाखमोलाची.

२

संग्राहिका : श्रीमती बयाबाई पाटील

वळवाच्या पावसानं वड्यावगळी मारी लाटा
पित्या माज्या दौलताला समींद्राला लई साटा

वळवाचा ग पाऊस गेला लागूनिया राती
पित्या माज्या दौलताला पेराया दिल्या घाती

शेताला गेली कुरी लागली माझी निरी
पित्या माझ्या दौलताची पिकली शेवईरी

कार्तीक मार्गेसरी वावडी उभी केली
पित्या माज्या दौलतानं जोंधळ्या धार दिली

बारा बैल नांगराला चार बैल कोळप्याला
पिता माझा तो दौलत शेतात बळावला

बारा बैलांचा नांगर धरीला कुंद्याच्या पिंडी
पित्या माझ्या दौलताचं बारा बैल घरचे गडी

पिकलं म्हणूयींनी जन बोलती चावडीला
पित्या माझ्या दौलताची रास लागली वावडीला

पिता माझा पितांबर बंधू वाड्याचा कडीपाट
बया माझी ती गवळण आयन्याची चवकट

पिता माझा पितांबर बंधू वाड्याला कळस
बया माझी ती गवळण आत फिरती तुळस

रांजणी पाणी लई मी का सावलीखाली घेती
पित्या दौलताला भाग्यीवानाला दुवा देती

वळिले किती दोर तुझ्या बैलाची खिलारी जोडी
पित्या माझ्या त्या दौलताच्या गाडीला नागमोडी
भरल्या सभेईत कोण जरीच्या मंदिलाचा
माझ्या पित्याला म्हणीयीती धनी चावर जमिनीचा

॥ ३ ॥

संग्राहिका : सौ. गंगूबाई बाबर

बाप म्हणे लेकी माझी हरबऱ्याची डाळ
जाशील परघरा तिथं होईल तुझी राळ
दिवाळीच्या दिशी माझ्या तबकी ग खण
आता कमी करते माझ्या बापाजीचे ऋण
बाप म्हणे लेकी तू ग गुलालाची गोणी
सोयऱ्याच्या घरी तुला लोटिली केरावाणी
माझ्या ग बापाजीनं माझं बहू बरं केलं
कुंकवाचा नारळ रत्न माझ्या हाती दिलं
एका मागं एक नका जाऊ बाप लेक
बापाच्या परीस मोठी आईची देखरेख
बापानं दिल्या लेकी कणगी पाहूनी दाण्याच्या
भावानं दिल्या भैनी विहिरी पाहूनी पाण्याच्या
बापानं दिल्या लेकी आपण झाले सुखी
मायेला चिंता मोठी लागे एकसारखी

लांब नि लांब क्यास बयाबाईनं वाढीवलं
बापाजी दौलतीनं पाणी गंगेचं आडीवलं

आंब्या तू आंबराई तुला एकच राहिली कैरी
सवतीवर दिली लेक बाप जन्माचा झाला वैरी

उनाच्या रकामंदी गाडी जुपली रेड्यायाची
बापाजी देसायांनी दौड दिलीया घोड्यायाची

बाप म्हणे लेकी माझी तांब्याची परात
जाशील परघरा सुनं लागेल घरात

जिवाला माज्या जड जावा बगूनी गेल्या शेता
पिता माजा तो दवलत आला सुकीर उगवता

जिवाला माज्या जड कसं कळलं माज्या बापा
अंगनी होता चाफा कळ्या पडती झपाझपा

अंबारीचा ग हत्ती साजासकट उबा केला
बापाजी बोलत्याती बाळे अंदान दिला तुला

लुगड्याची ग घडी ती बाई येईना माज्या मना
पित्या माज्या का दवलता नेसू द्या तुमच्या सुना

काळी ती चंद्रकळा दोनी पदार मोती घस
बाप म्हनीतो लेकी नेस दिष्ट होईल खाली बस

हावस मला मोठी जावानंदांत नांदायची
नाव बापाचं करायची

दिवाळी सनादिशी भाऊबिजेचं लुगईडं
दार पित्याचं उघईडं

सोन्याची अंगईठी बाई कशानं झिजयीली
पित्या माज्या त्या गुजरानं रास गव्हाची मोजयीली

जाती साठी माती ती का खाता लागं वाळू
पित्या माज्या गा दवलता ढान्या वागा मी तुजी बाळू

गावाशेजारी गावंदर शिवंशेजारी हाई मळा
पित्या माज्या त्या दौलताची होती सदाची तारंबळा

फाटली एवडी चोळी बाई फाटीली पाठीवरी
पित्या त्या दौलतानं चाटी लुटीले वाटीवरी[1]

चालता झडा झडा तुजी चालनी मला आली
पित्या माज्या व दवलता चला केवडी रात केली

बारीक बांगईडी नको भरूसा कालाकिंता
जोवरी माजा पिता राजवर्खीची काय कथा

लुगड्याची ग घडी म्या का टाकिली बाकावरी
माजा रूसवा बापावरी

उभ्या मी गल्ली जाते दंड भजवा झाकूईनी
पानी पित्याचं राकूईनी

बापानी केल्या सुना लेकापरास देकयीन्या
हाती दऊत लेकयीन्या

भरल्या बाजारातू उंच किरान्या मंदी पेरू
साऱ्या गोतात पिता थोरू

---

१ रस्त्यावर, वाटेवर.

लेकीच्या बापायाचं धन्य धन्य धारीयिष्ट
लेक देऊनिया झाले जावाई वरीयिष्ट

जाईन उभ्या बिदी[1] झाकुनी पाकुनी
बापाराया तुमची मर्यादा राखुनी

:::४:::

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

गोसावी केला गुरू म्यापल्या मतानी
भरतार केला गुरू पित्याच्या हातांनी

लेकीच्या बापानं रुपये घेतले शंभर
कसायाच्या दारी गाय बांधीली सुंदर

जाईच्या झाडाखाली थवा बसला पाकरांचा
आताच्या राज्यामंदी बाप न्हाई लेकराचा

उभ्या मी गल्ली जाते माजी नदार भुईकडं
पित्या माज्या समींदरा त्येच्या नावा पाणी चढं

सरलं दळायान मला आणिक घेणं झालं
बाप पावणं घरी आलं

सरलं दळायान सरलं म्हणू कशी
बापाघरी गाईम्हशी

---

१ रस्त्यावर.

दुरून वळकीती सये हाताची हालणी
वया माज्या त्या पित्याची समींदराची चालणी

बागणी गावावरी गार सावली वडाची
पित्या माज्या दवलताची येती जन्नानी चडाची

माळीण सादवीती माज्या वाड्याच्या भवतनी
पित्या माज्या दवताला आवड मेथीची म्हणूयींनी

पंढरपुरामंदी तिथं विण्याला विणा दाटं
पित्या माज्या दवलताला साधूला संत भेटं

बापानं दिल्या लेकी देकुनी जागा खातींपिती
पिता समींदर राजा शाना शाहीर माजा किती

पाटच्या पान्यामंदी कोन हरवाळ गीत गातो
बापाजी पंडिताचा ऊस कवळा पानी पितो

वळीव पावसानं वड्या वगळी न्हाई धर
पिता माजा दवलत हाई साठाचा समींदर

बाळाला बघू आलं सोप्या माळीत माईनातीं
बापाजी समींदर माजं कबूल व्हईनाती

जागा बघून दिल्या पागा वतन बघून दिल्या लेकी
पित्या माजीया दवलताला चतुर म्हनू किती

लाडक्या लेकीयीचा लाडका किती छंद
बापाशेजारी पाट मांड

लाडकी एवढी लेक धरी बापाच्या पदराला
लेक शोभती चातुराला

सासरी जाते लेक येतं डोळीयाला पानी
बापाजी बोलत्याती लेक माजी लई शानी

बापाजी समींदरा धन्य धन्य तुझी छाती
काळजाचा घड कसा दिला लोकाहाती

मनगटी बिंदल्याचा हात ठेविला ताटापुढं
लेक जेविती बापापुढं

:::५:::

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

लुगडं घेतीलं दोनी पदर कोल्हापुरी
बापाजीनं माझ्या केली खरेदी सोलापुरी

लुगडं घेतीलं दोनी पदर सारखं
बापाजीचं माझ्या प्रेम डोंगरासारखं

मुंबईची मुंबादेवी कुण्या राजाला पावली
हावशा पिताजीनी धज मोत्याची लावली

मुंबईची मुंबादेवी तिला सोन्याचा कानकेस[1]
माझी या पिताजीच्या नगरी द्यावं यश

मांडव शोभयीतो फुलं सोडीली चाफ्याची
हौस मुलाच्या बापाची

---

१ सोन्याचा कान व केस करून घालणे.

धडीच्या धोतराची मांडी दिसते दाणेदारु
माझ्या पिताजीची काय सुरत अनिवारू

पान्या ग पावसानं घेरीलं आडराना
माझ्या ग पित्यायाला भिजविलं गाडीवाना

गाडीवान दादा जोतं सोडावं सईल[1]
पिताजीचं माझ्या घरच्या गाडीचं बईल

बारा बयलांची दावण तेरावी ती म्हईस
पिताजीचा माझ्या गोठा वाड्याला पईस[2]

हावस मला मोठी डाळी डोरलं कानी फुलं
पित्याच्या बागयीत चंद्र नवतीचा डुलं

पंढरीच्या वाटे मोकळे माझे केस
बाबांच्या बरोबरी मला घडली एकादस

मांडवाच्या दारी बाई चिखल कसा झाला
बाप नवऱ्याचा न्हाला

रस्त्यांनी जातायाना खाली बघून माझी चाल
सदा बापाला नावाजलं

हौस मला मोठी जावा नंदात नांदायाची
नाव बापाचं करायाची

भरल्या बाजारात छत्रीवाल्यांची लई दाटी
पिता राहिला माझ्यासाठी

सरीलं दळण माझ्या सुपात पानविडा
पित्यानं भरीयेला मला नवलाखी चुडा

---

१ सैल, ढिले. २ ऐसपैस, लांबरुंद, भरपूर.

मैनाला सासुरवास जसा मिरीयीचा घोस
बाप म्हणे लेकी अशीलाचे तू ग सोस

पाया पडू जाता रुळली माझी वेणी
माझ्या बाबांनी पाहिले जथ्याचे वाडे दोनी

पाया पडू जाता रुळला माझा माथा
नानाजीनं माझ्या पाहिला थोर जथा

पित्या दौलतीनं कीर्त केली बहू
वाटेवरी बारव[1] पाणी पेतू[2] सारा गावू

शेजी तू आईबाई द्यावं उसनं येलदोडं
पित्या माझ्या दौलताची आली मोटार वाड्यापुढं

६

संग्राहक : श्री. बाजीराव पाटील

नवरीच्या बापा हारजीक केली
सव्वा खंडी सोनं लवती दांडी देली

नवरीच्या बापा काय केलं कन्यादान
सव्वा खंडी सोनं देलं दांडीच्या मापानं

नवरीचा बाप अथी तथी उभा राहे
जागा छबिन्याले पाहे

---

१ विहीर. २ पितो.

नवरीचा बाप बसला हरावून[1]
रामचंद्र नवरदेव गेला नर्मदा[2] लागून

नवरीचा बाप सारा ईळ ग उपाशी
आधी करा कन्यादान मग सोळा एकादशी

बाबाजीनं देलं सातपुळ्या[3] डोंगरात
कशाची भेटगाठ झाली वंजाऱ्याची गत

॥७॥

संग्राहिका : सौ. सजाताई सावंत

कुडची गावच्या पारावरी कोनी बांधिली हवीईली
पित्या दौलताला माज्या सरपंचाला सावईली

सम्मोरल्या सोप्या पावऱ्यापईची वरदळा
पित्या दौलताला माज्या न्हाई कशाचा कंटाईळा

दिवाळीच्या दिशी माज्या ताटात आलं कुंकू
पिता दौलताचं बाळ ववाळिलं मी देसमुकू

पंढरीरीला जाता संगं नेवावं बापायाला
गोपाळपुऱ्यामंदी पानी घालावं चाप्यायाला

विठ्ठल माझा पिता सये म्हायारी मला नेतो
चोळी गजनीची घेतो संगं नामदेव देतो

१ नाराज होऊन. २ नर्मदा नदीच्या काठाने. ३ सातपुडा.

बोलूनी चालूनी संसार लावू थडी
पितासनी पोटे येत नही घडोघडी

८

संग्राहिका : कु. विद्या देसाई

पारवं घुमत्याती पित्या माज्याच्या माडीईचं
पाटंचं दळान ग भावज गुजरी लाडीईचं

साकळीयाचा पाय बाई म्या ठेविला चोपाळ्यात
माज्या ग बापाजींनी मला दिली या गोकुळ

साकळीयाचा पाय बाई पडला साऊलीत
माज्या ग बापाजींनी मला दिलीया माहुलीत

हितगुज बोलईता चंद्र ढगाच्या आड गेला
पित्या या दौलताचा नाही गुजाचा झाडा झाला

सकाळच्या पारी तांब्या येतो ग अमृताचा
पित्या माज्या त्या राजसाचा वाडा पुसितो सम्रूताचा

लुगड्याच्या आधी बाई पदर फाटला
पिता माज्याच्या जिवावरी न्हाई गुमान वाटला

येवडा माजा जीव गोड खायाला सोकला
पिता माज्या दवलताच्या अंजीर बागत पिकला

जतान करी देवा माजी डोंगराची झाडी
माज्या पित्याची वस्तीवाडी

जातीसाठी माती खावावी बाई लवनाची
पिता माज्या दवलताची उंच कुळी रावणाची

बापानं दिली लेक वाटंच्या गोसाव्याला
बाळीच्या नशीबानं मिळे पालखी बसायाला

हिरवी हिरकण दंड करितो झळझळा
पित्या माज्याच्या जिवावरी शिरीमंती माजी कळा

लुगडं घेतीयलं घडी रुतली माज्या पोटा
पिता राजस दवलत धुंडीतो चारी पेठा

जन्माचा जोडा माजा गळीचा ताईत
पित्याच्या वाड्या चला शिरी बाशिंगासहीत

जन्माचा जोडा व्हावा गळीचा ताईत
शेल्या पातळाच्या गाठी पित्या दौलता म्हाईत

पाटेच्या पान्यामंदी राम राम कुनी केलं
बापाजी दवलत भाग्यवंत जागं झालं

माजा ग तोंडावळा पित्या दौलता नानावाणी
केसांचा झुंबडा मावळणी आत्यावाणी

बाप म्हणे लेकी या का मधाच्या घागरी
असं गोरंपण घालू कोणाच्या पदरी

बाप म्हणे लेकी तुला देऊनिया आलो
जलमाला तुझ्या न्हाई जामीन मी झालो

माज्या घरला पावना आला बाई माजा पिता
तांब्या तुपाचा केला रिता

हत्तीची काकणं बारा आण्याला लेती जोडी
पिता हसत चंची सोडी

भरली चंद्रभागा कुणी दाविलं चंद्रमुख
कुन्या हौशानं दिली लेक त्याची हारली तानभूक

कधी मी सोडिला दारीचा उंबरठा
कधी बा भेटंल का बाप माझा गोमटा

सकाळी उठूनिया आधी उघडा दारफळी
पिताजीच्या दारी तुळस चाफेकळी

सकाळी उठूनिया आधी उघडा दारकडी
पिताजीच्या दारी बाई तुळशीची माडी

दिवाळीची चोळी भाऊबिजेची मिराणी
बोळवण केली बाप बंधू दोघायांनी

जावं पंढरीला संगं नियावं बापाल
दहीनगावापाशी पाणी घालावं चाफ्याला

तिन्हीसांजा झाल्या दिवा लावू कुठं कुठं
पिताजीचे माझ्या चिरेबंदी वाडं मोठं

थोरलं माझं घर केर लोटतां लोटना
माझ्या या बापाजीची सभा बसली उठंना

माझ्या नानाबानं मोठ्या मोठ्या वगा[१] केल्या
लेकी पाटलाला दिल्या सुना मोठीयाच्या केल्या

लेकीच्या बापाला रात्रंदिस झोप न्हाई
कुठं द्यावी प्राणसई

लेकीच्या बापाला आहे रात्रंदिस घोर
कुठं द्यावी चंद्रकोर

---

१ शरीरसंबंध, ओळख, घरंदाजपणा.

बाप म्हणे लेकी खाली पाहुनी चाल बेटा
वखत आला खोटा खऱ्या रुपायाला बट्टा

बाप म्हणे लेकी तूं नांदूनी कर नावू
दहाजणांमधी खाली बघाया नको लावू

नाना माझा बाबा हाये रतनपारख्या
पाहिल्यात सुना लेका पंडितासारख्या

नाना माझ्या सावळ्यानं केली रतनाची हेड[1]
पाहिले जावाई लेकी वर केले चड

बापानं दिली लेक खावयाला असू नसू
पाहिली सख्खी सासू ल्योक मोतीयाचा घोसू

बापानं ग बाई माझं लगीन लाविलं
सटीचं आक्षार नाही वाचून दाविलं

माझीया चुड्याचं सोनं आहे दगदगी[2]
केलीया पारख नाना माज्या मनाजोगी

भूक लागली पोटाला धाव घेतली डोंगरा
नाना बाप माझा पाड लागला उंबरा

---

१ होड, स्पर्धा. २ बावन्नकशी.

::९::

संग्राहक : **श्री. गजमल माळी**

*माह्या माहेराची वाट खारीक खोबऱ्याची वाटी*
*माह्या बापानं आंदन गाई देल्या मह्यासाठी*

*जाईन मी माहेरा बसीन पित्यापाशी*
*गोठ ऐकीन हिताची इसवा देती काशी*

*बापाजीच्या घरी राज केलं रावनाचं*
*नाही उचललं पुढलं ताट जेवनाचं*

*बापाजीनं मह्या लय बरं केले*
*गाव मांडव्याच्या भोळ्या शंकराले दिले*

*आळंदी करून जन देहू गेले पायी*
*पिता माहा बापराय रामेसर घरी हाई*

*वाटंच्या वाटसरा तुला वाढिते मी जेवू*
*माह्या पित्याचं बा नाव घेशील गावोगावू*

*रामासारखे ल्योक सीतेसारख्या सुना*
*आता माह्या बापाजीला राजा दशरथ म्हणा*

*इंगोलीच्या ओढ्यामंदी गाडीला गाडी भिडे*
*पिताजी देसायाचा जरीचा शेला उडे*

*शिण्याच्या साताला चुलते दोघे तिघे*
*बोलले बापाजी लुगडं न्हाई मनाजोगे*

*बापाजीचा वाडा बाई रेंघते धावत*
*सीता भावजई आली बिजली लवत*

सीता भावजई पाय धुवून पाणी पेली
बापाजी राजानं कोणा अशीलाची केली

॥१०॥

संग्राहक : श्रीमती जानकीबाई पाटील

सोन्याची अंगईठी बाई ती कशानं झिजईली
पित्या माज्या त्या दवलतानं रास गव्हाची मोजईली
गावाशेजारी गावंदर शिवंशेजारी हाई मळा
पित्या माज्या दवलताची बाई सदा तारांबळा
दिवाळ सनायाला भाऊबीजेचं लुगईडं
दार पित्याचं उघईडं
लुगड्याची ग घडी बाई म्या टाकिली वाकावरी
माझा रुसवा बापावरी

॥११॥

संग्राहक : श्रीमती राधाबाई देसाई

लुगडं घेतीयीलं दोनी पदार गोपनीचं
पित्या माज्या दौलतीचं चाटी मैतर लिपानीचं[1]

---

१ निपाणी गावचे.

चाय्याच्या दुकानात मी का उठली रागं रागं
पिता माज्या दौलतानं मला फिरवलं मागं

पावणा आला म्हणू आला अंव्याच्या दिसामंदी
पिता माज्या दौलतीला तूप वाढिती रसामंदी

बापानं दिल्या लेकी आंबा हुंबर त्येंच्या शेती
पित्या माज्या दौलताला लेकीबाळी दुवा देती

लई माजी मया बाप्पाजी दयाळाला
जिरसाळीची पेर केली पान्याच्या जिव्हाळ्याला

चुड्याचं सोनं माज्या किती पिवळं हाडूळ
पित्या माज्या दौलतानं केली पारख वाडूळ

माज्या चुडीयाचं सोनं जशी लसनाची पात
पित्या माज्या दौलतानं केली पारख सारी रात

हिरव्या लुगड्याची निरी रुतली माज्या पोटा
बापाच्या जिवावरी काय पैठणीला तोटा

लुगडं घेतीयीलं साडेसाताची ऊंच[१] भेली
पित्या दौलतानं कोनच्या पेठंला पैदा[२] केली

लुगडं घेतीयीलं घडी ठेवली दारावरी
बाळ रुसली बापावरी

बापानं दिल्या लेकी नाही पाहिली जागाजुगा
जोडा पाहिला मनाजोगा

---

१ उंची लुगडे. २ खरेदी.

::::१२::::

संग्राहक : श्री. वि. वा. जोशी

*थोराघरचं मातेरं ही ग गरीबाची चंदी*
*माझ्या बापाजीचा खर्च मोठा बाववंदी*[1]

*दिवाळीच्या दिशी मी का ववाळिते बापाला*
*सई नेनंती ग माझी मोती मागती कापाला*

*जाते मी उभ्या गल्ली कशी झाकुनी पाकुनी*
*देसायाचं नाव माझ्या पित्याचं राखूनी*

*बाप करी बोळवण माय बांधिते शिदोरी*
*चला बंधू तेथवरी वाट तुम्हात*[2] *साजरी*

*बाप करी बोळवण माय करी ताडातोडा*
*बंधू शिनगारितो घोडा दावनीची गाय सोडा*

*लुगडं घेतईलं पदराला रामसीता*
*माझ्या बापाजीचा चाटी वळकीचा हुता*

*भुकेलं माजं पोट मी निऱ्या देते गाठी*
*पित्या नानाच्या नावासाठी*

*लेकीच्या बापाला न्हाई नेत्रायाला झोप*
*कोठे द्यावे शामरूप*

*सासरी जातायाना डोळ्यांना येतं पाणी*
*बाप म्हणे माजी तानी*

---

१ सढळ हाताचा. २ तुमच्यामुळे.

काय सांगू बाई माहेरीची बढाई
माझ्या पित्यानं लावली वेशीपाशी आंबराई

बाप विचारतो लेकी सासुरवास कसा
केळिच्या पानापरी जिरेसाळीचा भात जसा

बापाजी रे तुझ्या पोटीयीचं मी कलम
काय करू सांग पडला अस्तुरी जलम

जलम देऊनी पिता झाला उतराई
नऊ मास वज्जं कष्टी झाली मायबाई

गोरं माझं रूप त्येचा पिवयीळा रंग
जलम देऊनी पिता झाला पांडुरंग

मोठ्या मोठ्या पोतेऱ्यानं सारवल्या भिंती
बापाजीच्या वाड्या उद्या नारायण पोथी

सकाळच्या पारी वेलायाचे पुडे येती
बाबाजीला माज्या सदा देवाजीची भक्ती

सकाळच्या पारी माज्या अंगणी सडा पडे
देवाजीचा रथ बाबाजीच्या वाड्यापुढे

:: १३ ::

संग्राहिका : सौ. राजका देसाई

हात भरलं काकनानं पाठ झाकली पदरानं
माज्या बापायानं केलं म्हायार गुजरानं

माझ्या बाबाच्या अंगणी दिसे तुळस हिरवीगार
माज्या बंदूजीचा चाले साधूसंताचा संवसार

माहेरी जाता बाई जीव माजा हारकला
माझ्या पिताजीचा खांब सोन्याचा झळकला

पंढवीरीला जाया केलं मणाचं पीठकूट
पित्या माझ्या दवलता दिंडी गाठूया तू ऊठ

धन संपईता कुनी घातल्या आडाभिंती
पित्याला पुशियीती पोटी पुतर लेकी किती

पंढबीरीचा इठू दिंडीईला देतो सोबा
पिता माजा दवलत झांज घेऊन मदी उबा

आठ दिसाच्या शनीवारी देव मारुती झाला वला
पिता माजा दवलत रामसेवेला लागईला

चांदीच्या कंदीलात लावा सोन्याची जोडवात
आगाशिवाच्या डोंगरात माज्या पित्याला झाली रात

नवास म्या केलं सिंगनापुरीच्या माधवाला
पित्याला किती सांगू दवना गुलाल जोतिबाला

माझ्या माहेरी मळ्यात बाई लावला भुंडा ऊस
पिता दौलत हौशी माजा आल्या गेल्याला पाजी रस

माज्या ग माहेरात वाळे पाताळ परसदारी
पित्या माज्या त्या दवलताला नाव शोभतं कारभारी

माहेरी केली म्हणू माज्या पातबीळाची घडी
पित्या माज्या त्या दौलताची हौस मनाची केवढी

देव जोतिबा धरी फेर रत्नागिरीच्या डोंगरात
झाली पित्याला चांदरात

लगीनचिट्टी लिवा माज्या त्या म्हायाराला
पित्या माज्या त्या दौलताची मुंगी पैठण आयाराला

लगीनचिट्टी लिवा सासूबाई व कागदात
पिता दौलत माजा बोलं लेक जावाई मांडवात

अंगणात उभी कोण जरीच्या पातळाची
पित्या माज्या त्या दौलताची सून लाडकी सासऱ्याची

जासूदाच्या मुला तुला सांगते खानाखुना
पित्या माज्या त्या दौलताचा नवा बुरूज वाडा जुना

काळी ग चंद्रकळा काळी कासानी[1] तिचं नाव
पित्या माज्या त्या दौलतांनी सारी धुंडाळल्याता गावं

पंढरी करूयीनी मी ग आळंदी गेली सज
पित्या माज्याला विचारती तुकारामाची भाऊबीज

साधू संताची दिंडी उभी वेशीच्या बाहेरी
पित्या माज्या दौलताची झाली कथेची तयारी

जन जातंया जतरेला मी ग जातीया सुकाचारी
पित्या माज्या त्या दौलताला तीर्थं घडल्याती सारी

पंढरपुरामंदी सारी पताका जरीयाची
पित्या माज्या दौलताची दिंडी बागणीकरायाची

हारीचंदन वारा सुटला बाई गव्हाच्या मदानाला[2]
पित्या माज्या त्या दौलताला पाट्या देते मी सजनाल

हौसेनी केली हौस शेताबी शिवारात
पित्या माज्या त्या दौलतांनी आयनं लाविलं गुराळात

---

१ कासाई, रेशमी साडी. २ खळ्यात मळणी केलेले धान्य.

लुगवीड्याची घडी म्याग ठेवली पेटीवरी
पिता दौलत माझा बोलं बाळा रुसवा कुठंवरी

काळी नि चंद्रकळा सारं दिसतं माझं अंग
पित्या माज्या तू दौलता कुठं खरेदी केली सांग

उभ्या मी गल्ली जाते माझा पदर डाव्या मुठी
पित्या माज्याला बोलत्याती कुन्या अशिलाची ही बेटी

उभ्या मी गल्ली जाते खाली बघून माझी चाली
पित्या माज्या त्या दौलताला सारी सभाही नावाजली

बाबा दौलत माझा बोलं लेकी नांदून कर नावू
तुझ्या घरला येऊ जाऊ तुझ्या रांजणी पाणी पिऊ

बापाजी माझा वड उभी वडाला टेकूईनी
गार सावली देकूयींनी

॥१४॥

संग्राहिका : **सौ. शांतादेवी बाबर**

वाटेवैली हीर कुणी बांधिली मोडीवरी[1]
पित्या माज्या त्या दौलताचं नाव ग तोडीवरी[2]

भरल्या बाजारात अंबारीचा हत्ती आला
पिता माजा बोलईतो लेकी अंदान दिला तुला

---
१ वळणावर. २ दगडी बांधकाम.

पाटानं जातं पानी उसासंगट जुंधळ्याला
पित्या माज्या दौलताला गार सावली शंकराला
उन्हाळ्याचं ऊन काळ्या खडकाची झाली ल्हाई
पित्या माज्या दौलतानं संगं छतरी नेली न्हाई
नासिक एवढं गाव पंचवटीच्या शेजाराला
पित्या माझ्या दौलताला तीर्थ घडलं गुजराला
सावली परतली दारीच्या अंजीराची
पित्या माझ्या राजसाची वाट पाहाते वजीराची
भाऊ नि भावज कृष्ण देवाची द्वारका
पित्या माज्या दौलताचा वाडा गवळ्यासारका
वाटेवैली हीर पानी लागलं वसाट्याला[1]
पित्या माज्या दौलताला लई शिवार मराठ्याला
लेक सासऱ्याला जाती सये सकून[2] काय झाला
पिता दौलत बोलतो बैल येशीत तटला
पिता दौलत बोलतो हरणी पाजती पाडसाला
लई झाल्या लेकी म्हणू नकोस येड्या बापा
गेला चिमण्यांचा थापा मग रिकामा तुझा सोपा
जातीसाठी माती कुळीसाठी ठेवी लज्जा
पित्या माज्या तू दौलता नावासाठी सारं तुज्या
पिता म्हणू पिता पिता चंदनाचा पाट
पिता तवर माझा हाट
जातीसाठी माती खावी लागे खरोखरी
नाव पित्याचं दूरवरी

---

१ ओसाटा, उतार, लवण. २ शकून, मुहूर्त.

उभ्या मी गल्ली जाते माती लागंना आंगुठ्याला
पित्या माझ्या दौलताच्या रंग कुसुंबी पागुटयाला

उभ्या मी गल्ली जाते मी का वगंना सभेकडं
पित्या माझीया दौलताला समींदराला पाणी चढं

उभ्या मी गल्ली जाते नाही उदास माझी याती[1]
पित्या माझीया दौलताच्या बोल लागंना बगा जाती

उभ्या मी गल्ली जाते नाही पापनी वर केली
पित्या माझ्याला बोलताती समींदराची लेक गेली

जन्माला येऊनी केली पंढरी नऊ डाव[2]
पित्या माझ्या तू दौलता काशी तिरमक मला दाव

जन्मा येउनी केली पंढरी एक वार
पिताजी माझे बोले नाही जन्म वारंवार

चाट्याच्या दुकानात एक लुगडं शंभराचं
बापाजी दौलताचं नाव वरी हंबीराचं

लुगडं घेतईलं जर धुण्याला रंग दावी
बापाजी माझा सर्जा घेणारा परगावी

भरल्या बाजारात मी का धुंडते गोतावळा
माझ्या त्या बंधूजीचा पित्यासारखा तोंडावळा

सांगून धाडीईते आगगाडीच्या कुलपाला
पित्या माझ्या दौलताला यावं म्हणावं मुलकाला

पित्या माझ्या दौलता रामेसरला चला जाऊ
सारी तीर्थं तिथं पाहू

---

१ ज्ञाती, जाती (जात), खानदान. २ वेळां

हावस मला मोठी कडी मोडून करदोड्याची
पिता माझ्या दौलताची गोरी कंबर सरदाराची

गावाला म्हून गेला आटळ कुठं झाला
पिता माझा तो दौलती छड्याचा टोपीवाला

परटीन धुण्ं धुती घाल कोटाची घडी नीट
पिता माझ्या दौलतीचं आवत चालं थेट

तुळशीला घाली पाणी तुळशीला आल्या शेंगा
पिता माझ्या दौलताला तुरंवाल्याला माझ्या सांगा

एकला मुराईळी दोघीला कसा नेतो
पिता माझा तो दौलती गाडीसंगं घोडा देतो

कन्या निघाली सासुऱ्याशी ती का शेल्यानं पालविली
पिताजी बोले वाळे नको रडूस चाफेकळी

भरल्या बाजारात वास कशाचा मला येतो
बापाजी दौलईती येळ लौंगाची मापं घेतो

जन जाती कचेरीला घोडं बांधती लिंबाला
पिता दौलताची शिंगी सरकारी डांबायाला

कचेरी कोडतात[१] चाले आमचा झगडा
पिता माझा तो दौलत बोले मंजूळ बोबडा

आक्याचा पैलवान उभा हद्दीच्या धोंड्यावर
पिता माझ्या गुजराचा सोगा शोभे खांद्यावर

भरल्या बाजारात धरते पित्याच्या हाताला
कन्या शोभती बापाला

१ कोर्टामध्ये, सरकारदरबारी.

पाची उतरंड पैलवानाचं खोवरं
पिता माझ्या दौलतानं कुस्त्या नेमल्या जब्बर

चांदानं केलं खळं त्येला आभाळाचं वळ
पित्या माझ्या दौलताचं राज दुनयाआगळं

खऱ्या जरीईच्या चोळ्या वारमाहीस[1] माझं लेनं
पिता माझ्या दौलतीचं तालीवाराचं मला घेनं

दुरून वळकीते माझे बापाजी व्हय का न्हवं
पिता माझ्या दौलताला शेलापागोट्याची सव

लुगडयाची घडी तळहाताच्या एवढी
पिता माझ्या दौलताची लेक लाडकी केवढी

कोल्हापूर शार गल्लोगल्लींनी बटवेदार
पिता घेणार हौसदार माझा गाठवा चंद्रहार

वाट मी किती पाहू सावली जोत्याखर्ली गेली
पित्या माझ्या गुजराची वाट पाहता सीमा झाली

सकाळच्या पारी ऊन लागतं कवळं
पिताजी दौलत माझे सोनं पिवळं हाडूळ

वाट मी किती पाहू गेल्या महिन्यापासूनी
पित्या माझ्या दौलताला लैंदी झाल्यात जाऊनी

डफावरी हात हात मारीता शिणला
बापाजी माझा पिता आता शाहीर दमला

डफाव मारी हात पाची बोटांचा चाले चाळा
पित्या माझ्या दौलताचा ऐका शाहीराचा गळा

---

१ नेहमीचे.

डफाव मारी हात हात वाजीतो नेटं नेटं
बापाजींची माझ्या शिणली पाची बोटं

चांदीच्या करंडाला सोन्याची किळी केली
पित्या माझ्या दौलताला आवकाची[१] बोली केली

चांदीच्या करंडाला सोन्याचं झाकाईन
पित्या माझ्या दौलताला देवघराची राखाईन

उभ्या मी गळ्ळी जाता करी पदराची सारासारी
पिता माझा दौलत बसे कचेरी बिनघोरी

विसाच्या घोड्याला तेळा तिसाचा तोबरा
पिता माझा दौलत झाला वकील घाबरा

पळसाच्या बनायात काय डोंगर देतो शोभा
लाडक्या लेकीसाठी पिता लोकाघरी उभा

सोन्याच्या बंदूकीचा कोण गळ्ळीनं हिंडतो
पिता माझा तो दवलत कसा शिकार खेळतो

घोड्याव बसणार माझा पायानं आला बाई
पित्या माझ्या दौलताला तालीवारा गर्व न्हाई

समोरल्या सोप्या जान टाकिती आकड्याचं
पित्या माज्या दौलताचं येणं औचित फाकड्याचं

समोरल्या सोप्या जान टाकिती पानाचं
पित्या माज्या दौलताचं इष्ट मैतर मानाचं

उभ्या मी गळ्ळी जाता माझा पदराखाली हात
माझ्या बाबांची ताकीत

---

१ आयुष्य

सरीलं दळानं मला एवढ्यानं काई हुतं
माज्या पित्याच्या संगतीनं वाड्या मानूस येतं जातं

सांगून धाडिते पित्या माज्या दवलतीला
यावं वारणाकाठाला लाडक्या लेकीच्या गावाला

माळ्याच्या मळ्यामंदी इसवंदाचा एक खोपा
गावच्या जतरमंदी दिष्ट झालीया बापलेका

पाटानं जातं पाणी उसा संगट रताळाला
पित्या माज्या दवलताच्या केळी आल्या उताऱ्याला

ओवी मी आता गाते पिता माज्या गुजराला
रायाला किती सांगू हाई तुळस शेजाराला

बापाजी माजा वड बया दवन्याची पेंडी
जडावा माजा बंदू नंदी देवळाच्या तोंडी

बापाजी माजा वड बया तुळशीचं झाड
दोगांच्या सावलीनं पानी झऱ्याचं लई गोड

चाट्याच्या दुकानामंदी गंगागुजरी लुगडी
पिताजीला दावताना दरवाजा उघडी

हावशा माज्या बंधू नको मला ते लुगडं
पित्या माज्या दौलताचं दार सताड उघडं

माज्या अंगनात पानी वाजं झुळझूळ
पित्या दवलतांनं माज्या भरली बाई चूळ

पावना आला म्हनू माजा बापाजी सावकार
साकरेचं माप घाली वाणीनी लवकर

माज्या ग अंगणात घोडी कुणाची केकली
पित्या माज्या दौलतानं दौड उन्हाची फेकली

माझ्या ग अंगणात काळी जांभळी दोन घोडी
बापलेकांची आली जोडी

::१५::

संग्राहिका : सौ. हव्वाबी खान

माझ्या अंगणात तान्ह्या बाळाचा उरूस
बाप माझा ग पंडित भाग्यवंतही पुरुष

बापाची म्हणू माया सख्या ग बाळावरी
कोकमाची छाया बत्तीस केळ्यावरी

कशी लेकीच्या बापानं देहीची केली माती
दारी कसायाच्या उभी गाय पारबती

बाप म्हणे तुला नाही दिली गोसाव्याला
पाहिला हुंडीवाला मग पालखी बसायाला

भाऊ ना धर्माचा नाही उभा दारी बाप
कशी टाकली एकली काय पदरात पाप

बापानं दिली लेक बाई देऊन झाला चोर
जावाई सावकार नाही बोहण्या[1] उजूर[2]

लेकी सुनायांचं माझ्या बापाचं घरानं
पेरू पिकला भारानं

१ बोनं, नैवेद्य. २ मंजूर.

सुखाचं घरदार दुःखाचा बापराजा
निदानीला टाकी वैद्याच्या घरी बाजा

सारं सुखाचं सासर दुःखाचा बाप मला
खांदीचा नवा शेला वैद्यराया देऊ केला

जावायाचा मान कर जा लेकीबाई
पित्या बाबाजीला बहुत लेकी नाई

लक्ष्मी आली घरा धरे माझी करंगळी
माझ्या बाबाजींची दावते सोपामाळी

शेत पिकलं पिकलं जन बोलती येशीत
धन्या माझ्या पित्यायाचे नंदी बुडाले राशीत

पुढच्या ओसरीला दिवा जळतो तुपाचा
जळतो तुपाचा वंश वाढतो बापाचा

दळण कांडण रोज करिते रांधाणा
पिताजीला माझ्या थोर बहूत वंदना

उभी माडीवर माडी माझ्या बापाजींची
लंका झळके सोन्याची कशी माझ्या माहेराची

बापाच्या हयातीमंदी मुक्यानं दळू नये
जात्याची भरली शीग हातांनी मोडू नये

मावळाया गेला कसा कोकणीचा राजा
लेकावाणी माया सये करीतो पिता माजा

बापायानं माझ्या जोपा केली लेकावाणी
दूध पाजिलं ताकावाणी

१६

संग्राहिका : सौ. कमलाबाई बडवे

वाटच्या वाटसरा तुझी नदार हाये न्यारी
पिताजीच्या नावासाठी वाट सोडिईली सारी

उभ्या मी गल्ली जाते हालंना माझी निरी
नानाला बोलाविते बसा सभेला बिनघोरी

उभ्या मी गल्ली जाते लेक नाही तसल्याची
माझ्या नानांची मी केळ चांदीसोन्याच्या मसाल्याची

वाटवरला मळा कुठं गेल्याती मळंकरी
सम्रत नानाजींच्या चाले इंजीन हिरीवरी

वाटंवरचा मळा कुणा त्या हिल्लाळ्याचा
माझ्या त्या नानाजीचा चाले चरख गुऱ्हाळाचा

वाण्याला वाणी पुसे गुळाचा भाव कसा
माझ्या नानाजीनं नवी लागणं केली ऊसा

तिनी सांजा झाल्या दिवा लाविते लोनीयाचा
पिता माझीयाच्या घरी पलंग सोनीयाचा

चंद्रभागातीरी मगर माशायाचं घर
जन्म दिलेला पिता थोर

मांडवाच्या दारी घागर सांडली तुपाची
धन्य नवरीच्या बापाची

मांडवाच्या दारी वऱ्हाडाची झाली दाटी
हौशा पिता ग पान वाटी

लक्ष्मी आली घरा ओसरीचं चढे जोतं
पित्या माझ्याला बोलती हळदीकुंकाचं सोडा पोतं

लक्ष्मीबाई आली सोन्याच्या पावलांनीं
पित्या माझ्याचा ग वाडा चढती डौलानी

लक्ष्मीबाई आली तिनी सांज करूयीनी
माझ्या पिताजीच्या घरी हाती कंदील धरूयीनी

नवरीचा बाप मांडवी घेईना मानपान
माझ्या नानाला सांगते करा लेकीचं कन्यादान

चाट्याच्या दुकानी गंगासागर लुगईडं
नानाला देखुयीनी चाटी दरोजा उघईड

चाट्याच्या दुकानात साडेसाताचा रास्ता येतो
नानाच्या जिवावरी चाटी मागील ते देतो

चाट्याच्या दुकानात मांडी घालुनी बसयीला
नानाच्या जिवावरी काढी पोपटी मासयीला

बारीक भांग थडी मला लिव्याशी वाटली
माझ्या नानाजींनी तार पुण्याला पाठविली

हात भरीला बांगड्यानं मी आणिक लेणायार
नानाच्या जिवावर छंद पुरा मी करणार

एवढं माझं गोत नाही गोताची वळक
पिताजी चंद्र माझा बाई माडीला ठळक

लक्ष्मीबाई आली कशी बसत उठत
माझ्या पित्याचा वाडा पुसत

फुलां ग मधी फूल फूल उत्तम चाफ्याईचं
सुख भोगावं बापाईचं

माझ्या ग अंगणात ही सायकल कुनाची
पिताजीनं माज्या दवड दिलीया उनाची

लाडक्या लेकीईला भारी चुलत्याचा लळा
बापाजीला मागती आंदण पानमळा

ओसरीला बाई समई जळती मोराची
पिताजीच्या घरी बैठक बसली थोरांची

फाटली माझी चोळी आण देते मी धर्मािला
औक्ष मागते मी बापाजी घेणाऱ्याला

झाल्या तिनीसांजा दिवा ओसरी बाइला
पिताजी ग माझे बासरे सोडिती गाईला

झाल्या तिनी सांजा दिवे लावू कोठे कोठे
पिताजीचे माझ्या वाडे चिरेबंदी मोठे

लक्ष्मीबाई बोलं येऊ कोण्या बांधानं येशीत
पिताजीचे माझ्या नंदी बुडाले राशीत

गाईला गोगरास ब्राह्मणाला मधुकरी
पिताजीचे माझ्या अन्नछत्र आहे घरी

वाजत गाजत माझ्या दाराच्या भुजंला
पिताजी माझे ब्राह्मण बसले पूजेला

भुकेला ब्राह्मण हात लावितो पोटाला
पिताजींचे माझ्या शेत भीमेच्या काठाला

१७

संग्राहिका : सौ. मालतीबाई दांडेकर

घरी आलाया पावणा जल्म दिलेला माझा पिता
जेवाया वाढीताना तांब्या तुपाचा केला रिता

जेवणाची पाटी माज्या डुईला आला कड
बापाजी गुजरा पराशिवेला तुझा फड

जेवणाची पाटी माज्या मानेचा झाला इळा
बापाजी गुजरा परशिवेला तुझा मळा

सांगून धाडिते बापाजी गुजराला
डाळीडोरल्याचा साज जावा लेल्या शेजाराला

अंतरीचं गुज सांगतो एक्याला
सोप्या बसूनी बापाजी गुजरा सक्याला

सत्येनारायनपूजा वाड्यात झाली एक
बापाजी गुजराची परसाद वाटिते लेक

सयानू वघू चला पित्या माज्याचा माळीसोपा
रंगीत पाळन्याला भावज गुजरी टाकी झोपा

हिरवी चोळी माझ्या दंडात उसवली
बापाजी बोलती कुठं नागीन दृष्टावली

मयामंदी मया बापाची मया भारी
माजं कुरुळं केस सारी

घरचा कामधंदा कामाला नाही भेलो
बच्चानागाच्या पोटी आलो

वेडा माजा जीव वाऱ्याच्या लागे पाठी
पितां दवलती माजा धीराच्या सांगे गोष्टी

सकाळच्या पारी मांडी पिठात वुडयेली
पित्या दवलतीनं मला राज्ञाच्या घरी दिली

लुगडं घेतलं दुही पदर मला दावा
बापाजी दवलत रंगपारख्या गेला गावा

पिता इच्यारतो सासुरवास कसा
गळ्याची चिंचपट्टी सैल हुईना फासा

वाटेचा वाटसरू इच्यारी डाळी मोळी[1]
बापाजी गुजराची उच्च पाटलाची कुळी

झाडामंदी झाड आंब्याचं डौलदारू
सर्व्या गोतामंदी पिता माझा थोरू

सकाळी उठून जात्याचा फेरा लोटी
भाग्यवानाच्या आलो पोटी

बाप समरत सोप्या बांधिलं बारा हत्ती
लेकी दिल्यात्या परहाती

एवढा माझा राग रागाचा धनी कोण
पिता बसला दुर्योधन

गोंडाळ माजा हातू किती लावू धूळपाटी
पित्या माज्याच्या नावासाठी

भरला बाजार भरूनी झाला रिता
पिता पेठेला आला न्हवता

---

१ डहाळी मुळी, घराण्याचे मूळ.

## १८

संग्राहिका : **सौ. शशिकला पाटील**

*पैली माजी ववी गाते माज्या दिवानाला*
*साखरेचा पुडा घालिते मुंग्याच्या रिवानाला*

*सोजीच्या शेवाया बाई मी वळिते लुकलुकी*
*पित्या माज्या दौलताला न्हाई वहीन ग सक्की*

*वाळ सासऱ्याला जाती वाटेनं दरवळे बुत्ती*
*पित्या माज्याला म्हनीत्याती कुन्या हौशाची लेक जाती*

*वाडीया शेरामंदी छत्री कुनाची झोकं खाती*
*पित्या माज्या दौलताची स्वारी पगाराला जाती*

*वाडीया शेरामंदी पैसा न्हाई फुकायाचा*
*पित्या माज्याचा ग घाम गळतो लाकायाचा*

*वाडीया शेरामंदी साडेधाचा भोंगा झाला*
*पित्या माज्या दौलताचा दारी टांगा गडे आला*

*दिवाळीचा सन भरी पक्वान्नं पाच ताटी*
*पित्या दौलताच्या जलम मी घेतला ग पोटी*

*साखरेचा लाडू दुधातुपात डळमळं*
*पित्या दौलताचा माज्या जेवताना घाम गळं*

*जिवाला भारी जड खडीसाखर घोटईना*
*पिता दौलता ग माजा उशाचा उठईना*

*उभ्या मी गल्ली जाते माजा पदर काकनात*
*पिता बसला दुकानात*

भरिल्या बाजारात मी हुडकिते गोतावळा[1]
पित्या माज्याचा ग आज्यासारखा तोंडावळा

पाहुणा आला म्हणू काळी छत्री पिवळा दांडा
पित्या दौलताला ववाळीन पहिल्याच तोंडा

भरिल्या बाजारात एका पेटेनं दोगं जाऊ
पिता दौलत बोलत्याती चल साडीची घडी दाऊ

पित्या माज्या गुजराची हाई समाधी शेतात
कन्हेरीचं फुलं वाहू हौशाच्या बागात

काबाडकष्ट भारी माळी करितो मळ्यात
सोन्याचं लाकीट माज्या पित्याच्या गळ्यात

पत्रावरी पत्र पत्रवाल्याचं कोन गावू
पित्या माज्या वकिलाचं हाई त्यावरी नावू

सरगीच्या वाटा मी लोटिते चकपक
पिता दौलत ग माझा सपनी दावी मुक[2]

पोथी नि पुस्तकाचं मी उघाडिते पान
पित्या माज्या गुजईरा तुमचं म्होरं ध्यान

सुक नि येवडं दुक न्हाई दावीत जनात
पित्या माज्या गुजराची मूर्ती खेळती मनात

दिलेल्या घरात लेकी नांदून कड लावू
पिता माजं बोलत्याती खाली बगाया नको लावू

उभ्या मी गल्ली जाता बये चालले वाकत
माज्या पित्याची ताकीत

१ नातलग, २ मुख, दर्शन देणे.

बोटं भरली जोडव्यांनी पाय भरले पैंजनांनी
पित्या माज्या गुजराचं जोतं चढीते डवलानी

दिलेल्या घरात सुखी नांदतो माजा जिवू
पित्या माज्या गुजराला किती आशीर्वाद देऊ

सासऱ्याला जाती वुत्ती मागती सजुरीची
पिता माजं बोलत्याती लेक न्हवं गरीबाची

काशीला जायाला जनलोकांची तयारी
पिता गुजर कसा बोले काशी तुमची म्हायारी

काशीला जायाला मन पळतं धावतं
पिता गुजर बोलतो काशी तुमची गावात

अंगठी बिलवराची चाल निघाली देशात
साजाचं डोरलं पित्या माज्याच्या हातात

शिंप्याच्या दुकानी पिता बसला वळीराजा
उंच घडीला हाता माजा

शिंप्याच्या दुकानी शिंपी बोले आहेराला
पिता गुजर बोलतो घेतो लेकीच्या माहेराला

साडी पातळाची चाल निघाली शहरात
मोतीचूर चोळी पिता घाली पदरात

अंबारीचा हत्ती भरल्या पेठेनं गेला रिता
पित्या माज्या गुजराला धाडू म्हणाया नाही सत्ता

सम्मोरल्या सोप्या खुर्च्या बाकाची झाली दाटी
पिता गुजर माझा राजा आलाया भेटीसाठी

पावना आला म्हनू सया बगती जाता जाता
जन्म दिलेला माजा पिता

पित्या माझ्याच्या माघारी बंधू करीतो संसार
पित्या माज्या गुजराचा मी करीते उद्धार

आल्या गेल्याला विचारती गावचं पीकपाणी
पित्या माज्या गुजराचा शाळू लागला उसावाणी

शिंप्याच्या दुकानी जळे समई उजाळ
पिता माजं बोलत्याती साडी घेऊ का पाताळ

पाटील करी पट्टी संगं नोकर वेटीयीचा
पित्या माज्याला येतो ग नारळ भेटीयीचा

जिवाला भारी जड कसं कळलं वाडयात
पिता माज्याच्या रुतला खडा ग जोडयात

जिवाला माज्या जड कसं कळालं माळटिक्की
पिता दौलती ग माजा हाती रुमाल धूम ठोकी

आगीनगाडी आली सये सरळ सापावानी
हावशा माजा बंधू सये इमानी बापावानी

सरगीच्या वाटे कुनी लावला पुंडया ऊस
पित्याचं ग माज्या सरगी जायाचं नाही दिस

भरीला बाजार मला भरून काय व्हावा
पिता हौसंचा माजा यावा

पिताजी पावना जिरसाळीचा येळी भात
पित्याला जेवाया झाली रात

बसाया बसकर पाट टाकिते चवरंग
पित्या वाचूयीन सये मी बोलू कोणासंग

देखणेपणाची साऱ्या गावाला गेली हवा
बाबा कंदीलात लावा दिवा

देखणेपणाचा कुठं लागेना तलास
दुधाचा राहिला पित्या शिवारी गल्लास

माळ्याच्या मळ्यामंदी केळी नारळी का तोटा
पित्याच्या हिरीला चार मोटा

माहेराची खूण सांगी जंगम जोशीयाला
केळी पित्याच्या कुसवाला

लईजणी लेकी पित्या माज्या मायाळूला
पेरीली जिरेसाळ पाण्याच्या जिवाळ्याला

माहेराला जाती माझा पाऊल चढाचा
पित्या माज्या दौलताचा शेंडा दिसतो वडाचा

माज्या दारामंदी काळी करडी दोन घोडी
बापलेकांची चालली जोडी

पित्या दौलताचं पुन्य मी घेती कण कण
बाबा कुळीचा तुमच्या गुण

१९

संग्राहक : श्री. ए. के. घोरपडे

सासरी जातायाना डोळ्याला येतं पाणी
बाप समजावी चक्रपाणी

मनगटी बिंदल्याचा हात ठेवी ताटापुढं
लेकी जेवी बापापुढं

पित्या माझ्याच्या माघारी बंधू करीतो संसार
पित्या माज्या गुजराचा मी करीते उद्धार

आल्या गेल्याला विचारती गावचं पीकपाणी
पित्या माज्या गुजराचा शाळू लागला उसावाणी

शिंप्याच्या दुकानी जळे समई उजाळ
पिता माजं बोलत्याती साडी घेऊ का पाताळ

पाटील करी पट्टी संगं नोकर वेटीयीचा
पित्या माज्याला येतो ग नारळ भेटीयीचा

जिवाला भारी जड कसं कळलं वाडयात
पिता माज्याच्या रुतला खडा ग जोडयात

जिवाला माज्या जड कसं कळालं माळटिक्की
पिता दौलती ग माजा हाती रुमाल धूम ठोकी

आगीनगाडी आली सये सरळ सापावानी
हावशा माजा बंधू सये इमानी बापावानी

सरगीच्या वाटे कुनी लावला पुंडया ऊस
पित्याचं ग माज्या सरगी जायाचं नाही दिस

भरीला बाजार मला भरून काय व्हावा
पिता हौसंचा माजा यावा

पिताजी पावना जिरसाळीचा येळी भात
पित्याला जेवाया झाली रात

बसाया बसकर पाट टाकिते चवरंग
पित्या वाचूयीन सये मी बोलू कोणासंग

देखणेपणाची साऱ्या गावाला गेली हवा
बाबा कंदीलात लावा दिवा

देखणेपणाचा कुठं लागेना तलास
दुधाचा राहिला पित्या शिवारी गल्लास

माळ्याच्या मळ्यामंदी केळी नारळी का तोटा
पित्याच्या हिरीला चार मोटा

माहेराची खूण सांगी जंगम जोशीयाला
केळी पित्याच्या कुसवाला

लईजणी लेकी पित्या माज्या मायाळूला
पेरीली जिरेसाळ पाण्याच्या जिवाळ्याला

माहेराला जाती माझा पाऊल चढाचा
पित्या माज्या दौलताचा शेंडा दिसतो वडाचा

माज्या दारामंदी काळी करडी दोन घोडी
बापलेकांची चालली जोडी

पित्या दौलताचं पुन्य मी घेती कण कण
बाबा कुळीचा तुमच्या गुण

१९

संग्राहक : श्री. ए. के. घोरपडे

सासरी जातायाना डोळ्याला येतं पाणी
बाप समजावी चक्रपाणी

मनगटी बिंदल्याचा हात ठेवी ताटापुढं
लेकी जेवी बापापुढं

लेकीच्या रे बापा काय म्हणू तुला आता
तुझ्या पोटीची मी लेक झाली परक्याची मत्ता

दिली परघरी हात दावू का जोशाला
बापावरी माझ्या आता रुसू मी कशाला

वाटच्या वाटसरा माझ्या बापायाला सांगा
तुमच्यावरी आता नाही रुसायाला जागा

बापाच्या जिवावरी परदेस मी पाहिला
बावाजीचा नाही आता संबंध राहिला

एकुलता ल्योक नको पाहुनी देऊ बापा
दीर नणंदांनी होवा भरीयेला सोपा

सणामंदी सण आला दिवाळी दसरा
बापाजीचा मला सये हक्काचा आसरा

पंढरी पंढरी विठूरायाची नगरी
बापाजी ग माझे डुले नामाच्या गजरी

विठ्ठल माझा पिता मला माहेराशी नेतो
विठ्ठल रखूमाई मंत्र जागराचा देतो

॥२०॥

संग्राहक : श्री. बा. शि. पाटील

बाप म्हणे बाई तीळातांदळाच्या गोणी
लोटली परघरी झाली कशी केरावाणी

बाप म्हणे लेकी माझे मकंच्या कणसा
जाशील परघरा नको बोलूस माणसा

बाप म्हणे लेकी माझी हालन मालण
जाशी परघरा घेशील दहाचं बोलणं

लाडकी ग लेक काय मागिती बापाला
पायी ते पैंजण लावू साखळ्या कापाला

बाबाजी माझा पिता कसा बोलतो तोऱ्यात
करिते मी ताक रवी सोडीली डेऱ्यात

बाप या पाहुणा शेजी सुग्रण बोहिली[1]
दिव्याच्या ग ज्योती साखर तुपात मोहिली[2]

बाप या पाहुणा नाही गहू म्या दळीलं
साळीचं तांदूळ नुसतं दुधात येळीलं

दुपारच्या पारी मी का हिंडते तुपाला
शेजी घाली माप बाप माझा ग भुक्याला

---

१ बोलली. २ मळली.

## २१

संग्राहक : श्री. प्रल्हाद रं. त्र्यंबके

*बापानी दिली लेक नाई पाहिलं छप्पर*
*दैव तिचं थोर माडी बांधिली उप्पर*

*बापाजीराया म्हणे माझं मक्याचं कणीस*
*जाईल परघरी व्हईल मोलाचं माणूस*

*बापाजी राया म्हणे माझी तांदळाची कणी*
*जाईल परघरा बोलतील बाराजणी*

*नको उभी राहू भरल्या पानोध्यानी*
*शिकविलं मला बापाजी मोहित्यानी*

*बापाजी बापाजी लई लेक तुम्हा प्यारी*
*आंदण मागते पाणझरी*

*मोडला सये काटा भिलावा[1] कळ मारी*
*बाईला ग माझ्या बापाची भाईदारी[2]*

*बाप माझा वड आम्ही वडायाच्या शेंगा*
*कधी भेटशी श्रीरंगा*

---

१ बिब्बा. २ पाठबळ.

## २२

संग्राहक : श्री. पं. ख. नागपुरे

*वरमाय झाली माझ्या बाबाच्या देखत*
*जरीचं पातय जाई तांदूय झोकत*
*बाबाजीनं दिलं सातपुडया डोंगरात*
*कशाची भेटगाठ रात झाली खिंडारात*
*बाबाजीनं देलं नाही पाहिलं वतन*
*कपायीचं कुंकू जोडा पायला रतन*
*बाबाजी पावने आले दुरून देखले*
*फुलांच्या गाद्यायाचे दारी पलंग टाकले*
*रेशमी धोतर वायते ग वसरीले*
*बाबाजींचं येणं नित तिथं कचेरीले*
*गोरीले गुमान सये ताकाच्या पानात*
*बाबाजीच्या घरी भरलं अंबर सोन्यात*
*बाप म्हणे लेकी साडी कशात गावली*
*बाळाले गुटी देता तिथं कस्तूरी सांडली*
*लेकाच्या खांद्यावरी लेकीची करंगाई*
*बाबाजी राजे गेले बये काशीला आंगोई*
*पंढरीशी जाता संगं नेते मी बापाले*
*हाती तंबू झारी पानी तुयशी रोपाले*
*बाबाजीनं सये शिकविलं गेनीवंता*
*काय सांगू भाग्यीवंता*

जूतला रथघोडे रथा लावली बनात
बोलले बाबाजी लेक चालली वनात

बाप म्हने लेकी करायी कटकट
राम नाही नीट कसा व्हईन शेवट

जूतला रथघोडे रथा लावली छतरी
बोलले बाबाजी लेकी चालल्या जतरी

अस्सल बाबाजी कमअस्सल कशी होऊ
मूरखाचे बोलन्याले बोल किती देऊ

बाबाजी पावने आले जिवाला उल्लास
साकरेचे लाडू वरी तुपाचे गिल्लास

वाघ माझा पिता मी त वाघाचं कलम
गेला फुकट जलम

२३

संग्राहिका : **सौ. सुमन प्र. नलावडे**

बाप म्हणे लेकी लवूनी चाल बेटा
जाशील परघरा रुपाया येई तोटा

बाप म्हणे लेकी तुला कुठं कुठं देऊ
गहू जोंधळे म्हणून का वाढी दिढी लावू

बाप म्हणे लेकी तूं गुलालाचं पोतं
तुझ्या नशिबाला जामीन कोण होतं

बापाची लाडकी सासू सांगतसे काम
मैनाच्या निढळाला सये आला बघ घाम

बापाजी सजण नका बोल मना लावू
सरजाची नथ तिला मोती हैती नऊ

बापाजी मोकासा माझा चित्ताकाचा फासा
लाडक्या लेकीसाठी सोडी कमरेचा कसा

चौसोपी वाडा म्होरं वृंदावन तुळशीचं
बापाजी समींदर त्येचं शिवार पळशीचं

बापाचं पिकलं शिवार समदं शाळूचं
पिकलं पोटपाणी लाडक्या लेकीचं

पाच गावचे पाटील लगीनसराई दाटली
पित्या माज्या दौलतांनी सभा अंगं रेटली

बापाजीची माया जसी मिरगाची पेरणी
हासू लागे बाळासंगं जशी सुक्राची चांदणी

२४

संग्राहक : श्री. शं. बा. राजभोज

बांगडी फुटली फुटू परती काचाची
जिवाचा माझा पिता उद्या भरील सोन्याची

काळी चंद्रकळा हिचा पदर पिवळा
असू द्या बायांनो पिता माझा ग दुबळा

आम्ही सहा बहिणी सहा गावच्या बारवा
जिवाचा माझा पिता मधी जोंधळा हिरवा

तांबूळीनबाई पानं द्यावी वीस तीस
पिताजीला माझ्या विडा लागतो हाम्मीस[1]

दळण सरलं सरू गेलं सगळ्यात
जाईजुईचा ग हार माझ्या पित्याच्या गळ्यात

सरलं दळण माझ्या सुपात आठवा
सोन्याचा बटवा माझ्या पित्याला पाठवा

हात हालवणी माझ्या पित्याची चालणी
दुकान सोडूनी पाहू लागल्या वाणिनी

॥२५॥

संग्राहिका : कु. उषादेवी बागल

लिंबाच्या लिंबूईळ्या लिंबाला नाही जड
सयाला किती सांगू बापाला लेकी ग्वाड

साळू जाती सासऱ्याला लेक बापाच्या लाडाची
साळूला घालवाया सभा उठली वाड्याची

समोरल्या सोप्या सये जळती समया
वकीला शेजारीरी पिता बसतो पान खाया

---

१ नेहमीचा.

पावण्या पाहुणचार रातीच्या राती केला
जन्म दिलेल्या पित्याला गुजाकारनं बोलाविला

बसाया बसकार सोप्या टाकल्याती जेनं
बापाजीनं माझ्या लई दिसानं केलं येनं

पाऊस पाणी नाही छत्री कशानं वली झाली
पित्या माझ्या राजसाची कचेरीला स्वारी गेली

पराई परदेश मी कंठाया नाही भेले
ढाण्या वाघायाच्या पोटी जलमाला मी आले

भरल्या बाजारात तीळा तांदळाच्या ढिगा
बापाशेजारी ल्योक उभा

::२६::

संग्राहक : श्री. ए. आ. गुंजाळ

बापानं दिली लेक नाही पाहिलं जोड्याला
खिल्लारी बैलांची जोडी जुंपिली गाड्याला

बापानं दिली लेक नाही पाहिला जावाई
संपदा पाहून कन्या लोटली हवाई

बापानं दिली लेक रुपये घेतले शंभर
उभा बांधावरी सोडी नावाचे नंबर

बाप म्हणे लेकी माझी तांब्याची घागर
जाईल परघरा सुनं लागेल नगर

बाप म्हणे लेकी माझी तांब्याची परात
जाईल परघरा सुनं लागेल घरात

बाप म्हणे लेकी बस्ता[1] भराव्या पराती
चुलता पंडित बोले झुबे भरा गुजराती

## २७

संग्राहक : श्री. भाऊ भालेराव

असा माहा बाप झाडाची सावली
पंढरी पावली तिनी काळी

असा माहा बाप डोंगर पहाड
मन झिऱ्याचं ग मनगटाएवढं

असा माहा बाप कायी वराडची
मन त्याचं पन वानी कनसाची

जाड मिशाखाले इलुसं हासनं
जाड हाताखाले लोन्याचं बासन

---

१ कापडचोपड.

::२८::

संग्राहक : श्री. ना. ना. शिंदे

जातीसाठी माती खडे खाती मी चालूनी
गवळी नाना माज्या तुमच्या नावाला भिऊनी
जातीसाठी माती खडे खाते मी लवणाचं
नाना माझ्या गवळ्याचं बीज अशील रावणाचं
वाटचा वाटसरू मला दिसतू नानावानी
वाट काय पुसता चला देते घरी पानी
बोळवण केली बोळवणीची काय कथा
गवळीनाना माजा घेणारा समरथ होता
भरल्या बाजारात चोळीचं येईना नावू
गवळीनाना माज्या तुम्हा बोटानं किती दावू
लुगड्याची घडी येईना माज्या मना
गवळीनाना माज्या नेसूद्या तुमच्या सुना
भल्यासंगं भली मी येड्याशी कसं बोलू
बापो माज्या वकिलाचं हाई मी अशिलाचं पिलू
नानाजी बोलत्याती बये सासुरवास कसा
मिरच्याचा घस जाळ तिखटाचा जसा
लेकीची ग जात जशी झाडावैली चिमणी
गवळीनाना बोले कधी जाईल ती उडूनी
गार सावली बघून म्या उतरिलं वज्जं
गवळीनाना माझा विसाव्याचं झाड माजं

लुगडं घेतलं साडेसाताचं जरीकाठी
गवळीनाना म्होरं मागं येतो बगा चाटी

नवं मी नेसते जुन्यावरी देते पायी
गवळीनाना माज्या घेणाऱ्याला औक्ष लई

उभ्या मी गल्ली जाते वाजू देईना जोडवं
नाना माझ्या गवळ्याला कोणी लाविलं आडवं

उभ्या मी गल्ली जाता पदराची सारासरी
गवळीनाना माझा उभा रागीट पारावरी

उचकी लागली तिला देते गडे पाणी
नाना माझ्या गवळ्यानं सई केली कुण्या रानी

पिकलं पिकलं जन बोलती बाजारी
नाना माजा ग गवळी गुढं गाडीनं गोळा करी

पिकलं पिकलं जिभनीवाई झालं वज्जं
गवळी नाना मझ्या बोळवणीचं साल माजं

लेकीचा जलम कुण्या देवानं घातीला
जलम दिलेला परमुलुखी राहिला

भूक लागली पोटा तान लागली ताकाची
नाना माज्या गवळ्याची वाडी जवळी धाकाची

माझी जातकूळ कोण पुशितो सांदीचा
गवळी नाना माझा बंदा रुपाया चांदीचा

पाऊस पडला ओढे नाले नाही थीर
गवळीनाना माझा साठांचा समींदर

लेकीचा जलम जशी तांदळाची कणी
लेकी विकून झाला धनी

जिरसाळीचा तांदूळ तुपावाचून कसा खाऊ
नाना माझ्याच्यावाचून गावा कुणाच्या मी जाऊ

::२९::

संग्राहिका : सौ. इंदिरा कुलकर्णी

भूक लागे पोटी परवंटा देते गाठी
तुमच्या नावासाठी बापाजी हो

बापाजीनं दिल्या लेकी नाही पाहिलं धन
एक पाहिलं निधान कुंकवाला

लेकीच्या बा बापा धन्य तुझं मन
काळजाचा घड देशी परक्या आधीन

बाप म्हणे लेकी जसा साखरेचा खडा
जाशी परघरा जीव होई थोडा थोडा

वाघाचं ग पिल्लू वाघासंगं रानात
बापासंगं बसे बाळ दिवाणखान्यात

चोळ्यावरी चोळ्या किती फाडू शेलारीच्या
पिता दवलत माझा खेपा करतो गालेरीच्या

:::३०:::

संग्राहिका : सौ. नवलबाई शहा

*शेजी ग विचारती कुठं चुडा खरीदला*
*पिता माझ्या दौलतानी माझ्यासाठी मागवीला*

*काळी नी चंद्रकळा परीटदादाच्या धुन्यामधी*
*पिता माझ्या ग दौलतानी केली खरेदी पुन्यामधी*

*काळी नी चंद्रकळा एका धुन्यानं झाली मऊ*
*पिता दौलत बोलताती दिले रुपये साडेनऊ*

*काळी नी चंद्रकळा दोनी पदार रामसीता*
*मोल करितो माझा पिता वया नेसली पतिवर्ता*

*जाती ग साठी माती खाती मी लवणाची*
*पित्या माझ्याला म्हणीत्याती लेक कुणा रावणाची*

*वळवाच्या पावसानं काय मावलपन[1] केलं*
*पित्या माज्या दौलताचं बैल तासाला पानी पेलं*

*वळवाच्या पावसानं फळी मांडली कोसावर*
*पित्या माझ्याच्या उसावर*

*पिता दौलत बोलत्याती लेकी पिकू दे माझा ऊस*
*लावतो डोरल्याला घस*

*पिता दौलत बोलत्याती लेकी पिकू दे माजी साळी*
*करतो डोरल्यामंदी डाळी*

---

१ आश्चर्य, चमत्कार

बारा बैलाची दावईन शिंगी तेरावी कुठं गेली
पिता माझ्या ग दौलतानं बारा बिघ्याची पेरी केली
वाटं ग वरलं शेत नार तोडती शेंगा भेंडी
पिता माझा ग दौलत कुणबी पिकला पहिल्या तोंडी
वाटं ग वरला मळा नार तोडती घोळाईना
पिता माझा ग दौलत कुणबी भिडेचा बोलईना
पिकता पिकईले चार लोकांच्या झालं तोंडी
पित्या माझ्या ग दौलताच्या झालं बिघ्याला सव्वाखंडी
पिकता पिकईलं जन बोलती दिवानात
पिता माझ्याला सांगत्याती घाला वुचाडी लवनात
पिकता पिकईलं जन बोलती चावडीला
पित्या माझ्या ग दौलताची रास लागली वावडीला
हाताच्या आंगईठ्या त्या ग कशानं झिजईल्या
पित्या माझ्या ग दौलतानं राशी साळीच्या मोजईल्या
पिकता पिकईलं पित्या माझ्याला खंडी शेंग
वाणी पुन्याचा झाला दंग

॥३१॥

संग्राहिका : सौ. जैबुन्निसा खान

लाडकी लेक सये लाड सांगे बापापाशी
बाप म्हणे मोती खरे नथनीला घेशी
लेकीसाठी बापा एवढा विरस कशापायी
कन्यादान उरकुनी पुण्य पदरात घेई

बाप म्हणे लेक माझी सोन्याची सळई
जाईल परघरा लागेल उन्हाची झळई

पाटाचं पानी व्हातं सरळ सापावानी
लेकबाई माझी सरळ बापावानी

मांडवाच्या दारी चरवी सांडली तेलाची
लेकीच्या बापाची हुंडी चालली मालाची

माजीया वाड्याच्या उंच उंच भिंती
बापाजी येता जाता माझा कानोसा ग घेती

थोरलं माझं घरं खटलं रेटता रेटंना
बापाजींची जन जत्रा हाटता हटेना

३२

संग्राहिका : श्रीमती आनंदीबाई शिर्के

गुज बोलायाला कशाला व्होवा लोक
गुजाजोगा माझा बाप

गर्तीचा गरतावा चुलीत पारकावा
बापाजीचा माझ्या घरात वारकावा

माज्या रासम्होरं नित दिवानचावडी
वडीलाला न्याय माज्या मन्सूप निवडी

काळी चंद्रकळा तिच्या पदराला मोती
बापाजीनं केलं म्हायार अमरावती

पित्याच्या जिवावं छंद केला फार फार
डाळिंबी विलवर रुपायाला लेली चार

गाई हंबरती वासरे साद देती
पित्या माज्याचा वाडा गवळ्याचा लकापती

बापानं दिल्या लेकी लेकी देऊन झाला वाणी
लवंगा मांडिल्या दुकानी

## ३३

संग्राहक : श्री. रामकृष्ण आ. कदम

उभ्या मी गल्ली जाते पदर डाव्या मुठी
पित्याला म्हनीत्याती कुन्या अशीलाची बेटी

माझी जातकुळ काय पुसशी वेड्या जावू
पिता नाना माझा साऱ्या जवारीला ठावू

डोंगरी किंगरी पावा वाजतो साजनी
गाईचं खिल्लार माज्या पित्याच्या दावनी

उभ्या मी गल्ली जाते माजी हालंना पापनी
पित्या वाघाची दापनी[1]

उभ्या मी गल्ली जाते माजा पदर डुईवरी
माजी नदार भुईवरी

---

१ दटावणी, जरब, धाक.

॥३४॥

संग्राहिका : **सौ. लीलावती पवार**

*माज्या ग म्हायारी मळ्यायात भुंडा ऊस*
*पिता दौलती ग माजा आल्या गेल्या पाजी रस*

*माज्या ग म्हायारी दिसे उसाची ऊससरी*
*पित्या माज्याच्या जिवावं दुनया दिसती दुयेरी*

*म्हायार केलं म्हनू कशी पातळाची घडी*
*पित्या माज्या दौलतीची हौस मनाची केवडी*

*म्हायारपन माजं पिता केल्यानं न्हाईना*
*डोरल्याचा साज वाई खिशात माईना*

*काळी चंद्रकळा काळी कसाई तिचं नाव*
*पित्या माज्या दौलतानं सारी धुंडिली ग गावं*

*म्हायार करितो पिता माजा भोळा राजा*
*ऊंच घडीला हात माजा*

::३५::

संग्राहक : श्री. रामदास खाकरे

*बाप म्हणे लेकी तूं नांदजो भारानं*
*निंदक सोयरा नित् करतो गाऱ्हानं*

*घरात करते धंदा दारात देते कान*
*पित्या बाबाजीवानी कोन करतं रामराम*

*फाटली माझी चोळी फाटल्या दोन्ही धड्या*
*निरोप ने जो गड्या माज्या बाबाजीच्या वाड्या*

*बाप म्हणे लेकी तूं नशिबाची हीन*
*डोंगर शोधूनिया पळसाला पानं तीन*

*सासूचा सासुरवास सोसला जिवावर*
*पित्याच्या नावासाठी रात काढली शिवेवर*

*चांदीचं घंगाळ माझी मोत्यांची चुंबळ*
*सूर्याम्होरं माझ्या पित्याची आंघूळ*

*रात नि दिवस चैन पडंना विछान्यात*
*पित्या माज्या गुजराची मूर्त येती सपनात*

## २६

संग्राहक : श्री. स. र. बिन्नरगुरुजी

शेताच्या पेराला बसलेत बापलेक
तान्हं माजं बोलं पेरणी झाली झ्याक

बाबाजीची बैलं घाटी वाजे माळावरी
तान्हीया बाळाची गाडी गेली थळावरी[1]

गुंतलाय गाडा एवढ्या कोणा गरीबाचा
बाबाजीचा माझ्या बैल न्यावा हरीपाचा

गुंतलाय गाडा तुम्ही आरोळ्यांनी काढा
बाबाजीचा बैल माझ्या आवताचा सोडा

गुंतलाय गाड आरोळ्यांनी काय होतं
बाबाजीच्या बैला थोडं सैल द्यावं जोतं

बाबाजीचा बैल त्याच्या पायामंदी चांदी
सया बोलताती कोण्या हावशाचा नंदी

बैल हावशाच्या पायी पैंजण वाजती
बाबाजी धन्याला खांदी वनात साजती

बैल बाबाजीचे मला वाटतंय भ्यावं
याच्या पायाखाली जुन्या जुंधळ्याचं प्याव[2]

बैल बाबाजींचे कष्ट केलं पान्यावानी
पिकला जुंधळा कणसं आली तांब्यावानी

१ स्थळावर, जमिनीचं नाव. २ पेव, धान्य ठेवण्यासाठी केलेले छोटे तळघर.

बैल बाबाजींचा बांधू देईना कोणाला
हाती सुताचा कासरा हाका मारिते धन्याला

हावशा बैलानं बैठक मारली वसरी
धन्या राजसाला जोडी मागतो दुसरी

बाबाजींच्या बैला दाना देते मी पायली
घाटाच्या तोंडी धन्या तेनं पईन[1] गायली[2]

## ३७

संग्राहिका : सौ. शुभा वाजपेयी

मोठा मोठा लोक मना बापना संगती
जेऊन उठती रोज शिरान्या पंगती

पिता पिता करू पिता मना सातपुड्या
पिताना जीववर मना दुबयान्या उड्या

पिता पिता करू पिता देवसमा देव
पितानं नाव लीध देवसनं काम्हू लेव

पिता पिता करू पिता कायीना वावर
पिताजीना राजे समदा सुखना भंडार

पिता पिता करू पिता व्हतीन व किती
दिना जन्म त्यानं नाव गनपती

---

१ पैज. २ मारली, जिंकली.

देर मना जेठ बोलती म्हना माले
पिताजीले सांगू नका बोलजो सोयराले

देर जेठनी शातीवर संसार करू बानीना
पिताजीले सांगू आड खंदीघा पानीना

शंभरना तोडा पाय टाकू तोली तोली
पिताजींनी दिध्या लेकी पानी भरानी नै बोली[1]

लोकसनी दिध्या लेकी खेडापाडासमां झोकी
पिताजीनी दिध्या लेकी जागा तुयसीरोपी देखी

उगना नारायन उगानी घाई कई
मना पिताजींना दारे दयाधर्मनी ये झाई

सासू मनाशी झगडे देर बोलस वाकडं
पिता तुमनी लेक अशील चांदीन तुकडं

हिराना पोटनी हिरकनी बाप हिरा
त्यानी जी पारख काय करशी गव्हारा

वाघना पोटनी मना वाघना इलाम[2]
काय करू पित्या पडना अस्तुरी जलम

पिता पिता करू पिता कारे सोडी जासू
तुना मचूक[3] किलवानी[4] व्हई जासू

पिता पिता करू पिता नवलाख हिरा
जसा वाघना डकारा[5]

---

१ बोली नाही, अट नाही. २ काळीज, अंतःकरण. ३ वाचून, शिवाय. ४ केवीलवाणी. ५ डरकाळी.

३८

संग्राहिका : सौ. सिंधू भालेराव

बांगड्या भरीते रुपयाच्या नऊ नऊ
मागं म्होरं भाऊ मधी बापाजींचं नावू

बांगड्या भरीते रुपयाच्या आठ आठ
माझीया बापाजीचा मधी केवड्याचा थाट

कुंकाचा टिकला मी किती लेऊ गोलदार
पित्याची पारख जावो माह्या जल्मावर

माज्या ग चुड्याच्या सये रुंद रुंद तारा
पित्याच्या सावलीला लागंना ऊन वारा

पैठण कचेरीला खंदील जळतो जाळीचा
अंजन माजा बाबा हप्ता भरीतो काळीचा[1]

गाव गावीचे पाटील घोडे बांधिती लिंबाला
बाबायाची माज्या शिंगी सरकारी खांबाला

गाव पिंपळवाडी फार हालकी ग नावाला
वडीलाचं मोठेपण नाही तोलत गावाला

जाईल उभ्या गल्ली दंड भुजा पदरात
बाबाजी बसती मोठ्या मोठ्या वजीरात

सुतार लव्हार दोही चालले संगत
बाबाजींच्या घरी माझ्या बसली पंगत

१ जमीन (महसूल)

३९

संग्राहक : श्री. मा. कृ. कोकाटे

बांधिला माळी सोपा खांब रंगीत माळीईला
बापाजी चंदनाचा बाळ जातो जी साळईला

समोरल्या सोप्या दिवा जळतो लोणीयाचा
बापाजी दौलताचा दारी पलंग सोनीयाचा

हौस मला मोठी हांड्या शेजारी तपेल्याची
चांदीचं घंगाळ दारी आंघोळ वडिलांची

दूरल्या देशीयाचा कळंना बातबेत
बापाजी दौलत घाला कागद टपालात

चाटयाच्या दुकानात शालू हिरवा शंभराचा
पिता दौलताचा आला कागद हंबीराचा

मांडवाच्या दारी ढापा हालतो उंबराचा
पिता दौलत आणी आहेर शंभराचा

काशीच्या अवती भवती देवाची पाच गावं
पिता माझा ग दौलत सांगी तीर्थांची पाच नावं

पाटच्या पान्यामंदी वासुदेवाच्या आल्या झुंडी
बापाजीचा माझ्या वाडा बळीयाचा धुंडी

भुकेला बामन दान मागितो डाळीचं
पित्या दौलताचं घर धुंडितो माळीचं

:::४०:::

संग्राहक : प्रा. प्रभाकर मांडे

बाप म्हणे लेकी तू नांदून दाव बया
भरल्या सबमंदी नको लावू खाली पाया

बापाची हो राया तुमच्या पोटी आले नसते
देवजीच्या दारी तुळशी झाड झाले असते

बापाजीच्या राज्यी गुळाच्या गूळभेल्या
भावा तुमचं राज्य भैनी दारावरनं गेल्या

जलमी येऊनी बाई मरुनी जायाचं
बापाजीचं नाव कैलासाला निघायाचं

बापाजीची माया कशी लावणीची जाई
येता तरी जाता हळूवा[१] देते बाई

पंढरपुरात चोळी घेतो माझा पिता
सोनीयाची टीप भरे सत्यभामा माता

चंदन मैलागिरी[२] बया चोळिला कुठूनी
बापाजी चंदन मला गेल्याती भेटूनी

---

१ हेलावा, झोका, हेलकावा. २ मलयपर्वत.

# लो | क | क | था

# अनुक्रम


डॉ. सरोजिनी बाबर, पुणे

बाप्पा

श्री. सु. बा कुलकर्णी, पुणे

राजा न् परदान

डॉ. सरोजिनी बाबर, पुणे

शेंडंफळ

# बाप्पा

## निवेदिका : डॉ. सरोजिनी बाबर

मजी सांगायची काय गंमत की, ही गोष्ट तशी लईंदीची हाय. तर तवा एक गाव हुतं. तितं एक लई मजी लई गरीब माणूस ऱ्हायाचा. इतका गरीब म्हनता की, काय सांगावं? निजायला धरती न् पांघराय आभाळ अशी त्येची गत. घरात बायकू, चार पोरं. ह्येनं काय तरी मिळकत करावी न् त्यावर भागवावं अशी गोष्ट रोजची. तर एकदा ह्येनं काय विचार केला की, आपुन जंगलात जावावं. लाकूडफाटा जमवावा. मोळी बांदावी न् ती विकून यील त्यावर भागवावं. ऱ्हवं ही सहा तोंडं चालायची कशानं गा? खावावं काय? घरात फुटका मनी असल तर शप्पत! म्हणून मग ह्येनं दारात खबुतराच्या तोंडातून पडल्यालं हुलगं केलं गोळा. रोजचा एक हुलगा अशा बेतानं हं! हुलगं गोळा केलं तर बायकूला माडगं करून दे बोलला. आनिक आपुन कुंभारवाड्यात गेला गा! का? कशापाई म्हनचीला तर एकांदा मोगा आनावा म्हटला. गेला. मोगा घिऊन आला. आला तर पोरं म्हटली, "बाप्पा ह्यो कशाला गा मोगा आनलास?" तशी ह्यो कसा म्हनतो, "आनला माडगं न्ह्याला. बगूया नशीब निगालं तर. जातो जंगलात." आनीक बायकूनं

माडगं केल्याव ते ह्या मोग्यात घालून ह्यो आपला जंगलात गेला.

तितं मग ह्येनं काय केलं की, त्यो मोगा दोरीनं बांदला. एका झाडाला टांगला न् स्वत्ता मग जंगलात शिरला. घाम गळस्तोर फिरला. काटकं कुटकं गोळा केली. माघारी आला. मोग्यातलं माडगं पिऊन गावात गेला. मोळी इकली. पैका केला. त्यावर पोरांचं पोट भागलं. बायकूनं उरलसुरलं खाल्लं. असं मग रोज होत गेलं. असा ठरला नेमच जसा काय हं!

होता होता मग त्या जंगलात चमत्कार घडला. काय? चमत्कार घडला तर तिकडून शंकरपार्वतीचं विमान निघाल्यालं. तशी पार्वतीला त्या बाप्पाच्या मोग्यातल्या माडग्याचा वास आला. म्हणून ती काय म्हटली, "देवा, विमान थांबवा. खाली उतरू. चांगला वास आलाय." पण देवानं, कुठलं काय म्हटलं न् चल म्हणाला. पण ही पडली हट्टाला. हितं उतरायचंच बोलली. शंकरानं मग तिचं ऐकलं. दोघजन खाली आले. पार्वतीनं त्यो मोगा बघितला. टोपन उघडलं. लईच चांगला वास आला म्हनताना तिनं त्या मोग्यातलं पाक माडगं पिऊन टाकलं. आणिक त्या बदल्यात म्हणून तिनं त्या मोग्यात पांच लाडू ठेवले. मोगा बंद केला. झाडावर टांगला न् ते मग निघून गेले.

घटकाभरानं मग बाप्पा तिकडं आला. लई भूक लागलीय म्हटला. त्येनं त्यो मोगा झाडावरचा सोडवून घेतला. आणिक आता माडगं पेणार फाकडया तर माडगं कुठाय? बघतोय तर लाडू! "अगा बाबा गा!" बाप्पाची छाती दडपून गेली. जल्मात जे बगाय मिळायचं न्हाई ते साक्षात बघून त्यो हाडबडला. लाडू कुनी दिलं गा माडगं पिवून असं म्हटला. बघत राहिला. देवाची किरपा असल म्हणाला न् त्येनं त्यातला एक लाडू तोंडाला लावला की उचलून! तर वो! लावला तर लाडवाची चव त्येला लई आवडली. म्हणून आपला खात सुटला तर पुन्हा आपले पाच लाडू मोग्यात तयार! कितीबी खावा लाडू पाचीच्या पाची हाईतच आपलं! म्हणताना पोटभर ह्येनं लाडू खाल्ले न् घरला गेला. पोरं खाऊंदेत म्हटला, झाली गोष्ट त्येनं पोरांच्या न् बायकूच्या कानावर घातली. सगळ्यांना आनंदीआनंद झाला. नशीब

चालत आलं असं बायकू बोलली. तिनं देवाला साष्टांग दंडवत घातला.

घरातल्या सगळ्यांनी मग ते लाडू खाल्ले. कितीबी खावा. पुन्हा आपले पाचीच्या पाची लाडू मोग्यात हाईतच हं !

तर एक दिवस काय झालं की, पोरांला उदंड आऊक मिळावं म्हणून बाप्पानं विचार केला. उभ्या गावाला लाडवाचं जेवण द्यावं म्हटला न् पिटविली दैंडी म्हणीणासा. पण गाव काय म्हटलं की, ह्येच्या लेकाच्या घरात खायला प्वाटभर न्हाई तर ह्यो लाडू कुठलं गा देणार ? म्हणून माणसं दुचीत पडली न् कोणच आलं न्हाई. बाप्पानं मग काय केलं की, आपल्या पोरांचे मैतर बोलीवले. त्यांला लाडू खायला दिले. दिले तर पोरं गेली हारखून न् दाबून खात बसली. किती खाल्ले म्हनचीला तर पाक पोट तडीला लागू पावतर. हां ! मग ती गेली घरला न् ही वार्ता गावभर पसरली. जशी काय वारं पळत सुटावं अशा चालीनं.

झालं. मग उभ्या गावानं लाडू खाल्ले न् बाप्पाच्या पोरांला उदंड आयुक चितलं. आशीर्वाद दिला. ह्येचं चांगलं होऊंदे म्हटली माणसं. तशीं काय गंमत की, त्या गावातला धनशेटजी जरा चिडला. 'मी लाखपती माणूस. माज्यापेक्षा ह्यो कोन गा वरचड आलाय' म्हटला न् त्येनं ह्या बाप्पाच्या नावानं लाखानं शिव्या मोजल्या. पण कावळ्यानं सराप दिला म्हन काय दांडी मोडती काय गा ! छाट् ! बाप्पाला चांगले दिवस येत गेले. त्येनं पाक जंगल तुडविलं न् सात तळाची माडी बांदीन म्हटला.

इकडं तंवर काय झालं की, त्या धनशेटजीनं आपल्या बायकूला बाप्पाच्या घरला जा म्हटलं. कारण काय तर लाडवाची काय भानगड हाय ती बघावी. आता न्हवऱ्यानं सांगितल्याव बायकू न्हाई म्हनतीया काय ? गेलंच पाहिजे तिनं. म्हणून ती बाप्पाच्या घराला गेली. बाप्पाच्या बायकूनं खरं हुतं ते हिला सांगितलं न् मग ही घरला आली. आली तर अशानं असं हाय म्हन तिनं धनशेटजीला सांगितलं. आधीच पैशाचा लोभी ह्यो तर हे ऐकून आनीकच बावचळला. कुंभारवाड्यातनं मोगा घिऊन आला. बायकूकंडं माडगं करून घेतलं. मोगा

भरला न् गेला की स्वत्ता जंगलात! पण त्येला लई भ्या वाटलं. लई मजी लईच. घर सोडून कवा जंगलात एकला गेलाच न्हाई तर! मग त्येनं काय केलं की, त्यो मोगा बाप्पा टांगतो त्या परमान एका झाडाव टांगून दिला न् आपुन एका झाडामागं दडून बसला.

तितक्यात शंकरपार्वतीचं इमान तिकडून आलं. पार्वती खाली उतरली. तिनं त्या मोग्यातलं माडगं पिवून टाकलं न् बक्षिसी म्हणून त्यात घातल्या लाथा न् बुक्क्या! वर मग मोगा झाकला न् शंकरपार्वती आली तशी आपली निघून गेली. गेली तर हा हळूच उठला. त्येनं सगळं बघितल्यालं. म्हणताना घाई-घाईनं मोगा उगडाय गेला तर हात झटाकला न् ह्यो धाड्दिशी मागं आपटला. ह्येच्या अंगाव लाथाबुक्क्यांचा जसा काय भडिमार उसळला. तशी लागला आरडाय वरडायला न् मेलो मेलो म्हणायला. पण येणार कोण गा सोडवायला? न्हवं देवाला काय कळत न्हाई का कोण चांगला न् कोण वाईट ते? पाक कळतंया म्हणून तर ही शिक्षा.

धनशेटजीनं मग हळूच त्या मोग्याला हात जोडले न् लांबनंच त्याव झाकण टाकलं. तशी ह्यो हाग्या मार बंद झाला न् तिरमिरी येऊन पडल्याला ह्यो फाकड्या मोगा घिऊन घरला आला. बायकूनंही किनव्या घरला आनलीया तर भोगूं दे म्हटला ह्यो वानवळा न् त्येनं तिला एका खोलीत ढकलून दार बंद केलं. आत मोगा ठेवल्याला. तशी त्यो बघून हिला काय वाटलं की, धनलक्ष्मी चालत आली घरला. म्हणून तिनं हावऱ्यागत त्या मोग्याचं तोंड उडलं तर काय चमत्कार! हिच्याव्र लाथाबुक्क्यांचा हलकल्लोळ उसळला. हिनं आरडूनवरडून त्यासरशी सारं गांव गोळा करायचा बेत केला. पण धनशेटजीनं मोगा झाक म्हटल्यावर तिनं तसं केलं न् मार थांबला. मग ती भाईर आली ती नवऱ्याला बोटं मोडीतच.

ह्यानं मग काय विचार केला की, गावजेवण घालावं. बाप्पापेक्षा लोक येतील म्हटला. दवंडी पिटली. गल्लीगल्लीनं आवातनं गेलं. झाडून सारं गाव जेवाय आलं. लांबच लांब पंक्ती बसल्या. अगदी अच्याट पंक्ती हं! तर ह्येनं

मोगा उघडला मात्र न् साऱ्या पंक्तीच्यावर लाथाबुक्यांचा मारा होत सुटला! माणसं लागली बोंबलायला न् सैरावैरा पळायला. अशी काय दुनियावन दुनिया झाली ती कुणाला कळचना. म्हणताना ह्येनं मोगा झाकला. तशी माराचा सपाटा मागं हटला न् माणसं जीव मुठीत धरून घरला पळत सुटली. आपल्याला तरास झाला तर त्यो दुसऱ्याला पण हूंदे म्हणणाऱ्या धनशेटजीला बरं वाटलं. त्यासरसी त्येच्या घरातली धनलक्ष्मी उठली न् गेली थेट बाप्पाच्या घरला. तिच्या हाती अमृताचा तांब्या. पदरी रामसीता. मुठीत धनदौलत. तर आपली अमृताचा सडा घालीत तिनं बाप्पाच्या घराचं जोतं वलांडलं न् तिथं समृताचा वाडा उभा राहिला. बाप्पानं तिला पोराबाळांसकट दंडवत घातले न् काळजाच्या पायघडीव बस म्हटला.

पुढं मग त्येला चांगले दिवस आले न् त्येची पोरं शाणीसुर्ती झाली. सगळीकडं आनंदीआनंद झाला. बाप्पानं मग सुखानं राज्य केलं. तर ते आपुन पण तसं करूया.

# राजा न् परदान

निवेदक : श्री. सु. बा. कुलकर्णी

राजानी आन् परदानानी मोटी भान्गड् हिनीही। परदान् राजाला इसा आखह। राजा तुना सोहरा आदीक् का जीव आदीक्। त राजा इसा आखह की सोहरा माना आदीक्। राजा हेर व फश्शील्। हे मन्ले नायी फसुला। त राजा परदानाला आखह। तू मन्ले मापा बाचहस्। तू माला परदान् नाही लागस्। दुस्रा परदान् मा ठेवीन्। आता यो परदान् रागेजी त्याचे घर ग्याहा।

आता यानी काय गम्मत् करीहो। माटाने भाजीना दाण्ड् बाहाटीओडा तोड़ाहा। आन् आगुटीमा पोलाहा। आन् त्याला नरम् कराहा। आन् रात्ना

---

राजाचे आणि प्रधानाचे मोठे भांडण झाले. प्रधान राजाला म्हणे, "राजा तुला तुझा मुलगा अधिक प्रिय की जीव अधिक प्रिय?" तर राजा म्हणे, "माझा मुलगा अधिक प्रिय!" राजा, पहा हो फसशील." "छे! मी फसणार नाही." तेव्हा राजा प्रधानाला म्हणाला, "तू एवढा माझ्याशी वितंडवाद घालतोस, तर तू मला प्रधान नकोस. मी दुसरा प्रधान ठेवीन." असे ऐकल्यावर हा प्रधान रागाने त्याच्या घरी निघून गेला.

आता ह्यानें काय गंमत केली? मनगटाएवढा जाड माठाच्या भाजीचा दांडा घेतला व तो विस्तवात पोळून मऊ केला. रात्रीचा राजाच्या घरी गेला. राजा आणि राणी

लिहीन् राजाने घर ग्याहा। राजा आन् रानी दोनी आपला बाळाला उङ्गमा लिहीन् निज्नात्। ये पर्दानानी मदानीने चाईहिन् बाळाने शातीवर् तो भाजीना डाम्त्र् त्याला सापाने गत् पेड् करीहिन् थेवाहा।

आता राजा आन् रानी सकाळ्ने उठ्नाहात्। आन् इसा बाळाने शातीवर् हेरहत् त मोटा साप्। आता राजाने नवा पर्दाना ली वाहारी आनाहा। र पर्दाना माने बाळाने शातीवर् साप् आहा तो मार्। आता पर्दानाने हातामा सुरी लिदीहि आन् मारु लाग्याहा साप्। त पर्दान् राजाला आकह। साप् मारीन् पन् बाळ्हूं मरील्।

त आता राजा इसा आखह। आता मन्ले काय् कर्वां। त आता इचार इसा करह। साप्हूं मरह आन् बाळ्हूं मरह। आता मा धरूला जाईन् त माहूं मरीन्। आन् बाळ्हूं मरील्। आता काय् कर्वां। आता मन्ले पर्दान् आप्ला जुना आहा। ज त्याला वाहारी ये।

आता ते पर्दानाला वाहारी आनाहा। तुला राजाने आताने आता बोल्वाहा। आता यो पर्दान् ग्याहा। राजाला काय् आकह। माला तूय् नापास

---

दोघेजण आपल्या बाळाला पुढ्यात घेऊन झोपले होते. मध्यरात्रीच्या सुमारास या प्रधानाने तो भाजीचा दांडा सापाप्रमाणे पेड करून राजपुत्राच्या छातीवर ठेवला.

राजाराणी सकाळी उठले आणि पहातात तो राजपुत्राच्या छातीवर मोठा साप. तेव्हा राजाने नव्या प्रधानाला बोलावून आणले. "प्रधाना, माझ्या बाळाच्या छातीवर साप आहे तो मार." तेव्हा प्रधानाने हातात सुरी घेतली व तो साप मारायला गेला. प्रधान राजाला म्हणाला, "साप मारीन पण त्याच्याबरोबर बाळही मरेल."

तेव्हा राजाला विचार पडला की आता काय करावे. त्याने असा विचार केला की सापही मरेल आणि बाळही मरेल. मी साप धरायला जाईन तर मीही मरेन आणि बाळही मरेल. आता काय करावे. तेव्हा त्याने त्याच्या जुन्या प्रधानाला बोलावून आणण्यास सांगितले.

तेव्हा त्या प्रधानाला बोलावून आणले. तुला राजाने आताच्या आता बोलावले आहे. आता हा प्रधान आला आणि राजाला म्हणाला, "मला तू नापास ठरविलेस?"

कराहास्। आन् माला आता कासा वाह्राहास्। माने बाळाने शातीवर् साप आहा। तो किसा मार्वा। त्याला मन्ले आता काय् कर्नार। ओडाच् का मन्ले आहा। त हां।

आता यो परदान् ग्याहा। माने मागा मन्ले कोन् येसाल् नुको हा। मा मन्ले जाताहां तो हेरुला साप्। आता यानी वती विझ्वी टाकीही। आन् ते बाळाने शातीवर् साप् हता तो उक्लांहा। आन् खिसामा घाली थेवाहा। आन् त्यानी साप दुस्रा मारीहीन् खिसामा लिहीन् गयेल्। तो वाहेर् काडाहा।

आता ते बाळालां उक्लाहा आन् कड्यावर लिदाहा। राजापा लिहीन् ग्याहा। राजाला काय् आखह। यो तुना बाळ् ले। आन् यो तुना साप् ले। आता परदान् राजाला इसा आकह। की राजा बाळ् अदीक् आहा इसा तू आकइस्। मड्ग् तुने बाळाने शातीवर् साप् हता तो तू धर्शील् कासा नाही। त मन्ले माला चावील्। आन् मा मन्ले मरील्। मड्ग् तू आकस् तो की बाळ् अदीक् आहा माना। त राजा ज्याना त्यना जीव् अदीक् आहा। त तुला नाही वाटील

---

"माझ्या बाळाच्या छातीवर साप आहे तो कसा मारावा?" "त्यात काय मोठेसे आहे? एवढेच काय काम आहे?" तर राजा म्हणाला "हं!"

तेव्हा हा प्रधान गेला. "माझ्या मागे कोणी येऊ नका हं! मी जातो तो साप पहायला." तेव्हा त्याने दिवा विझवून टाकला आणि त्या राजपुत्राच्या छातीवर साप होता तो उचलला व खिशात घालून ठेवला. त्याने खिशामध्ये एक दुसरा साप मारून आणला होता तो बाहेर काढला.

आता त्या राजपुत्राला उचलले आणि कडेवर घेतले. राजाजवळ त्याला घेऊन गेला आणि राजाला म्हणाला "राजा, हा घे तुझा बाळ आणि हा घे तुझा साप." आता प्रधान राजाला म्हणाला, "राजा, मुलगा अधिक प्रिय असे म्हणत होतास, मग तुझ्या मुलाच्या छातीवर साप होता तो पकडलास कसा नाहीस?" पण तो मला चावला असता आणि मी मेलो असतो." "मग तू कसा म्हणत होतास की मला माझा मुलगा अधिक प्रिय आहे? राजा ज्याचा त्याचा जीव ज्याला त्याला अधिक आहे. तुला नाही

तीं। बाळ् मरील् त माहा मरीन्। आता यामा तू वळक् की परदान् लवाड् का राजा खरा। त राजा आखह येक्दा पाय् पडुला तट दोन्दा पडीन्। त तूज़ मन्ले मोटा आहास् आन् मा खोटा आहा।

---

असे वाटले की मरतो आहे तर मीही मरावे? आता यामध्ये तू ओळख की प्रधान लबाड की राजा खरा." तेव्हा राजा म्हणू लागला, "प्रधाना, तुझ्या एकदा पाया पडायचे तेथे दोनदा पडीन. तूच मोठा आहेस; मी खोटा आहे!"

# शेंडफळ

निवेदिका : डॉ. सरोजिनी बाबर

फार दिवस झाले त्या गोष्टीला. असंच आपलं एक गाव होतं. तिथं एक गरीब माणूस रहात होता. रानात जावं, लाकडं तोडून आणावीत आणि बाजारात नेऊन ती विकावीत तेव्हा कुठं पैपैसा मिळायचा. हाच त्याचा उद्योग, त्यावरच त्याचं आयुष्य. त्याच्या संसाराचा तेवढाच आधार. तर अशा या माणसाला सात मुली होत्या! एकीचढ एक देखणी. अगदी नक्षत्रासारखी. पण त्यांच्या पोटाला वेळेला कधी मिळायचं नाही.

तर एकदा काय गंमत झाली, ह्या मुलींना पुरणपोळी खावीशी वाटली. तशी त्या माणसानं बायकोला म्हटलं, "अग अग!" तर ती म्हणाली, "काय म्हणतायसा वो धनी?" त्यावर त्यानं सांगितलं, "पोरीस्नी पोळी पाइजे. करून दे." मग तिनं विचार केला. पुरणाच्या सातच पोळ्या मोजक्या केल्या. त्या पोरींना खाऊ घातल्या.

संध्याकाळी तो माणूस घरी येऊन बघतो तो आपला हा प्रकार. आता काय करायचं? पुरणपोळी तर त्याच्या फार आवडीची. पण खावी म्हटली तर बुटी मोकळी! त्याला भारी राग आला. फडाफडा बोलला. मारहाण

करू लागला. तशी पोरी आडव्या आल्या. त्यांना पण त्यानं चापट्या मारल्या. आणि मग राग थोडा निवाल्यावर बायकोला म्हणतो कसा, "या कार्ट्यांचा लई तरास. त्यांना जंगलात सोडून देतो. तिथं मग त्यांना वाघ, सिंह, आस्वल ही मंडळी गपागप खाऊन टाकतील. ह्यांचं पुना नाव नको!"

आणि खरोखरच एक दिवस त्या माणसानं ह्या साती पोरी काढल्या की घरातून बाहेर! बायकोनं पुष्कळ समजूत घातली. पण त्याचा हेका कायम. प्रत्येक पोरीच्या हातात फुलं गोळा करायला परडी देऊन त्यानं सगळ्यांना जंगलात आणलं. 'फुलं फळं गोळा करून आणा' म्हणून बजावलं. आणीक स्वतः लाकडं तोडायला म्हणून गेला. जाताना नाही म्हणायला धाकट्या पोरीचा तेवढा मायेनं मुका घेऊन त्यानं एवढीच बडबड केली, "हे माझं शेंडफळ नाव काढील."

इकडं या सात मुली दिवसभर जंगलात भटकल्या. मग एका जागी जमल्या. बापाची वाट बघत राहिल्या. जवळची भरलेली परडी निरखीत उभ्या राहिल्या. पण बघतात तो रात्र झाली तरी बापाचा पत्ता नाही. न्हे तो परस्परेच घरी गेलेला, तर येईल कसा? पण ह्यांना बिचाऱ्यांना ते कुठलं माहीत. त्या आपल्या आशेने त्याच्या वाटेकडं डोळे लावून राहिल्या. आता बाप येईल, मग येईल म्हणून त्यांनी खूप वाट पाहिली. पण बाप काही आला नाही. अखेर शेवटी त्यांनी ते जंगल सोडलं आणि वाट दिसंल तिकडं त्या निघाल्या.

होता होता काय झालं की, वाटंत त्यांना एक जांभळीचं झाड लागलं. टिप्पूर चांदणं पडलेलं. पोटात दाबून भूक लागलेली. त्या कारणानं मोठी मुलगी सरसर झाडावर चढली. तिनं एकेक जांभूळ पारखून खाली टाकलं; बाकीच्यांनी त्यांचा फन्ना उडविला. पण गंमत अशी झाली की, त्या धांदलीत धाकट्या मुलीच्या वाटणीला एकही जांभूळ आलं नाही! ते मोठीनं बघितलं. तिनं एक जांभूळ धाकटीसाठी म्हणून खाली टाकलं आणि स्वतः खाली उतरली. पण बघतेय तो ते जांभूळ मुंग्यांनी उचललं. तशी ह्या मुंगीच्या मागं धावल्या. धाकटी मुंगीच्या पाठोपाठ चालली. पण मुंगीनं काही जांभूळ सोडलं नाही. तर ती गेली ती थेट एका मोठ्या राजाच्या घरात!

धाकटी मागोमाग तिथं आली. पहातेय तर एक मोठा राक्षस दरवाजात झोपलेला. आता काय करावं ? आली का पंचाईत ? धाकटीनं विचार केला. बाकीच्या बहिणींना बाहेरच थोपवून ती हळूच आत वाड्यात गेली. तिथं एका मोठ्या कढईत दूध तापत होतं. धाकटीनं ते रसरसत्या निखाऱ्यावरचं उकळलेलं दूध नेलं आणि राक्षसाच्या तोंडावर ओतलं. तसा तो राक्षस तडफडून तडफडून मेला. मग सगळ्याजणी बिनघोरी वाड्यात शिरल्या. आत जाऊन काय काय म्हणून बघतात तो सगळा सैपाक ऊन ऊन असा तयार. सगळ्याजणी मग आनंदानं पोटभर जेवल्या.

नंतर त्यांनी वाडा बघितला. तिथं खूप खोल्या होत्या. प्रत्येकीने एकेक खोली ताब्यात घेतली. आणीक आता त्या झोपायला जाणार तेवढ्यात देवघर दिसलं. सगळ्या तिकडं वळल्या. देवघराचं दार धाकटीनं उघडलं. आत राम-सीतेची मूर्ती होती. सगळ्याजणी देवापुढं बसल्या. देवाला नमस्कार केला. सीतामाई प्रसन्न झाली. तिनं मुलींना दर्शन दिलं. धाकटीला कानात बोलली, "कोंड्याच्या खोलीत नीज. तुझं भलं होईल."

धाकटीला ते पटलं. सीतामाई गुप्त झाली. सगळ्या मुली झोपायला गेल्या. धाकटी कोंड्याच्या खोलीत गेली. तिथं सगळीकडं मौल्यवान मोहरा होत्या. इतर मुलींच्या खोलीतही काही ना काही होतंच. कुणाच्या खोलीत मोती, कुणाच्या पोवळी, कुणाच्या हिरेमाणीक असं काही होतं.

एक दिवस सगळ्याजणींनी बेत केला. बापाच्या घरी जायचं ठरवलं त्यांना आईची फार आठवण झाली. प्रत्येकीनं वाड्यातील एकेक हत्ती घेतला. खोलीतला माल हत्तीवर अंबारीत ठेवला आणि निघाल्या.

इकडं तोवर धाकटीनं काय केलं की, सगळ्या मोहरा गोणीत घालून त्यावर शेणमाती लिंपली आणीक मग तीही आपल्या बापाकडं निघाली.

होता होता वाटंत काय झालं की, चोर आडवे आले. त्यांनी सहाजणींची मालमत्ता लुटली. धाकटीच्या मालमत्तेला घाण माखलेली बघून तिच्या कुणी वाटेला गेलं नाही.

पहिल्या सहाजणी रडत रडत घरी आल्या. त्यांना हात हालवीत आलेल्या बघून बापानं घरात घेतलं नाही. 'चालत्या व्हा' म्हणाला. तेवढ्यात धाकटी आली, तिनं बापाच्या पुढं सगळ्या मोहरा ओतल्या. बाप आनंदला. हारखून गेला. म्हणाला, "माझं शेंडंफळ खरं नशीबवान." आणी त्यानं तिला प्रेमानं कुरवाळीत जवळ घेतली.

धाकटी शहाणी होती. तिनं बाकींच्या बहिणींची झाली हकीकत 'अशानं असं झालं' म्हणून बापाच्या कानावर घातली आणि त्यांना घरात घ्यायला लावलं.

सगळीकडं मग आनंदी आनंद झाला.



# दवण्याची रोपं



(आईवडील)

# अनुक्रम


प्रा. गजमल माळी, औरंगाबाद :: सौ. शांतादेवी बाबर, वागणी, सांगली.

सौ. कुमुदिनी पवार, चितळी, सातारा :: सौ. शरदिनी मोहिते, सांगली.

सौ. मालतीबाई दांडेकर, कोल्हापूर :: श्री बाजीराव पाटील, चिखलगाव, अकोला.

डॉ. सरोजिनी बाबर, पुणे :: सौ. कमलाबाई बडवे, पंढरपूर, सोलापूर.

सौ. ताई रानडे, नासिक :: सौ. पुष्पा घाटगे, कोल्हापूर.

श्रीमती राधाबाई देसाई, वागणी, सांगली :: सौ. सजाताई सावंत, वागणी, सांगली.

सौ. यशोदा पाटील, वागणी, सांगली :: सौ. सिंधू वारनूळकर, कोल्हापूर.

श्री. ना. रा. शेंडे, नागपूर :: कु. उषादेवी बागल, कातरखटाव, सातारा.

सौ. जैबुन्निसा खान, गेवराई, बीड :: श्री. वि. बा. जोशी, चंद्रपूर, चांदा.

सौ. सुमन नलावडे, भवाळी, जळगाव :: सौ. शशिकला पाटील, रामानंदनगर, सांगली.

श्री. ए. आ. गुंजाळ, खडकजांब, नासिक :: सौ. नवलबाई शहा, बोरगाव, सांगली.

सौ. शालिनी घोटे, किनवट, नांदेड :: श्री. वि. भि. वाव, हिंगणी बु॥, अकोला.

सौ. इंदिरा कुळकर्णी, अमरावती :: कु. चांदबिबी शेख, पुणे.

श्री. ना. ना. शिंदे, माढे, सोलापूर :: सौ. हव्वाबी खान, पुणे.

श्री. बा. शि. पाटील, महाळुंगे पडवळ, पुणे :: श्री. रा. श्री. कदम. सातारारोड, सातारा.

श्री. स. र. बिन्नरगुरुजी, समशेरपूर, अहमदनगर :: श्री. प्र. रा. भामरे, देरेगाव, नासिक.


श्री. मा. ल. सोमवंशी, लांडेवाडी, पुणे :: सौ. शुभा वाजपेयी, धरणगाव, जळगाव.

श्री. प्र. सी. शिळणकर, तळेगाव द., अमरावती.

श्री. बाळासाहेब बारमुख, तळेगाव (दा.), पुणे. :: सौ. सिंधू भालेराव, अहमदनगर.

श्री. मा. कृ. कोकाटे, सांगली. :: श्री. प्रभाकर मांडे, परभणी.

सौ. विमल थत्ते, हैद्राबाद.



# जिव्हाळ्याची पासोडी

मथुरेच्या गौळणीगत रवीवारडीत घुसळण करणाऱ्या आणि तिन्हीसांजेला हंबरत्या गाईवासरांना सोडून रायानंदाला अमृताचा घोट देत दुधानं चरवी भरणाऱ्या आईची न् बाप्पाजींची दृष्ट ज्यावेळी लक्ष्मीआई काढते त्यावेळी ऊर आनंदानं भरून येतो. चटक चांदणीच्या रूपानं घुंगुरती जोडवी वाजवीत ती दारात आली म्हणजे सोन्याच्या शिंगांच्या बैलजोडीची दृष्ट ह्या घरधन्यांच्या सकट काढते. त्यावेळी पाणंदीला कृष्णदेव गाईम्हशींच्या बाळनंदामध्ये खेळत पावा वाजवीत असतो. त्यासरशी फळभाजींनी दाटलेल्या मळ्यातील उसाचा तुरा डोलायला लागतो आणि बाप्पाजीबयांच्या दारातील गाईंची दावण समाधानानं हुंकारते. आणि ओसरीवर पडलेल्या धान्याच्या राशीची ठेवरेव हौसेनं ही लक्ष्मी-आई करीत सुटते. ते बघून आमच्या मनीचा शीण उतरतो. अशा मनोहारी अमृताच्या कुंडात आपला जन्म झाला या आनंदानं शरीर व मन रोमांचीत होतं. आणि त्या नादात मग काळीज बोलत सुटतं. शब्दांना गळा गवसतो. जिव्हाळ्याची बोलणी सुरू होतात. चंदन मैलागिरीप्रमाणे वाटणाऱ्या बाप्पा-जींच्याबद्दल आणि गोड नारळीगत दूध पाजलेल्या आईबद्दल काय बोलू न् किती बोलू याची भूल पडते.

*बापाजी बयाबाई दोन दवन्याची रोपं*
*त्येंच्या सावलीला मला लागती गाढ झोप*

या कल्पनेला अशावेळी भव्य उड्डाण घ्यावेसे वाटते. हृदयाला कवटाळून बसलेल्या मनोभावनेला सरसावून पुढे यायचा मोह होतो. मनाला उभारी चढते.

आणि मग वडील सागर तर आई सरिता, वडील आंबा तर आई गोंदण, वडील वड तर आई जाई, असल्या उपमा सुचायला लागतात. त्यामुळं अंगावरच्या शेल्याच्या पदरात या भावनेचा पखवाज घुमतो आणि चैत्रपालवीगत उल्हासानं मन तरंगत सुटतं. एखाद्या दरियात निशाणाचं जहाज चालावं त्याप्रमाणं हा मनीचा मोर डुलायला लागतो. आणि मग एखादी लेकबाळ ह्या चिंचेच्या सावलीत मनाच्या चंद्रज्योती पाजळून म्हणते कशी—

*माझा सये पिंड बाप्पाजींच्या दंडभुजा*
*मावली बयाबाई तोंडावळा ग तुझा*

*माझा ग अंगलोट जाईच्या फोकावानी*
*बया माऊलीनं जोपा केलीया ल्येकावानी*

*कृष्णाबाईच्या पाण्याची चूळ भरता जाते तान*
*बाप्पा बयाला देखूनी सन्तूषी माझं मन*

तर ते ऐकून ऐकणारा एवढा भुलून जातो की, बोलायची सोय नाही. बारीक पिठाच्या चौघडी भाकरीची चव जिभेवर घोळावी न् त्या धांदलीत कोल्हापुरी मसाल्याच्या कालवणासंगं दाबून जेवल्याचा त्याला आनंद व्हावा अशा वेळी ही लेकबाळ—

*मोठे मोठे डोळे भुवयामंदी बाक*
*लाडके मैनाबाई गोरे नागिनी रूप झाक*

*ल्येकाचं नवस तुला केल्याती लेकीबाई*
*लाडकी मैना माजी मोगऱ्यामंदी जाई*

*आंब्याची आंबराई चिंचबाईचा तेगार*
*सावळ्या मैनाईला डोळं लागलं जबर*

*कुरूळ्या केसाची अंगाशेजारी पडती वाकी*
*तू ग दैवाची माझ्या लेकी*

*नाकाच्या नथनीला मोती लावीले सात*
*मैना केवड्याची जात*

आईनं केलेल्या ह्या कोडकवतीकाचं मोजमाप मनाशी करीत राहाते आणि—

*शेजे बाजेवरी उंसुशी भिंगाची*
*मैनाबाई माझी पोफळी रंगाची*

*सडा सारवन चूल भानूशा लकालकी*
*तुला आईचं गुण लेकी*

*माळ्याच्या मळ्यामंदी मेथीबाई डहूळली*
*तान्ही माझी मैना गर्भीण पाण्या गेली*

*माहेरच्या वाटे सरीबिंदुल्या झोळण्यात*
*लाडक्या मैनाईचं बाळ तान्हुलं पाळण्यात*

वडिलांनी आपल्या लाडाकोडाचा असा विचार केल्याचं आजीकडून किंवा आत्याकडून हिला कळलेलं असतं. ते लक्षात घेत तिचा जीव आणखी सुखावतो. तर हे वचून पहाणाराची तहानभूक हरपते आणि तोही आपसूकच मग—

*मैना माझी बाळंतीण मला कळून सव्वा महिना*
*खण अंगीला घ्यावा फैना वर काढावी राघूमैना*

असली वडबड करून आपल्या मनीचं समाधान बोलून मोकळा होतो. ते हिच्या कानावर नेमकं जातं हं! म्हणून मग ती आपली ओळखपाळख देताना आपल्या घरंदाज वळणाची भाषा त्याच्या कानांवर घालते—

"जोडव्याचा पाय हळू वाजला की, त्या चालणीवरूनही पतिदेव आपली पारख करतात. गरतीची लेक आहे म्हणतात. गल्लीबोळानं जाताना आपली नजर खाली असते त्यामुळं सातीसमुद्रागत असलेल्या माझ्या दौलती नानारावांना उभं जग नावजतं. घरात जाच असला तरी मी वडिलांच्या कुळशीळासाठी तो

आनंदानं सोसते. चंदनासारखा देह झिजला त्यापायी तरी मी आनंदात रहाते. आणिक कुणाची जर वाकडी नजर फिरलीच तर सांगून मोकळी होते की—

*आमी पाटलांच्या मुली जशा तलवारींच्या अण्या*
*जाईल पानी तुज वोळ दुरूनी शहाण्या*

बास. पुन्हा कोणी नाव काढायची विशादच नाही. अंहं! आणि कोणी गरीब श्रीमंतीवरून नाव काढलंच तर मग उगाच हिणवून घेत नाही. उलट—

*संपदेच्या नारी नगं व्हऊस उताणी*
*दुपारची सावली देखिली कइकांनी*

असं बोलत ती आपल्या माहेरची श्रीमंती—

*आईवाचूनी माया न्हाई भैनींवाचून जिवाळा*
*काय झुलव देतो पाण्यावाचून लवाळा*

अशी सांगून टाकते."

आईवडील ह्या स्वभावानं हारखून जातात. आणिक सासरी गेलेल्या लेकीचा आठव उराशी बाळगीत—

*थोरलं हिचं घर काम करीते ईळभर*
*कपाळीचं कुंकू न्हाई सुकलं तीळभर*

लेकीचा अभिमान चारचौघांच्या कानांवर घालतात. अशावेळी जन्मल्यापासून जिवापाड सांभाळलेल्या लेकीला उभ्या वाऱ्यानं येऊन पालापाचोळा गोळा करीत जावं तसं सासरच्यांनी तिला घरच्या कळपातून उचलून नेली ही खटकणारी भावना ते मागं सारतात. त्यासरशी कुणीतरी—

*सम्रताच्या नारी डाव्या बाजूनं माज्या चाल*
*तुझ्या चितांगाचं मोल कुंकवाला दिलं काल*
*शेरभर सोनं शेजी झाकून घेते गळा*
*कपाळीचं कुंकू माझा उघडा पानमळा*

*सकाळच्या पारी माझा हात देता घेता*
*पिता दौलतीची कन्या मी भाग्यवंता*

*पहाटच्या पाऱ्यामंदी माझा उघडा दरवाजा*
*सावळा क्रिष्णदेव गस्त घालीतो बाळराजा*

लेकीचा हा मनोभाव अभिमानानं कानांवर घालीत आलं की, त्यांचा जीव एवढा होतो. आणि मग आपल्या मुलांच्या कवतिकाच्या गोष्टी करीत व एकमेकांच्या आठवणींना उजाळा देत ते कितीतरी वेळ सुखावतात. अशा वेळी त्यांच्या जिवाला एवढा आनंद होतो की—

*मध्यान रात झाली चांद माळीच्या खाली गेला*
*देव माधवजी गुजा आला*

ह्या आनंदात त्यांची ब्रम्हानंदी टाळी लागते! त्या गोष्टीचा साक्षात्कार लेकीला आपल्या घरी होतो न् ती जो भेटेल त्याला सांगत सुटते—

*गोंडाळ माझे हात जाती म्हायारी सपनात*
*सोन्या मोत्यांचे विळोर मला येती टपालात*

१

संग्राहक : प्रा. गजमल माळी

जन जाते जतराले[1] मी त जाते माहेराले
दोनी माजे मायबाप काशीतीरथ पाह्याले

गादली[2] मही डोकी केसाच्या झाल्या लटा
डोई इचरे मही माता पानी टाकी मह्या पिता

हातात बटवा वानी हिंडतो कहीचा
आई न बापाचा सौदा मिळंना दोहींचा

बापराज महा काशीखंडाचा पिंपळ
मायबाई माजी झाड तुळशीचं झपाळ[3]

बापराज महा काशीमंदी पिंपळ हाले
मायबाई माजी पान्यामंदी नाव चाले

आईबापा घरी लेक लयंदी[4] नसावी
गवळणबाई सवंदर कामात असावी

सासरी जाते येळी बाप म्हनं जाय बया
आईची येडी माया लांब येती समजाया

माहेराले जाते माज्या जिवाला इसावा
बापाजी बयाजी सारा संबंध असावा

१ यात्रेला. २ मळली, घाण झाली. ३ डौलदार, गोलाकार. ४ पुष्कळ दिवस.

बापाजी बयाजी दोनी अमृताची कुंडं
त्यात जलामला आम्हा बाळायाचा पिंड

माता न्हाऊ घाली येशीला गेला लोट
बापाजी चंदनानं माळ्यानं धरली मोट

॥२॥

संग्राहिका : सौ. शांतादेवी बाबर

जिवाला जड भारी कसं कळालं माझ्या बापा
आईनं वळकीलं परसरदारी होता चाफा

आई नि बाप माझे दोनी तुळशीची रोपं
दोनींच्या सावलीला मला गर्क[1] येती झोप

माय नि बाप दोनी जशी काशीची देवळं
हावशा बंधू माझा वर निशाण पिवळं

जिवाला माझ्या जड सांगे माळीण जाता जाता
बया माज्या मालनीनं तांब्या ठेविला तोंड धुता

सरीलं दळायान माज्या सुपात नागसाप
जन्म दिलेला मायबाप

आईबापांनी दिली लेक नाही पाहिला वाडाहुडा
सोप्या पाहिला मोटनाडा

१ गार, निवांत, गाढ.

पित्या माझ्या दौलतानं ताटी ठेविला घास घेता
हावशा बंधूजीनं चंची ठेविली पान खाता
भावज गुजरीनं करंड सारिला कुंकू लेता
आजी मालन बोलयीती लावा कंदील जावा आता

बया पुतळ्याची माळ लोंबती पाटी पोटी
पिता दौलतानं माज्या चंद्रहारानं केली दाटी

सांगूनी धाडिते माझा सांगावा अडयाल
बापाजी बयाबाई चांदवयीच्या[1] पडयाल

रामाच्या देवळाला झळके सोन्याचा कळस
आईबाचं नाव घ्यायला हवा कशाला आळस

माहेराला जाता उंच पाऊल माझं पडं
मायबाप माझे गंगासागर येती पुढं

माझा अंगपिंड माझ्या पित्याच्या मासाचा
बयाबाईचा माझ्या शिरी बुचडा केसाचा

बापाचं नाव घेता काशीचा वड हालं
बयाचं नाव घेता दरीयात नाव चालं

गावाला गावकूस पानमळ्याला पायरी
आईबाच्या जिवावर दुनिया भरली दुहेरी

पहिली माजी ओवी पित्या माज्या राजायाला
बया तुळस शेजाराला

सरीलं दळान माज्या सुपात सोनचापा
ओवी गाते मी मायबापा

---

१ घरापलीकडे.

संवरत[1] आईबाप नको करू माझा घोर
राजबिंडा भरतार त्याच्या इथं माझा शेर

कोलापूर शार[2] काय शेराची कीरत
रंकाळा तळ्यावरी आईबापाची मूरत[3]

आईबापानं दिली लेक नाही पाहिला घरवाडा
जोडा धुंडून काढला जसा अंगठीवैला खडा

आईबापानं दिली लेक कशी वाटच्या गोसाव्याला
तिच्या नशिबानं आली पालखी बसायाला

राग मला आला माझ्या रागाचं धनी कोन
बापाजी बयाबाई हैत नावाचं धनी दोन

कुरळं माजं केस बयाबाईनं वाढविलं
पित्या माज्या दौलतानं पानी गंगेचं आडविलं

कुरळं माझं केस बयाबाईच्या आवडीचं
पानी पित्याच्या कावडीचं

आईबापानं दिली लेक नाही पाहिला जागाबिगा
जोडा पाहिला मनाजोगा

पहिली माजी ववी बापाजी सजनाला
बया पुतळी वजनाला

---

१ समर्थ. २ शहर. ३ मूर्ति.

॥३॥

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

*माळ्याच्या मळ्यामंदी बाई केळीला पान रुंद*
*बाबा बयाच्या जिवावर माझ्या मनाला आनंद*

*घान्यात[1] घानंकरी फडात[2] फडकरी*
*बाबा नि बया माजी हैती[3] मांडव कारभारी*

*शेजी तू बयाबाई सांग सपनीची कहाणी*
*बाबा नि बया माज्या उशाला राजाराणी*

*दुबळी बाबा बया मला दुबळी वाटयीना*
*मळीला पानमळा त्येचा गारवा तुटईना*

*पंढरीरीचं कुंकू धडा घेऊ का पासरी*
*बाबा नि बया बोलं लेकी गेल्याती सासरी*

*भरल्या बाजारात बया बाबाचा आठव*
*पेडे माटाची[4] जोडवी माझ्या पित्याचा साठव*

*हितनं मला दिसू माझ्या म्हायाराची झाडी*
*बया आणि बाबा माजी इसाव्याची माडी*

*बापाजी नि बया रामसीताची बया जोडी*
*संबाळ कर देवा माज्या मोत्याच्या या लडी*

*आईबापानी दिल्या लेकी नाही पाहिलं घरदार*
*जोडा देखिला मनहार*

---

१ उसाचा घाणा. २ उसाचा फड. ३ आहेत. ४ घडणीची पद्धत.

सईल झाली बया झुब्याची तोंडकडी
बावा नि बयाबाई दृष्टि पडंना झाली येडी

साधू संतांचं दरशन मी घेतीया खिन खिन[1]
बाबा आणि बया तुमच्या कुसव्याचं पुनं[2]

शेरभर सोनं न्हाई मोटसं भूषायान
बाबा आणि बया जन्म दिला कुशीयानं

घोलाव्याची भाजी मी का येचिती शेंडा शेंडा
आईबांनी केला गुरू चौमुलखी त्येचा झेंडा

गुरुरायाचे क्यास मोत्याच्या तूनतारा
बयाबाला किती सांगू शिष्य घालीतोया वारा

अंबाडीची भाजी मी येचिती गबा गबा[3]
बयाबानी केला गुरू रत्नागिरीचा जोतिबा

सांगून धाडीयीती पित्या माज्या दवलताला
धन संपदा तुझी तुला बया भेटीव माजी मला

पिताजी पितांबर बया गवळन व्हाती गंगा
ताईता बंधू माज्या गोकूळच्या श्रीरंगा

आकाड सरावन दोनी महीने खडावाचं
पिता दौलत बयाबाई दोनी दागिने जडावाचे[4]

काशी या म्हणू काशी त्या काशीची पाच गावू
बाबा नि बया बोलं या तीर्थाला दोगं जाऊ

ऊंच ऊंच चोळ्या माज्या वरसाला झाल्या बारा
बया नि बाबायाला देते हिशेब तालीवारा

---

१. क्षणभर. २. पुण्य. ३. झरझर, घाईने, भराभर. ४. मौल्यवान, ठेवणीतील.

लुगवीड्याची घडी मी का बघती दिव्याजोती
बयाबावाला इचारती यात रेशमी काड्या किती

बापाजी ईसवरू बया गवळन पारवती
ताईत बंदूजीला मंदी नंदीला सोभा किती

बापाजी आणि बया दोनी अमृताची कुंडं
देवांनी घडवीला त्यातूनी माजा पिंड

माजा तो अंगलोट पित्या माज्याच्या अंगावानी
कुरळं माजं क्यास गौळण मातेवानी

बापाजी माजा वड गेली पारंबी वावू वावू
बयाच्या कुसव्याचा झाला इस्तार गावू गावू

देव देवळात नंदी देवळाच्या तोंडी
आइबाप माझे विष्णू शंकराच्या पिंडी

बापाजी ईसवरू बया दवन्याची ग पेंडी
बंधू देवळाच्या तोंडी

माजाया अंगलोट[१] पित्या सावळ्या दंडभुजा
बया तोंडावळा ग तुझा

पहिली माजी ओवी मायबापाला गाती एक
सर्जा पाटलाची मी लेक

बापाजी माजा वड त्येची पारंबी ठायी ठायी
येल इस्तार बयाबाई

१ अंगलट, ठेवण, बांधा.

:४:

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

बापानं दिल्या लेकी बैसले सुखे ओटी
मायेला चिंता मोठी लेकईची

लेक सासरी जाती मायबाप झाले शांत
परि मनातून कढ येती ग जोरात

बापाचे उपकार फिटती काशी गेल्या
माऊलीचे उपकार फिटती न काही केल्या

बापानं केले तोडे माईनं केली नथ
म्हाईलं मला देती नागपंचमीच्या आत

पड पड पावसा पड बाबा चवूकडं
आईबाच्या गावाकडं मोतीपवळ्याचं पाणी पडं

माहेरी नाही आईबाप तू कशाला जाते येडी
भाऊ नि भावजया साऱ्या मावंच्या परवडी

मातापिता बोले लेकी होईल तुझं कसं
सासू सासऱ्याच्या तिथं कसा कटेल परदेस

माय तुझी मया असे घरात दारात
बापाजीची मया आली शिवार वलांडीत

पहिली माझी ओवी गणराया गणपती
बापाजी नि बया माझे गरसुळीचे मोती

काशी म्हणू काशी काशीला तीन नावं
एकीचं पाणी प्यावं एकीच्या गावा जावं

माहेराला जाया नार नटली थटली
मोटारगाडीत आईबाप आठवली

५

संग्राहिका : सौ. मालतीबाई दांडेकर

बापाजी गुजरानं पानी गंगेचं आडविलं
लांब लांब केस बयानं वाढविलं

गौरीची चोळी मला दिवाळीला धाडा
बापाजी बयाबाई बाकी मागली तुमी फेडा

लुगडं घेतईलं दुही पदरी रामसीता
घडया घालिते माजी माता मोल करीतो पिता

दरव्या[1] माझा बाप बया माझी नावू
आवलं मारी देवू त्येच्या उतारानं जाऊ

पहिली ओवी गाते मी का पुन्हा पुन्हा
जन्म दिलेल्या दोघाजणा

पहिली माझी ओवी धरतरी मेघायाला
जलम दिलेल्या दोघायाला

आईबाच्या जिवावरी न्हारीला खाला मेवा
बंधू दलाल्या झाला नवा

---

१ दर्या, समुद्र.

आईबापाच्या जिवावरी न्ह्यारीला खाल्लं तूप
बंधूच्या राज्यामंदी आलं इंगरजी कुलूप

आईबापायाचं राज लुटिते दुही दारा
बंधूच्या राज्यामंदी सोप्या बसला चौकीपारा

भरला बाजायार भरून मी काय करू
बावाबया न्हाई कुन्या पेटंचा रस्ता धरू

देसाई बाप माझे काशीखंडाचे ग ऋषी
माय हरण ग माझी विष्णूपदाची तुळशी

देसाई राया माझा काशीखंडीचा ग वड
हरण मायबाई त्रिवेणीचं पाणी गोड

देसाई राया वड मायबाई ग गोंदन
काशीची वाट जाती दोनी झाडांच्यामधून

प्रपंच करूनी परमार्थ केले दोनी
माझे मायबाप मोक्षीयाचे झाले धनी

बापाजी माझा वड बया मालन पिंपरण
दोघांच्या साऊईली झोप घेते संपूरण

दुबळं माजं पनू न्हाई दुबळी माजी काया
बापाजी बयाबाई चुनगती माजा पाया

दुबळं माजं पनू न्हाई दुबळं माजं तोंड
बापाजी बयाबाई चुनगती माजा पिंड

आगिनीच्या फुडं जळतं वलंचिलं
मायबावाचून कोण म्हणील काम केलं

येड्या माज्या जिवा तुला उलीसं कळंना
आईबापासारखी कुठं दौलत मिळंना

६

संग्राहक : श्री. बाजीराव पाटील

मायबापाघरी सुखाची चांदनी
रांजनाचं पानी सूर्या डोलतो आंगनी

मायबापा घरी धंदा नाई केला
रांजनाचं पानी शीन वापरता आला

मायबापानं देलं वाटीच्या गोसायाले
नारीचं दैव्य थोर पालखी बसायाले

वरमाय झाली मायबापाच्या देखत
नेसली हिरवी साडी गेली अक्षदा फेकत

वरमाय झाली आतन्या पुतन्याची
नाई आली सर पोटीच्या रतनाची

मायबाप राजे सांडलं उलंडलं
सासूसासऱ्याचं राजे कागदी मांडलं

:: ७ ::

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

बापाजी समींदर बया मालन दूधगंगा
ताईता माजा बंदू चल तीर्थाला पांडुरंगा

काशीच्या पल्यायाड बनारसीची नदी व्हाती
बापाजी बयाबाई वाघ हरणी पानी पिती

काशीच्या पल्यायाड बनारसीचा डोंगयीरू
बापाजी बयाबाई माजं तीर्थाचं आगयीरू

सकाळच्या पारी आधी जात्याची पाळं लोटी
बापाजी बयाबाई रत्नं मुखाला येण्यासाठी

आईची लाडकी बापाजीचा तिला ळळा
आंदण दिला मळा लेकीबाई

सरलं दळण गाते माय माऊलीला
आयुष्याची ओवी बापाजी गुजराला

पैली माजी ववी बापाजी गुजराला
बया तुळस शेजाराला

पैली माजी ववी बापाजी गुरुस्वामी
बया पोटीची बाळं आमी

पंढरीला जाती बया बापाजी येती म्हणा
संगं पालखी घाडा मेणा

आईबापानं दिली लेक देश सोडून कोकनात
आली बापाच्या सपनात

काळी चंद्रकळा फेकून दिली म्या रागं रागं
बाबा आणि बया मला समजाविती दोगं

पंढरी केली म्या आईबापाच्या पुण्यानं
आंघोळ केली म्या चंद्रभागेच्या पाण्यानं

पंढरी केली म्या आईबापाला पुसून
आंघोळ केली म्या चंद्रभागेत बसून

बाबा माझा वड बया माझी ती वडाई
दोगांच्या सावलीची किती सांगू मी बढाई

मायबापाची ग सेवा कोणी केली हंबीरानी
पाळणा हालविला रोहीदास चांभारानी

बाप माझा बेल माता माऊली तुळस
राजसाचा उंच माझ्या माडीचा कळस

बाप माझा वड माता मावली ग फांदी
वागविला पिंड त्यांनी माझा कडंखांदी

हाताचा पाळणा नेत्रीयीचा केला दिव
आईबापाची माझ्या आता घडंना मला सेवा

पहिली माझी ववी बाबा नि बयावरी
बेलाची तीन पानं महादेवा नंदीवरी

बाबा आणि बया दोनी तुळशीचं झाडं
लागंना ऊन वारा उभं राहिल्यानं आड

आईबापानी दिली लेक त्यानी पुण्याई काय केली
तीर्था ठिकाणी लेक दिली

सम्रत आईबाप लेकीयीला देतो चंदी
ऊस लुटीला काशीमंदी

बाबा आणि बया तुळशीची मंजूईळ
दोनींचं घेता नाव घडे गंगेची आंघूईळ

आपण चालायावे आईबाच्या चालीवरी
मोत्याला मोल भारी पवळे गेले लालीवरी

आपण चालावे आईबापाच्या रीतीनं
शेजी आली घरा हिशी बोलावं प्रीतीनं

नऊ मास पोटी ग नऊ मास ताटी
कामा नाही आले बाबा बयेच्या शेवटी

आईबाच्या घरी राज्य केले लेकावानी
रांजणीचं पाणी मला झालं कोसावानी

गावाला गावकुस शेतमळ्याला पाणंद
जोवरी बाबा बया तोवरी ग आनंद

गावाला गावकुस शेतमळ्याला वसती
जोवरी बाबा बया दुनिया भरली दिसती

बाबा बया माझी जशी वड व तुळशी
हिरीखाली मळा तिथं हरळी लुसलुशी

जोवरी बाबा बया तोवरी पोरपन
हेलकावे घेती हिरीखाली बोरबन

बाबा आणि बया लावणीची जिरेसाळ
यांच्या राज्यावरी नवती माझी देती ढाळ

बाबा आणि बया माझी लावणीची मका
मोडिते येता जाता मला मना करू नका

बाबा आणि बया दोन्ही झाडं लई गोड
बया बर्फाचं घर बाबा अंजिराचं झाड

बान्रा आणि बया माझी आमराई पाडाची
आता चाड नाही मला वरकड झाडाची

नाना माझा वड बया माझी वडफांद्या
साऊलीला बसू लेकी आम्ही सरसुंद्या

नाना माझा वड वडाची पानं रुंद
हरणी माझी बया साऊली करवंद

बापाजी समींदर बया मालन न्हाती गंगा
नटव्या माज्या बंदू करी आंगूळ शिरीरंगा

सुक्काचा भरतार दुक्काची मायबाई
बाप्पाजी आंबराई बंदू वैदाच्या गावी जाई

काकाजी म्हनीयीती बाळे आटप लवकर
काकी बोलईती सावल्या आल्यात्या जोत्यावर

अंबाडीची भाजी नित तोडावी ओटयात
मायबापाची संपता कधी येती ना तोट्यात

माय बाप म्हणे लेकी दिऊनी तुला आलो
तुझ्या ग संकेताचा जामीन नाही झालो

आइच्या राजी केली लेकिनी घेऊ देऊ
भावजई बोलं पावनीचं कोन गावू

बापाचे उपकार फेडीते काडोकाडी
आईचे उपकार भिनले हाडोहाडी

लेकाया परास लेक कशानं झाली उणी
मायबापाला गाते ववी कैलाशी ऐकावी कुणी

पहिली माझी ओवी पित्या माझ्या दौलतीला
बया तुळस सोबतीला

पिंड जसा माझा बापाजीच्या दंड भुजा
माझे बयाबाई मी तुझीच रूपवजा

आधी गाईन बाप्पा बया मग गाईन देवा तुला
बाबा नि बयांनी मला उदरी जागा दिला

हे दिवाळीबाई कर बिगी बिगी येणं
मायबापाच्या घरी मला कधीपासून जाणं

सुखी आहे पोर सांगा आईच्या कानात
बाप भाऊसाठी खंत करिते मनात

मातापित्यांच्या राज्यात खाई शिक्यावेलं दही
भाईराजाच्या राज्यात ताकाला सत्ता नाही

८

संग्राहिका : सौ. कमलाबाई बडवे

माझा जीव बाई माझ्या बाबाच्या मासाचा
बाईच्या सायासाचा शिरी बुचडा केसाचा

चंद्रभागातीरी मगरमासा इली[१] गेला
मायबापानी ग माझा पिंड पैदा केला

सासरी मला बाई कामानं काय होतं
माझ्या आईवडिलांचं नाव दूरवरी जातं

---

१ व्याला.

नदी-नालीयांना बाई कशाचं झाकण
माझ्या मायबापायांना देवाजीचं राकणं

बारीक माझा गळा वाऱ्यानं ऐकू गेला
पिताजीनं माझ्या घोडा दारी उभा केला

वाटंच्या वाटसरा पाणी प्यावं माझे घरी
आई वडिलांचं नाव न्यावं बा दूरवरी

आईची वाडिलांची सेवा करते मी पुण्याई
देशील देवराया लेक सून जावई

९

संग्राहिका : श्रीमती ताई रानडे

पहिली माझी ओवी गाऊ मी कोणा कोणा
जन्म दिलेल्या मायबापा दोघेजणा

माझे आईबाप जसे तुळशीचे रोप
मला थंड आली झोप साऊलीला

माय तो माहेर बाप माझी सत्ता
नको बोलू भाग्यवंता भाऊराया

माय तो माहेर बाप तो येऊ जावू
पुढे आणतील भाऊ लोकाचारा

माहेरी जाईन बैसेन खांबुभुजा
बापापरीस धाक तुझा मायबाई

माहेरी जाईन बैसेन गादीवरी
विसावा तुझ्या घरी मायबाई

माऊलीची माया काय करेल चुलती
चोळी शिवेना पुरती काकूबाई

बाप म्हणे लेकी मरी तरी जाती
तुझ्या संसाराची काचनी न राहती

बाप म्हणे लेकी दैवाची खटखट
शेवाळाची जागा पाय ठेव बळकट

काय सांगू पिता माझ्या कर्माची कथा
नदीमाईला आला पूर लोटी तरी देता

पिताजी कसा म्हणे लेकी मोठे जागी देऊ
दैवात झोपडी उंची हवेली कोठे पाहू

## १०

संग्राहिका : **सौ. पुष्पा घाटगे**

बापाजी बया काशी सासूसासरे तीर्थ गाठू
चौगांच्या पुण्याईनं तीर्थ घडत तीनशेसाठू

पैली माजी ववी बापाजी गुरुस्वामी
बयापोटीचं फळ नामी

पैली माजी ओवी गाते बापाजी सागराला
बया तुळस जागराला

लुगडं घेतीयीलं दोनी पदार मोती घसू
आई म्हणती लेकी नेसू बाप म्हणीतो घाली कासू

जातीसाठी माती खायीतो थोडी थोडी
बापाजी बयाबाई तुमच्या नावात मला गोडी

आईबाप पुण्यवंता चला भेटू महाराजा
चंद्रभागामंदी पाऊल पड माजा

काशीच्या पल्याड बनारशीचा डोंगरू
बापाजी बयाबाई माझा तीर्थांचा सागरू

बापाजी देवराय नित नजरंपुढं दिसू
माऊली माय बोलं द्रिष्ट होईल खाली बसू

हिरवी हिरकणी दंड करतो रसारसा
पिता माझा ग दौलत हट्ट पुरवी व्हवा तसा

जिवाला जड भारी कसं कळालं वाड्यामंदी
पित्या माज्या दौलताला कडू लागलं पानामंदी

पिकला पिकला माज्या बाबाजीचा ऊस
पानीयाच्या मिस बैलांना पाजा रस

बाप म्हणे लेकी नांदून कर नावू
सग्या सोयऱ्याचं हाई आसपास गावू

लांब नि लांब केस बया माजीच्या आवडीचं
पाणी बाबाच्या कावडीचं

आईबाप असताना कोण काशीला गेलं येडं
उग[1] पायाचं दिलं भाडं

---
१ उगीचच, निष्कारण.

बाप माझा वाघ मी जातीची वाघीन
सासूरवास देकून जिवाची झाली आगीन

बाप माझा आंबा त्याच्या पोटीची मी कयरी
कोण बोलला वयरी त्याची चढू कशी पायरी

मांडवाच्या दारी सये आयेर कोणा कोणा
पिवळा पितांवर पिता माहेरीचा राणा

लेकीचा कंटाळा नको करू माज्या बापा
जातील चिमण्या उडून पडंल मंजील रिता

आकाराचे गहू त्याचे परकार बहू
बापाची ती सर काय करतील भाऊ

बापाजी सये माझा जसा मखमली डेरा
त्याच्या सावलीनं मला लागंना ऊनवारा

बहीण भावंडाचा बाई झगडा भातक्याचा
बाबाजीनं माज्या लावला बाग बत्ताशाचा

११

संग्राहिका : श्रीमती राधाबाई देसाई

विठ्ठल माझा पिता विठ्ठल माझी माता
दोहींच्या दर्शनाला ठेविते पदी माथा

माय तोवर माहेर बाप तोवर खबईर
भाव भावजयांचं ठाणं पुढं बसलं जबईर

माय तोवर माहेर बाप तोवरी माझी हवा
भावाच्या राजात जुनी जागीर राजा नवा

माय बापा घरी माझं कोड नि कौतिक
भरताराच्या घरी पाणी मिळतं कवचित

आकाड सरावण दोनी महिने मोडीचे
बापाजी बयाबाई दोनी दागिने जोडीचे

जन जाती जतरेला मी त जाते म्हायाराला
बापाजी बयाबाई दोनी तिरथं पाहायाला

बापाजी माझा वड बया माझी वडशेंगा
माझा तो बंधूराया सेवेला आला सांगा

१२

## संग्राहिका : सौ. सजाताई सावंत

माय म्हणू माय माझी तुळशीची रोपं
त्यांच्या सावलीला गार लागे मला झोप

माय म्हणू माय माझं तुळशीचं पान
त्यांच्या सावलीला माझं बालपणचं न्हानं

जवर आई बाप तवर तुजं येनं जानं
आईबाच्या माघारी मग कुनाचं न्हवं कोन

संबरत माजा पिता हत्ती डांबलं दारात
माऊली माझी बोले कन्या पराया घरात

*आळंदी घडली मायबाप असोईनी*
*आंगूळ म्या केली इंद्रावनी बसूईनी*

*पहिली माझी ओवी मी गाते मातापिता*
*मग गाते सर्व गोता*

*आईबापाच्या माघारी भाऊभावजया कुनाच्या*
*चिमन्या निघाल्या उनाच्या*

॥१३॥

संग्राहिका : **सौ. यशोदा पाटील**

*आई नि बाप दोन्ही बाई तीर्थायाची कुंडं*
*बयाला किती सांगू त्यात जलामला माझा पिंड*

*बया गवळणीपरास पिता माझा उपकारी*
*दुनया दाविली मला सारी*

*बापाजी वड माझे मालन वडजाई*
*दोघांच्या साऊलीची किती सांगू मी वडेजाई*

*बापाजी माझा वड बया मालन उंच काठी*
*बंधू हावशा आला पोटी माझं पाताळ जरीकाठी*

*दारीचं वाळवान चिमन्या पाखरानं किती खावं*
*आईबापाचं ते राज लेकीबाळींनी किती न्यावं*

*साखरेचं पोतं येता जाता झालं रितं*
*बंधूला किती सांगू बाबा बया जागं हुतं*

::१४::

संग्राहिका : सौ. सिंधू वारनूळकर

बया म्हणताना तोंडी सुटला पाझईर
बाबा म्हणताना डोळे हौसचा सागईर

वाटं ग वैला वड पानाफुलानं झाला जड
आईबापाला लेक ग्वाड भैन भावाला झाली जड

आई नि बापायाची सेवा करावी आदरानं
जोडीच्या बंधू माझ्या पाय पुसावं पदरानं

लेकीचा जलईम जसा गाजबीराचा वाफा
आईबापांनी केली जोपा करुनी काय नफा

गीत म्या गायीयीलं बापा माज्या त्या गुजराला
बया तुळस शेजाराला वर जाईचा येल गेला
कळ्या फुलांचा भार आला

माळ्याच्या मळ्याईत कोरली विहिरीची पायरी
आईबापाच्या जिवावर दुनिया पाहीली दुयीरी

भरली चंद्रभागा बया मालन वहाती नावू
पाठीच्या माझ्या बंधू पित्यासंगट तीर्थी जाऊ

बंधू इवाई करू गेले मला कशाला चार चौघं
बयाच्या माज्या बाळा पिता सांगल ऐकू दोघं

आईबापाच्या माघारी भाऊ भावजया कुनायाच्या
चैताच्या महिन्यात झळा मारिती उनायाच्या

पड पड रे पावसा झड येतीया वाऱ्याची
बापाजी बयाबाई माजी पासुडी निवाऱ्याची

भाऊ भावजयाचं राज हाई डोळ्यांनी बगायाला
आईबाच्या जिवावर जावं इलास भोगायाला

बारीक बांगईडी कशी सुटली काचायाची
आईबाच्या जिवावर उद्या भरीन पाचायाची

आईची माया जशी तकाल[1] पागाळतं
पित्याची माया जशी लोकांड वितळतं

सटीचं अक्षार बरम्या लिवितो साऱ्या राती
पित्या माज्याला काई ठावं बया जवळ माजी होती

माता नि पिता माजी हायती मोगऱ्याची आळं
त्येंच्याबी सावलीला आमी नवतीचं बाळं

जिवाला जड भारी खडीसाकार घोटईना
बया माझीचं पाणी डोळ्याचं तुटईना
पिता उशाचा उटईना

जिवाला जड भारी सांगावं जाता जाता
परसदारी माता तांब्या ठेविला तोंड धुता
ढेलजंत पिता चिलीम ठेवली वढता वढता

१ कथील.

## १५

संग्राहक : श्री. ना. रा. शेंडे

बापाजी बयाबाई दोनी काशीची देवळं
ताईता बंधू माझा मधी निशाण पिवळं

बापाचा उपकार काशी गेल्यानं ग फिटे
मायबाईचे ग माझ्या साजनीचे कष्ट मोठे

बापाजी माझा वडू हरन माझी ग गोंदन
पंढरीची वाट जाई दोनी झाडांच्यामधून

माय तुझी मया घरच्या दाराआत
बापाजीची मया आली डोंगर चिरत

मायेचा उपकार फेळीन[1] चोईडोई
पित्याचा उपकार शिरी वज्जं झालं बाई

मायेचं उसनं फेळीन आल्या गेल्या
पित्याचं उसनं फिटे न काई केल्या

बापाजी राया मह्या काशीतला वड
माही मायबाई पानी तिरगुनीचं गोड

बापाजी राया मह्या आमराईचा पाड
माही मायबाई खिरनी मोठी गोड

बाप माहा चाफा माय माही चकसेला
आठवू नाई देला काळया कसा गेला

---

१ फेडीन.

*बाप माहा चाफा माय करवंद*
*केईचं पान रुंद सावली कडीबंद*

::::१६::::

संग्राहिका : कु. उषादेवी बागल

*आगाशी वावडी सज्याचा आधार*
*मायबापाच्या माघारी मावंचा बाजार*

*पुनवं पाठोपाठ चांदा लागल्या वड्या*
*जोवरी मायबाप तोवर लेकी तुझ्या उड्या*

*पावणा आला घरी जन्म दिलेला माझा पिता*
*त्याच्याबी पंक्तीला तांब्या तुपाचा केला रिता*

*पंचामृताच्या तांब्या उभी राहिली मारगी*
*माझे ते मायबाप सये तान्याले सरगी*

*किती मी वाट बघू पुण्यापासून कोरेगाव*
*मायबापाची माझ्या आली मोटार भरधाव*

*पहिली माझी ओवी मायबापाला मी गाती*
*बंधू दामोदराला मधी घेती*

*एवढं माझं ग्वात नाही गोताची व्हराचड*[1]
*मायबापाचं मला याड*

---

१ स्पर्धा, चढाओढ.

लेकीचा जलम जसा गाजराचा वाफा
जातीया परघरा झाली धर्माची मायबापा

लाडक्या त्या लेकी सये चालल्या उन्हाच्या
मायबापाच्या माघारी भाऊभावजया कुणाच्या

माझ्या घरीबी पावईणा येतो म्हणून न्हाऊ नका
माझ्या त्या मायबापा वाट बघाया लावू नका

जिरसाळीचे तांदूईळ मला वाणींनी घाल बिगी
माझीया मायबापा नाही सवंड रहाण्याजोगी

लुगड्याच्या आधी कसा पदर फाटला
आईबाच्या जिवावर नाही गुमान[1] वाटला

तिनीसांजची ग बाई करिते कुचूकुचू पाल
आईबाच्या जिवावरी लेकी ग तुझा ताल

शंभर माझं गोत जसं माळावेलं तन
जन्म दिलेले मायबाप अंतरीची रत्नं दोन

आईबाच्या घरी नाही झाली हेळसांड
बाई परायाच्या घरी भांड्याला लागं भांडं

आठवण होता जीव माझा ग बावरा
मायबाप दोन्ही माझा अंतरीचा हिरा

आईबाप बोलत्याती लेकी दिल्या घरी न्हावं
भांडं न्हवं ते बदलावं

आईबापायाची माया साऱ्या जगामधी भारी
गोड करून साजिरी

---

१ फिकीर, पर्वा.

*माहेरी जाते ओढ लागली माझ्या जिवा*
*माझे ते मायबाप माझा अंतरीचा दिवा*

॥१७॥

संग्राहिका : **सौ. जैबुन्निसा खान**

*नांदाया जाती लेक बाप म्हणे सुखी ऱ्हाय*
*आईची वेडी माया जशी हंबरते गाय*

*पिता माझा तो चंदन माता माझी ती गोंदन*
*दोनी झाडाला छेदून वाट जातीया मधून*

*लेकीचा तू जन्म का रे देशी वेड्या देवा*
*आईबाची सेवा नाही घडली माझ्या जीवा*

*लेकीचा जलम देव घालुनी चुकला*
*आईबाची सेवा बंधू करितो एकला*

*उचकी लागली केर पारोसा नेताना*
*बयानं सई केली न्हारी पित्याला देताना*

*चंदन आगर नाव माझ्या बापाजीचं*
*माऊलीचं माझ्या दूध गोड नारळीचं*

## १८

संग्राहक : श्री. वि. वा जोशी

मायबाप गणगोत माझं माहेर वेढलं
भेटीला जाते बाई मला तीरथ घडलं

मला जन्म दिला तथी होते कोन कोन
आईबाप दोनी तिसरा भगवान

किती हाक मारू बाबाजी देवाले
माझी मायबाई जाई गुंतली वेलाले

बाबाजी राजा माझा काशीवड बोले
माझी मायबाई दर्‍यामधी नाव चाले

जनम देऊन पिता झाला ग वायला[१]
येवढा प्रतिपाळ माझ्या माऊलीनं केला

माझ्या गावाहून माहेराचा दिवा दिसं
बाबाजी पोथी वाचे माय माझी खाली बसं

बाबाजी मायबाई माझा ओलीताचा मळा
शीतळ सावली माझा लागून गेला डोळा

काशी काशी करी कुठं काशीतला गोटा
मायबापाहूनी कोनी देव नाही मोठा

माहेरीचा दिवा मला दिसं कोसामानी[२]
मायबापाला बघून चित्त होतं समाधानी

१ वेगळा, मोकळा. २ काही अंतरावर.

## १९

संग्राहिका : सौ. सुमन प्र. नलावडे

*साळू निघाली सासरी आईबाला करमेना*
*सारविल्या भिंती वर काढील्या मईना*

*साळू निघाली सासंरी हिच्या वटीला गहू हैती*
*मूळ दिवाळीला पाठवू मायबाप बोलताती*

*साळू निघाली सासरी झाली माळायाच्या आड*
*आईबापाच्या हुरद्यात झाली लई धडपड*

*माईचं म्हायेर माझ्या पित्याचं सासर*
*माझीया आजोळी आम्ही राहतो बिनघोर*

*सोयऱ्याचं बोलणं जसं कडूनिंबाची वाटी*
*नाना नि बयानं माझ्या घुटिलं[1] माझ्यासाठी*

*पिता माझा पितांबर माय माऊली तुळस*
*दोघांच्या सावलीनं सावरी संसाराचा कळस*

*पिता गोकुळावानी माय मथुरावानी*
*आईबाच्या पुण्यानं माज्या नावाला चढं पानी*

---

१ सहन केले, घोटले.

२०

संग्राहिका : सौ. शशिकला पाटील

पहिली माझी ओवी गाते मी मातापिता
दारी सुक्कीर उगवता

आईबापानं दिल्या लेकी नाही पाहिलं घरदार
गाव पाहिला बाजार जोडा पाहिला डौलदार

म्हायार केलं म्हणू दोनी पदार राजारानी
आईबापासाठी लेक समींदर शानी

पाची परकाराचं ताट द्रोण तुपाचा शेजाराला
माता मावली गवळण पुसे पिताजी गुजराला

आईबापानं दिल्या लेकी तिला सासरवस कसा
चित्ताकाचा फासा गळी रुतला सांगू कसा

माहेराची वाट मला दिसते कडीकोट
आई बाप माझे झाडं सुरूची दोन नीट

सासरवास जसा दारी तुळस वाकली
मातापित्याच्या नावासाठी देही करवत घातली

उगवला नारायण लपयीला आडभिंती
माझी ती बाबा बया औक मागाया उभी न्हाती

ज्याला हायती बाबाबया त्याला कशाला व्हावी काशी
सर्वी तीर्थं बयापाशी

गार सावली बघून मी उतरीलं वझं
बाबा नि बया झाड विसाव्याचं माझं

माळीन सादविते घ्या ग सयांनू कारलं
मायबापानी दिलं मला साजासहित डोरलं

काशी म्हणू काशी काशीला गेलं येडं
माझ्या बाबा बयापुढं काय तीरथ बापुडं

तुमच्या जिवासाठी जीव झाला कष्टी
बाबा आणि बया कधी पडतील द्रिष्टी

आइबापाचं सुख इसरल्या का सया
पोटीच्या बाळाला म्हणती बाबा बया

वाटवरल्या वडाच्या पारंब्या नको तोडू
आइबापाच्या माघारी माया बहिणीची नको मोडू

डोंगरकटारीला मातापित्याची दोन झाडं
त्यांच्या सावलीला मला झोपेनं केलं येडं

डोंगरकटारीला मातापित्यांची झाडं दोन
चवघी आमी बहिणी साऱ्या जाऊया मिळून

माता पिता नव्हं बाई किराना समदा
किती मी उपसू तुला पापणीच्या हावदा

दारीचं बाळवान चिमण्याबाईनं सारीलं
बाबा बया बोलं लेकीबाईंनी येढीलं

आईबापांनी दिली लेक नाही लावित तुम्हा बोल
जोडा पाहून दिला डोल

बाबा बया माझी मग कशाला मला तोटा
पाणी हौदाला मारी लाटा

पिता माझा पितांबर बया गझनीची झोळी
माय बापाची ग माझ्या सये माया ती आगळी

माय माझी काशी पिता तुळशीचं बेट
कशाला मग घालू रोज देवाजीला खेटं

## २१

संग्राहक : श्री. ए. आ. गुंजाळ

आस्तुरी मिळती बाळा लेण्यालुगड्यानं
मिळेना आईबाप सोनं देऊन तागड्यानं[1]

आस्तुरी मिळती लेण्या लुगड्याबीवारी
मिळेना आईबाप सोनं दिलं भारूभारी

शंभर गोताचा बाई गवताचा भारा
आई आणि बाप अंजीराचा बाग न्यारा

आई आई म्हणून तोंडाला येतं पाणी
आई माझे बाप गोड साखरेच्या वाणी

आई माझे बाप जसे शिंपल्याचे मोती
बाळपणीचे सांगाती

आई आणि बाप जशी कवलास माडी
बहिण भावंडं जशी हानमाची[2] जोडी

---

१ ताजवा. २ हानम, खिलारी बैलांची जोडी.

काशी काशी म्हणू लोक चालले धावत
आई आणि बाप माझे तीरथ गावात

काशी काशी म्हणू काशीला गेलं येडं
गिन्यानी पुत्र खरा आईबाच्या पाया पडं

बापाची लाडकी आईची पद्मप्यारी
लाडकी लेक मागे आंदण चंबू झारी

आईची लाडकी बापाच्या पडे गळा
लाडकी लेक मागे आंदण पानमळा

आजा बोले माजा चुलते बोलती भायेरी
लाडक्या लेकीला घाला दागिने दुहेरी

सरगीच्या देवा तुला नाही दयामाया
नेले आईबाप लावी वाट मला पाया

सरगीच्या देवा उघड खिडक्या कवाडं
आईबाप माझे मला करू दे निवड

सरगीच्या देवा उघड दाराचा झोपाटा
आईबाप माझे मला पाहू दे मुखोटा

पिता माझा पितांबर बया गझनीची झोळी
माय बापाची ग माझ्या सये माया ती आगळी

माय माझी काशी पिता तुळशीचं बेट
कशाला मग घालू रोज देवाजीला खेटं

## २१

संग्राहक : श्री. ए. आ. गुंजाळ

आस्तुरी मिळती बाळा लेण्यालुगड्यानं
मिळेना आईबाप सोनं देऊन तागड्यानं[१]

आस्तुरी मिळती लेण्या लुगड्याबीवारी
मिळेना आईबाप सोनं दिलं भारूभारी

शंभर गोताचा बाई गवताचा भारा
आई आणि बाप अंजीराचा बाग न्यारा

आई आई म्हणून तोंडाला येतं पाणी
आई माझे बाप गोड साखरेच्या वाणी

आई माझे बाप जसे शिंपल्याचे मोती
बाळपणीचे सांगाती

आई आणि बाप जशी कवलास माडी
बहिण भावंडं जशी हानमाची[२] जोडी

---

१ ताजवा. २ हानम, खिलारी बैलांची जोडी.

काशी काशी म्हणू लोक चालले धावत
आई आणि बाप माझे तीरथ गावात

काशी काशी म्हणू काशीला गेलं येडं
गिन्यानी पुत्र खरा आईबाच्या पाया पडं

बापाची लाडकी आईची पन्नप्यारी
लाडकी लेक मागे आंदण चंबू झारी

आईची लाडकी बापाच्या पडे गळा
लाडकी लेक मागे आंदण पानमळा

आजा बोले माजा चुलते बोलती भायेरी
लाडक्या लेकीला घाला दागिने दुहेरी

सरगीच्या देवा तुळा नाही दयामाया
नेले आईबाप लावी वाट मला पाया

सरगीच्या देवा उघड खिडक्या कवाडं
आईबाप माझे मला करू दे निवड

सरगीच्या देवा उघड दाराचा झोपाटा
आईबाप माझे मला पाहू दे मुखोटा

॥२२॥

संग्राहिका : सौ. नवलबाई शहा

आई माझी गंगाकाशी पिता माझे रामेश्वर
देवाला नको जाया माझ्या घरी देव थोर

आई माझी गंगातुळशी पिता माझे पंढरपूर
तीर्थाला नको जाया घरी तीर्थांचे सागर

आई माझी सीतामाई पिता माझे रामचंदर
देव्हाऱ्यातले देव माझे घरी आहेत थोर

आई माझी पारबती पिता माझा महादेव
नऊ लाख देवाहूनी माझ्या घरी थोर देव

आई माझी रुक्मावाई पिता माझे कृष्णदेव
जगातल्या देवाहूनी माझ्या घरी थोर देव

आई माझी रखमाई देव विठ्ठल माझे पिता
चंद्रभागा भावजई पाय धुते येता जाता

जाती ग साठी माती खावावी वाटी वाटी
आई बापाच्या नावासाठी

पिता माझा वाडा बया माझी ती कोंदन
काशीला गेली वाट दोनी झाडांच्या मधून

## २३

संग्राहिका : सौ. शालिनी धोटे

*लंबे लंबे बाल सये धुती माझी माता*
*बाल धुते माता वर पाणी टाकी पिता*

*शेजी म्हणं बाई तुला माहेराचं येड*
*बाप द्राक्षाचं झाड आई चारोळी लागे गोड*

*सकाळी उठून करू सूर्याचं स्मरण*
*माता पिता हयाती मी मागते मरण*

*सकाळी उठून मातापिता म्हणाया चुकले*
*पडला अस्तुरी जलम कामा धंद्यात गुतले*

*सासूचा सासरवास माऊलीपशी सांगू नई*
*माता पित्याचं गोडपण तिथं इदोल[1] घालू नई*

## २४

संग्राहक : श्री. विठ्ठल भिकाजी वाघ

*जलम देऊन पिता झाला उतराई*
*तयहाताचा पायना तुमी केला मायबाई*

---

१ वाकुडपणा, मिठाचा खडा

मायबापाच्या राजी म्या लुटली द्वारका
भावजईच्या राजी झाला अबोठा[1] पारखा

हाताची बांगडी बाई खेयता फुटली
माय बापाच्या राजी लंका लेकीनं लुटली

मायेचं माहेर आहे गोकुए[2] नगर
पित्याचं आंगन आहे पंढरपूर

मायबापाचं राज्य आंब्याची आंबराई
भरताराचं राज फुलाची बागशाई

हाताची बांगळी केसाऊन बारीक
मायबापाच्या राजी लिह्याची तारीफ

सासुरवासानं डोईच्या झाल्या लटा
मायबाई इचरते पानी टाकती पिता

सीता सासूबाई पाया पडते धाई धाई
दिवाईचं मूय वाट पाहती बापमाई

सारवल्या भिंती वर काढलं स्वस्तिक
मायबापाविना कोना लेकीचं कौतिक

१ उंबरठा. २ गोकुळ.

॥२५॥

संग्राहिका : सौ. इंदिरा कुलकर्णी

सकाळी उठोनी देवासी वंदावे
आधी ते भजावे माय बाप

बाप तो प्रयाग माता वाराणसी
वंदितो तयासी प्रेमभावे

मातापिता दोन्ही उमामहेश्वर
त्यांच्या चरणावर माथा माझा

माता वाराणसी पिता तो प्रयाग
नमन तयांच्या ग पायी सदा

माय रखुमाई पिता पांडुरंग
नमन साष्टांग त्यांचे पायी

आधी ते वंदावे मायबाप दोन्ही
त्याविण कोणी दैवत नाही

मायबाप माझे अत्री अनूसया
वंदू तया पाया रात्रंदिनी

बापाजी भास्कर चंदन माऊली
बाळालागी पान्हेली मायबाई

## २६

संग्राहिका : कु. चांदबिबी शेख

दुरून दिसते मला वाटं माजी आई
उभी होती सये चुलती काकूबाई

ज्या गावी आइबाप त्या गावाचं मला याड
सयानू किती सांगू तिथं गारब्याचं झाड

आइबांनी दिली लेक आंबा उंबर तिच्या शेती
लाडकी येवढी लेक आईबापाला दुवा देती

आईबाच्या पुण्याईनं गाव नासिक म्या पाहिलं
बाई नारळाचं फळ कुशावर्ताला वाहिलं

मायबाच्या जिवावर खावं खारीक खोबरं
मायबाप माझा हाई कोटीचा जबर

जोवरी मायबाप लेकी येऊद्या जाऊद्या
आंब्याची आंबराई लेकी बाळीला खाऊद्या

जोवरी मायबाप लेकी माहेराची हवा
भावाच्या राजामंदी अंमल आला नवा

माय तो माहेर बापावरी माझी सत्ता
भावज गुजरी, नको बोलू मला आत्ता

## २७

संग्राहक : श्री. ना. ना. शिंदे

*माय बाप जोवरी तोवरी माहेरी सत्ता*
*मग येणं जाणं कसं होईल दशरथा*

*जोवरी माय बाप तोवरी भरली सुगी*
*गवळण बाई बोले लेकी लुटावं बिगी बिगी*

*मायबाच्या जिवावरी राज्य केलं म्या रावणाचं*
*नाही हाताचं धुतलं ताट म्यापलं जेवणाचं*

*माय बापाच्या माघारी गेली माहेराशी वेडी*
*तिनं कवटाळिल्या मग दारातल्या मेढी*

*माय बापाचं राज्य जसा परसातील मळा*
*भाव भावजईच्या राज्यी मान माझा झाला शिळा*

*वैराळ दादा नको मला घालू कालाकिता*
*बाबा बयाच्या जिवावं तुला मोलाची काय चिंता*

*पहिली माझी ओवी नाना माझ्या गाती एक*
*गवळण माझी गिरजा गवळ्याची लेक*

*दुसरी माझी ओवी नाना माज्या चातुराला*
*बयाला ओवी गाता शीण मनीचा उतरला*

*तिसरी माझी ओवी नानाचं काय नातं*
*माज्या जलमाच्या येळं गिरजा जागली सारी रात*

*लेकीचा जलम कुणी घातला येड्या देवा*
*जन्म दिलेल्या मायबापा तुझी घडत नाही सेवा*

जातीसाठी माती खाते बाई गोळा गोळा
आईबाच्या नावासाठी घेते भिल्लीणीची कळा

मायबाप बोले लेकी उपजता मरायावं
सोयऱ्या धायऱ्यात नित गाऱ्हानं नसावं

मायबाप बोले लेकी उपजता मरायावं
आईबाच्या नावासाठी नांदून दाखवावं

पहिली माझी ओवी नानाजी माज्या निळा
गवळण बाई माजी कस्तूरी कशी तोळा

दुसरी माजी ओवी नानाजी देशपांड्या
बाई माज्या गवळणीनं वागविलं कडीखांद्या

## २८

संग्राहिका : **सौ. हव्वाबी खान**

बापाजी माजा वड बया माजी फुलजाई
दोनींच्या सावलीची काय सांगावी नवलाई

उन्हाळ्यात ऊन तापे नागीन वनात
लेकीचे मायबाप रोज जळती मनात

आई बाप माझे तवर येणं जाणं
पुढं कोण्या समयानं

आम्ही चारी भैनी ग आनंदानं नांदू
मायबापाचं नाव सांगू

पिताजी माझा वड माय माऊली चंदन
दोघाही देवांना हात जोडून वंदन

माझा ग बाई पिंड बापाजीच्या दंडभुजा
माझें तू मायबाई गडे तोंडावळा तुजा

बापानं दिल्या लेकी मग झाला ग मोकळा
मायेच्या जिवाला ग बये चिंतेचा सापळा

बापाजी माझा वड बया माझी त्येची पानं
माझा तो बंधूराया शोभा देतो पारंब्यानं

भीमाशंकर तीर्थ केलं आईबापाच्या पुण्यानं
आंघूळ म्या केली कुशावर्ताच्या पाण्यानं

बापाजी ग ईश्वरू मायबाई गोदावरी
भाई राजस ग माझे स्नेह बंधू रामेश्वरी

माळ्याच्या मळीयात माझं आई बाप दोगं
शेवंतीचं फूल सये सावळ्या रामा जोगं

दळणा कांडणानी कामानं काय होतं
बापाजी बयाजीचं नाव दूरवरी जातं

माय ती रुक्मीण विठोबा सावळा पिता
शीण माझा गेला दोघांना ओव्या गाता

पिताजीपरास माता मनाची मोकळी
माया आईची आगळी

२९

संग्राहक : श्री. बा. शि. पाटील

*आईबाची सेवा लेका पुंडलिकानं केली*
*आंघूळ करावया चंद्रभागा मागितली*

*भरला बाजार किराणा ग झाला सस्ता*
*आई बा मिळंना काय करू चीजवस्ता*

*जन्म देऊनिया पिता झाला निरधारी*[1]
*माऊलीला माझ्या कष्ट गांधारीला भारी*

*जन्म देऊनिया पिता झालाया वाईला*[2]
*माझ्या माऊलीनं लक्ष पराण लाईला*

*दुनया दावली बाप आई या दोघांनं*
*उचलिला वाटा परनारीच्या पुतानं*[3]

*लेक जातीया सासरी आईचा जीव थोडा*
*बापाचा जीव वेडा दारी सजविला घोडा*

१ निर्धास्त. २ वेगळा मोकळा. ३ पुत्राने.

३०

संग्राहक : **श्री. रा. श्री. कदम**

चंदन मैलागिरी नाव तुज्या ग बापाईचं
गोड दूध नारळीचं बया माज्या माऊलीचं

मायबाप म्हणीती लेक वंशाला नसावी
माता पारबती बोलं दुनया कशानं वसावी

सासरी जाती बाळ बाप म्हणीतो जा ग बाई
जन्म दिलेली माजी आई मागं हंबरीती गाई

जोवर आईबाप लेकी तवर तुझी उडी
झाली पुनव पाठमोरी मग चांदाला लागं घडी

आई बापाच्या माघारी लेक माहेराला गेली
भावज गुजरीनं धर्मशाळा दाखविली

आईला म्हणते माई चुलतीला म्हणते ताई
जरीचा पदर डोई पिताजी तुमची भावजई

माईला म्हणते माय चुलतीला म्हणते गंगा
चुलत्या पांडुरंगा खाली बसून गोठी सांगा

देसाई महादेव माय बाई पारबती
भाई राजस ग माझे पुढे नदी शोभा देती

लेकीचा जलम जसा गारवीचा सोपा
आईबापानं केली जोपा

आई बापानी दिली लेक नाही पाहिली चालीरीत
जाई आडली चिलारीत

## ३१

संग्राहक : श्री. स. र. बिन्नर गुरुजी

काशी म्हणू काशी काशी कोणीया खंडात
माझा जल्म झाला आईबापाच्या पिंडात

भरला बाजार बाजारात सारा मेवा
जिवाला वाटतं बया बाबा माजा यावा

भरला बाजार बाजारात सारा खाऊ
बाबा आणि बया भेटनात दोन जिवू

माझीया बाबानं आंबं धाडलं पाडाचं
कागदावर शाई नाव लिहिलं झाडाचं

माझीया आईनं आंबं धाडील्यात लई
सातपुड्या आंबा याची मिऱ्यावानी कोई

आईबाचे पांग नाही फिटती जलमात
बाबाजींनं दिली मला मोठ्या घराण्यात

पंढरीच्या वाटं मोकळे माझे केस
आईबाप बरोबर घडली एकादस

पंढरीच्या वाटं मोकळी माझी वेणी
आईबाप बरोबर आखाड्या केल्या दोनी

पंढरीच्या वाटं मी त होईन माथन[१]
येतील आईबाप पाणी पितील ओतून

१ रांजण.

पंढरीच्या वाटं मी त होईन बाभळ
येतील आईबाप वर टाकतील तांदूळ

पंढरीच्या वाटं मी त होईन गाय
येतील आईबाप आधी धरीन त्यांचे पाय

३२

संग्राहक : श्री. प्रभाकर रा. भामरे

बाप मना अंबा माय मनी अंबराई
गहेरी पडे छाया माले निंदरा लागी गई

बाप मना वड माय मनी शेवडाई
काय सांगू बाई दोनी झाडसनी बडाई

बाप मना अंबा माय केळसनी फनी
घाल माळ पाणी झाडं उपकारी दोनी

आई मना बाप दोनी अमृतन्या हीरी
भाऊ नि भावजया दोनी कमदन्या[1] मेरी[2]

आईबापनी सेवाले कई येऊ नही आड
भरतारनी सेवाले माले मोठी रे आवड

पंढरीले जाऊ संगे घेऊ मना बापा
घागरे घोळाना संगे सारजाना थापा[3]

१ कमोद नावाचा तांदूळ, २ ओळी (पिकांची) ३ जथा, थवा

नाना मन्हे माय दौलतन्या भित्ती
केसार कस्तुरीना गिलावा देऊ किती

नाना कशा म्हणे लेकी दैवनी मालन
आगे मांगा भाऊ मागे घेतला जलम

नाना कसा म्हणे लेकी सासरे कसं कटं
शेवाळ्या दगड पाय ठेई वळकट

आईबानी पोट जलम लेवानी तारीक
रेशमी दोरी गाठ पडनी बारीक

मननी हाऊस सये मनात न्हाईनी
सरगी गया आईबाप त्याले न सांगायनी

समींदर ढवळे समदा सये काटोकाट
सरगी गया आईबाप त्यांना तपास लागे कोटं

## ३३

संग्राहक : श्री. मा. ल. सोमवंशी

आईबाच्या घरी खाल्ली दुधावरची साई
सासरी ग वया बोलायाची सत्ता न्हाई

आईबाच्या घरी राज्य केलं लेकावाणी
लेकायापरास मला देखिलं साजणी

आईबाच्या घरी म्या लुटिली द्वारका
माहेर ग वसा आता झालाया पारका

पंढरी करावी आईबाप विचारोनी
आंघोळी बसावे चंद्रभागी सावरोनी

पंढरी करावी आईबाचा आशीर्वाद
घेऊ नये कोणा लोकायाचा आपीर्वाद[1]

लाडक्या लेकीनं केलं आकान[2] तुफान
माऊली बोलता कडी[3] घेतली बापानं

पाण्यापावसाची आली आगूट रेटून
सांगते सयांना येते आईबाला भेटून

आगिनीच्या फुडं जळती वल्ली बेटं
आईबासारखा सौदा मिळंना ग कोठं

जंवर आईबाप तंवर येऊ जाऊ
पिके आंबराई तंवर सराई घेऊ

आईबाप माझे नळनीळ जोडी जशी
पाण्याच्या जिव्हाळ्याला हारळ लसलशी

आंब्याची आंबराई टाकिते हाती डाव्या
आईबाच्या गावा जाया मन माझं घेतं धावा

पायातल्या [illegible]णा[4] काढिते मी वज्जं वज्जं
वाट वाढूळ बघती सये आईबाप माजं

लिंबाला लिंबोळ्या लिंब झाला किती जड
आईबापायाला हैती लेकीबाळी गोड

मंचरीच्या बाजायारी वाणी हिंडे घेऊन गोणी
भारूभार देते सोनं आईबाप दिलं का कोणी

१ शाप. २ आकांडतांडव. ३. कड, बाजू. ४ वहाणा, चप्पल.

मंचरीच्या बाजायरी किराणा झाला सस्ती
आईबाप माझी मला दोन्ही मिळाली ग वस्ती

मंचरीचा बाजायार दिसतो सये रिता रिता
आईबाप माझी आली दिस घेऊन पुरता

आईबाप बोले लेकी लाड खायाचा पियाचा
उचलिला वाटा परघराला जायाचा

आईबाप बोल लेकी काय सराई बराई
वाढवून वरतून धन लोकांची कराई

लेकीचा जलम बाई बंगाळ बंगाळ
आईबाप बोले घडी योगाची संबाळ

आईबाप बोले लेकी तांदळाची गोणी
जाशील परघरा लोटतील केरावाणी

आईबाप बोले लेकी हालन मालन
जाशील परघरा तिथं दुयीरी बोलनं

आईबाप बोले लेकी संसाराची साळू
घेऊनी मांडीवरी बये भरली म्या टाळू

बाप आणि आई माझी निवाऱ्याची कोप
त्यांच्या आसऱ्यानं आमी निसूर[१] घेतो झोप

---

१ निवांत, निर्धास्त.

३४

संग्राहिका : सौ. शुभा वाजपेयी

बाप मना राजा काशी खंडमांना वड
जिनी दिना जन्म पानी पारंबीना गोड

म्हादेव मना पिता काशीखंडे वड डोले
जिनी दिना जन्म नाव भागीरथी चाले

देसदेसनं पानी आड माहेरना गोड
ज्या देसना मायबाप त्या देसनं लागे वेड

वाटना वाटसरू बंदा रुप्या देऊ तुले
माय बापना मह्या खुशाली सांग माले

माय तोवर माया बाप तोवर हरजार[1]
भाऊ तुनी वाट देखू मी निराधार

मिरीवरी मिरी एक मिरीना भराव
मायबाना घर माले न्हारीना सराव

उंढायानं[2] ऊन्ह हिवायानं कनकं भारी
आईबांनी लाल शाल पांघरी बसू दारी

देवले सांगस माले मारी टाक देवा
आखो जन्म देवा त्याच मायबापे देवा

बाप मना समींदर माये वाहे नदी जशी
जीवले बहू खुशी

---

१ येरझाऱ्या, येणे जाणे. २ उन्हाळा.

बाप सुन्यानासारखा माय मनी चांद जशी
जीवले वहू खुशी

३५

संग्राहक : श्री. प्रभाकर शिळणकर

काशीची कावईड सये रामेसरा नेली
पुण्याई फार झाली मायबाची

नेस मायबाई लडीचा तपशेला
पटयारी गाव केला बाबाजीनं

नेस मायबाई लडीचा काळा गोट
कागदी नाव मोठं बाबाजीचं

बापाचं उसनं काही केल्यान ग फिटे
कष्ट हरणीला मोठं मायबाई

काशीला गेले बाबा बया दोघं पुण्यवान
जोड्यानं केलं दान बाबाजीनं

आऊक्ष चिंतीते मायबाबाचीया पुत्रा
गऊरीच्या मंगळसूत्रा मायबाई

आईबाची माया सावूली घनदाट
सोडवेना वाट माहेराची

## ३६

संग्राहक : श्री. बाळासाहेब वारमुंख

एक वन वलांडिलं    एक वन वलांडिलं
दोन वनं वलांडिली    दोन वनं वलांडिली
चौथ्या पाचव्या वनाला    चौथ्या पाचव्या वनाला
श्रावण काशीला निघाला    श्रावण काशीला निघाला
आई बापाची कावड    घेऊन श्रावण निघाला
गेला काशी जवळी    गेला काशीजवळी
काशी गावामंदी गेला    काशी गावामंदी गेला
आईबाप बोलत्यात    आईबाप बोलत्यात
बाळ माझ्या सरावन    बाळ माज्या सरावना
तान लागली आमाला    तान लागली आमाला
आईबापाची कावड    आईबापाची कावड
ठेवली बेलाच्या फांदीला    ठेवली बेलाच्या फांदीला
घेतली हातामंदी झारी    घेतली हातामंदी झारी
श्रावण गेला तळ्यावरी    श्रावण गेला तळ्यावरी
घातली पाण्यामंदी झारी    घातली पाण्यामंदी झारी
झारी बुडबुड बोलली    झारी बुडबुड बोलली
दशरथमामा जागा झाला    दशरथमामा जागा झाला
बाण त्यानी सोडीयेला    बाण त्यानी सोडीयेला
बाळ श्रावण मारिला    बाळ श्रावण मारिला
श्रावण धरणीशी पाडिला    श्रावण धरणीशी पाडिला

दशरथमामा जवळ गेला    दशरथमामा जवळ गेला
बाळ श्रावण पाहिला    बाळ श्रावण पाहिला

श्रावणबाळ बोलता झाला    श्रावणबाळ बोलता झाला
आईबाप तानेल्याती    आईबाप तानेल्याती

कावड बेलाच्या फांदीला    कावड बेलाच्या फांदीला
घेतली हातामंदी झारी    घेतली हातामंदी झारी

दशरथमामा निघायाला    दशरथमामा निघायाला
गेला आईबापाजवळी    गेला आईबापाजवळी

आईबाप बोलत्याती    आईबाप बोलत्याती
बाळा माज्या सरावणा    बाळा माज्या सरावणा

उशीर तुला झाला कसा    उशीर तुला झाला कसा
कारं बोलनासं बाळा    कारं बोलनास बाळा

पाणी नको आमायाला    पाणी नको आमायाला
दशरथमामा बोलता झाला    दशरथमामा बोलता झाला

बाळ श्रावण मारिला    बाळ श्रावण मारिला
श्रावण श्रावण म्हणूयींनी    श्रावण श्रावण म्हणूयींनी
हाक फोडिली दोघांनी    हाक फोडिली दोघांनी
गेली सरगाला निघोनी    गेली सरगाला निघोनी

## ३७

संग्राहिका : **सौ. सिंधू भालेराव**

आस्तुरी जलम नको मनले देवाला
आईबापाची सेवा नहीं घडली जिवाला

जलम देऊनी आई मपली वायली
संसाराची सुई माह्या पित्यानं लाईली

आईबापाची संपदा लेक लुटिती द्वारका
दिलं लगीन लावून का ग उंवरा पारखा

गाते पैली ववी माज्या बापाजी बेलाला
मायबाई माजी जाई गुंतली येलाला

पहील्या ओवीचं नाई राहिलं धोरण
बाबा माजी बया रत्नं जाईल फिरून

चला शिंगूबाई चालीचा घेते लाहू
एका इळामंदी मला बाबा बया दावू

काम मी करिते माज्या कामाच्या येळाला
परिंद झाले बाई आईबाबाच्या साळाला

बाया आणि बयाबाई तिसरा माह्मा गुरु
देवाजीच्या दारी चारी मार्ग झाले सुरू

दरीयाच्या काठी मगर माशीयाचं घर
बापाजीनं माह्या जलम दिला बया थोर

चला जाऊ पाहू काशी वारानशीचा गोटा
आईबापापरीस असा देव कोण मोठा

काशीच्या पल्याड बदरीनारायणाचं ठाणं
मायबाप खांद्यावरी दर्शन केलं रावणानं

काशीचं नाव घेता खांब द्वारकेचा हालं
मायबाप माझं जहाज दर्यामंदी चालं

चला जाऊ पाहू काशीचं काळं पाणी
कोणीही देव नाही आईबापावाणी

आईबापापोटी लेक जलामली धुरपती
कुशावर्ती अंग धुती दोही कुळ्या उद्धरती

आस्तुरी मिळंल लेण्या लुगड्यानं झ्याक
नाही मिळत आईबाप रुपये दिले जरी लाख

काय करू बाई माज्या मावंच्या गोताला
आईबापाविना कोणी धरीना हाताला

## ३८

संग्राहक : **श्री. मा. कृ. कोकाटे**

बापाजी माझा वेळू बया माझी वेलजाई
दोहींच्या सावलीत मला निर्मळ झोप येई

पहिली माझी ओवी बापाजी जगजेठी
बया माझी मालईन खजिगन्याची पेटी

पहिली माझी ओवी बापाजी राजमानी
बया सारजा लई गुणी

वकडी वाभईळ पानं तिची कातरीवानी
वावाजी आई माझे धनुष्यबाणावानी

वैराळ साद देई घ्यावं वांगड्या कालाकिता
वया माझी ती मालन देई जामीन माझा पिता

भरल्या वाजारात सुनी दिसते ओसरी
आई वाप दिसल्यानं पेठ भरली ग सारी

आईवापावानी मला कुणाची नाही गोडी
आई न वाप माझे रमामाधवाची जोडी

सेरभर सोनं बाई बांधिलं पदरात
आई वापासाठी येडं हिंडतं वाजारात

अंतरीचं गुज बाई बोलू मी कुणापाशी
आई न बाप माझी झाडं गुजाची देवापाशी

सासरवासायाची रगड भरली पेवं
गौळण माझी बया पित्या दौलता माप घेवं

सासरवासायाच्या भरल्या गडे खोल्या
आईबापाविना कोण लावील त्येला किल्या

आई न बापायांना दिसती लेक थोर
सासूसासऱ्यांना गडे अंगणीचा केर

३९

संग्राहक : प्रा. प्रभाकर मांडे

आईचं गोत जशी नदीईची वाळू
बापाजीचं गोत आत्तीबाई ग मायाळू

सासरी जाते लेक मागं परतुनी पाये
आले वाटी लावायाला तुझे बापमाये

बाप माझा चाफा माय माझी जाईजुई
जाई तुझे येल पांगईले गावोगाई

बाप माझा चाफा माय माझी आंबवेल
नारायणा देवा दोनी झाडा पाणी घाल

बाप माझा चाफा माय माझी नर्म गादी
आठवला नाही गेला हिवाळा ग कदी

जवर मायबाप तवर माझ्या येरझारा
आडवा डोंगर पायाखाली झाला चुरा

जवर मायबाप तवर घोर काई
तपतील कळ्या मग कोमेजून जाई

सटीला जलम घातीला सुन्या राती
बोलती माय माझी बाळ बापापाशी होती

आस्तुरी जलम देव घालूनी चुकले
आईबापायाचे नाही उपकार फिटले

:::४०:::

संग्राहिका : सौ. विमल थत्ते

उंच वसरीला देसाई[१] करी संध्या
हरन मायबाई अमृतानं भरी तांब्या

बाप माझा वड माय चिंचबाई गार
याहींच्या सावलीला जानी माझी निरघर[२]

देसाई राया माझा समींदराचा साठा
माय माझ्या हारनीचा गंगेचा ताफा मोठा

ववीला गाते मी ग देसाई सागईर
माय हरन माझी निरशा दुधाची घागईर

बाप करी बोळवण माय भरीते शिदोरी
चला बंध तेथवरी वाट तुम्हानं साजरी

भरल्या सबमंदी उचलीना ग पापनी
मायबाच्या नावासाठी जीव घालते काचनी

मायबाचा वाणवसा वाटिते मी घरोघरी
मागं उसायाच्या गाड्या म्होरं पाकाच्या घागरी

नातवंडा परतवंडांनी भरल्या चारी बाजा
माय बाप माझे येती गुरु महाराजा

बोळवण केली सये हलक्या मोलाची
मायबापानं व दिली गाय बैलाच्या तोलाची

१ पिताजी. २ निर्घोर, बिनघोर, निचींत.

*लुगडं घेतलं त्येच्या पदराला मासा*
*किती पडल्यात इसा मायबापायाला पुसा*

# लो | क | क | था

## अनुक्रम

⁝⁝ श्री. रमजान खान, पुणे

लिंबाजीरा

# लिंबाजीराव

श्री. रमजान खान

असंच एक छोटंसं गाव होतं. तिथं एक गरीब शेतकरी रहात होता. त्याची बायको भारी सालस आणि कष्टाळू होती. त्यांना सात मुलं होती. मुलखाची आळशी आणि आयतखाऊ. त्यांतलं एकही पोर कवडीचं काम करीत नसे. बापानं कष्ट करायचे. आईनं चार घरं मागायची आणि शिळ्यापाक्या टुकड्यावर कशीतरी गुजराण करायची. हा त्यांचा नित्यक्रमच होऊन बसला होता.

सारी मुलं मात्र गोरी गोरी पान, नाकी डोळी नीटस आणि रूपाने देखणी होती. सगळ्यात थोरल्याचं नाव लिंबाजी. हा तर सगळ्यात देखणा होता. बोलायचा पण भारी मिठास. रोज सकाळी उठायचा, आंघोळपांघोळ करायचा, आईबापाचं दर्शन घ्यायचा आणि गावच्या पारावर जाऊन बसायचा. गावचे लोक थट्टेनं त्याला म्हणायचे, "काय लिंबाजीराव, औंदा लगीन बिगीन करायचं का नाही?" लिंबा चटकन उत्तर द्यायचा, "हो तर, यंदा लगनाचा बेत हाय की." "मग मुलगी बिलगी बघितली का एखादी?" गावकरी मंडळी असा प्रश्न टाकून फिदी फिदी हसायची.

"मी राजाच्या मुलीशीच लगीन करणार हाय" लिंबाही तितक्याच

धिटाईनं उत्तर द्यायचा. लोकांना तेवढीच करमणूक वाटायची. लिंबा मात्र हे सारं मनापासून बोलायचा.

एके दिवशी लिंबा पहाटेचाच उठला. आंघोळ पांघोळ आटोपली. नित्यनेमाप्रमाणे आईबापांचं दर्शन घेतलं. शिळापाका तुकडा पदरात बांधला आणि जिकडं पुढा तिकडं मुलूख थोडा असं करीत करीत एका नगराजवळ येऊन थांबला.

लिंबानं विचारपूस केली. तर ती एका राजाची नगरी आहे हे त्याला समजून आलं. तो तडक राजवाड्याकडंच गेला. दरवाजावर नागव्या तरवारीचा पारा होता. लिंबाजी सरळ जाऊन पारेकऱ्याला भेटला. त्याला सलाम ठोकला आणि आपल्याला राजाला भेटायचं आहे असं पारेकऱ्याला म्हणाला. लिंबाजीच्या अंगावरचे कपडे पाहून शिपाई मंडळी हसू लागली. एक शिपाई म्हणाला देखील, "अरं तुला याड बिड तर लागलं न्हाई ?" तरीही राजाच्या भेटीचा हट्ट सोडायला लिंबाजी तयार नव्हता. तो तिथंच बैठक मारून बसला.

कर्मधर्मसंयोगानं राजा त्याच वेळी शिकारीला निघाला होता. दरवाजावर राजा येताच मोठी ललकारी झाली. शिपाई मंडळींनी खडी ताजीम दिली. लिंबाजीही उठून उभा राहिला. त्यानं राजाला लवून मुजरा केला. लिंबाचं पिळदार शरीर आणि रुबाबदार चेहरा पाहून राजाही जरा चकीत झाला; पण तसं काही न दाखविता त्यानं लिंबाला थोडे दटावूनच विचारले, 'कोण रे तू? काय पाहिजे तुला?"

लिंबानं आपलं नाव गाव सांगितलं आणि मी राजकन्येला मागणी घालायला आलो आहे असं बेधडक सांगून टाकलं.

एक भिकार माणूस आपल्या लाडक्या लेकीला मागणी घालतो आहे, हे ऐकून राजाचं पित्त खवळलं. याला चांगला बदडून नगराबाहेर हाकलून द्या असा राजानं प्रधानाला हुकूम फर्माविला.

राजाची आज्ञा, मग काय? ताबडतोब लिंबाजीच्या मुसक्या बधल्या गेल्या आणि मारीत झोडीत त्याला गावाच्या बाहेर नेऊन हाकलून देण्यात आला.

हिरमुसलेला लिंबा मुकाट्याने आपल्या गावी आला. आईबापांचं दर्शन घेतलं आणि झालेली हकीकत त्यांच्या कानांवर घातली. हे डोक्यातलं वेड सोडून दे म्हणून आईबापांनी त्याला खूप सांगितले, पण त्याने काही आपला हेका सोडला नाही. "तुमच्या पायाच्या पुण्याइनं राजाची मुलगी घरी चालून आली नाही तर या लिंबाजीचं नाव बदलून ठेवा तुम्ही" अशी तो आईबापांना खात्री द्यायचा! विचारे आईबाप, कपाळावर हात मारून घेण्यापेक्षा अधिक काय करणार?

लिंबाजीचं हे वेड सर्व गावभर लोकांना ठाऊक झाले. "राजांचा जावई", "राजाचा जावई" म्हणून लोक त्याची थट्टा करीत. पण लिंबाजी तिकडं लक्षच देत नसे. तो आपल्याच चालीनं चालायचा.

होता होता चार सहा महिन्यांचा काळ लोटला. लिंबाजीच्या डोक्यातलं वेड काही कमी झालं नाही. तो पुनः मुशाफरीवर निघाला. आईबापांचं दर्शन घेताना त्यानं सांगूनच टाकलं मुळी त्यांना की मी आता लग्नाला बोलवायलाच तुम्हांला येईन. आईबापानं आशीर्वाद दिला, 'इडा पिडा टळो नि बळीचं राज्य येवो."

लिंबाजी मार्गाला लागला. साऱ्या रस्त्यानं राजाची मुलगीच आपल्याबरोबर बोलते आहे असं धरून तो चालला होता. होता होता ते नगर आलं. लिंबाजी मागच्यासारखाच त्या देवडीवर जाऊन उभा राहिला आणि मला राजाला भेटायचं आहे असा हट्ट धरून बसला. शिपाई मंडळींनी त्याला परोपरीने समजावून सांगितले, पण त्याने आपला हट्ट सोडला नाही.

पण काहीही म्हणा, लिंबाजीचं दैवच थोर. मागच्यासारखाच आजही राजा शिकारीला निघाला. बरोबर आपली कन्याही घेतली. राजाची स्वारी वेशीवर येताच कर्णे फुंकले गेले. ललकारी उठली. भालदार चोपदारांची एकच तारांबळ उडाली; पण आपला लिंबा काही घाबरला नाही. तो रस्त्याच्या कडेला ताठ उभा राहिला.

राजाची स्वारी पुढे येताच लिंबाजी पुढं झाला. त्यानं राजाला सलाम ठोकला. राजानं त्याला प्रथम ओळखलंच नाही. पण आपण का आलो आहे

हे कारण सांगताच राजाच्या ध्यानात या स्वारीचा पराक्रम आपोआपच आला. आपल्या मुलीच्या समोरच त्याने मागणी घातल्यामुळे राजाला त्याचा फारच संताप आला. त्याने त्याचा कडेलोट करा असा हुकूम बजावला. शिपाई लिंबाजीला पकडायला धावले. तरीही स्वारी गंभीरच. समोर मृत्यु उभा राहिलेला असताही भीतीची सूक्ष्म छटाही त्याच्या चेहऱ्यावर उमटलेली दिसली नाही. ही गोष्ट राजाच्या मनालाही चाटून गेली. पण ती त्याने बोलून दाखविली नाही. लिंबाजीच्या या बेफिकीरपणाचा राजकन्येच्या मनावर मात्र चांगला परिणाम झाला. त्याचं राजबिंडं रूप बघूनच राजकन्येचं अर्धअधिक मन हेलखावे खाऊ लागले होते. आणि त्याच्या खंबीर मनोवृत्तीमुळे तर तिचं मन तिकडं ओढ घेऊ लागलं. तिनं आपल्या वडिलांना विनंती केली की, "या तरुणाला असली कठोर शिक्षा देऊ नका. माझी त्याच्याशी लग्न करायची तयारी आहे."

मुलीची इच्छा ऐकून राजाच्या काळजाचं पाणी पाणी झालं; पण मुलगी काही आपला हट्ट सोडायला तयार होईना. शेवटी राजा संतापला व त्या संतापाच्या भरात त्याने मुलीचा हट्ट पुरा केला.

राजाने लिंबाजीच्या मुसक्या सोडायला सांगितले. त्याला चांगला पोषाख घालून वाजतगाजत राजवाड्यावर आणायला सांगितले. लिंबाजीची सुटका झाली व त्याला राजाचा निरोप कळविण्यात आला; पण तो अशा परिस्थितीत आईबाप, बहीणभाऊ व वऱ्हाडी मंडळीशिवाय राजवाड्यावर जायला तयार होईना. ही गोष्ट राजाच्या कानांवर गेली. राजाने लिंबाजी-बरोबर लावलष्कर दिलं, अंबारीसहीत हत्ती दिला. घोडे दिले. मेणा दिला. मग लिंबाजीची स्वारी गावाकडे झोकात निघाली. गाव जवळ येताच लिंबाजी हत्तीवरून पायउतार झाला. लष्कराला तिथंच थांबायचा हुकूम केला आणि आपण अनवाणी पायानं चालत आपल्या घरी गेला. बिचारे आईवडील हताश होऊन बसले होते. त्यांना पाहताच त्याने त्यांचे पाय धरले. झालेली हकीकत त्यांच्या कानांवर घातली. पण त्यांचा काही या गोष्टीवर विश्वासच बसेना. शेवटी गावाबाहेर लावलष्कर उतरले आहे, ही बातमी हां हां म्हणता गावात पसरली. ती

आईबापांच्या कानांवर येऊनही आदळली. तेव्हा कुठं त्यांना ही गोष्ट खरी वाटली.

आईबापांचं दर्शन घेऊन लिंबाजी घराबाहेर पडला. त्यानं गावात फिरून घरटी आवातनं दिलं. आणि झाडून सारा गाव गोळा केला. वऱ्हाड थाटामाटात राजाच्या गावी आलं. सगळे गोरगरीब व साधेभोळे शेतकरी लोकांचे वऱ्हाड बघून राजाला फार दुःख झाले. पण मुलीच्या पुढे बिचारा करणार काय? तिचं मन वळवावं म्हणून राजाने गच्चीवर नेऊन तिला त्या वऱ्हाडाची कल्पना दिली. वेष पालटून बघून ये आणि मग लग्नाला तयार हो असा सल्लाही दिला; पण एकदा घेतलेला निर्णय बदलावयास मी तयार नाही असं राजाला तिनं खडसावून सांगितले.

राजाचा नाइलाज झाला. जनरीतीप्रमाणे राजा आपले मानकरी घेऊन वेशीबाहेर आला. उभय बाजूंच्या लोकांच्या भेटी झाल्या. नारळ फुटला आणि सारं वऱ्हाड वाजत गाजत राजवाड्यावर आलं.

लग्नघटिका भरली. राजाराणीचा जीव खालीवर होऊ लागला, पण नवऱ्या मुलीच्या चेहऱ्यावर दुःखाची अंधुक रेषाही उमटलेली दिसली नाही. शेवटी शुभ मंगल सावधान म्हणून लग्नास प्रारंभ झाला. लग्न लागले. आणि राजकन्या एका भिकार माणसाची नववधू म्हणून सासरी जायला निघाली. राजाच्या मनाविरुद्ध हे सगळं झाल्यामुळे तो रागावलेलाच होता. पण आईचं हृदय स्वस्थ कसे बसणार? राणीधर्म सोडून ती आपल्या मुलीला छातीशी धरून रडू लागली. पण मुलीनेच आईला धीर दिला. "माझं काहीही वाईट झालेलं नाही. मी जाईन तिथं सुखी राहीन व मी लोकांना सुखी करीन असा आशीर्वाद तुम्हीच मला दिला आहे ना? आईसाहेब, डोळे पुसा आणि तुमच्या या लेकीला सासरी जायची परवानगी द्या."

शेवटी मुलीची पाठवणी झाली. जाताना राजानं सर्व वऱ्हाडी मंडळीला भारी किंमतीचा पोशाख केला आणि वेशीच्या बाहेर जाऊन निरोप दिला.

मजल दरमजल करीत लिंबाजीरावाचं लग्नाचं वऱ्हाड त्याचे गावी आलं सारं वऱ्हाड वाजत गाजत गावात शिरलं. नवरा नवरी आपल्या चंद्रमौळी

झोपडीजवळ उतरली. पाठवणी करण्यासाठी आलेल्या राजाच्या लोकांना हे अठरा विश्व दारिद्र्य पाहून फार दुःख झाले. परंतु नवऱ्या मुलीच्या मनावर याचा काहीच परिणाम झालेला दिसून आला नाही. तिनं उंबऱ्यावरचं माप ओलांडलं. घरात प्रवेश केला आणि सारं घर ताब्यात घेतलं. आपल्या परिपाठातलंच हे घर आहे अशीच तिची वागणूक दिसून आली.

दुसरा दिवस उजाडला. पाठराखणी मंडळी परत फिरली. नवऱ्या मुलीने आपल्या सासूसासऱ्यांना व दीरनणंदांना नमस्कार करून सर्वांना समोर बसायला सांगितलं आणि आता यापुढे कामाशिवाय कोणीही या घरात फुकटचं खायचं नाही अशी विनंती केली. सर्वांनी तिचं म्हणणं मान्य केलं. सारी मंडळी कामाला लागली. निढळाच्या घामानं मिळविलेल्या मजुरीवरच आज लिंबाजीरावांच्या घरी चुलीवर भांडी चढली. चार घरचे शिळे टुकडे खाऊन कंटाळलेल्या त्या मंडळींना आपल्या मेहनतीचं फळ चाखताना श्रमाचं महत्त्व पटलं. रोज आई-वडिलांना नमस्कार करून ती भावंडे बाहेर पडत आणि सकाळपासून सायंकाळपर्यंत कष्ट करून मिळेल ती मजुरी घेऊन हसतमुखाने घरी येत. सात दुणे चौदा हात कामाला लागल्यावर लक्ष्मीला हो काय तोटा ?

घराचं रूप पालटलं. अगोदरच सगळी मुलं देखणी. त्यांत भरपूर काम, पोटभर दाम आणि चांगलाचुंगला घास खायला मिळाल्यावर ती सारी मुलं राजपुत्रासारखी शोभून दिसू लागली.

राजकन्येनं सांगावं आन् साऱ्यांनी ऐकावं असा पायंडाच पडून गेला. घाम गाळावा, काम करावं, मगच जेवावं, असा दंडकच तिनं घालून दिला. सारा गाडा बिनबोभाट चालू लागला.

होता होता मग असेच दिवस आले नि गेले. महिने लोटले. वरसं मागे पडली—आणि—एक्या चांदण्या रात्री अवचितच एक नवल घडलं. रात्री बारावर दोन वाजले असतील. एकाएकी दारावर थाप ऐकू आली. लिंबाजी उंबऱ्यालाच उसं देऊन झोपला होता. तो लगबगीनं उठला. त्यानं हळूच बायकोला उठवलं. ती उमगली. लगबगीनं उठली. आंघोळपांघोळ केली. हाती

पंचारती घेतली. आणि दरवाजा उघडून बाहेर आली. तर काय?....हिरवं लुगडं ल्यालेली, कपाळी मळवट भरलेली, हाती हिरवा चुडा भरलेली साक्षात लक्ष्मी उभी दारात.

राजकन्येपाठोपाठ लिंबाजी पण बाहेर आला. दोघांनी जोडीनं देवीला दंडवत घातला. खणांनारळांनी ओटी भरली. मग लक्ष्मीला हाती धरून राज्यकन्येनं तिला घरात आणलं. ती कायमचंच ठाण मांडून बसली. मग काय कमी पडणार? राजाचा खजिना रिता होऊ लागला. आणि लिंबाजीरावचे इमल्यावर इमले चढू लागले. भला मोठा राजवाडा उठविला. गावाचं रूपही पालटून टाकलं. एक नमुनेदार नगर वसवलं. तेच उद्योगनगर म्हणून लोक ओळखू लागले.



# दौलतीच्या भिंती

(सासूसासरे)

# अनुक्रम

⁙ सौ. कुमुदिनी पवार, चितळी, सातारा ⁙ सौ. गंगूबाई बाबर, पुणे
⁙ सौ. शरदिनी मोहिते, सांगली ⁙ सौ. लीलाराजे पटवर्धन, बुधगाव, सांगली
⁙ श्रीमती कमलाबाई सावंत, वागणी, सांगली ⁙ श्री. ना. रा. शेंडे, नागपूर
⁙ सौ. पुष्पा घाटगे, कोल्हापूर ⁙ सौ. सजाताई सावंत, वागणी, सांगली
⁙ सौ. लीलावती पवार, कऱ्हाड, सातारा ⁙ सौ. सावित्रीबाई सावंत, वागणी, सांगली
⁙ प्रा. गजमल माळी, औरंगाबाद ⁙ सौ. सिंधू वारनूळकर, कोल्हापूर
⁙ डॉ. विमल चोरघडे, पुणे ⁙ श्री. बाजीराव पाटील, चिखलगाव, अकोला
⁙ सौ. ताई रानडे, नासिक ⁙ श्री. पं. ख. नागपुरे, हिवरखेड, अकोला
⁙ श्रीमती आनंदीबाई शिर्के, पुणे ⁙ श्री. वसंत झांबरे, कढोली, जळगाव
⁙ श्री. प्रभाकर रा. भामरे, दरेगाव, नासिक ⁙ श्री. रा. दा. पाटील, खडकीसीम, जळगाव
⁙ सौ. विमल थत्ते, हैद्राबाद.



# शंकर पार्वती

उरीपोटी दाटलेला उमाळा गिळला पाहिजे, आलेला हुंदका आवरला पाहिजे, हौसमौज मागं ढकलली पाहिजे, कोपऱ्यातल्या केरसुणीचं जिणं जगलं पाहिजे, शिळंपाकं खाल्लं पाहिजे, मनोभावाला चेपून टाकलं पाहिजे आणिक गळी रुतणाऱ्या चित्ताकाच्या फासाप्रमाणं असह्य होणारा सासुरवास न बोलता, न सांगता सोसलाच पाहिजे अशा नशिबाची मालकीण ह्या दुनियेत एकच. आणि ती म्हणजे सासुरवाशीण. खाली मान घालून पुढं येईल ते काम बिनबोभाट मागं सारीत तिनं संसाराचा गाडा रेटावा असा सासरच्या घरानं घातलेला दंडकच. तिला वेगळं म्हणून अस्तित्व जसं काय नाहीच ! अंहं !

त्यामुळं शरीर चालत असलं तरी तिचं मन खंगत गेलेलं असतं. आणि अस्थिपंजर ती दिसत नसली तरी तिची मनोभावना पार काळवंडून गेलेली असते. माहेरचं मूळ आलं दारी तरीदेखील ही त्याच्याशी बोलू शकत नाही. फार फार तर सासरच्यांना त्याला तसाच परतवू नका म्हणून विनवणी करील बिचारी. पण ऐकतो कोण तिचं? दारी कारल्याचं आळं लावून मग तिथं बी पेरल्यानंतर बऱ्याच दिवसांनी फुलणाऱ्या वेलावरच्या कारल्यांची भाजी करून खाल्ल्यावर मग जा म्हणणाऱ्या सासूला बोलावं कुणी? बोलणं होतच नाही. म्हणून अशी सून भल्या पहाटेला जात्यावर बसते. दळावं म्हणते. आणि मग कुणाचीच भाडभीड तिथं उरत नाही. अशावेळी ती मनाला येईल ते जात्या ईश्वराशी बोलत सुटते. आपल्या गोड गळ्यानं हा देव आळवते. भावफुलांनी डवरलेल्या पूजेनं मनाचं समाधान करू पहाते. तिच्या आवाजानं दाही दिशांना पाझर फुटतो आणि ह्या राधिकाच्या कोयाळ बोलण्यानं गोड अलगूज वाजत असल्याचा भास शेजीराणीला होतो !

तर अशी ही सासूरवाशीण आपल्या माहेरच्या वळणानं मोहोरलेली. आईच्या शिकवणीनं रुळलेली. आजोळच्या सांगाव्यानं शिणगारलेली. आया-वायांचं ऐकून शहाणी झालेली. ती आपल्या सासूसासऱ्यांना म्हणते आपल्या घरच्या दौलतीच्या भिंती! चिरेबंदी अशा भक्कम आधाराच्या. आणि त्यांचा मान राखते कसा म्हणाल तर कैलासीच्या शंकरपार्वतीप्रमाणे! देवासारखी त्यांना ती मानते आणि तिची वाणी त्यांच्याएकी फार फार उदे बोलत रहाते.

सासूबाईंची कूस यशाची, त्यांच्या पदराला लाखमोलाच्या गाठी, त्यातले रत्नहार म्हणजे आपले पतिराज ही तिची कल्पना. म्हणून धडाभर कुंकू महिन्याकाठी लागावं असा लेकीसुनांनी आपला वाडा भरल्याचा तिला अभिमान वाटतो. त्यामुळं आपली कूस उजवण्यासाठी तिला सासूसासऱ्यांचे आशीर्वाद हवेसे वाटतात. घरचा कुलदीपक या आशीर्वादाच्या बळावरच अंगाखांद्यावर खेळू शकेल हा तिचा विश्वास आहे. त्यासाठी सासूसासऱ्यांना देव्हाऱ्यावरील सोनं मानून त्या उजेडात सारं घरदार लोटून काढायला ही सखी राजीखुशीनं पुढं येते आहे! एवढेच नाहीतर त्यांना आपल्या कुळशीलाचे भर्जरी निशाण ती मानते आणि त्यांच्या जिवावर जगण्यात भूषण समजते.

त्यामुळं अधून मधून गळसरी नाहीतर काही दुसरा अलकार तिला मामा-जींच्यापासून हवासा वाटतो. म्हणून ती त्यांच्या माडीवर उभी रहाते न् माहेरच्या चंद्रमौळी झोपडीतील लंकेचं वैभव बघून सुखी होते. ढाण्या वाघासारखे तिचे भाऊ तिच्यासाठी धावून येणारे असतात; आणि दारी पडलेल्या चाफेकळ्यांच्या खुणांनी कावराबावरा झालेला बाप लेकीला बरं नसल्याचं जाणून शुक्राच्या चांदणीसरशी उगवता होऊन धावत येतो. तर त्याच एका आनंदात ती समाधान पावते आणि सासूसासऱ्यांनाच आईवडील मानून त्यांच्या सेवेला काही उणे पडू देत नाही. तिचं मन केवढं मोठं म्हणावं आणि तिचा हा तेगार तरी किती विलोभनीय समजावा? कारण तिचं एकच म्हणणं की, सारा संसार हा सासूबाईंचा न् पतिदेव हाच एक आपल्या मालकीचा दागिना, तर बाकीच्या उण्यादुण्याची पंचाईत मी करूच कशाला? उलट, सासूसासऱ्यांना

आपल्या संसाराच्या सोन्याच्या भिंती मानून त्यावर आपल्या आयुष्याचा गिलावा चढवायला ही सुंदरी निघालीय! कारण तिचा भ्रतार एवढा चांगला आहे की, त्या सुखाच्या वर्णनानं सूर्यदेवानंही डोलावं न् हिचा हेवा करावा! खरं ना! तिलाच विचारा हवं तर खरं खोटं. आपल्या मायमाऊलीचा पान्हा पोटभर पिऊन साजिवंत झालेली ही राधिका सासूच्या बरोबरीची झालीय हा आनंद काय कमी मोलाचा म्हणावा? बघा तर खरं!

## ⁞⁞ १ ⁞⁞

### संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

सासू नि सासरा दिर माझा ग तिसरा
ओव्या गाऊ भरतारा तू ये रे बा विठ्ठला

सासू नि सासरा दोनी देव्हारींचं देव
पडते मी पाया मनी नाही दुजा भाव

सासू आत्य बाई परसदारीची तुळस
सासरा पाटील माझ्या माडीचा कळस

सासू पारबती सासरा भोळा राजा
यांचीया पोटीचा गिन्यानी चुडा माजा

सासू पारवती सासरा महादेवू
यानच्या पोटीचा चुडा माजा सदाशिवू

सकाळी उठूयीनी शेनापान्यात माजा हात
सर्गी गेलेल्या सासऱ्याचं दैव हाई गोठयात

सासू नि सासयीरा सोन्याची पाखयीरं
त्येंच्या नि सावलीला आमी लोकांची लेकयीरं

सासरा ईसवर सासू मालन पारबती
दीर हाईती गणपती

जावयाची सासू काय करिती कोनामंदी
लाडू बांधिती शेल्यामंदी

सरलं दळण सरलं म्हणू कशी
सासू नि सासरे दोनी भरलेल्या राशी

सासू नि सासईरा दीर तो तिसईरा
गाऊ ओव्या भरतारा पांडुरंगा माझ्या

सासू या ग मालनीच्या पदराला किती गाठी
नऊ लाखाचं सोनं जतान केलं आमच्यासाठी

सासू या मालनीचा पदर हिरवागार
तिच्या ग सावलीला माझा चुडा डौलदार

दिल्या घेतल्यानं पाणी पुरंना नदीचं
सासू सासऱ्याचं गोड बोलणं चवीचं

सासू मालनीचा सये कुसवा येसाचा[१]
चुडा मोत्यांच्या घसाचा

२

संग्राहिका : सौ. गंगूबाई बाबर

सासू नि सासरे शंकरपारबतीच्या मूर्ती
जाऊ तारामती ननंद माझी भागीरथी

सासू सासऱ्यानं किती केलं आमासाठी
आंब्याची आंबराई लावली शेरताटी

१ यशस्वी.

सासू सासऱ्यानं कीरत केली काही
वाड्यामधी आड बारवी[1] ठाव[2] नाही

सासू सासऱ्यानं पुण्य केलं पुण्यामधी
सकाळी उठूनी हात माझा लोण्यामधी

सासू नि सासरा बाई सरगीचे देवू
त्यांच्या पायांवरी आम्ही मस्तक ग ठेवू

सासू नि सासरा माझ्या दौलतीच्या भिंती
बाबा आणि बया काशीखंडाच्या मूरती

सासू नि सासरा आंबा लाविला दोघांनी
बाळाला दिली लेक खाण उत्तम पाहोनी

देणं देवाजीचं पुण्य माझ्या सासऱ्याचं
कडेला तानं बाळ हाती दावं वासराचं

लक्ष्मी लक्ष्मी हाका मारतो सासरा
घरी गुरं ढोरं पाणी पाजितो भासरा[3]

सासू आत्याबाई तुमची सोनीयाची ठेव
तुमच्या शेल्यामंदी जलामले महादेव

सासू आत्याबाई तुमची सोनायाची झारी
तुमच्या मिरीखाली जलामले शिरहारी[4]

सासू नि सासरा माझ्या घराला राकान
सोन्याच्या उतरंडी वर मोत्याचं झाकान

माडीवरी माडी माझ्या आत्ती मामंजीची
सासूबाई लंका जशी मूर्ती सोनीयाची

---

१ विहिरीला. २ खोली. ३ भाचा. ४ श्रीहरी.

सासू सासऱ्यानं कीर्त केल्यात पाह्याला
सात खन माडी मोऱ्या ठेवल्या न्हायाला

सासऱ्यानं कीर्त केल्या बगा न्हाऊन्हाऊ
दारामंदी आड पानी भरी सारा गावू

सकाळी उठूनी माझा हात शेनामंदी
कपाळीचं कुंकू भडक मारी मेनामंदी

सासू आत्याबाई तुमची सोन्याची पावलं
तुमच्या पोटीयींचं मला रतन[2] लाभलं

सासू आत्याबाई तुमच्या पदराला गाठी
कुंकवाच्या पुड्या केल्या जतन[3] आमासाठी

सासू आत्याबाई पडते तुमच्या मी पाया
तुमच्या आशीर्वादं जाते सूनमुख पाह्या

सासू आत्याबाई तुमच्या पोटीयींचं बाळ
सून म्हणूयींनी माझी नका करू राळ

सासू मालनींचा माझ्या पदर भिंगाचा
त्यांचीया पोटीचा चुडा गुलाबी रंगाचा

शेताच्या बांधाला कोण घेतं मेळवण
बाप्पाजीची भैन आत्ती सासू मावळण

शिवेच्या शेतात जोडी कुळव कुनाची
सासऱ्याची माझ्या जोडी डफळ्या वानाची

सासू आत्याबाई तुमच्या करंडीवरी मासा
सासू सुनेचा डौल कसा

---

२ रत्न. ३ सांभाळ.

झालीया दोपार बळीराजा जेवनाला
सासऱ्याचं श्यात शिवेच्या ग लवनाला

सासू सासयीरा माझ्या माडीचा कळस
धाकली ननंद माझ्या दारीची तुळस

सासू नि सासरा माझी ननंद धाकली
बसायाला यांना चंदन वेलाची सावली

देवा भगवाना तुला मागणं बा नेक
सासू सासऱ्याला औक द्यावं शंभराव एक

सासू सासयीरा दैवाचे ग नारी तुला
म्हायार ग भोगायाला

सासू सासऱ्याचा घ्यावा आशीर्वाद सुनं
पोटी फळ काय उनं

सासू सासयीरा दैवाच्या ग वैल द्यावू
जोड्यानं वेल व्हावू

३

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

सासू सासऱ्याचा आशीर्वाद घेग सुनं
दारी कारल्याचा वेल मग फळाला काय उनं

सासू नि सासरे जशी तुळशीची माळ
ह्यांच्या ग सावलीला आम्ही परायाची वाळं

नवस मी बोलीले सासूबाईच्या पुत्राला
आयुष्य मी चिंतीते माझ्या मंगळसूत्राला

वराड उतरीलं का पाण्याच्या आसऱ्याला
आई सांगते बाळाला कंठी माग सासऱ्याला

कुंकू मला लागतं बाई महिन्याला घडा घडा
माझ्या ग सासूबाईचा लेकीसुनांनी भरला वाडा

सासूचा सासुरवास रडवितो पदोपदी
लेक थोराची बोलेना कोणापाशी कधी

सासू सासऱ्याचा घ्यावा आशीर्वाद सुनं
पोटी फळ लाभे आहे देवाजीचं देनं

सासू नि सासरे माझ्या घराला भूषण
देऊ नये त्यांना कधी चुकून दूषण

सासरा माजा बोले पडे उजेड वाड्यावर
सासू मालन बोलती जान जमखाना माडीवर

काळी चंद्रकळा माझ्या बंधूची पारक
सासू सासऱ्याला बाळपणीची ओळक

सासू आत्याबाई हात जोडीते बसून
दिवाळीचं मूळ राम चालले रुसून

सासू आत्याबाई सोनियाचं तुमचं गोट
जलमाला जावो आमचं कुंकवाचं बोट

माडी ग वरी माडी सासईऱ्या मामंजीची
लंका शोभती म्हायाराची

लेकाची ती आई लेकाच्या पडपा[1] गाती
चिंचेची[2] सावली कईकाच्या कामा येती

:४:

संग्राहिका : सौ. लीलाराजे पटवर्धन

सासू सासरा माझ्या देव्हाऱ्यावरलं सोनं
त्यांच्या उजेडात मी लोटिते चारी कोन

सासू नि सासरा माझ्या वाड्याची दोन दारं
दोघांच्या सावलीनं नाही लागत ऊनवारं

सासू सासईरा दोनी सोनीयाची फुलं
त्येंच्या उजिडानं माजी वागत्याली मुलं

सासू सुंदरीचा तिचा कुसवा वेली गेला
तिच्या आधारानं नांदती सुना ग धाकुल्या

सासू मालनीचा काय सांगू उपकार
दिला बाई मला पिर्तीचा चंद्रहार

सासूचा सासुरवास सासू नव्हं ती बयावाई
ताट करूनी वाट पाही

सासू सासईरा दोनी शंकर पारवती
नणंद भागीरथी दीर माझा गणपती
पती माझा चंद्रज्योती

१ मोठेपणा. २ मुलीची आई.

*सरलं दळण सरलं म्हणू कशी*
*सासर म्हायार भरल्या दोन राशी*

॥५॥

## संग्राहिका : श्रीमती कमळाबाई सावंत

*सासू शिया देते सुनेच्या बापाले*
*लागले पनाये मंजेरी चाफ्याले*

*सासूचा सासुरवास जसे मिरच्याचे दाने*
*अशीलाचे सोसे कमशीलाचे काय जाने*

*सासूचा सासुरवास नंदेचे देनं आले*
*हातचे काकन करवताने ढिले झाले*

*माझ्या ग अंगणात गरड्या लिंबाची साऊली*
*सयांनू किती सांगू सासू न्हवं ती माऊली*

*माय बापाच्या म्या घरी नाही वेचली गोवरी*
*भास देई नानापरी सासू मालन सुंदरी*

*दळीता दळण पीठ भरा लवकरी*
*सासू माझी ती सुंदरी*

*माझीया चुड्यावरी सासूबाईचे लक्ष फार*
*शाई बिजलीचे चितार*

*दळण दळूयानी पीठ म्या भरीयेलं*
*सासूपुढं ठेवीयेलं*

वग्गाहाळच्या तलावानं माळरानाचं झालं मळं
सांगते तुला भैना सासू सुनांचं पिवळं गळं

सासू कशी बाई सासू कशी
निर्मळ गंगा काशी जशी

समोरल्या सोप्या जान पासूडी कुणायाची
सासू निजली सुनायाची

:::६:::

संग्राहक : श्री. ना. रा. शेंडे

ईवाई सोयऱ्याचा चिरंबंदी वाडा खोल
भाई राजसाचा माझ्या जाईल चवर डोल

सासू ग सासऱ्याच्या कंथाच्या ग कामेनी
बाळरायाला ग माझ्या तेल लाविती अंगनी

पाचजणी सवासनी सहावी वरमाये
मोती न्हानोयाले जाये

मांडोवाच्या दारी चिखोल काहयेचा झाला
नवरीचा बाप न्हाला

मांडोवाच्या दारी पिवरे पिवरे पाय
नवरी न्हानली वरमाय

वरबाप वरमाय न्हायाले बसती
चुडा रत्नायाचा वरमाईहाती

भांडोवाच्या दारी अहेराचं आलं ताट
वराची वरमाय बसे डाया हात

बसा बसा वरमाये भाऊच्या डाइवळे[1]
तुमच्या भावाचं अहेराचं ताट चढे

सासू नि सासरे दोनी देव्हारीचे देवू
बसूनी पूजेला आम्ही जोडीने फुलं वाहू

नवरीचा बाप अती तथी उभा राहे
जागा जानोला[2] पाहे

नवरीचा बाप सारा ईळ उपवासी
त्याले घळली एकादशी

७

संग्राहिका : सौ. पुष्पा घाटगे

सासू नि सासरा माझा देव्हारा कुलपाचा
चुड्या माझ्या राजसाचा हात पुरेना माणकाचा

सासू नि सासरे माझ्या घराचे भूषण
कपाळी त्याले कुंकू भरजरीचे निशाण

सासू नि सासरे माझी सोन्याची पाखरं
तुमच्या व सावलीला आमी लोकांची लेकरं

१ डावे बाजूस. २ जानवस घर.

सासू नि सासरे माझ्या देवाऱ्यावरी देवू
बसुनी पाटावरी आमी जोड्यानं फुलं वाहू

लांब नि लांब केस वेणी येती गोफावाणी
माझ्या सासू सासऱ्यांनी सून पाळिली लेकीवाणी

सासर हे बी वस मला कसला ठावं नाही
सासू न्हवं ती बयाबाई ताट वाढूनी वाट पाही

: ८ :

संग्राहिका : सौ. सजाताई सावंत

शालूच्या पदरात कुनी बांधीयीली भाजी
सासू नि सासरे शिवेपाशी माजी आजी

सत्तीनारायनाची पूजा वाडयायात झाली एक
सासू सासऱ्याची भाग्यीवानाची मी लेक

मांडवाच्या दारी कोन वरमाई काळीमोर
बंधूच्या आयाराची गाडी आली शिवेवर

सोळा सोमवार केले सतरावा उजवीला
सासू सासऱ्याचं पुण्य हिरा पाळणी निजवीला

संबोरल्या सोप्या वतीव तांब्या लोळं
सासऱ्या पाटलाच्या मांडीव नातू खेळं

सासरा गनपती सासू गुजरी ववी गाती
चांद सूरया माजा पती

९

संग्राहिका : सौ. लीलावती पवार

सासू नि सासईरा जाई मोगबीऱ्याचं आळं
त्येंच्या मी साऊलीला परबीजाचं कंबाळं

सासू नि सासईरा दोनी काशीची देवईळं
चुडं माजं ते राजईस वरी निशान पिवईळं

सासू नि सासईरा माझ्या सोन्याच्या आडभिंती
सयांनू किती सांगू त्येंचा आधार मला किती

सासू नि सासईरा दोनी देवाच्या मूरती
दीर दाजिबा गणपती जाऊ गुजरी पारबती
नंद कामिनी भागीरथी रामचंदर माझा पती

सासू सासरा म्हणीयीती पडे उजेड वाड्यावर
सासू मालन म्हणीयीती जान जमखाना माडीवर

सासरा पाटील सासू सुखाची चांदणी
याहीच्या पोटचा चांद डोलतो अंगणी

सासूसासऱ्याचा आशीर्वाद घे ग सुनं
त्याहींच्या आशीर्वादं फळाला नाही उनं

सासू पारबती सासरा भोळा राजा
याहींच्या पोटचा गिन्यानी चुडा माजा

सासू नि सासरा दोनी सोनीयाच्या तारा
त्येंच्या सावलीला मला लागेना उनवारा

१०

संग्राहिका : सौ. सावित्रीबाई सावंत

लंबाले मह्े बाल सरळ मही येनी
जलाल आत्याबाई मह्या म्हायेराचं पानी

सासू आत्याबाई तुमचा पदर भिंगाचा
तुमच्या सेवेसाठी उभा जोडा बाहिंगी रंगाचा

सासू आत्याबाई तुमचा पदर सोनसळीचा
तुमच्या पदराखाली जोडा आमचा खेळीमेळीचा

सासू आत्याबाई तुमची सोनियाची मिरी
तुमच्या सेवेसाठी तीर्थ वाडी रत्नागिरी

सासू अत्याबाई तुम्ही तुळसीची पानं
तुमच्या हाताखाली सून नांदते मी ल्हान

सासू आत्याबाई तुमच्या पदराला गाठी
पंढरीचं कुंकू पैदा केलं माज्यासाठी

::११::

संग्राहक : प्रा. गजमल माळी

सासू आत्याबाई तुमचं नेसणं फुलाचं
तुमच्या मांडीवरी राघू मैनाले वंशाचं

सासू आत्याबाई पाया पडणं चांगलं
कपाळीचं कुंकू तुमचं पाऊल रंगलं

सासू आत्याबाई तुमी बाजेवरी बसा
भरते.मी चुडा दाम वैराळाले पुसा

सासू आत्याबाई तुमचे सोनियाचे घोळ
तुमच्या घोळाखाली आमी परायाची बाळं

सासू आत्याबाई नका बोलू सणासुदी
शेतामंदी गेली मही सोनीयाची मुदी

सासू आत्याबाई सारा संसार तुमचा
कपाळीचं कुंकू एवढा दागिना आमचा

सासू आत्याबाई तुमच्या पदराला शेव
तुमच्या पोटचा चुडा मव्हा महादेव

सासू आत्याबाई तुमचा पदर जरीचा
तुमच्या पोटचा चुडा सावळ्या रंगाचा

सासू आत्याबाई तुमच्या पदराला गाठी
सोडिले मायबाप सावळ्या चुड्यासाठी

॥१२॥

संग्राहिका : **सौ. सिंधू वारनूळकर**

*मिळाल्या बाई मला आईसारख्यी सासूबाई*
*सोन्याच्या संपुष्टात पूजिली अंबाबाई*

*मायमाऊलीचा पान्हा पेले मी सरासरी*
*कामात सासूबाई आले तुम्हा बरोबरी*

*मामंजी सासूबाईंचा केवढा आधार*
*त्यानं शोभिवंत झालं बाई माजं घर*

*सासरे सासूबाई दोनी सोनीयाच्या भिंती*
*माझ्या ग आयुष्याचा वर गिलावा करू किती*

॥१३॥

संग्राहिका : **डॉ. विमल चोरघडे**

*सासऱ्याला सून आवडली मनातून*
*तोड्याखाली पैंजण हळू वापर जिन्यातून*

*सीता भावजई उचल भांड्याचा पसारा*
*जेवूनिया गेला तुझा दैवाचा सासरा*

*सासऱ्याला सून आवडली म्हणे बाई*
*शंभराचे तोडे पायी*

*जुंदळ्याची रास तिवड्याला बसविली*
*सासऱ्यांनी माझ्या तिला पासूडी नेसविली*

*काळ्या ग वावरात मेंढ्याबायांची दावन*
*सासरे मामंजीची नव्या उसाची लावन*

*डाळी डोरल्याची मला हौस सरायाची*
*मामंजीची सून मी ग आहे तालीवाराची*

*माझ्या मामंजीची बाई स्नानसंध्या भारी*
*सासू आत्याबाई जवळ उभी मंदोदरी*

*पुढील्या सोपीयात नाही उभी मी ऱ्हानार*
*मामंजीची बाई माझ्या कदर करनार*

*उंच ओसरीचा केर लोटता लोटेना*
*माझ्या मामंजीची सभा बसली उठेना*

१४

संग्राहक : **श्री. बाजीराव पाटील**

*सीता सासूबाई पाया[1] लागते बसून*
*देवा आईचं मूळ बंधू चालले रुसून*

*सीता सासूबाई उपाशी नोका निजू*
*गाईच्या दुधात बत्तासा घालते भिजू*

---

१ नमस्कार करते, पाया पडते.

सीता सासूबाई पाया लागते घाई घाई
वर्साची दिवाई वाट पाहील मायबाई

आंधन देता देता चांदनी आली माथा
नवरीच्या मामाजीचा संदूक सावरीता

वऱ्हाळीन आना चवरगावची राधा
मंदोदरबाई मांगे पायन्याले जागा

माह्या घरी कार्य कार्याचं होईल कसं
पाच झनी 'जाऊ' सहावी नणंद बसं

माह्या घरी कारन तुमी कारनाले ये जा
सांगीन सोयऱ्याले साडी अहेराले घेजा

मांडवाच्या दारी अहेरानं भरलं डालं
सांगीन शेजीपाशी माझं गनगोत आलं

अहीर चढू चढू चौरंग झाला लाल
कोनाची नेसू साडी कोनाची ती शाल

अहीर चढू चढू चवरंग झाला काया
कोनाची नेसू साडी कोनाची चंद्रकया

मांडवाच्या दारी नेटाची खूण दिसे
बयाची मावशी शेला शेवंतीचा नेसे

१५

संग्राहिका : **श्रीमती ताई रानडे**

सासू ने सासरा देव्हाराना देव
त्यासना भोजने न करू दुजाभाव

सासू ने सासरा कोणा भाग ते नारीने
फुलाचे झाकन त्याले झाकिले चंवूने

भाऊ करू व्याही बाप म्हणस नको बाई
आत्येने भावजया मान राख्यो जो नही

भाऊ तुनी कन्या दे जा माझ्या गायी
भाची माडीने उभे धंदा झाला का आजीबाई

तातडीने जानं आड लागन यावल
सरकाऱ्या दंगल धीरे टाकीज पाऊल

सरकारी शिपाई हाका मारत बाई बाई
येड्या बाईला म्हणतो मुख्य मालक घरी नाही

सरकारी शिपाई हाका मारत भलत्या राती
कोडाण्याने किल्या भाऊ पोलीसाच्या हाती

पाटलानी लेकी वतनदार मना ठसा
दिर गोविंदाले म्हणे कुणबी सगा करू कसा

::१६::

संग्राहक : श्री. पं. ख. नागपुरे

*सासूचा सासरवास भोगला जीवावर*
*पित्याच्या नावासाठी निजली सेवावर*

*येवढा सासरवास असलाचे लेकराले*
*लागला मिरोध सागाचे लाकडाले*

*माई तुही मया माहेरी नितरोज*
*सासरी झाई सून नेम गाई रोज रोज*

*सासू आत्याबाई तुमचे पदराले मोती*
*पुसतीन आयाबया माहेरी गेली होती*

::१७::

संग्राहिका : श्रीमती आनंदीबाई शिर्के

*आहो आहो विहीणबाई*

*कुठं गेले आमचे व्याही*

*व्याही गेले वेळूबना*

*वेळूबनाहून काय आणलं*

*वेळूबनाहून आणला गोफ*

*गोफाजोपाचा झाला गुंता*

सव्वालक्ष सोनं टाका
सोनं घ्याहो नवऱ्याच्या बाप्पा
दारी होते मोर मुराळी
तिथं होते चोर जावाई
त्यांनी नेली आमची बाळी
बाळीपायी धावण्या धावा
आपल्या धावण्यानं काय होतं
ज्याची होती त्यानं नेली
आपली माया व्यर्थ गेली

१८

संग्राहक : श्री. वसंत झांबरे

सासू आत्तीबाई मह्या देव्हारना देव
सासरा मामंजी करनीले महादेव
सासू नि सासरा काशीखंडना मूरती
दोहीसले देवा किती सांगना कीरती
सासू सासराना आशीर्वाद माले
पुत्रना पायना मह्या माजघर डोले
सासू नि सासरा भागनी नारीले
सारंगन पानी आंबाना हारले

::१९::

संग्राहक : श्री. प्रभाकर रामचंद्र भामरे

*सासू नि सासरा मना जीवले आसरा*
*नाना म्हणे माय जन्म देणारा दुसरा*

*सासू आत्याबाई पतीवर्ता माऊली*
*तुमना पदराले करू बाळले साऊली*

*सासू आत्याबाई तुमी बोलू नका काही*
*राम गया गावी तिले करमत नही*

*सासू आत्याबाई पाय पडूद्या बागात*
*दिवाळीना सण भाऊ चालला रागात*

*सासू आत्याबाई पाय पडूद्या पायरी*
*दिवाळीना सण माले जाऊद्या म्हायेरी*

*पहाटेन दळण सासू सूनले साजस*
*शेजी कशी म्हणे कुठं अलगुज वाजस*

*सासू आत्याबाई सुकदेवनी चांदणी*
*सासरा बुवाजी सूर्य डोलस अंगणी*

*सासू आत्याबाई तुमना अंडोरले सांगा काई*
*वेदनी छडी मना झुबाले लागी जाई*

*सासू आत्याबाई मनी आशा नका मोडू*
*दिवाळीना मूळ नका परतावून सोडू*

*सासू नि सासरा मना देव्हारेना देव*
*त्यासनी सेवाले माले निंघना सुकदेव*

सासू सासरना आशीर्वाद घेवा सई
दगडना देव पुंजल्यानी काय व्हई

शेरभर सोनं सासूबाईनी मिरीवर
उजाळ पडं व्हई मनी कुकूनी चिरीवर

सासू करे सासरवास ननंद कसाले बोलवा
सासरवासिनी कोणत्या युगतीनं चालवा

सासऱ्याचा धाक मला काय सांगू बाई
धाकटा माझा दीर लई हुस्तीखोर हाई

सासऱ्याचा धाक मला काय सांगू बाई
धाकली माझी ननंद करे माझा हेवादाई

सासऱ्याचा धाक मला काय सांगू बाई
शिळ्या भाकरी खाया मला दियायाचा बाई

सासू सासरानी सये मनातली ठेव
त्यासले देऊ नही सये अंतरभाव

सूनमुक पाहीसन सासरा जया खुषी
सासूनी पूजा करता राहू नही खुषी

सासू नी सासरा मना पंढरीना देव
पुत्र पुंडलीक त्यासवर ठेई भाव

सासू आत्याबाई तुम्हना पदरले ओवा
हाळू पाय टाका जल्म जया तुम्हना नवा

२०

संग्राहक : **श्री. रा. दा. पाटील**

*दिवाळीना मूळ नको फिराक सासरा*
*मायबापले भेटाले सण नाहीरे दुसरा*
*सासरना वाटे काय हिरवळ दाटनी*
*मायबापना घरनी मन्ही हौस नाही फिटनी*
*सासरले राहीसनी मन्हा जीव व्हस थोडा*
*मायबापनी मन्हां सोनाना जीव घडा*
*सासरना वाटे पसरनात काटाकुटा*
*माले देखीसनी मायबापले पान्हा फुटा*
*सासू सासरा ननंद दीर घर शे आबादानी*
*मायबापनी माले घडी सोनानी एकदानी*

२१

संग्राहिका : **सौ. विमल थत्ते**

*सासू सासऱ्याच्या सोन्याच्या मूरती*
*ननंदबाई माझी शोभती पारबती*
*सासू ग सासरे सये देवाला मागावं*
*सावळ्या बहिनाबाई साळू माहेर भोगावं*
*सासू.सासऱ्याचा आशीर्वाद घ्यावा सुनं*
*येल कारलीचा आला फळाला काय उनं*

सासू आत्याबाईंचा कुसवा वेली गेला
हळदीवेल कुंकू चुडा माझा दृष्टावला

सासू आत्याबाई यांची सोनीयाची मिरी
हळदीवर कुंकू माझ्या कपाळी लाल चिरी

लेकी ग मंडोदरी सीतेसारख्या ग सुना
मामाजीला माझ्या बाई दशरथ म्हना

सासू आत्याबाई तुम्ही सुक्राची चांदनी
सासरा पाटील सूर्या चमकतो अंगनी

सासू आत्याबाई तुमी वसरीला वसा
झालं का नाही काम आमा लेकीवानी पुसा

सासू आत्याबाई मी त माहेराला जाते
तुमच्या पोटीचा चांद माझ्या संगं नेते

सासूचा सासरवास सोस दमानं मान गोड
सागाचं लाकूड कुसळीनं इमल्याव चढं

सासू आत्याबाई मी त चालले माहेरा
तुमच्या पोटीचा मला चांदाचा आसरा

कुंकाचा करंडा सासू मागती सुनाला
सांग सईबाई असं दईव कुनाला

मोठीया घरची सून कामाच्या कसाल्यात
लवंग मसाल्यात वहिनाबाई माझी

मोठीया घरची सून हंड्याभांड्यानं वागती
भावजय सीताबाई पानी कोळ्याला मागती

पाटलाची लेक देसमुखाघरी देली
नवल गोठ झाली पडदा लावून चुडा लेली

सासूचा सासरवास सोसावा दमायानं
आपल्या कुळामधी नाही फिरुनी जाव देनं

सुनंला सासरवास सासूबाईनं ग केला
लेक गेली सासऱ्याला आनुभाव तिला आला

सुनंला सासरवास करू ग कशासाठी
उसामंदी मेथी लाईली नफ्यासाठी

सुनंला सासरवास जिनं आला तिनं केला
माईचा ग माझ्या जलम भोळ्यामधी गेला

वयनीचा सासरवास भाऊ ऐकतो बागामंदी
पाची पानाचा ग इडा सुकला हातामंदी

वयनीचा सासरवास भाऊ ऐकेनासा झाला
नको तिथं पानी पेला शिंगीवर स्वार झाला

भाऊ पुसं बहिणीला बाई सासुरवास कसा
लोखंडाच्या साखळीत वाघ आकळिला जसा

नेणत्यापनायात सासू कामाला लाविती
बोटं शिणली दाविती

सासूचा सासरवास नंदंचा उभा जाळ
सुकली मोहनमाळ

सासूचा सासरवास नंदंचा कशासाठी
सुकली रत्नपेटी

सासूचा सासरवास नका करू सासूबाई
सून जाचण्याजोगी नाही

वयनीचा सासरवास भाऊ ऐकतो मळ्यात
मोट सोडली पान्यात

# लो | क | क | था

# अनुक्रम

१ श्री. मारुतराय शं. गवंडे, रत्नागिरी

सासू–सुना

२ श्री. वि. वा. जोशी, चंद्रपूर (चांदा)

धाकली लक्ष्मी

# सासू - सुना

**मारुतराय शं. गवंडे**

त्या गावात एक कुटुंब राहात होतं. त्या कुटुंबात इन मीन तीन माणसं होती. सासू, सून, आणि लेक. सासूनं सून घरात आणली. तिला मोठा आनंद झाला. सुनेच्या जिवावर आपल्याला सुख मिळेल. संसाराचा भार हलका होईल असं ती मनातल्या मनात म्हणे. पण झालं भलतंच.

सून होती मुलखाची आळशी. पण ती एकुलत्या एक मुलाची बायको. म्हणून सासू सुनेचे भारी लाड करी. पण ते आले अंगाशी. सून झाली शिरजोर. सासूचं काही म्हणता काही काम ऐकत नसे. सासूनं सांगितलं, "सूनबाय, सूनबाय, एवडी ढोरं घेऊं जा." तर सूनबाय म्हणायची, "नई सासूबाय माहा निभार लागता. "सूनबाय सूनबाय जरा भात शिजय" तर सून बोलायची, "माका नाय शिजवक येना."

इतकं झालं तरी म्हातारी सासू दुर्लक्ष करी. जाऊ द्या, अजून पोरवाव आहे. आज नाही उद्या सुधरेल. अशी आशा धरून म्हातारी दिवस काढीत होती.

अशी तशी एक दोन वर्षे निघून गेली. एक दिवस सासूच्या पायाला

लागला दगड. ती कशीबशी लंगडत लंगडत घरी आली आणि जीव टाकीत बसली. तिनं सुनेला हाक मारली आणि म्हणाली, "सूनबाय, जरा सांद घेऊन हकडं ये." "नाय वो सासूबाय माका सांद उचलायची नाय!" सूनबाई उद्गारली.

म्हातारी उगीच राहिली. तिनं स्वतः सांदीचा दगड उचलून आणला; त्यावर वेखंड उगाळलं आणि ते पायाला लावलं.

म्हातारीनं या प्रसंगानं ओळखलं, आपली सून ढोंगी आहे; कामचुकार आहे. तिला चांगला धडा द्यायचा तिने ठरविले.

एक दिवस म्हातारीनं सांदीचा दगड सोनाराकडं नेला. त्याला वाहेरून सोन्याचा मुलामा देऊन घेतला. त्यामुळं ती सोन्याची भली मोठी पुतळी तयार झाली. म्हातारीनं ती घरी आणली. सूनबाईला जवळ बोलावलं. तिच्या पाठीवरून प्रेमानं हात फिरविला आणि म्हणाली, "सूनबाय, तिया माहा एकुलती एक लाडकी सून. माझो काय आता भरवसो नाय. तेवा सगळा किडुकमिडुक मोडून तुका एक भली मोठी सोन्याची पुतळी केलंय. ती तू सदी घाल. हैसेक मोल नाय." असं बोलत बोलत म्हातारीनं सुनेच्या गळ्यात ती बेगडी सांद बांधली. सुनेला फार आनंद झाला. पुतळी गळ्यात घालून ती मिरवू लागली. शेजाऱ्यापाजाऱ्यांना दाखवू लागली.

चार-आठ दिवस असेच गेले. म्हातारीनं एक दिवस सुनेला हाक मारली आणि म्हणाली, "सूनबाय, जरा माजा डोचका दुखता हाय. वेकाण झरवक सांद हकडं हाड बगू"

"सासूबाय, सासूबाय, माका नाय वो सांद उचलाची." पटकन सून बोलून गेली.

"गळयात बांधान बरी मुरडतेय लोडणा!" म्हातारी जरा रागारागातच बोलली.

सुनेला संशय आला. तिनं सांद गळ्यातन काढली आणि पाहते तो काय? —सांदीचा दगड नि बाहेर बेगड.

"भली खोड मोडली," सासूबाई पुटपुटली. सून चटकन पुढं झाली. तिनं सासूचे पाय धरले. दोघींची दिलजमाई झाली. सासू सून आनंदानं राहू लागली. पोटपाणी पिकलं. नातवंड म्हातारीच्या मांडीवर खेळू लागलं. घर सारं हसायला लागलं.

# धाकली लक्ष्मी

निवेदक : श्री. वि. वा. जोशी

कितीी वरसं झाली कोनालेच माहीत नाही. एका गावामधी एक सावकार व्हात. मोठा सिरीमंत गोडबोल्या; पन तव्हडाच दयावंत. कोनालेही अडी अडचन पडली की सावकाराकडं जावं, काम झालंच म्हणून समजावं. येवढं काहाले, खुद गावपाटलाले नाज राहो नगदी राहो काम पडलं तर त्यानं या सावकाराकडं जावं. सावकाराचा दब्दबा गावात तर व्हताच; पन जवळच्या दहापाच खेड्यामधीही व्हता. आमचा खरा मायबाप तोच असंच समद्या लोकाले वाटे.

त्याची अस्तुरी पन तशीच व्हती. जशी काही लक्षुमीच घरी नांदत व्हती. कोनी बाईबापडी गेली आन् तिले ताक दही भेटलं नाही असं कव्हाही व्हायचं नाही. गरिबाले–कोरकुटका नाहीपरता घुटभर आंबील तरी तिनं देलीच समजा. वाड्यात संपत व्हती संततही व्हती.

सावकारासले दोन पोरं होते. बापावानी रूप आन् मायेवानी सोभाव. मोठा जरा बेस[1]च होता. लहानगं पोर नाही म्हटलं तरी थोडं बद्याडच.[2]

---

१ चांगला. २ वेडसर अर्धवट.

सोताच्या[1] मनानं काही करायची त्याच्या अंगात धम्मक न्हवती.

हळू हळू पोर मोठे झाले. लेहन वाचन सिकले. मोठा पोरगा बापाले कारभारात मदत करू लागला. लहान आपला असाच राह्यला. सांगितला काम करावा आन् घातला घाटा खावा. कोनाच्या अध्यात ना मध्यात.

दोनी पोर मोठे झाले. सावकाराले वाटलं आता यांचा लगीन करून टाकला पाहिजे. गावपाटलाचा, दिवानजीचा, बरोबरीच्या चार मानसांचा इचार घेतला; दहापाच मोठे गाव धुंडाळले आन् तोलामोलाच्या एका सावकाराची पोरगी पाहून पहिले मोठ्यालेत उजवला[2]. दुसरा जरा खष्टीच[3] व्हता. पोरी लगीत[4] भेटल्या. चांगल्या घरच्या पोरींचे बाप येत, पन पोराले पाहिला की मागच्या वाटेन लागे.

तसा काही लहान पोरगा दिसायले वाईट न्हवता. त्याचा काही कोनाले तरासबी न्हवता. एका गरीब बिचाऱ्या मानसानं त्याले पसंद केला. सावकारालेही मुलगी पसंद पडली. चारजनांचा हो[5] पडला. मग काय राहिला. धूमधडाक्यानं लगीन लागलं. साऱ्या गावाले गावभोजन घडलं. दोन सुना घरी नांदायले लागल्या.

सावकारनीनं दोही सुनाले मायेची माया दावली. पन हरू हरू मोठीचा घमंडी सभाव, धसक-फसक करायची सवय, सदा पाहावं तं शेजाऱ्यापाजाऱ्यापाशी नाहीतर नवऱ्याजवर चुगल्यान् चहाडी लावायची सवय सावकारनीच्या लक्षात आल्याबिगार राहिलं नाही. लाहान जावेले तर जशी काही रावतीनच समजत होती आन् तिच्याशी वागनही तसच. बेचारी लहान सून मोठी सोसीक, शांत सोभावाची आन् देवभोरी. सासूसासऱ्याले तिनं आपले मायबापच मानले. रोज त्यांच्या पाया पडल्याबिगार तिनं कधी तोंडात घास घेतला नाही. तिच्यालेखी मोठी जाऊही मायबहिणीसारखीच.

पण मोठी आपल्याच तोऱ्यात राह्ये. तिनं हरू हरू आपल्या नवऱ्याले

---

१ स्वतःच्या २ लग्न केले. ३ वेडसर ४. पुष्कळ ५. होकार

मुठीत घेतलं. ती नवऱ्याले बोलायची, "सासरा पहावं तं कंजुष, एक दमडी काही सुटायची नाही. पोरासुनेला काही हौस आहे का नाही कोनी पाहायले तयार नाही. भाऊजी तं भलेच भले. बापानं सांगितलं तरी होच. मायेनं सांगितलं तरी होच. तुमी सांगितलं तरी होच. आन् त्याची बायको त सासू-सासऱ्याच्या पोटात शिरली. जशी काही पोटची पोरगीच लागली. नवऱ्याले तरी एवढं पाहात नाही. मले का समजत नाही! जशी काही सारी दौलत इच्याच नावानं सासरा लिहून देणार आहे! आन् तसं झालं म्हंजे तुमी बसा बोंबलत. ते काऽऽही नाही. हातखर्चाले आन् हौशीले काही पैसे मांगत राहा. नाही त भाऊजी अन् त्याची बाईल समदं दडपून बसल."

पहिले पहिले मोठ्या मुलानं तिकडं लक्षच दिलं नाही. पन रोज बायकोची किटकिट आन् डोऱ्याम्होरं लाह्यन्या भावाच्या बायकोचं कौतुक पाहून त्यालेबी बायकोचं म्हननं पटायले लागलं आन् तो एका दिशी बायले म्हनाला, "मायवो, तुले तुजी लाह्यनी सूनच मोठी झाली. तिचाच कौतुक करत बस. आमी काई तुजे कोनीच नव्हं. त्यापक्षी आमी दोगं येगरेच ऱ्हातो. म्हंजे तुम्हाले काही अडचन नको."

मायले आपल्या मोठ्या पोराचं म्हननं ऐकून भायच[1] अचंबा वाटला. कधी तिच्या मनी नाही, सपनी नाही अन् आज तिच्या कानी काय पडलं! त्याले भाय समजाऊन पाह्यलं. पन त्याचा आपला एकच हेका—"बाले सांगून आमची येगरी चूल करून दे. आन आमच्या हिश्याचं जे काई देवाचं—आम्हांला देऊन टाक."

हळू हळू सावकाराच्याही कानांवर त्या गोष्टी गेल्या. एवढं चांगलं घरात गोकुर नांदतंय. उद्या आपल्या वाड्यात नातूनातिनी खेरायले लागतील. पन मोठ्या पोराले काय अवदसा आठवली की त्यानं आपल्या बायलीच्या नादानं येगरं राह्यचं ठरविलं. काही दिवस गेले; पन पुढं पुढं असं झालं, मोठ्या

१ फारच.

सुनेचा तोरा आन् मोठ्या पोराचं घरामंदी रोज भांडन सावकारानं पाह्यलं. ह्ये काह्यची रोज कटकट! त्यानं इचार केला. पंचाले बोलावलं आन् मोठ्या मुलाचा हिस्सा देऊन त्याला मोकरं केलं. मोठा पोरगा आन् मोठी सून येगरी राह्यला लागली. सावकारानं लहान्यालेही इच्यारलं. त्याहीवर तो फिदीफिदी हासला आन् लाजून बोलला, "मले काय इच्यारता? मायले इच्यारा नाय तं आपले सूनबायले इच्यारा."

अशा रीतीनं सावकाराच्या घरात कली शिरला. एका घराची दोन घरं झाली. येगयेगऱ्या चुली पेटू लागल्या. दिसामागून दिस भरभर जाऊ लागले. मोठा पोरगा आता मालक बनला. मोठा हिस्सा हाती आला. त्याले पख फुटले. दोस्तभाईंचा गराडा पडला. मेजवान्या झडू लागल्या. नाचवाल्याच्या मयफली चालू झाल्या. पोरगा पार बिगडून गेला. आन् त्याची बायको—तिची घमंड, तिचा रुबाब, दुसऱ्याले हिनवून बोलायचा सभाव, नाही त्या उचापती काढायची सवय, काऽऽही काऽही इचारू नका. तिनं येटाळात[1] लाहन्या जावेचं, सासूसासऱ्याचं आन् त्या बह्याड दिराचं नाही नाही ते रामायन सांगनं सुरू केलं. इतकाच नाही तं लाह्यन्या जावेचं आन् सासऱ्याचं आतून सूत आहे. पूजापानी, हातपाय जोडनं समदं वरचं सोंग आहे. सासू पाहिली तं भोरी.[2] तिले काय समजतं? आन् दीर तर खप्तीच. त्याले बायको म्हंजे काय ते तरी माहीत आहे की नाही कुनाले ठावं?"

नवरा बाईलबुद्या आन् बायको कैदासीन. अशानं जे व्हायचं ते झालं. चार पाच वरसात तीनतेरा वाजले, आन् घरात फाके पडायची येर[3] आली. मोठ्या सुनेची आता घमंड पार उतरून गेली. तिले आता वेटाळात कुत्रा हुंगत नव्हता. सर्वाले आता दोघांचा सभाव करून (कळून) चुकला. वाटीभऱ्या पिठाले ते आता महाग झाले. आईबापाकडं जाऊन काही मागायले त्यांहिले[4] तोंड नव्हतं. वनमजुरी करून दोघालेही पोट भरायची येर (वेळ) आली.

---

१ आळी, वस्ती, गल्ली. २ भोळी. ३ वेळ. ४ त्यांना.

लाहान सून मोठी सोशीक. देवानं रूप दिलं आन् दैवानं हात दिला. मायबाप नव्हते तरी त्यांच्या रूपानं सासूसासरे भेटले. त्याहीलेच देव मानून तिनं सेवाचाकरी केली. हे बेसपनच[1] तिले नडलं. मोठी सून आपल्या डावात होती. तिचा डोरा (डोळा) सासऱ्याचं घरदार, शेतीवाडी यांकडं होताच. दोघही कधी मरते त्याची वाटच पहात होती. दान्यादान्याले मोताद झाली; पन् तिची वाईट बुध काही गेली नाही. सासूसासरा आन् लाहान जाऊ तिघांचाही रस्त्यातून काटा कसा निघल याची ती वाट पहात बसली. पन् त्यालेही जास्त दिवस लागले नाही.

सावकाराच्या वाड्यात दरसाली यक्का[2] होत होता. औंदाही यक्का झाला. साऱ्या गावाले आवातनं गेलं. मोठ्या पोरालेही सावकारानं निरप धाडला. आतापावतो मोठा पोरगा किंवा त्याची वाईल काही आले नव्हते. पन औंदा आवातनं आलं आन् मोठ्या सुनेनं दादला नको म्हणत होता तरी तिनं त्याचं काही ऐकलं नाही आन् त्याले जबरदस्तीनं घेऊन दोघानही दशमीच्या रातीच जाऊन ठान दिलं.

एकादशीले सक्कारी (सकाळी) यक्का धरला. दिवसभर आन् रातभर भजन चालू होतं. दुसऱ्या दिवशी यक्का संपला. पाह्यटेपासूनच सयपाकाले सुरुवात झाली. चुली धडाधड पेटल्या. भांड्यांचा आवा[3] जमला. बायामानसांची नुसती झुम्मड उडाली. सारा सैपाक व्हायले दुपारचे बारा वाजले. मंग बसल्या पंगती. हे मारे पंगतीवर पंगती उठत होत्या. मोठी सून जातीनं सारं पाहात होती. वाढूही लागत होती. तिले घडीची फुरसत नव्हती. लाहान्या सुनेले तिनं तिकडच सयपाकघरात गुतवून ठेवलं. सासूसासरे बिचारे भोरे. त्याहीले वाटलं आपली मोठी सून आता रस्त्यावर आली दिसते. एकापरी ठीकच झालं. पन त्याहीले तिच्या मनातलं कारंबेरं[4] काय ठाऊक ?

सारा गाव जेवला. त्याहीच्या पंक्तीले मोठा मुलगा आन् तो लाहान खत्रीनंदन कवातरी बसले आन् पोटभर जेवले. मोठ्या सुनेनही तडफ करून चालता बोलता आपला दरा[5] टम्म भरून घेतला. रात व्हायले लागली.

---

१ चांगुलपण. २ एकादशीचे व्रत-खंड न पडता दिवसरात्र भजन करायचे व दुसऱ्या दिवशी पारणे फेडावयाचे. ३ ढीग. ४ काळेबेर. ५ पोट.

गडीमानसही जेवून झाले. राहत्याराहिले सावकार, सावकारीन आन् लाहान सून.

मोठ्या सुनेनं पुढंपुढं करून त्या तिघालेही जेवायले मारे आग्रह कर-करून बसवले. सोता वाढलं. सासूसासऱ्याले मोठा आनंद झाला. मोठ्या सुनेनं खरकटं काढलं. सारवून टाकलं. आन् आपल्या नवऱ्याले हाक मारून घराकडं जायले निघाली. सासूसासऱ्यानं मोठ्या आग्रहानं आता रातीची जाऊ नको उद्या सक्कारी जा म्हणून सांगितलं. पन तिनं काही ऐकलं नाही. नवऱ्याले संगं घेऊन ती निघून गेली.

सासूसासरा, लहान सून आन् गडीमानसानं सारी आवराआवर केली. लहान पोरगा कोठेतरी गप्पा हाकलत बसला. एक दीड घंटा झाला असंल, सावकाराले आन् सावकारनीले उलट्यावर उलट्या होऊ लागल्या. लाहान सून बेचारी घाबरून गेली. तिनं नवऱ्याले कोठून तरी हुडकून आनला आन् वैदाले[1] बलावलं. दवापानी केलं. पन दोघांच्याही पोटातल्या करा[2] काही केल्या बसेना. जास्तीच गडबड झाली. कुनी म्हनलं, अंगाराधुपारा करून पहा. तोही करून पाहिला. पन काह्यलेच गुण आला नाही. राती बारावर दोन वाजत नाही तो दोघंही तडकाफडकी मेले.

समद्या गावात बातमी पसरली. सारे गोरा[3] झाले. मोठ्या लेकालेही निरप गेला. पहाटे ते दोघेही आले. मोठी सून तर अर्ध्या वाटेपासून मोठ्यानं गळा काढून रडतच आली. जसे काही तिचेच मायबाप मेले होते. गावलोकानं समदं वळखलं. लाहान्या सुनेकडं आन् तिच्या बह्याड नवऱ्याकडं पाहून सारा गाव हरहरला (हळहळला).

इकडं आसपासच्या गावात खबर गेली. भाय लोक जमले. लाजेकाजेस्तव मोठ्यानं म्होरं होऊन सारं निपटलं. गावच्या तऱ्यावर त्या दोघालेही अग्नी दिला. समदे लोक विचारे हरहरत वापस आले. पन ज्याच्या त्याच्या तोंडी एकच गोष्ट—मोठ्या पोरानं आन् त्याच्या बायकोनं काहीतरी खाऊ घालून मायबापाले मारलं.

---

१ वैद्याला. २ कळा, वेदना ३ गोळा.

धाकट्या सुनेवर तर आभाळच कोसळलं. राती कोनीच जवळ नाही. मोठी जाऊ आन् तिचा नवरा एकीकडं झोपले. ही आपल्या नवऱ्याजवळ झोपली. त्याचा त केव्हाच डोरा लागून गेला. पन हिले आलटूनपालटून सासू आन् सासरेच दिसायले लागले. तिले वाटलं आता जावं आन् त्या आगीत जरून (जळून) मरावं. नाहीतर—तिनं मनाचा हिय्या केला. मोठी जाऊ जेथी झोपली होती तेथी जाऊन तिनं कानोसा घेतला. ती आन् तिचा नवरा मायबापाचे दिवसवार झाले की काय करायचं याचे मनसुबे करीत होते.

लहान सुनेनं पाह्यलं आता आपली धडगत नाही. आपल्या इज्जतीले धोका आहे. ती तेथून हरूच परत आली. नवरा डाराडूर झोपून होता. तिनं देवानारायनाला हात जोडले. नवऱ्याच्या पाया पडली आन् आंगनात आली. बाहीर काळाकुट्ट अंधार होता. रात किर्रर करत होती. ती तऱ्याकडं निघाली. सासूसासऱ्याच्या दोनी चिता धिमधिम जरत होत्या. तेथी ती आली. सासूसासऱ्याच्या चितेला परदक्षिना घातली. हात जोडले. अंगावरचा पदर खासकन् ओढला, घट्ट कमरेला गुंडारला, तडकाफडकी तऱ्याच्या पोटात शिरली आन् मानूसभऱ्या पान्यात जाऊन जी डुबकी मारली ती काही पुन्हा वर आली नाही. बिचारीनं सासूसासऱ्याबरोबर आपलाही परान दिला. साऱ्या गावाले हा हा म्हणता गोष्ट करली. समदे हरहरले.

समद्या गावात त्याची एक कथाच होऊन गेली आन् आताही चार लोक जमले म्हंजे एकमेकाले ती कथा सांगतात. कुनाकुनाले तर आवसे पुनवेले त्या तऱ्यात पहिले दोन कमलं उगवलेले दिसतात. मागून एक तिसरं कमळ उगवते. ते त्या दोन कमळाभवती गरकन् फिरते आन् डोऱ्याची पातनी लवते न लवते तेवढ्यात पुन्हा काहीच नाही.



# वडीलधारी

## अनुक्रम


**मामा**

- श्रीमती जानकीबाई पाटील, बागणी, सांगली
- सौ. कुमुदिनी पवार, चितळी, सातारा
- सौ. राजाक्का देसाई, बागणी, सांगली ⁞ सौ. शरदिनी मोहिते, सांगली
- डॉ. सरोजिनी बाबर, पुणे ⁞ सौ. जैबुन्निसा खान, गेवराई, बीड
- श्री. स. र. बिन्नरगुरुजी, समशेरपूर, नाशिक

**आत्या**

- श्रीमती जानकीबाई पाटील, बागणी, सांगली

**मावशी**

- सौ. शरदिनी मोहिते, सांगली

**चुलता-चुलती**

- सौ. कुमुदिनी पवार, चितळी, सातारा ⁞ डॉ. सरोजिनी बाबर


**व्याही**

- सौ. यशोदा पाटील, बागणी, सांगली

*लोककथा*

**वरमाय :**

- निवेदन.—डॉ. सरोजिनी बाबर



# जहाज

आईवडिलांच्या व्यावहारिक जीवनाला न पेलणाऱ्या कवतिकाच्या गोष्टी करणारी वडील माणसं संसारात रग्गड असतात. त्यांचा सहवास ज्यांना घडतो त्यांच्या सारखे तेच भाग्यवान होत. इथे काळजात दाटलेल्या उमाळ्यापोटी उभी रहाणारी हौसमौज धा धावून पुढे येते. म्हणून ही मंडळी लहानग्याचं कवतिक किती करू आणि किती नको या विचारानं भुलून जातात. विशेषतः बहीणभावांच्या मुलांचे बाबतीत आणि नातवंडांचे एकी या कवतिकाला आपल्यापरीनं सीमा ओलांडाविशी वाटते. त्या कारणाने अशा मंडळींना लोकगीतकारांनी जहाजाची उपमा दिली आहे. एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्याकडे नेणारी मंडळी म्हणून त्यांचा लौकिक मोठा. ही माणसं आजोळघरची.

त्यामुळे आपल्या खेळगाण्यांनी मामारायांची नगरी वेडावून टाकणारी तालेवारांची भाचे मंडळी आजोळी जायला नेहमीच उत्सुक असतात. एकाद्या चाफेकळीनं आपल्या वेणीचा डौलदार गोंडा सावरीत—

*नदीच्या पल्याड ग काडी हालती लव्हाळ्याची*
*तिथं माजी हैती बाई मामा मावशी जिव्हाळ्याची*

अशी खूणगाठ सांगितली की, मामामावशी नसणारांची नजर पाणावते आणि ते असणारांची तहानभूक हरपून जाते. वडिलांच्यासारखा आपला तोंडावळा आहे म्हणणारी ही लाडकी चंद्रज्योत आपल्या केसांचा झुंबडा मावळणी आत्यासारखा आहे म्हणते! ह्या आत्याने काढलेल्या कशीदाचा चोळी-परकर आवडीनं घालते. रंगीत मण्यांनी गुंफून तिनं दिलेली भावली घेऊन पोटभर

खेळते. आणि वडिलांच्यापुढं जेवावं त्याप्रमाणं मामांच्या ताटात रंगीत पाटावर बसून जेवते. चांगलीचांगली चूलबोळकी आणि खेळणी आणून कवतिक करणारे मामा तिचा एवढा अभिमान बाळगतात की, तिच्या लग्नाची भाषा फक्त त्यांनीच करावी! तिच्या आईवडिलांना तो अधिकार जसा काय नाहीच! अंहं! आम्ही कुणाचे कोण हिला देणारे अशी त्यांची भाषा हं! कन्यादान करणारे देखील मामाच आणि सूनवाळ म्हणून तिच्या आईकडे आपली लेक धाडणारेही तेच.

बहिणीच्या लेकाला जावई करून घेणारे मामा दाट चिंचबन लावून त्या सावलीत झोकानोकाने त्याचं लगीन लावून देतात. मामी चांदीच्या परातीत त्याचे पाय धुते. एवढेच नाहीतर सोन्याचा ताईत त्याच्या गळ्यात बांधून मोकळी होते. रतीबाचे पेढे त्याला खाऊ घालते. भरल्या रांजणात त्यानं पाय धुतले तरी ती कवतिकाची गोष्ट ठरते! आणि मग एखादेवेळी साखळदंड लावून आणलेल्या वाघाप्रमाणे तो घरजावईही होतो. घरचा कारभार त्याच्या हाती जातो. शिंगी सारंगीवरून दौडत त्याची स्वारी मग गावोगाव निघते. पै-पाहुण्यांना भेटते. आणि अशा भाच्याचे पंगतीला पान आले की, मामामामी काशी गेल्याचं पुण्य पदरी पडल्याचा आनंद मानतात! शप्पथ!

मामाच्या बागशाहीत पिकलं डाळिंब खाण्याचा हक्क धरणारी भाचीवाळ दंडी सोन्याच्या वाक्या लेली की, मामांनी चांगलं माहेर केलं अशी आवई गावभर उठते. आणि ह्या लाडाईच्या गोंडाळ हाताला बांगडी भरायला काशीचा वैराळ आला होता म्हणून कळल्यावर तर तिच्या तालेवारीचा आणखीनच बोलबाला होतो. तशात तिच्या आत्तीनं तिला चिंचेच्या पत्रावळीवर वाढावं म्हणजे ह्या चंद्रावळीच्या कवतिकाची शीग ओलांडून गेली असं सारं गाव म्हणायला लागतं! आणि मग एकमेकींच्या आठवणीची साक्ष देणारी उचकी लागली की, ह्या दोघी पण कावऱ्याबावऱ्या होऊन जातात. आत्या मीठमोहऱ्यांनी भाचीची दृष्ट काढते आणि मग भाचीलाही आणखी उभारी येत बुगडीखालचा झुबा तिच्याकडून हवासा वाटतो!

इकडे तोवर मावशीनं सुवर्णाचा चंद्रहार ह्या लाडीला केलेला असतो न् भाऊबीजेला येताना हिला घेऊन यायला भावाला कळविलेले असते! आणि त्याचा कढ येऊन आपल्या ओसरीचे खांब झालेल्या व दाण्या वाघाप्रमाणं असलेल्या लेकांला हिच्या चुलत्यानं केव्हाच ग्वाल्हेर-बडोद्याच्या खेपा करायला सांगून जरतारी साडीचोळी आणलेली असते.

म्हणून अशा कवतिकाला सीमा नसते. त्याबद्दलच्या बोलण्याचाही ठाव घेता येत नाही. सरता सरू नये अशा द्रौपदीच्या थाळीप्रमाणंच ह्याबद्दल बोलावं तेवढं कमीच ठरतं! अशा वेळी प्रत्यक्ष चंद्रसूर्यही गंगनी डोलत उभा रहातो ते घटकाभर हे ऐकून!! देवाशपथ!

# मा मा

१

संग्राहिका : श्रीमती जानकीबाई पाटील

मामाच्या घरी भाचीयाचा बडेजावू
बोलतो भाचा मामी मंदील कुठं ठेवू

पाऊस पडतो झिमाझिम ग देशावरी
मोत्याची अब्दागिरी मामा धरीतो भाच्यावरी

मैनाला मागणं हमी कुणाची घियावी
आजोळी जाऊनी खूण मामाची दावावी

मैनाला मागणं कुणी देऊ कुणी न्हाऊ
मामे बोलताती आमी कन्यादाना येऊ

मावळ्याच्या घरी भाच्यायाची सौती[१] खोली
निम्म्या राजाची[२] बोली केली

मावळ्याच्या पुढं भाची जेविती चपाती
कशी पडली सजागती

१ स्वतंत्र. २ राज्याची.

नवरी माझी बाई बाहुल्या उभी राही
कन्यादानासाठी मामाची वाट पाही

कन्यादान केलं एवढं मामानं भाचीचं
भाऊला माझ्या पुण्य घडलं काशीचं

कन्यादान केलं ताट तांब्या ढवळी गाई
बाईचा माज्या मामा म्हणती ढोंगी लई

कन्यादानं केलं थाळा तांब्याची परात
बाईचा माझ्या मामा मोठा हाई समरत

कन्यादान केलं थाळा तांब्या तिसरा जांबा
तरी बाई माझ्या मामांनी दिला तांगा

लग्नाच्या दिवशी नको येऊ तू पावसा
कन्यादान करी माझ्या बाईचा मावसा

वाटेवरली बाभळ हिचं केलं ऊदबन[1]
मामा समरत[2] भाचा दिला उजवून

मामा आणि मामी दिसं आजोळी चांगली
तांब्याची घागर मामी पाण्याला व गेली

येथून दिसती माझ्या आजोळीच्या भिंती
तांब्याच्या पराती मामी माझे पाय धुती

जाईन माहेरा तुला नेईन आजोळा
लाडके गीताबाई पाही माझा गोतावळा

जाईन माहेरा तुला नेईन सांगाती
बाळ माझा राजा जेवी मामाच्या पंगती

---

१ दाट सावली, मंडप. २ समर्थ.

मामाच्या परिवारी भाचीचं उष्टं पडे
मामा मामीयांना ग काशीचं तीर्थ घडे

मामाच्या परिवारी सांडली तूपपोळी
तरी बाई माझी भाची जेवे चाफेकळी

मामाच्या परिवारी सांडले तूपलोणी
भावाला मिळे माझ्या काशीचं तीर्थवणी[1]

मामाच्या परिवारी सांडला दूधभात
मामायाच्या घरी जेवी भाचा रघुनाथ

मामाच्या परिवारी भाचा जेवी गणराया
भोजन वाढती मामी सती अनसूया

मामाच्या परिवारी भाचा जेवी गणपती
भोजन वाढती मामी तुझी पारबती

मामायाच्या घरी भाचा गेला घाईघाई
मामामामी बोलती खाली बसावं जावई

रघुनाथ माझा आजोळी गेला काल
गोफाचे करगुटे कमर झाली लाल

लाडका बाळराज आजोळी गेला राती
गोफाचे करगुटे मामा मावश्यांच्या हाती

मामा घरी भाचा मामी टाकिती बसाया
बाळराजा माझ्या तुझे आजोळ देसाया

मामा घरी भाचा माम्या टाकिती चवाळ[2]
बाळराज माझा बसे आजीच्या जवळ

---

१ तीर्थ, पवित्र पाणी. २ बैठक, जेन, पासोडी.

लाडका बाळ माझा गेला मामायाच्याकडे
मामींने चारिले त्याशी रतिबाचे पेढे

मामाचा लाडका भाचा साऱ्यांना माहीत
मामींनी घातला गळा सोन्याचा ताईत

:::२:::

संग्राहिका : सौ. कुमुदिनी पवार

मामा करी राम राम भाचा करतो सलाम
बंधू बोलत्याती बाळ बाईचा गुलाम

मामाला मुजरा भाचा घाली दोनी हातं
भाचा बाळ माझा लावी जावायाचं नातं

मामा करी राम राम मामी टाकिती बसाया
बाळायाची आजी माझ्या लागली हसाया

मामा करी राम राम मामी घालिती रांगोळी
बाळायाची माझ्या आजी बसली जवळी

कन्यादान करी मामा आणि मावळण
तीही बाई माझी हाई भाग्याची गवळण

बाळ भाचीचा ग खेळ चुली देवारा भानवशी
मामा भाचीचा लई हौशी

मोठे मोठे डोळे भिवया दिसत्याती नामी
दृष्ट काढिती मामामामी

मावळ्या घरी बाळ भरल्या रांजणी धुतो पाय
मामा हासत उभा राही मामी बोलनाती काय

मामाच्या पंगती भाची जेवली जमुना
बाळायाला माझ्या काशी घडली ब्राह्मणा

मामा घरी भाचा कारभारी झाला
साखळदंड लावूनी वाघ पाण्यावरी नेला

मामा या भाच्याची झोंबी लावली जनांनी
भाचा कवळा पाहून बैठक मारली मामांनी

मामा या भाच्याची झोंबी लागली माळाला
संभाळ रे बाबा तुझ्या बहिणीच्या बाळाला

मामा आणि भाचे गेले काय दिवानात
मामाची ती पानं भाच्याच्या रुमालात

मामाला मुजरा भाचा घालतो दुरुनी
आता माझा बाळ शिंगी सारंगीवरुनी

मामाच्या शेतात पवन्यानं[1] केली मात
भाचा त्याचा बाळ बैलं चारी साऱ्या रात

मामाच्या शेतात फार पवना मातला
भाच्या बाळायानं सारा रातवा[2] घेतला

खळ्याच्या पाळीला कोल्हा भुंकतो एकला
मामा आणि भाचा रास उफानी धाकला

मामा मांडती व पाट मामी घालते रांगोळी
तान्ह्या माझ्या बाळा तुझं कौतुक आजोळी

---

१ एक प्रकारचे गवत. २. रात्रभर काम केले, पैऱ्याचे काम केले.

*मामाच्या पंगतीला भाच्यायाचे पान पडे*
*काशी गेल्याचे पुण्य घडे*

॥ २ ॥

संग्राहिका : **सौ. राजका देसाई**

*हिरव्या चोळीवरी कुणी काढिल्या गवळणी*
*बापाच्या त्या बहिणी मला सोबती मावळणी*

*हिरव्या चोळीवर कुणी काढिली गवळण*
*मामारायांना सांगते घरी हावसेची मावळण*

*पाटच्या पाऱ्यामंदी कोन करितं हरिहरी*
*मावळं माझं सकं जागं झाल्याती वारकरी*

*सासरी बाळ जाते तिच्या डोळ्याला झंजाईळ*
*मावळं बोलत्याती जल्म लेकीचा वंगाईळ*

*सासरी जाते बाळ तिच्या डोळ्याला न्हाई पानी*
*मावळं बोलत्याती बाळ मनाची लई शानी*

::४::

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

मामाच्या घरी ग भाची ऱ्हाई[1] आवडीनं
मामाराया हौसेचा पाणी वाहे कावडीनं

मामाच्या घरी भाची जेवी दूधभात
मामा पुण्यवंत काशी घडली गावात

मामाचा ग पाय भाचीबाईला लागला
मामा पुण्यवंत काशी जायाला निघाला

देवाजीच्या दारी मी त गुणी आणि उणी
अशी मला दिली मामा मामी रत्न दोन्ही

चिंचेचा आकडा आहे वाकडा तिकडा
माझ्या मामाची सुरत जसा चंद्राचा आकडा

आम्ही दोघी भैनी दोन गावच्या बारवा
जीवाचा[2] मामा मधी चंदन हिरवा

आई माझी साडी बाप माझा पीतांबर
जीवीचे मामा माझे ठेवणीचे मोतीचूर

---

१ रहाते. २ जिवाभावाचा.

५

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

मांडवाच्या दारी नवरी कापती दंडभुजा
माझी तू बाळाबाई तुझ्या पाठीशी मामा उभा

मांडवाच्या दारी बामन बोलतो मंगायाळ[1]
मामा मामी बोले जलम लेकीचा वंगायाळ[2]

मांडवाच्या दारी बामन बोलतो सावधान
मामामामींनी केलं भाचीचं कन्यादान

मामाच्या पंगतीला भाची जेवली मुकरन[3]
आंब्याचा आंबरस ताटी वाढिलं शिकरन

मामाच्या पंगतीला भाची जेविली चपायाती
बंदूरायाशी माज्या काशी घडली सजागती

मामाच्या पंगतीला भाचीबाईचं सवईळं
मामी वाढिती जेवाया मामा बसती जवईळ

आयेराचे धनी मामा बसा जी तुम्ही खाली
जरीचं पातायाळ मी वरच्यावरी झेली

मामा तुमची भाची केवढी बघा झाली
मामीयीनं माझ्या चुनडी[4] रंगविली

म्हायार केलं म्हनू भनीसंगट भाचीयीचं
मावळ्या पंडिताला तीर्थ घडीलं काशीयीचं

---

१ मंगलाष्टका. २ वाईट. ३ तालेवारीची. ४ साडी, लुगडे.

लाडकी येवढी लेक लाडकी होऊ नको
मामाची बागशाही हिरवी डाळिंबं तोडू नको

पालक पाळयीना वर खेळना परकाराचा
माज्या बाळायाचा मामा मैतर जिनकराचा

आंब्याचा आंबरस वर केळीचं शिकरान
मामाच्या पंगतीला भाचा जेवितो नखऱ्यानं

मैनाला मागणं आम्ही कुणाची देणार
मामांनी केली बोली बाई देशीचा येणार

मैनाला मागणं शब्द कसा आम्ही द्यावा
मैनाच्या मामाचा विचार तुमी घ्यावा

मावळं बोलत्याती भाची बाळाची कोंची आळी
तिची डाळिंबीखाली माळी[1]

मावळं बोलत्याती भाची बाळाला कुटं दिली
दंडी सोन्याच्या वाक्या लेली

आजोबीळाला गेली करी कवतिक आजाआजी
मामा तांब्यानं दूध पाजी

गोंडाळ तुजा हात मामाच्या नदरेत[2]
कंगन्या[3] कोरीव कागदात

गोंडाळ तुजा हात मामा म्हनीतो भाचीयीचा
आला वैराळ काशीयीचा

बाळाला बघू आलं तिला कुनाला कुनी द्यावी
तिच्या मामाची वाचा[4] घ्यावी

---

१ माडी. २ नजरेत. ३ सुवर्णाच्या नक्षीदार बांगड्या. ४ शब्द, वचन.

मैनाला मागणं दुही दारांनी झाली दाटी
कंबरेला शेला मामा तिचा पानं वाटी

मैनाला मागणं आम्ही कुणाची देणार
मैनाच्या मामाचे आता मंडळ येणार

दैवाचा माझा बाळ आजोळी आजा आजी
बाळाचे माझ्या मामा पेल्यानं दूध पाजी

अंगड्या टोपड्यानं वळन झाली लाल
बाळाचे ग माझ्या मामा मामी आले काल

अंगड्या टोपड्यांनी बाळ कोणी सजविलं
सांगते सयांनू त्याच्या मामानं पाठविलं

मांडवाच्या दारी पहिला आहेर कुणाचा
मामा आणि मावशीचा

६

संग्राहिका : सौ. जैबुन्निसा खान

मामा नि मावश्या तुला पुसती राजीया
बाळराजा माझा किती वर्साचा मुंजीया

एकुलता एक माझा कातणीचा धागा
मामा तुमी मावशा माज्या बाळा औक मागा

मामा म्हणीयीतू भाची केवढी दिसते
मखमल जरतारी सये परकर नेसते

जावळाची वेणी उकलितो तुझा मामा
गोरे बाई माझी कन्यादानी सत्यभामा

लगनाच्या येळी नवरी कापे थरथरा
देसाई व मामा मागं कट्यार उभी धरा

कन्यादान केलं सये सोन्याच्या ताम्हणी
उजविलं दैव तुझं मामांनी मालनी

७

संग्राहक : श्री. स. र. बिन्नरगुरुजी

मामा काय भासा चालले निमुन्या तोडाया
कशाच्या निमुन्या हे त लागले लढांया

अंगडं टोपडं कुंची चालली लोळत
मामाच्या ग गावा बाळ चाललं खेळत

अंगडं टोपडं कुंचीचा ग घोळ पडे
तान्हं माजं बाळ मामाचं जोतं चढे

अंगडं टोपडं याच्या टोपड्याला भिंग
तान्हं माझं बाळ मामा पुढं श्रीरंग

अंगडं टोपडं याच्या टोपड्याला तारा
तान्हा माझा राघू मामा कडेवरी हिरा

अंगडं टोपडं कुंची गोंड्यांनी येढीली
तान्हीया राघूची हौस मामांनी फेडीली

अंगडं टोपडं याला कुंच्या झाल्या लई
तान्हीया बाळाच्या मावशा ठायी ठायी

अंगडं टोपडं बाळ धरीतं कवळी
तान्हा माझा राघू जाय मामाच्या जवळी

मामा भासीयाची कुस्ती लागली खिंडीत
सया बोलताती मायालेकीचं पंडीत

मामा भासीयाची कुस्ती लावली बावरी
भास्याची कवळी सीन मामा मंदील सावरी

मामा भासीयाची कुस्ती चालली कसून
भास्याची कवळी शीन मामा राहिले बसून

मामा काय भासा खेळतोय एकीबेकी
भास्याव आला डाव मामाच्या नेल्या लेकी

मामा काय भासा खेळतो सुरीदोरी
भास्याव आला डाव मामाच्या नेल्या पोरी

# आत्या

::१::

संग्राहिका : श्रीमति जानकीबाई पाटील

*उचकी लागयीली का ग उचकी तुजी घाई*
*आत्ती माज्या ग मावळंनी सई काडली कशापाई*
*जिवाला जड भारी कोन्या कागदी जल्दी लिवा*
*आत्ती माजी ग माळवन दुरल्या देशाची यील कवा*
*आत्तीच्या पंगतीला भाची जेवीती चंद्रावळी*
*पाटी ग वैली वेनी जशी नागीन बाई काळी*
*मावळनी आत्याबाई एका म्हायारी दोगी जाऊ*
*माजं बापाजी तुमचं भाऊ*
*मावळन आत्याबाई तुमच्या बुगड्याखाली काप*
*तुमचा कुंडलिक माजा बाप*
*मावळन आत्याबाई तुमच्या बुगड्याखाली काई*
*तुमची भावजई आमची आई*
*मावळ्याच्या घरी भाची पावनी चंद्रावळी*
*केली चिंचेची पत्रावळी*

# मावशी

::१::

संग्राहिका : सौ. शरदिनी मोहिते

*जानवसवाडा काय मागती हावशी*
*बाळाची ती माझ्या नवरदेवाची मावशी*

*नवस जरी केला माझ्या माहेरच्या देवा*
*लाडकी मावशी मी भाचा मुराळी मला यावा*

*एवढी भाऊबीज सकाळी कुणी केली*
*मावशी मावली शिवेशजारी का दिली*

*भाऊबिजेदिशी भाऊ कसा आला न्हाई*
*मावशी बोलती जोड कापाचे झाले काई*

*भाऊबिजेदिशी भावानं दिलं काई*
*मावशी सांगतसे चंद्रहाराला सोनं लई*

*भावाला भाऊबीज बहिणीला दिवाळी*
*मावशीसंगे भाची मामाला ववाळी*

*मावशी म्हणूनी हाक मारीयीली कोनी*
*माज्या भैनीच्या बाळांनी*

चुलत भावंडाला नका म्हनूसा वंगाळ
एका राशीचं जुंधळं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

::२::

संग्राहिका : डॉ. सरोजिनी बाबर

सासरी जाते लेक चुलत्याच्या आवडीची
तिला घालवाया सभा उठली चावडीची

माहेराच्या वाटे अंबाचिंचेची बनं दाट
बयासंगट चुलती लई बगती माझी वाट

लुगड्याचं मोल एका चोळीला माज्या दिलं
वडील चुलत्यांनी उंच म्हायार मला केलं

लाडकी माजी बाई हिचं खेळणं हुड्यावरी
चुलता राजस म्हणती भिंग झळकूंदे चुड्यावरी

बापाची लाडकी चुलत्याच्या कानी लागे
ठाण्याची शिंगी मागे

लाडाची बाई लेक तिचं नाव तारामती
चुलता हिंडतो बारामती

लाडकी एवढी लेक चुलत्या म्हनी तात्या
पायी पैंजण उभी जोत्या

माझ्या घरी पावना शेजी म्हणीती कोण राजा
हिरव्या मंदिलाचा चुलता सख्खा माजा
रुखवत आला निऱ्या वाटोळ्या मालत्या
कोण मानाच्या चुलत्या

# व्याही

॥ १ ॥

संग्राहिका : सौ. यशोदा पाटील

नागवेली पानं माझ्या बैलाला चावना
याह्या माझ्या बंधू द्यावा नदीचा पवना

नदीच्या पवन्याचा बैलाला येतो वास
याह्या माझ्या बंधू द्यावा मळ्यातील घास

मळ्याच्या घासाचा लागे बैलाला तोटरा
याह्या माझ्या द्यावा ताटी मक्केचा[1] पोटरा[2]

मक्केच्या पोटऱ्याचा बैलायाला येतो वास
याह्या माझ्या द्यावा तुझ्या मळ्यातील ऊस

आडसाल्या ऊस त्याचे टोचताती काठ
बैला पेंडीची सव द्यावी तेल्यायाची गाठ

शेंगायाची पेंड माझ्या बैलांना फुटाना
याह्या माझ्या बंधू आणा वलेव वटाणा

---

१ मक्याचा. २ घास, पोटऱ्यात आलेली मका.

वलेव वटाणा आला बैलाच्या खाण्यात
याही बंधूराया सरकी भिजवा पाण्यात

सरकीईचं खाणं लागे बैलायाचं खूर
सांगते याही तुम्हा आणा भरडीची तूर

तुरीचा व दाणा लागे बैलाला तुराट
हरबऱ्याचा दाणा याही करू नका खराट

मोठी मोठी बैलं तुमच्या तुरीच्या हेलाला
सांगते याही तुम्हा शेत शिवंच्या शेल्याला

शिवंच्या शेताला औतं गेली गाड्यावरी
याही माझा बंधू शिलेदार घोड्यावरी

# लो | क | क | था

# अनुक्रम

डॉ. सरोजिनी बाबर, पु

चरमाय

# वरमाय

निवेदिका : डॉ. सरोजिनी बाबर

आटपाट नगरातली गोष्ट. फार फार जुन्या काळची. या नगरात अशीच एक म्हातारी रहायची. तिला ना मूलबाळ, ना कुणी नात्याचं. तसंच तिला ना घरदार, ना शेतीभाती. शिळंपाकं भीक मागून जे मिळेल ते खावं. फाटकं तुटकं भीक मागूनच मिळेल ते ल्यावं, नेसावं. मिळालंच मूठभर शेण कुठं तर ते विकून पै पैसा जमवावा, असा तिचा रोजचा नेम. असंच तिचं रोजचं आयुष्य.

होता होता एकदा काय गंमत झाली, तिच्या ओटीत भिक्षा घालताना कुणीतरी एक भोपळ्याची बी टाकली. म्हातारीला ती बी बघून घटकाभर वाटलं, 'टाकावी झालं खाऊन!' म्हणताना पण मग तिनं विचार केला. अशीच कुठं ती बी लावली तर भोपळ्याचा वेल येईल. मग पोटभर भोपळा तरी खायला मिळेल. आणि मग तिनं आपल्या मोडक्यातोडक्या झोपडीच्या वळचणीला ती बी पेरली. पावसाळा आला. वळचणीखाली भोपळ्याच्या वेलानं तोंड वर काढलं.

म्हातारीचं भीक मागणं चालूच होतं. हळूहळू वर मान काढणाऱ्या वेलाकडं ती नेमानं बघायची आणि म्हणायची कशी, 'आज नाही उद्या माझा नारायण मला भेटंल.' तिला त्या भावनेत आनंद वाटायचा.

काही दिवसांनी त्या वेलाच्या बुडाशी भोपळा लागला. म्हातारी आनंदली. म्हणाली कशी, 'हाच ग माझा नारायण! हाच मला सोन्याचा दिवस दाखवील!' आणि तिनं मनोभावानं त्या भोपळ्याला नमस्कारदेखील केला! आपल्या नारायणाला कुणी बघू नये, त्याला ऊनवारा लागू नये म्हणून तिनं त्या वेलाभोवती आडोसा केला. आपली फाटकी पोत्याची बैठक तिनं त्यावर झाकली.

त्यानंतर असेच काही दिवस आले नि गेलेही. म्हातारी पोटच्या मुलाप्रमाणं त्या वाढत्या भोपळ्याची निगा राखू लागली.

मग एक दिवस असा उजाडला की, म्हातारीचा सोमवारी उपास होता. त्या दिवशीच भल्या पहाटे त्या भोपळ्यातून एक मोठी तेजस्वी मूर्ती बाहेर पडली. भोपळ्याच्या दोन फाका झाल्या. प्रत्यक्ष भगवान सूर्यनारायणच भोपळ्यातून बाहेर पडले. ते ताबडतोब नदीवर गेले. स्नानसंध्या, पूजाअर्चा त्यांनी उरकली; आणि दिवस उगवायच्या आत पुन्हा भोपळ्यात येऊन गुप्त झाले.

झाल्यागेल्या गोष्टीची वास्तपूस्त कुणीच केली नाही. कुणाला काही चाहूलही लागली नाही. खुद्द म्हातारीला देखील काही सुगावा लागला नाही. जिकडं तिकडं आपलं शांत. नाही म्हणायला राजकन्येला मात्र ही चाहूल लागली. पुढचा सोमवार आला. भगवान सूर्यनारायण महादेवाच्या रूपानं भोपळ्यातून बाहेर पडले. नदीवर निघाले. नदीवर जायची वाट राजवाड्यावरून होती. राजकन्या जागी झाली होती. तिनं ती दैदिप्यमान मूर्ती पाहिली. तिचे डोळे त्या उजेडानं दिपले. ती दचकली. भांबावली. टक लावून त्या तेजस्वी माणसाकडं बघत राहिली. अखेरीस तिला दिसून आलं की, त्या माणसानं नदीत बुडी मारली आहे. त्यामुळे ती घाबरली. तिची समजूत हा माणूस बुडाला. कायमचा नदीत गडप झाला. पण तसं झालं नाही. त्या माणसानं पुन्हा डोकं वर काढलं. पुन्हा तो नदीच्या आत घुसला.... पुन्हा वर आला.... असं कितीतरी वेळां घडलं....

राजकन्या त्याची वाट बघत राहिली. तो माघारी फिरेल तेव्हा त्याच्याशी बोलायचा तिनं बेत केला. पण बिचारी वाट बघून बघून थकली तरी त्याचा

पत्ता नाही. असं चांगलं पुढचा सोमवार उजाडेपर्यंत झालं. रोज पहाटे उठावं, त्या भल्या माणसाची वाट बघावी, पण गाठ मात्र पडू नये असं घडत गेलं. तिचा हिरमोड झाला. तिला त्याचा ध्यास लागला!

तिसरा सोमवार उजाडला. राजकन्या आख्खी रात्र जागीच राहिली. ती खिडकीत उभी राहून कानोसा घेत होती. तिनं पाहिलं तो म्हातारीच्या पडक्या झोपडीच्या वळचणीखाली भोपळा फुटला आहे आणि त्यातून एक तेजस्वी माणूस बाहेर पडतो आहे. झालं, तिचं भान हरपलं. श्वास आवरून ती बघत राहिली. काय काय घडतंय ते पाहात बसली.... आणि मग तिला दिसून आलं की, मागं बघितलं होतं त्याप्रमाणंच यावेळीही हा डोळे दिपवून टाकणारा माणूस नदीवर गेला. आंघोळपांघोळ केली, पूजाअर्चा उरकली आणि परत त्या भोपळ्यात येऊन गुप्त झाला. पूर्वीपेक्षा यावेळी मात्र त्याची जादा हालचाल तिला दिसली. ती विचार करीत राहिली. तिचं मन त्या तेजस्वी माणसावरून बाजूला सरायला तयारच होईना.

शेवटी तिनं त्याच्याशी लग्न करण्याचाच निश्चय केला. तेव्हा कुठं तिला बरं वाटलं. तिनं आपला बेत लगेच आपल्या आईवडिलांना कळविला. राजाराणीला नवल वाटलं. तिचं सांगणं, वागणं त्यांना वेड्यासारखं वाटलं. त्यांनी तिचं मन वळवायचा लाख प्रयत्न केला. पण ती आपला हट्ट सोडीना. आईवडिलांना पत्ता न लागू देता तिनं लग्न करायचा बेत केला. ती गुपचूप त्या भोपळ्याजवळ गेली आणि तिनं त्या भोपळ्याला माळ घातली. तिचं लग्न लागलं. तिनं तो भोपळा हळूच तोडून घेतला आपल्या स्वतःच्या महालात आणून ठेवला.

पुढचा चौथा सोमवार उजाडला. राजकन्येची छाती धडधडू लागली. आपल्या धन्याला भेटायला ती उतावीळ झाली. बघता बघता भोपळा फुटला. त्यातून तो तेजस्वी माणूस बाहेर आला. न बोलता नदीवर निघून गेला. इकडे तो परतण्यापूर्वीच भोपळ्याच्या फोडी राजकन्येनं लपवून ठेवल्या! आणि मग ती त्या माणसाला भोपळा शोधताना बघून म्हणाली, "अंहं! आता भोपळ्यात नाही जायचं. इथं राहा माझ्याजवळ. मी तुमची आहे." त्यावर तो माणूस म्हणाला,

"आज नाही. राजकन्ये, माफ कर. आणखी एक आठवडा थांब. पुढच्या सोमवारी तुझी इच्छा पुरी होईल. तू माझी राणी होशील. मी तुझाच आहे. प्रत्यक्ष भगवान साक्षात् तुझ्यापुढं उभा आहे देवी! आज माझा भोपळा दे–" राजकन्येनं भोपळा परत केला. तशी तो माणूस पूर्वीसारखा एकदम गुप्त झाला.

पण पुढच्या सोमवारी तो केव्हा येतो म्हणून घटका मोजत बसलेली राजकन्या दिसताच त्यानं सांगितलं, "मी नदीवर जाऊन येतो. तोवर माझ्या अंगाला उटी लावण्याची तयारी कर. गंध उगाळून ठेव. फुलांचा पंखा तयार ठेव. सारं थंड थंड अंगाला लागू दे. आणि हे बघ, ह्या भोपळ्याच्या फोडी मी यायच्या आधी जाळून टाक. आणि मी आल्याबरोबर सारं गार गार माझ्या अंगाला माख. म्हणजे मी आता आहे तसाच राहीन." आणि तो निघून गेला.

इकडं त्याच्या सांगण्याप्रमाणं राजकन्येनं सारी तयारी केली. तो आल्याबरोबर त्याच्या अंगावर गुलाबपाणी, गंध, उटी, अत्तर यांचा वर्षाव केला. फुलांच्या पंख्यानं त्याला वारा घातला. थंड पाण्यानं आंघोळही घातली. त्यामुळं त्या माणसाचा देह शांत झाला. त्याला आराम वाटला. तो आनंदला. कौतुकला. त्यानं मोठ्या प्रेमानं राजकन्येकडं पाहिलं.

एव्हाना सूर्योदयाची वेळ झाली. राजकन्येनं सुगंधी फुलांचे हार त्याच्या गळ्यात घातले. नेसायला पितांबर दिला. अंगावर भर्जरी शेला घातला. आपल्या हातानं कपाळावर गंध लावला. अखेरीस त्याला वाकून नमस्कार केल्यावर ती आनंदानं आईवडिलांकडं त्याला घेऊन गेली. दोघांनी राजाराणीला नमस्कार केला. राजाराणीला एवढा सुंदर मुलगा बघून आश्चर्य वाटलं. राजकन्येनं त्यांना सारं घडलं तसं सांगितलं. राजाराणीला लेकीच्या पसंतीबद्दल फार आनंद झाला. मोठा सुंदर मुहूर्त बघून त्यांनी लग्नाचा बेत जाहीर केला.

देशोदेशींचे राजेरजवाडे जमले. दरबारी थाटात आठवडाभर लग्नसोहळा पार पडला. वरमाय म्हणून त्या भिकाऱ्या म्हातारीची सर्वांनी बडदास्त ठेवली. म्हातारीच्या पोटात आनंद मावेना. समाधानानं बिचारी खुळी झाली. राजाराणीनं तिला महाल बांधून दिला. तिचा मानमरातब केला.

आणि म्हातारीजवळच राहायचं म्हणून जावईबुवांनी हट्ट घेतला. म्हणून तिच्याजवळच त्यांनाही राहता यावं यासाठी राजानं नवा महाल बांधून दिला. एवढंच नव्हे तर राजानं आपलं सारं राज्य जावयाला आंदण देऊन स्वतः देवदेव करीत राहिला.

नवे राजाराणी सुखानं राहिले. त्यांचं सुख तुमच्याआमच्याही वाट्याला येवो.

"आमची कहाणी संपली. तुमची तहानभूक हरपली."

# पंचद्वार



(विविधलेख)

## अनुक्रम


सौ. लीलाराजे पटवर्धन, बुधगाव, सांगली

आधी गाते मी मातापिता

श्री. ना. रा. शेंडे, नागपूर

तीर्थांचे दोन मंगल चरण

श्री. के. जे. सावे, मुंबई

कोन्कण्यांची लोकगीते

श्री. अनंत काणेकर, मुंबई

सोनकोळ्यांची पूर्वजपूजा

सौ. कुमुदिनी पवार, चितळी, सातारा

आई आणि लाडकी

डॉ. सौ. सविता जाजोदिया, दिल्ली

'जळहरजामी बाबुल माँगाँ, रातादेई मायड'




आपल्या घरात आपल्या आवतीभोवती वावरणारी सासुरवाशीण, माहेर-वाशीण असावी म्हणजे तिच्या सुखदुःखांशी समरस होण्याचे प्रसंग अनेक येतात. त्यातल्या त्यात भावनाप्रधान माणूस तर अशावेळी भुलूनच जातो. सुखाच्या वेळी त्याचा ऊर आनंदानं भरून येतो आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचा मळा फुलतो. दुःखाच्या वेळी त्याचं काळीज करपून जातं आणि त्याच्या गालावर लिंबू गळायला लागतं. त्या कारणानं त्याला—

*सासुरवासिनीची गेली काकनं कोपराला*
*बया विचारीती काय जाचलं लेकराला*

*सासर एवडा वस नका करूसा सासूबाई*
*चांदणी मैनाबाई चांदी आलीया सोन्यापायी*

*भैनीचा सासुरवास बंधु ऐकतो सान्यावाटं*
*गंगा लोटती डोळ्यावाटं*

या भावनांचा अर्थ उमजतो. त्यातलं सारं समजतं. स्वतः तोदेखील हुंदक्यानं दाटतो. आणि मग—

*लेक जाते सासुऱ्याला तिच्या वटीला हिरवा पेरू*
*संगं मुराळी छंदखोरू*

ह्या कल्पनेनं त्यातल्या त्यात होणारं समाधानही तो आनंदानं उरीपोटी दाटू देतो. एवढंच नाहीतर—

*सावळ्या सुरतीवरी मिसरूड पालापाला*
*जावाई राजस शेवगा वहाराला आला*

कवतिकाच्या गोष्टीदेखील त्याला सुचू लागतात. त्या कारणानं त्याच्या मनाला हुषारी येते, आणि मग.—

*औंख मी चिंतिते चुड्यामागल्या गजऱ्याला*
*दीर राजस वजीराला*

अशा भावना व्यक्त करणाऱ्या लेकीबाळीवरून मीठमोहऱ्या उतरून टाकायचा मोह त्याला होतो. अशा वेळी ती—

*सुखदु:खानं सये न्हाई कुनाला सोडियेलं*
*चांदासूरव्याला गिरनानं वेढीयेलं*

आपल्या मनाची अशी समजूत घालून मोकळा होतो. जीवनाचा खरा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळं मग—

*नणंद पाव्हणी नका म्हणूसा कुठली*
*चुड्यामागली पाटली*

आपल्या घरी येतेल्या पाव्हण्यामंडळींचं स्वागत या परीनं करताना त्याचा जीव एवढा होतो. एवढंच नाहीतर—

*माऊलीची माया शेजी कराया का गेली*
*लटकी साखर शाळूच्या पाना आली*

*भावज गुजरीचा पदर धरणीचा*
*बंधुराया माझा खांब कातीव कोरणीचा*

असला अभिमानही आपल्या घरात त्याला उभा करायची ईर्षा येते. म्हणून तो आपल्या मनाशीच—

*जावायाला दिली पाच भांडी जेवायाला*
*लाडकी मैनाबाई दिली समई उजेडाला*

असल्या गोष्टी करीत बसतो. त्या नादात त्या जिवाला उभारी येते. कारण आपल्या घरच्या मुलाच्या एकी—

*नवरा पाहू आलो काय पहाता नवऱ्याला*
*माझ्या तोळबंदीच्या भवऱ्याला*

हा दिमाख त्याच्या मनी खळाळत असतो. आणि त्या घरची ह्या लेकाची आई—

*दोन माजी बाळं दंडीच्या दोन येळा*
*बया ठेवणीची चंद्रकळा*

अशा अभिमानानं तिच्या लेकीला दिसत असते याची पण त्याला जाणीव होते. त्यामुळे असा माणूस ह्या सगळ्या गोष्टींची पारख करीत सुटला म्हणजे—

*बंधूच्या परास भाच्या राघूची आगत*
*मुदलापरीस मला व्याजाची लज्जत*

अशाच काहीशा भावनेने या गोष्टीबद्दल बोलत रहातो. तर त्याची ही पारख कागदावरही उतरली म्हणजे मोठी मजा येते. त्यातलाच हा वानवळा—

# "....आधी गाते मी मातापिता।"

## सौ. लीलाराजे पटवर्धन

आईवडिलांना तीर्थस्वरूप मानले जाते. सिंधू, गंगा, गोदावरी, कृष्णा, कावेरी इत्यादी नद्यांचे पाणी आणि देवाच्या पायीचे पाणी आपण तीर्थ मानतो. सारी तीर्थे पवित्र, पुण्य देणारी आणि पापनाशक; तसेच आईवडीलही! पण मातापित्यांचे उपकार मनी येता असे वाटते की ते तीर्थांच्याहून श्रेष्ठ, देवापरीस मोठे, स्वर्गाहून आगळे आणि....आणि गीता, भागवत, रामायणाच्या गोडीहूनही गोड आहेत. त्यांना तीर्थांचे सागर मानणे हेही त्यांच्या अनंत गुणांच्या तुळेला कमी भरणारे आहे.

माणूस जन्माला येतो, पण जन्माला येणे हे काय त्याचे कर्तृत्व का? जन्माला येण्यापरीस जगणे हे तर फारच कठीण. बाळंत्यातील अर्भक जगते आईच्या अंगावरच्या अमृताने आणि मायेने. ते जगते, मोठे होते, माणसात येते, जाणते होते, भले होते, त्याला कारण आईबाप. अगर आईबापांच्या तुळेची मायाळू माणसे, धर्माचे मातापिता, माणसाला माणूस करणारी आईबापे हीच देव, हीच धर्म, हीच तीर्थे, आणि मोक्ष! त्यांना तीर्थांचे सागर म्हणा, विठ्ठलरखमाई म्हणा, काशीरामेश्वर म्हणा, त्यांच्या तुळेला ते सारे थिटेच पडणार.

माणसाला समज असेल तरच त्याला देव कळणार, धर्म समजणार,

तीर्थ उमजणार, पुण्य पेलणार, पाप उकलणार. असा समज नसेल तर माणूस नव्हे, धोंडाच तो. धोंड्याला सजीव समजूतदार माणूस बनविणाऱ्या आईबापाला कोणत्या विशेषणांनी, उपमांनी, तोलणार? शब्द अपुरे आहेत त्यांचा मोठेपणा गायला.

आई स्वर्गाहूनही थोर असे म्हणतात. तशीच मातृभूमीही स्वर्गापेक्षा मोठी मानतात. पण मनात येते की मातृभूमीची ओळख आईच्याच मायेतून निर्माण झालेली. मग मातृभूमीपेक्षाही आईच काकणभर उजरी नाही का? आणि आईच्या प्रेमस्वरूप वेलीचा आधार जो पिता....मातृस्वरूप पार्वतीचा जो शंकर, ते वडीलही सर्वांपेक्षा मोठे.

सागराला सर्व नद्या मिळतात. सर्व तीर्थे सागराचे ठिकाणी आहेत. पण सागराच्या पाण्याने तहान भागविता येत नाही. स्नान केले तर अंगाचा खारट-पणा परत गोड्या पाण्याने धुवावा लागतो. असा सागर आईच्या प्रेमसागराशी सरसा कसा येणार? एकूण आई म्हणजे आई! आणि वडील म्हणजे वडील! त्यांना तुलना नाही. त्यांच्या गुणांचे मूल्यमापन होणार नाही. अमृत, स्वर्ग, देव, तीर्थ, धर्म, राष्ट्र, इतिहास, काव्य ही सारी महान मूल्येही त्या आईवडि-लांच्या तुलनेस कामी येत नाहीत. म्हणूनच त्यांना तीर्थांचे सागर न म्हणता मुली आईबापाला तीर्थापरीस पावन मानतात. तीर्थयात्रा, तीर्थस्नान, कशाला हवे? सागरी लेक पहा काय म्हणते—

*मायबाप असताना कोण काशीला गेलं वेडं।*
*व्यर्थ पायांचं दिलं भाडं ॥*

मग आईबापाला काय म्हणू? जित्या प्रेमाचे झरे, निःस्वार्थ मायेची मधाची मोहळे, वात्सल्याचे वटवृक्ष, माणसांच्या माणुसकीची मूर्तिमंत शिकवण, त्रिभुवनाचे मांगल्य, अग्नीची पावकता, हिमालयाची शीतलता, आणि सूर्यनाराय-णाचे तेज या गुणांची मूर्ती अशी ती आई; असे ते वडील....!

हे आईवडिलांचे चित्र आमच्या मुलीबाळींनी किती मोहक, सुरेख, आणि सरशा शब्दात काढले आहे! जिथे शब्दसृष्टीच्या ईश्वरांनी वर्णन करता हात टेकले तिथे या भोळ्याभाबड्या लेकींनी आपल्या आईवडिलांची गुणगाथा कशी

मन हरखून घेणाऱ्या कोवळ्या मऊसूत आणि आभाळ भरून उरेल अशा अर्थवाही शब्दांनी रचिली आहे पहा—

*पिताजी माझा वड बया माझी गोंदईन*
*काशीला गेली वाट दोनी झाडांच्या मधईनं*

निसर्ग जवळून पाहिला असेल, झाडापानात देव दिसण्याइतकी मनाची सरळता आणि प्रतिभा असेल आणि उरात उपकारांची जाणीव, काळजात वात्सल्याची कळ असेल तर या साखर ओळींचा रस अजमावता येईल.

वडिलांना वडाचे झाड म्हटले आहे, वड म्हणजे पुराण पुरुष....मोठा, पवित्र विस्तारलेला, वाटसरांची सावली, पांखरांचा आधार, गुरावासरांचा स्वंथ करायाचा निवारा, आणि सर्व मंगलांचे मंगल, सर्व पतिव्रतांचे पूजनस्थान; सती सावित्रीचे सौभाग्यसाधनाचे देवरूख असे हे वडाचे झाड....तसा माझा पिता. "पिताजी माझा वड" तीन शब्दांनी केवढा अर्थ! दिला ब्रह्मांडाला व्यापून उरेल असा हा अर्थ!

"बया माझी गोंदईन." माझी आई गोंदणीचे झाड. लालचुटूक फळांनी डंवरलेले. आपले साधेभोळे....रानगावचे राहणारे.

आणि या दोन झाडांच्या मधून काशीची वाट गेली आहे. काशीची वाट, धर्माची वाट, श्रद्धेची वाट, पुण्याची वाट, त्यागाची वाट.... ही जीवनाची वाट आईवडीलरूपी वृक्षांच्या सावलीतून गेली आहे. कुण्या मुलीच्या काळजात, कोण्याकाळी, शारदेनं वात्सल्याच्या तारेवर झणत्कार केला आणि तिच्या मुखावाटे या ओळी उमटल्या हे आजच्या जाणत्या वाङ्मयपंडिताला सांगता येईल का?

आईने कसे वाढवले, कोडकौतुक कसे केले, तिच्या आणि वडिलांच्या घरात मायेचे राज्य कसे नांदले, आईचे मन कसे मोठे, वडिलांचा तेगार कसा, त्यांचा दरारा कसा, मन कसे मोठे अशा कितीतरी भावभानांचे साजरे, देखणे वर्णन गावकन्यांनी गायले आहे. त्याचे रसग्रहण किती म्हणून करावे?

*आई नी म्हनू बाप दोनी तुळशीची रोपं*
*दोघांच्या सावलीला गडद गेली झोप*

आईबाप तुळशीची झाडे....ती पवित्र आणि सुवासिक....त्यांच्या सावलीत बाळपणाची झोप गडद झाली. चिंता नाही, भय नाही, कशाकशाची काळजी नाही. खावे, प्यावे, ल्यावे आणि झोपावे. आईबापांच्या आसऱ्याला गाढ, गडद झोपावे. कारण आईने—

*हाताचा पाळईना, डोळ्यांचं केलं दिवं*
*बया माझ्या गौळणीचा, तिचा उपकार झाला नव्हं*

हातांचा पाळणा आणि डोळ्यांचे दिवे करून लालनपालन करणाऱ्या आईचा, मालनबाईचा, गौळणीचा, किती किती उपकार झाला नव्हे का?

*पाची प्रकारचं ताटं वर केळाचं राइएतं*
*बया गौळणी वाचुनी कोन वाढील आयितं*

पाच पक्वानांचा ठाव आणि त्यात केळ्याचे राइते. असा अमृताचा ऐता घास माझ्या बया गौळणीवाचून कोण वाढणार? नाही, जगात असे कोणी नाही.... घरची श्रीमंती असली तर सोन्याहून पिवळे. आणि नसली तरी कोंड्याचा मांडा करून आपल्या बाळांच्या मुखी अमृताचा ऐता घास आईवाचून कोण घालणार?....वेळेनुसार स्वतः उपाशी राहून आपल्या चिमण्या बाळांच्या मुखी भुकेचा आधार चोजाने भरवणाऱ्या आईच्या ऋणातून मुक्त व्हायचा रस्ता तिन्ही जगांच्या मालकाला, देवालासुद्धा गवसलेला नाही....बया गौळण मायबाईचे उपकार फार फार झाले....पण तिच्यापरीस माझा पिता उपकारी! कसा म्हणाल तर त्याने प्रेमाची पाखर घातलीच पण मला शहाणेही केलं....दुनियादारी काय ते त्याने शिकवले....पंख चांगले वाढवले आणि मग दुनियेच्या आभाळात उडायला मोकळे सोडले.

*बया गौळणी परईस पिता माझा उपकारी*
*दुनिया दावली त्यानं सारी*

असे गुणाची लेक म्हणते आहे.

*बया म्हनू बया माज्या तोंडाला पडे मिट्टी*
*माझी तू बयाबाई माझी आईन्याची पेटी*

आई, आई, आई! आई, तुझे नाव घेतले की, तोंडभर साखरेची मिठी पडते. आई तू माझी आरशाची पेटी आहेस. आरशाची पेटी म्हणजे हळद, कुंकू, काजळाची पेटी.... सौभाग्याची पेटी.... आईला सौभाग्याची पेटी म्हणणाऱ्या लेकीच्या मनची कल्पना महाकवीच्या कल्पनेला सरशी जाणारी नाही का?

अशा मंगल, वत्सल माऊलीची माया कशी? काय उपमा दिली आहे जानपद बालिकांनी?

*मावलीची माया सारखी बाळांवरी*
*केळीचा खांब डुले बत्तीस केळ्यांवरी*

केळीची हिरवीचार पाने.... घडाच्या सगळ्या केळ्यांवर मायेची सावली धरते.... वरची मोठी खालची लहान अशी केळी असतात घडाला; म्हणून काही त्यात सान थोर असा भाव केळीची माया करीत नाही, तशीच आईचीही! मुलांना केळ्यांची व आईला केळीच्या झाडाची उपमा देणारी ती माउलीची गुणी लेक पुढे म्हणते आहे—

*मायबापाची ही बी माया जशी दुधाची उकळी*
*माय चाऱ्याची पाकळी बया मनाची मोकळी*

अशा मोत्यांच्या ओळी. कितीतरी....जशा श्रावण सरी....आईबापांच्यावर पांढरीच्या पोरींनी गायलेल्या या स्वयंभू, सरसरून येणाऱ्या, उपजत म्हणूनच गोड आणि वात्सल्याच्या डुबेने ओल्या झालेल्या कितीतरी ओव्या आहेत.

लेकी आईच्या गुजगोष्टी ह्या देवभक्तांच्या गुजगोष्टी परीस न्याऱ्या हं!

*गुजया सांगताना माझ्या गुजाची किती गोडी*
*बया गौळण माझी बोलं शाळू दिवस रात थोडी*

आईचे आणि लेकीचे हितगुज चाललेले. त्या गुजगोष्टींची गोडी किती? माझी आई बोलते मी ऐकते....पण दिवस पुरत नाहीत. दिवस अपुरे, शाळू दिवस, थंडीचे दिवस लहान, तसे दिवस लहान होतात आणि रात्री अपुऱ्या पडतात....गुज थांबत नाही....किती बोलू न किती ऐकू, असे होते माऊलीला अन् लेकीलाही!

*गुजया बोलताना चांद माळीच्या आड गेला*
*वया गौळन माझी बोल नाही गुजाचा झाडा झाला*

गोष्टी करीत आई आणि लेक बसल्या....चांद माळ्याच्या आड मावळला तरी मनीच्या गुपीत गोष्टीचा उलगडा झाला नाही. अंहं !

किती हो प्रेमाचे नाजुक गोवे हे? फुलपाखरांच्या पंखाच्या नाजुक हातांनीच उलगडायचे हे भावनांचे गोफ....! हे गोफ रेशमी, जरतारी, उगवत्या सूर्याच्या किरणांसारखे उबदार, चकचकते पण हातात धरता येत नाहीत. धरता सापडत नाहीत....सापडले तर ठरत नाहीत आणि....केवळ मनच्या भावनांच्या शिंपल्यात आसवांच्या दंवाच्या मोतीदाण्यात ते साठवता येतात....वात्सल्याचे धागे....थेंब....लोलक....!

म्हणून सर्व धर्मकार्यांचा, लेखनकार्याचा, जसा प्रारंभ श्रीगणेशाने होतो तशाच प्रकारे आईवडिलांच्या प्रेमाची गीता ही—

*"पहिली गाते ओवी आधी गाते मातापिता*
*मग गाईन सर्व्या गोता"*

अशी सुरू होते. आईबाप; व्यक्ती दोन, पण या दोन व्यक्तींचे अव्यक्त रूप जणू काही सर्व मंगलांचा मंगल श्री देव गणेशु !

आई आणि वडिलांच्या नावाजणींची गाणी, ओव्या, या जास्त करुण आणि वत्सल होण्याचे कारण असे की, सासरी गेलेल्या मुलींच्या काळजातून त्या स्फुरलेल्या आहेत. सासरचे कुलव्रत आनंदाने आचरणाऱ्या कोवळ्या वयाच्या त्या सुहासिनीच्या मनात कधी जडभारी वाटले की त्यांना आठव व्हायचा आईचा, बापाचा....मनी कळ उठली की, आई आठवते....मनी भय वाटले की, बाप आठवतो....आई म्हणजे माया तर बाप म्हणजे आधार, दिलासा. बाळी हिंपुटी झाली की, तिला माहेरची सय व्हावी. असे काही उणेदुणे सासरी घडले —सासरचे जिणे ते एकादशीचे व्रत....पुण्य देणारे पण खडतर—तर तशा व्रतस्थ जीवनात तनुमनाला कुठे काही बोचले की मायबाप आठवायचे. आणि आईचा दिलासा आठवला की, डोळ्यात पाणी आणि गळ्यात गाणी; अशी लेकीची गत व्हायची—

*तुझ्या मी जीवासाठी होईन गगनीची घार*
*काशी गौळण बया बोलं लक्ष पराण तुझ्यावर*

लेकी, तुझ्या जिवासाठी आभाळीची घार होईन, तुझ्यावरून माझे लक्षलक्ष प्राण कुरवंडून टाकीन, असे माय माझी म्हणाली होती.

आईबापांचे राज्य....गोकुळचे राज्य....तिथे चांदाला ऊब, सूर्यनारायणाला गारवा, कष्टांना मोती, दारात गंगा, आडात गुळवणी, गोठ्यात कामधेनू आणि ओटयात मोतीदाणे असायचे; असे आईबाचे राज्य माझ्या....!

*आईबापाचं म्हनू राज, राज....मनात सांगायाला*
*भर्ताराचं राज, राज निशीबी भोगायला*

*आईबाप संमरत हाथी बांधलं दारायात*
*लेकी लोकाच्या घरायात*

असे वैभवाचे माहेर....तरी ते आता आठवणी काढण्यापुरतेच. आईबाबा, तुम्ही लेकीला लोकाच्या घरी दिलीत....तुमच्या दारी हत्ती झुलत असले तरी आता आम्हाला काय त्यांचे ? आमच्या नशिबी भर्ताराचे राज्य तेच आमचं राज्य.... कधी काळी कष्टी मन तुमची आठवण काढील. तेवढाच दिलासा....तुमच्या प्रेमाची शिदोरी पदरी बांधून सासऱ्या आलो....हे तप आचरू....मन मारून हसू, रडू, पण कुळवंतांच्या लेकीचा आब राखू....तुमची आठवण होते हो !

सासरी लेकीच्या जिवाला कधी गोड नसले तर आई तिच्या भेटीला जाते. लेकीच्या सासरी गोतावळा मोठा आहे. पण आजारी लेकीची नजर आईच्या भेटीसाठी आसावलेली आहे. हा प्रसंग किती सजीव उभा केला आहे पहा—

*जितं परान माझा गेला आयाबायांनी भरला वाडा*
*काशी गौळण बयाबाई आली कोयाळ वाट सोडा*

कोयाळ म्हणजे कोकिळा. इथे आईला कोकिळा म्हणायचे कारण ?....सभोतालच्या कावळयांच्या गर्दीत माझ्या जिवाची कोकिळा एकटी माझी मायच, हीच भावना आहे.

कधी आई रागे भरते....वागणेसवरणे चुकले तर तिला आवडत नाही. लेकीला उपदेश करणे आईचे कर्तव्यच आणि कधीमधी लाडकी लेक ही चुकायचीच. बाळपण अल्लड असते. लग्ने लहानपणी व्हायची, मग कर्तेपणाचा पोच बाळपणी कुठला यायला? आई रागावली तरी उलट बोलायचे नाही. मुकाट आईचा राग सहन करायचा....लेक म्हणते—

*नऊ महिने वज्जं हुतो बयाच्या डाव्या कुशी*
*बया माझ्या गौळणीला तिला मागारी बोलू कशी*

अशी जरी आईबद्दलची आदराची भावना असली तरी लेकीची रुसायची जागा एकच....आई. आईपाशी रुसायचं, हट्ट करायचा, मागणं मागायचं.

*लुगड्याची घडी फाटली जाईवरी*
*माझा रुसवा आईवरी*

आईच्या आठवणी किती हो काढाव्या? वडलांच्या मायेची सय किती हो करावी? तशी सय करणं हेच लेकीच्या आऊक्षातला सुखाचा आणि धीराचा आधार.

*लंब नी लंब केस बया माझीनं वाडविलं*
*पिता माजिया दौलतीनं पाणी गंगेचं आडविलं*
*लंब नी लंब केस बया माजीच्या आवडीचं*
*पाणी बापाच्या कावडीचं*
*लंब नी लंब बाल कुरळ्या केसांचं झालं येल*
*माजी तू बयाबाई रूप नाजुक डोळं लाल*

लेकीचे लांब केस, तिच्या न्हाण्याला माझा बाप गंगेचं पाणी आडवतो. स्वतःच्या खांदी कावडी वाहून माझा बाप माझ्या न्हाण्याला पाणी आणतो. बाईचे लांब केस काळे कुळकुळीत आणि कुरळे, कुरळ गुंतून वेल झाले त्यांचे. आई तुझे कुरळ्या केसांनी शोभणारे रूप किती ग नाजूक दिसायचं आणि डोळे माणकांसारखे लाल....चमकदार....पाणीदार. आईच्या रूपाचे असे आगळे वर्णन ऐकून दंगच व्हावे!

*चाटयाच्या दुकानात शिंपीदादाची लंका लाल*
*बया माझी उभी पेठेला मखमल*

कापडाच्या दुकानात शिंप्याच्या दोरीवर नाना रंगांची कापडे दिसताहेत पण माझी आई जेव्हा पेठेने जाते तेव्हा नाना रंगांच्या दुकानांच्या ओळीत ती मखमलीच्या फरदासारखी वाऱ्यावर रुळत जाते जणू काही. जणू देवाची पताकाच. अशी नाजुक मखमली कांती, अशी रंगानं साजरी, अंगाने वेलीसारखी आणि चालायला रेशमाच्या लाटेसारखी....! लेकीची आई. जशी दिसायला सुंदर तशीच गुणांची गुणवतीही —

*दळण कांडताना नाही कुणा हार गेले*
*बया माझ्या गवळणीचे दुध वाघिणीचे पेले*

*थोरल्या जात्याची मी ग केली भिंगरटी*
*बया माझीचं दुध दुध फिरत मनगटी*

*दळण दाळिता चिंब भिजून पदर ओला*
*बया माझ्या गौळणीच्या आकडी दुधाला कड आला*

*बारीक दळणाची तिची भाकरी चऊघडी*
*बयाच्या जेवनाची याद होतीया घडोघडी*

घरकामाला ताठ होती आई. तिचे दूध प्यालेली लेक तशीच दणकट. ती घरकामाला डगमगणारी नव्हे. आईचे दूध, वाघिणीचे दूध....दळणाचा डोंगर रचताना कायेवर घाम निथळू लागला....पदर ओला झाला. पण म्हणून काय झाले....बयाने पाजलेल्या निरश्या दुधालाच हा कड आला. हा घाम नव्हे, ही दुधाची उकळी आहे !! कामसू आईची कामसू लेक आपल्या आईच्या शिकवणीला कसे नावाजते आहे पहा. अंगी असलेले बळ हे आईच्या मायेचे बळ आहे, तिच्या अन्नाचा पिंड कोठल्याही कणखर कामाला घाबरणार नाही. अशा कामसू सुनांचे संसार आईच्या शिकवण्याच्या बळावरच मोहरतात, फुलतात.

वडिलांबद्दलची भावना आईविषयींच्या भावनेपेक्षा आणखी निराळी आहे—

*पिता दौलत माझा बोलं लेकी देऊन तुला आलो*
*नाही जन्माचा धनी झालो*

वडील जन्म देणारे पण ते काही जन्माचे धनी नाहीत. कन्या ही दुसऱ्याचे धन. ते ज्याचे त्याला देऊन टाकीत. देवापितरांच्या उपकाराचे उतराई होणारे वडील. लेकीला सासरी धाडून पदर डोळ्याला लावतात; पण....पण पुरुष-माणसे काय आयाबायासारखी आसवं गाळीत राहतील? वडील काळजावर वजन ठेवतात कर्तव्याचे; अन् न ढाळता आसवे पितात....पण हे लेकीला माहीत आहे. वडिलांचे मन कसे हळुवार आहे याची पोरीला जाणीव आहे. त्यांच्या मोठेपणाचा तिला आदर आहे—

*गीता नी भागवत माझ्या गळ्याचं सोनं*
*पिताजी दौलईत मला शिकवी शाणपण*

गीता, भागवत हे बाळीच्या गळ्यातील सोनं आहे. धर्माने वागावे अशी ही पित्याची शिकवण आहे बाईला.

*काशी आणि काशी म्हणू मी काशी काशी*
*काशीला चौदा वेशी तीर्थ बापाच्या पायापाशी*

काशी काशी काशी! चौदा वेशींच्या त्या काशीचा आम्हांला तेगार कशाला सांगता? आमच्या बापाच्या पायापाशी साक्षात् तीर्थ आहे तीर्थ.

*थोरलं माझं घर आठ आकणी नऊ दारं*
*पिता माझा दौलईत सव्र्या गावाचा सावकार*

*आंबाडीच्या भाजीईला लागईतो पाची परकार*
*बापा माझ्याच्या राज्यावर आता नव्हता दरकार*

असा समर्थ पिता होता. त्याच्या राज्यात लेकींना कशाचाही दरकार नव्हता. पण म्हणून काही त्यांनी—दैवाने गरीबीचे सासर मिळाले म्हणून—मनी खंत खाल्ली नाही. वेळ आली, आणीबाणी गुदरली तर "बापाच्या नावासाठी ईख पिईन वाटी वाटी" अशी करारी काळजाची हिंमत आहे त्यांना.

वडलांसाठी जीव झुरझुरा होतो आहे. कारण आई देवाघरी गेली आहे. वडील एकटे आहेत....पार्वतीशिवाय परमेश्वर ! लेकीला स्वतःचा संसार साजरा करताना बापाची सय येते. बाप एकला आहे माझा. त्याला माझ्या आईची सय येत असेल. कुणाला न दिसता बाप आसवे गाळीत असेल. स्वतःच्या लेकीला अमृताचे ताट वाढणारी ही लेक बापाची आठवण येऊन जिवाभावाने गदगदून येते.

*"पाची पक्वानाचं ताट वर साखरा सखूताई*
*पित्या माझ्या दौलताला जेव म्हणाया माता नाही"*

माझा डोंगरासारखा बाप माझ्या आईशिवाय विचारा झाला हो....माझी माय देवाघरी गेली....माझा बा उघडा पडला....एवढा त्याचा मुलखावर दरारा, पण आता त्याच्याकडे मायेने कोण पाहाणार ? आम्ही लेकी दूर....त्याचे दुखले-खुपले तर कोण हो बघणार ?....

*ईश्वरपूजेला बेल वाहीला जोगईला*
*पिता माझ्या दौलतीचा प्रेम जगाच्या आगईळा*

अशा माझ्या वडलांच्या जेवणाची आबाळ होत असेल....आई गेली.... बापाची आनंदाची दुनिया ओसरली....माझे वडील कसे हौशी, प्रेमळ, मानी, त्यांच्या किती आठवणी काढू ?

*माझ्या चुड्याची गडन नाही कुनाला येनार*
*पित्याच्या पारखीचा इंद्रसभेचा सोनार....*

अशा इंद्रसभेच्या सोनाराला लेकीच्या बांगड्यासाठी कामाला लावणारा माझा बाप ! देवा....माइया वडलांना सुखी ठेव....माझ्या काळजाचे जोडे करून त्यांच्या पायी घातले तरी त्यांचे उपकार फिटणार नाहीत. त्यांनी मला चांगली जागा पाहून दिली. मी सुखी आहे....माझे सुख मला बोचत आहे. माझा बाप वनवासी शंकर....त्याची पार्वती देवबाप्पा तू आपल्या घरी नेलीस. आता तो कुणाच्या जिवावर जगणार ? आमच्या लेकींच्या ! पण आम्ही परक्याचे धन....

बापाच्या लेकी नव्हे. सासूसासऱ्यांच्या सुना. दोन हस्तक आणि तिसरे मस्तक टेकून देवा विनवणी करतो आमच्या बाला सुखी ठेव....सुखी ठेव.

असे मायेचे डोंगरासारखे आईबाप असल्यावर मुलींच्या सुखाला काय उणे? त्यांना मैत्रिणी नको, शेजारणी नको, नको देव, नको तीर्थ. त्यांना हवीत आई आणि बाबा.

*गुजनी बोलायास आज कशाला व्हावी शेजी*
*माझ्या गुजाला बया माझी*

*आई बाप असताना दुनव्या भरली दिसईती*
*मामा मावशीची अशी भंवतीनी खेडी किती*

*माजानि इवडा पिंड पिता माज्यानी पैदा केला*
*उपजाचा दिस बया काशीला जड गेला*

*माझ्या चुड्याचं सोनं पिवळ तारमीक*
*बाबा बयाच्या पारकीचं*

*गणगोत असूनी नाही कुणाची कारण*
*आईबापाच्या जिवावर माझ्या मनाची धारण*

अशी माता आसा पिता असताना कशाला हवीत तीर्थक्षेत्रे? आईबाप असले की—परक्यांची दुनिया, जनरीतीची पण जिव्हाळ्याने रिती असणारी दुनिया—भरलेली वाटते. गणगोताचा केवा कोणाला? कुणा कुणाचे कारण पडत नाही! आईवडलांच्या जिवावर आमची आयुष्याची दारोमदार असते. त्यांच्याशिवाय सारे शून्य. शून्य. हळव्या मनाच्या लेकी आईबापांशिवाय कावऱ्याबावऱ्या होतात. स्वतःच्या साजऱ्या संसारातही कुण्या कातरवेळेला आईवडिलांची आठवण येऊन त्यांच्या डोळा पाणी भरते. देव, तुळस, सासू, सासरा, नवरा आणि मुले यांच्यातून त्यांचे मन क्षणभर उडून जाते आणि जन्माला घालणाऱ्या आईवडिलांच्या पुण्यपायांना दंडवत घालून, आसवे पुसत पुसत आपल्या सासरी, घरी येते. परत येते.

त्या बालिकांचे संसार आईवडिलांच्या आशीर्वादाने फुलाफळाला येतात. पोरीच्या मुखावाटे आईच्या आठवणीची–काकुळतीची ओवी बाहेर पडते... तिला भास होतो...आईची आसवे स्वर्गातून अंगावर पडत आहेत. ती वावरी वर आभाळाकडे पहाते...शब्द ओठावर थरथरतात—

*"पहिली माझी ओवी, कशी कैलाशी ऐकू गेली*
*गडन राधाबाई, स्वर्गी गेलेली जागी झाली"*

"आई, माझ्या ओवीची हाक ऐकून तू कैलासात जागी झालीस ? आई, रागाऊ नको...मी तुझी लेक...तुझ्या आशीर्वादासाठी तळमळते आहे ग ? मला हे सासरचे सौभाग्याचे व्रत पार पाडण्यासाठी तुझे बळ दे....तू जसे माझ्या बाचे घर धन्य केलेस तसे मला हे घर तुलसीवृंदावन करायचे आहे. शक्ती दे, बुद्धी दे. आई, तुझ्या आशीर्वादामुळे मला दहा हत्तींचे बळ येईल."

लेकीला आईच्या भेटीचा साक्षात्कार होतो. ती मनोमन दंडवत घालते. आणि त्या धर्माच्या आशीर्वादाच्या बळावर पत्नीचे, मातेचे, गृहस्वामिनीचे कर्तव्य पार पाडण्यासाठी कमर बांधते, पदर कसते.

तिला स्वतःच्या संसारात आत्मविश्वास प्राप्त होतो. तिला आईसारखे यश येते.

*सडा सारवण चुली देव्हारा लखलख*
*माझ्या बयाची मी ग लेक*

*सादाला देते साद साद देणार चातुर*
*लेक बयाची पातर*

माझ्या आईसारखी मी संसाराला पात्र आहे. माझ्या आईने माझ्या वडिलांचा संसार धन्य केला तसा मीही माझ्या पतिदेवांचा करणार....मला माझ्या आई-वडिलांचे आशीर्वाद आहेत. माझ्या मातापित्यांचा बोल कधी खोटा होणार नाही. आभाळात माझ्या आईबांच्या प्राणांच्या ज्योती साक्षी आहेत. मला काही कमी पडायचे नाही....मी घरदाराचे नाव उजळीन आणि माझ्या आईवडिलांच्या

नावाला तीर्थरूप देईन....माझी आई भरल्या कुंकवाने देवाघरी गेली. मीही अहेवाचे लेणे लेऊन जन्मोजन्मी सवाशीणच मरणार—

*माझ्या चुडीयाला सोनीयाची किल्ली*
*जन्मोजन्मी सवाशीण देवाघरी म्या बोली केली.*

माझ्या हाती हा जो चुडा आहे तो आईने घातलेला आहे. त्या चुड्याला माझ्या वडिलांची धर्मशिकवणीची सोन्याची चावी आहे. मी देवाशी बोली केली आहे की मी जन्मजन्मांतरी सवाशीण राहीन, सवाशीण राहीन.

*मायबाप काशी बहिणा तुझी वाराणशी*
*बंधू तीर्थाला कुठं जाशी ?*

अरे भाऊ...कुठं चाललास तीर्थाला ? वेडा रे वेडा....अरे तुझी आई आणि तुझे वडील प्रत्यक्ष काशीविश्वेश्वर आणि तुझी बहीण वाराणशी....ही तीर्थे घरी असताना तू तीर्थाला निघाला आहेस. खुळ्या ? शास्त्राभ्यास नको, व्रते उपवास नको, तप नको, देहदंड नको, नको दगडाचे देव, नको जत्रा न् पीर....पापाचे मनात भय आणू नको, दुष्टाची भीती बाळगू नको....संसाराचा हा सुखदुःखाचा सागर भलेपणाने तरून आणि तुझ्या मुलामाणसांना तारून तुला पैलतीरी जायचे असेल तर आईबापांची सय ठेव आणि त्यांचे पाय आठव....त्यांचा आशीर्वाद तुझे भले करील, भलेच करील.

# तीर्थाचे दोन मंगल चरण

—श्री. ना. रा. शेंडे

समाजजीवनात परस्परांच्या नातेसंबंधांना आणि त्यामुळे वृद्धिंगत होत जाणाऱ्या हितसंबंधांना फार महत्त्व आहे. विशेषत: ग्रामीण जीवन जगत असताना निर्माण होणाऱ्या नात्यासंबंधाचे आणि हितसंबंधाचे जतन व संवर्धन करणे आवश्यक असते. त्यामुळेच कौटुंबिक जीवनाबरोबर शेजारधर्माला विशेष महत्त्व येत असते. शेजारधर्मामुळे प्रसंगी जी साथ अथवा जो दिलासा व आधार असतो तो परस्परांच्या कुटुंबांना जणू एकप्रकारे वरदान ठरतो. आणि म्हणून जिव्हाळ्याने शेजारधर्म पाळायचा असतो. यात विश्वास, पत, निष्ठा व सहकार्य यांची नितांत गरज असते. कुटुंबा कुटुंबातील आई-वडील हे या समाजजीवनातील प्रमुख घटक असतात. ते आपले हितसंबंध निर्माण करून, त्यांच्या कल्याणकारी अभिवृद्धीसाठी झटत असतात. कौटुंबिक अथवा प्रापंचिक जीवनात आई-वडिलांचे स्थान, श्रेष्ठत्व आणि त्यांनी निर्माण केलेले हितसंबंध व शेजारधर्म यांचा लोकसाहित्यात उच्च व उदात्त आविष्कार घडविण्यात आला आहे.

आई-वडिलांनी निर्माण केलेल्या शेजारधर्माच्या हितसंबंधांचा हा एक दाखला पाहा:

*निंबाजी बाबाचं शेजारी झाड मोठं*
*घरावर सावली दाटदूट*

*शेजारच्या झाडाले लदवदली फुलं*
*आमचं आंगणं भरलं*
*शेजारची वाडी उभी वाडीले लागून*
*बाप पाहे कवतुकानं*
*शेजारची लेक ठेच लागून पडली*
*माह्या मातेनं कवटारली*
*शेजारची आंबिल वाडीतून आली*
*मातेनं दूधवाटी देली*
*रातीचं जेवण शेजारची हाक देते*
*बाप जेवाया बलावते*

शेजारची ती दोन घरे. एकाच्या अंगणात मोठा वृक्ष. पण त्याची शीतल छाया दुसऱ्याच्या घरावर पडलेली. एकाच्या परिसरातील वृक्ष फुलांनी बहरून आला. पण त्या फुलांचा सडा मात्र दुसऱ्याच्या अंगणात पडला. एकाची वाडी (कुंपण) दुसऱ्याच्या वाडीला लागून आहे — ती दोन्ही घरांना एक आहे आणि त्या दोन्ही घरांचे स्वामी अभिमानाने ती पाहात आहेत. शेजारची एक मुलगी ठेचाळून खाली पडली हे पहाताच, घराशेजारची आई धाव घेऊन त्या मुलीला ममतेने कुरवाळते. शेजारच्या एकाने वाडीला असलेल्या एकाच फाटकातून दुसऱ्याला आंबिल दिली म्हणून परत फेड करताना दुधाची वाटी देण्यात आली. रात्रीच्या जेवणाच्या वेळेला शेजारी अशावेळी एकमेकाला जेवण झालं का म्हणून हाक देऊन विचारतात व परस्परांना जेवायला बोलावतात. शेजारधर्मातील व कौटुंबिक जीवनातील हा परस्पर सद्भाव, ही एकात्मता आणि माणुसकी आजही किती प्रेरक व बोधक आहे; नव्हे तिची आज तर नितांत गरज आहे. त्यातच केवळ समाजजीवनच नाही तर राष्ट्रीय जीवन अधिक तेजोमय व प्रभावी होणारे आहे.

काही महत्त्वाच्या कामासाठी आई–वडील परगावी गेले आहेत. वडिल-धाऱ्यापैकी घरात कोणीच नाही. अशा वेळी शेजाऱ्यांना विनविण्यात येते—

*शेजारीणबाई माय-बाप गेले दूर*
*नजर ठेवा घरावर*

*शेजारीणबाई घरीदारी कोणी नाही*
*माये तुहीच भलाई*
*शेजारच्या दादा तुह्या अंगणात मोट*
*पाणी देतो एक घोट*
*शेजारच्या बाबा बाप आला नाही घरा*
*आता तुहाच आसरा*

आम्हांला कोणी दिलासा दिला व मदत केली तर आम्ही कोणाच्या ऋणात रहाणार नाही. आमचे आई-वडील त्या ऋणातून भरपाई देऊन मुक्त होतील. ते मोठे गुणी व परोपकारी आहेत. कोणी चोळी-फडके देईल तर आमचा बाप शेलापागोटे देऊन सन्मान करील. कोणी चटणी-भाकरी दिली तर आमची आई पुरून उरेल इतकी तूप-रोटी देईल. आमचे आई-वडील कोणाचे लेणे-देणे ठेवीत नाहीत. कोणाचे देणे ते रांजण भरून भरून देतील. दुसऱ्याची आसवे आपल्या पदराने पुसून काढतील. दुसऱ्याला आनंदच देतील. प्रसंग पडला तर ते जिवाला जीवसुद्धा देतील. आई-वडिलासंबंधाने इतकी प्रबल निष्ठा, निस्सीम विश्वास आणि भक्ती मोठ्या अभिमानाने व्यक्त करण्यात येत असते—

*येईल माहा बाप शेलापागोटं घेऊन*
*अगा राखियेला मान*
*येईल माही माय तूप-रोटी घेऊन*
*देईल ताटली भरून*
*मायबाप गुणवंत कोणाचं न लेणं-देणं*
*भरून देतीन रांजणानं*
*दिलार मायबाप आसू आसूनं पुसती*
*जीवाला जीव देती*

भारतीय मनुष्यधर्म, संस्कृती आणि नीती यांचे सत्प्रेरक दर्शन घडविणारी अशी अनेक गीते लोकसाहित्यात ठायी ठायी आढळतील.

ग्रामकन्या नव्हे ग्रामदेवता आपल्या वडिलांच्या वैभवाचं, त्याच्या दातृत्वाचं आणि विशाल हृदयाचं अत्यंत मनोज्ञ चित्र रेखाटून, आपली असीम

श्रद्धा व्यक्त करते. आपल्या बापाचे घर चंद्रमौळी असले तरी तिला ते सोन्याचे वाटते. बाप साधे जीर्ण धोतर नेसत असला; तुटक्या चपला वापरत असला तरी ते धोतर तिला उंची रेशमीकाठाचे धोतर तो नेसला आहे, सुंदर व चकाकी असलेल्या चपला तो वापरीत आहे असे तिला वाटते. त्याच्या अंगावर फाटका सदरा असला व डोक्याला त्याने ठिगळे लावलेला फेटा (पागोटे, पगडी) गुंडाळलेला असला तरी तिला त्याने अंगावर मखमली व जरीच्या वेलबुट्टींनी सजलेला अंगरखा घातला आहे व किमती फेटा गुंडाळला असल्याचे वाटते. त्याच्या बोटात तांब्याच्या तारेची अंगठी असली व हाती लाकडी तुटका नांगर असला तरी तिला बापाच्या पाचही बोटात हिऱ्याच्या अंगठ्या आहेत व हाती सोन्याचा नांगर आहे, असेच वाटते. तिला आपल्या बापाचे शेत माणिक-मोत्यांनी फुलून डौलाने डुलत आहे आणि आपला बाप एवढा दातृत्वशील आहे की तो कमावलेले धन कोंडून ठेवीत नाही, लपवून ठेवीत नाही तर धन-धान्याचे संपूर्ण कोठार लोकांच्या साठी खुले ठेवतो व ज्याला जितके हवे तितके दान तो मुक्तहस्ते देत असतो, असे वाटते. आपला बाप विशाल व उदात्त अंत:करणाचा आहे, त्याच्या हृदयातून जनकल्याणार्थ गंगेचा पावन प्रवाह सदैव वाहात असतो; तो धर्मराजाचाच अवतार आहे, या अभिमानाने तिचे मन हरखून जाते !

*माझ्या बापाजीचं सोनियाचं घरदार*
*आयटीनं हिंडे बाप माझा रुबाबदार*

*माझ्या बापाजीचं रेशमी करवती धोतर*
*अंगावर झलारते अंगरख्याची बुटी जर*

*डोक्यावर साजे रंगीत फेटा तुर्रेदार*
*पायात् वहाणा चमकिल्या खुबीदार*

*पाचाही बोटांमंधी लागे हिऱ्याची कतार*
*हाती धरियेला सोनयाचा नांगर*

*माणकं-मोत्यानं सजते, डुलते बापाचं वावर*
*दान वाटते, खुलं ठेवते बाप धनाचं कोठार*

*बापाजीच्या हुर्यांतून वाहे पिर्‌तीची धार*
*माहा बाप राजा धर्‌माचा अवतार*

वडिलांसंबंधी ध्वनित झालेली, शब्दांकित केलेली केवढी महती, केवढी थोरवी ! तेवढीच श्रद्धा आणि निष्ठा आईसंबंधी प्रकर्षाने दर्शविली जाते.

आई मोठी गुणवान आहे. तिने उंची शालू परिधान केला आहे; आणि सोन्याच्या गोटपाटल्या घातल्या आहेत. ती मोठी प्रेमळ व मायाळू आहे. तिने बुट्टे-दार सुंदर चोळी घातली आहे आणि सत्वाचा, भाग्याचा कुंकवाचा टिळा लावला आहे. ती मोठी भाग्यशाली आहे. तिने पतीच्या पूजेसाठी चौरंगपाट मांडला आहे आणि पूजेचा थाटमाट केला आहे. ती मोठी दयावंत आहे. सेवा करायला ती देवघरात बसली की तिची ती मनोमय सेवा पाहून अंगणातील वृंदावनाजवळ प्रत्यक्ष लक्ष्मी उभी रहाते आणि कौतुकानं हासू लागते. आई मोठी देवभक्त आहे. ती जेव्हा तीर्थाला जायला निघते तेव्हा विठ्ठल-रुक्मिणी तिच्या घरी येतात. ती मोठी पुण्यवान आहे. ती अंगचा पदर कधी ढळू देत नाही. ती आपला पदर नीट सावरून घराण्याची अब्रू, प्रतिष्ठा राखते.

*माय माही गुणवंती नेसली हिरवा जोट*
*घातल्या पाटल्या-गोट*
*माय माही मायावंती बुट्टेदार घाले चोळी*
*लावे सत्वाची टिकली*
*माय माही भागवंती मांडला चौरंगपाट*
*पूजापातीचा केला थाट*
*माय माही दयावंती देवघरात बसली*
*बिन्द्रावनी लक्षुमी हासली*
*माय माही भगतीण तीरथाले निघाली*
*इठ्ठल-रखमाई घरा आली*
*माय माही पुणवंती पदर देहीचा सावरते*
*लाज कुळाची राखते*

अहो, माझ्या आईच्या मोठेपणासंबंधी, थोरवीसंबंधी आणखी काय सांगू?

आई रात्रंदिवस कष्ट करून कामधंदा करते. कोणाला कसलाही त्रास देत नाही, कष्ट करू देत नाही. ती स्वतःच राबत जाते. ती कधी कधी स्वतः उपाशी राहाते पण मुलाबाळांना ममतेने आंजारून गोंजारून जेऊ घालते. धन्य आहे ती! ती गोड खिरीने पाने भरते आणि रोज वाण वाटत असते. आई अगदी पहाटेला उठून जेव्हा सडा-सारवण करते तेव्हा शुचित्वपूर्ण व मंगलमय वातावरण पाहून अंगणातील वृंदावन कसे नाचू लागते! आईची कीर्ती, थोरवी चारही दिशांकडे पसरली आहे. आमच्या देवघरात तिच्या पुण्याईची, सत्वाची दिव्य ज्योत अखंड तेवत असते!

*राबून रातदिस माय कामधंदा करे*
*पोरांच्या तोंडी घास भरे*
*पहाटच्या अम्मली माय करी सडा-सारवण*
*अंगणी नाचे बिन्द्राबन*
*माह्या न् मायेनं खिरीनं भरले पान*
*वाटते रोज वाण*
*माह्या मायेची कीर्ती चारी भुवन्या फिरते*
*वात सत्वाची जळते*

अशी गुणी व सत्वशील आई स्वर्गस्थ झाली तर, आईचे जे महत्त्व व थोरत्व होते त्याची तीव्र जाणीव होते. मनावर फार मोठा आघात होतो. मुलीचा आत्मा मातेच्या विरहाने पिळवटून निघतो. तिला वाटते, आपली आई आपल्याला टाकून गेली. आपण तिचे ऐकले नाही, कामधंदा नीट केला नाही, आपण तिच्याशी भांडत होतो; आणि म्हणून आपल्यावर रागावून ती निघून गेली. आईच्या आठवणीने ती कमालीची खिन्न होते, दुःखी होते आणि कळवळून म्हणते—

*सांगा वो मायांनो, सांगा ना बायांनो*
*माही माय कोण्या गावा*
*माह्या जीवाचा इसावा*
*आहे बसली कोण्या देवा ?*
*काहून रुसली माही माय, म्हून का छपवली गाय*
*कोठी जाऊ कोठी पाहू*

*कोण्या आसऱ्याले राहू*
*बापा माय कशी धुंडू ?*
*रानाच्या रानदेवी, चांदाच्या चांददेवी*
*गावच्या मायबाई*
*पंढरीचे रूखमाई*
*भेटवा माय माही !*
*आता नाई मी फुगीन, नाई खेलाया जाईन*
*कामधंदा मी करीन*
*माहा देह मी देईन*
*माय चरण मी पूजीन*

मुलीने आपला कसूर जमेस धरून भांबावलेल्या स्थितीत करुणा भाकली आहे. किती हृदयद्रावक व उदात्त चित्र या गीतात दर्शविले आहे! 'माझा देह मी देऊन आईची सेवा करीन', पण 'माझी आई मला भेटवा' हे उद्गार अंतःकरणाचा कसा ठाव घेतात!

सासूच्या जाचामुळे सासुरवाशीण मुलीला आईचे विशेष स्मरण होते. तिचे दुःखीकष्टी मन आईच्या भेटीसाठी आतुर होते. कितीही जाच झाला, त्रास झाला तरी आईला भेटीनच असा ती निर्धार करते.

*तुह्या जीवासाठी घार गंगनाची व्हईन*
*पर पक्ष्याचे लावून तुह्या भेटीले येईन*
*तुह्या जीवासाठी गंगनाची व्हईन नील*
*लागन उनवारा माह्या सावलीनं चाल*
*तुह्या जीवासाठी व्हईन जंगलाची चिमणी*
*मायाच्या मयात तू वाग मी निंबोणी*
*तुह्या जीवासाठी व्हईन जंगलचं पारव*
*मायाच्या मयात तू मळा मी बारव*
*तुह्या जीवासाठी देईन मी वू जान*
*खाली तुहं शीर, वरती माही मान !*

माहेरी असताना आईने आपल्याला किती ममतेने, किती जिव्हाळ्याने वागविले, आपली किती काळजी वाहून सुख दिले याची आठवण होऊन तिचे हृदय भरून येते!

*माय तुह्या घरी राज केल्लं लेकावानी*
*तांब्याभर पाणी व्हतं व् पित्याची अंगणी*

*माय तुह्या घरी राहून राज केल्लं*
*तांब्याभर पाणी तुह्या हातीं नाई देल्लं*

*माय तुह्या घरी राज केल्लं रावणाचं*
*नाई उचललं ताट व् तुह्या जेवणाचं*

*मायबाई तुह्या घरी धंदा नाई केल्ला*
*रांजणाचं पाणी वापरता माय शिण गेला*

सासुरवाशीण मुलीच्या मनात काहूर उठते. तिची द्विधा मनःस्थिती होते. आपल्या आईबापाने भेटायला यावे अशी तिची अपेक्षा असते. माहेरची माणसे भेटायला आली नाहीत की ती मनातल्या मनात त्यांना बोल देते. पण लगेच आईबापांच्या प्रेमळपणाची, चांगुलपणाची आठवण येऊन ती गहिवरते. ती कृतज्ञता व्यक्त करते.

*वाट पाहू पाहू डोये झाले कुकावानी*
*येव्हळी तुही मया काहून झाले लोकावानी*

*निंबाच्या निंबोया निंबाखाली पसरती*
*भांडाले झाल्या लेकी, पोरीले इसरती*

*माय तुही मया घरच्या दारा लोक*
*बापाजीची मया आली डोंगर चिरत*

आईचे उपकार तर कसेबसे फेडता येतील, पण बापाचे उपकार मात्र कधीच फेडता येणार नाहीत याची जाणीव होऊन, ती उद्गारते—

*मायेचा उपकार फेळीन चोईडोई*
*पित्याचा उपकार किती वझं झालं बाई*

मायेच उसव फेळीन आल्या गेल्या
पित्याचा उसव फिटे न काई केल्या

आणि मग ती आईबापाची मुक्तकंठाने महती गाते—

बापाजी राजा माह्या काशीतला वड
माही मायबाई पाणी तिरगुणीचं गोड
बापाजी राजा आमराईचा रस पाड
माही मायबाई खिरणी मोट्ठी गोड
बाप माहा चाफा, माय माही चक्रशेला
आठवू नाई देल्ला उन्हया कसा गेला
बाप माहा चाफा माय करवंद
केईचं पान रुंद सावली कळीबंद

आईची तीव्रतेने आठवण होऊन, मुलगी हुंदका देत आळवते—

तुह्या उद्री देला जल्म जल्म देऊन केलीस सोनं
केली जीवाची राखण अवो माहे वो मायेऽऽ
नाई सांगतला धंदा केला हाताचा तू रांधा
खुला ठेवलास हंडा अवो माहे वो मायेऽऽ
माही पाहोन वो आस देलीस तोंडातला घास
केला दो दिसाचा उपास अवो माहे वो मायेऽऽ
जंगल पहाळी हिंडुन आणलीस इंधन कुंधन
केलीस रातीचं जागरण अवो माहे वो मायेऽऽ
माहे पाहून हातपाय ळळत व्हतीस मनात
निंजलीस घवून कुशीत अवो माहे वो मायेऽऽ

कन्या आपल्या आईबापासंबंधी असीम निष्ठा व भक्ती व्यक्त करते. ती आपल्या आईबापाला देव्हाऱ्यावरील दोन पूजनीय देव मानते. त्यांना विनम्रतेने, श्रद्धेने प्रणाम करण्यासाठी तिचे दोन्ही हात जुळतात—

मायबाप देव्हाऱ्यातले देव दोन
पूंजते तीरथाचे चरण !

# कोकण्यांची लोकगीते

लेखक : श्री. के. जे. सावे, एम. ए., एल्‌एल्‌. बी.

नाशिक जिल्ह्यात पेठ नावाचा डोंगराळ महाल आहे. जिल्ह्याचा मुख्य भाग घाटमाथ्यावर व पेठ भाग खाली आहे. जिल्ह्यातील लोक पेठेला तळ कोकण म्हणतात व तेथे राहणाऱ्या लोकास कोकणे म्हणतात. कोकण्यांची वस्ती ठाणे जिल्ह्यात व नगरहवेली भागात सह्याद्रीच्या पश्चिम पठारातही आहे. कोकणे हे आदिवासी आहेत. शेती व मजुरी करून ते आपला निर्वाह करतात. हे लोक फार गरीब व अशिक्षित आहेत. परंतु स्वभावाने ते गोड, प्रेमळ व आतिथ्यशील आहेत. इतर आदिवासीप्रमाणेच कोकण्यातही धार्मिक व सामाजिक चालीरीती मोठ्या आस्थेने पाळल्या जातात. लग्न हा कोकण्यातील मोठ्या आनंदाचा व महत्त्वाचा प्रसंग. पाट मोतूर कितीही केले तरी लग्नाची हळद जन्मात एकदाच लागते. तेव्हा लग्नाचे सर्व विधि काळजीपूर्वक झाले पाहिजेत असा त्यांचा कटाक्ष असतो. लग्नसमारंभ म्हणजे बायकामुलास करमणूकीची रेलचेल. त्यात गाण्याचा सुकाळ. कोकणी बायका गाणी फार गोड म्हणतात. परंतु परक्या माणसासमोर गाणी बोलताना त्या फार लाजतात, व एरवी गाणी म्हणण्यास त्या फारशा तयार नसतात. एके ठिकाणी तर घराच्या कुडाच्या भिंतीच्या एका बाजूस गाणी म्हणणाऱ्या बायका व दुसऱ्या बाजूस मी असा आमचा गाणी ऐकण्याचा

समारंभ चालला होता. न समजणाऱ्या शब्दांचा अर्थ सांगण्यास एक कोकणा माझ्या शेजारी बसला होता हे सुदैव.

लग्नप्रसंगी निरनिराळी गाणी म्हटली जातात. काही लग्नविषयक असतात तर काही सामान्य स्वरूपाची असतात.

प्रथम दोघींनी गाण्याचे कडवे म्हणावयाचे व मग दुसऱ्यांनी ते 'झेलून' घ्यावयाचे अशी गाणी म्हणण्याची पद्धती असते. या गीतात काही अभंगा-सारखे प्रकार असतात. हे अभंग कोकणी मुली साध्या चालीत फार मंजूळ म्हणतात. खाली दिलेल्या अभंगात घरी आलेल्या योग्याचे आतिथ्य केल्याबद्दल आपल्या सुनेचा सासू संशय घेते. बायकांचा संशयी स्वभाव किती मजेदार रीतीने या अभंगात दाखविला आहे तो पाहा—

*घाटावरून आला जोगी । घाटावरून आला जोगी*
*उतरीला सीता दारी । उतरीला सीता दारी*
*"घाल सीता मला भिक्षा । घाल सीता मला भिक्षा"*
*"काय घालू तुला भिक्षा । काय घालू तुला भिक्षा"*
*"का ग सासू नाही घरी । का ग सासू नाही घरी"*
*"गेली कळोल्या बाजारी । गेली कळोल्या बाजारी"*
*मोठ्या तांदळाची केजी[१] । मोठ्या तांदळाची केजी*
*घेतल्या मेथयाच्य भाज्या । घेतल्या मेथयाच्या भाज्या*
*सासू आली घरा आली । सासू आली घरा आली*
*आणी सून झारी पाणी । आणी सून झारी पाणी*
*"घेवो आत्या[२] तुमी पाणी । घेवो आत्या तुमी पाणी"*
*"नाय घेत तुझे पाणी । नाय घेत तुझे पाणी"*
*"तू त जोगयाची राणी । तू त जोगयाची राणी"*
*"नको घेऊ तोंडी पाप । नको घेऊ तोंडी पाप"*
*"जोगी माझा माईबाप । जोगी माझा माईबाप" ॥ १ ॥*

---

१ पेज. २ सून सासूला आत्या म्हणते यावरून या जातीत मामाची मुलगी करण्याचा प्रघात आहे हे दिसते.

किती सुंदर व साधा अभंग आहे हा! पाणी घेण्याचे नाकारून सासू 'जोगयाची राणी' म्हणून सुनेला बोल लावते. त्याचे किती. समर्पक उत्तर सून देते!

पुढील अभंगात मीराबाईच्या विषप्राशनाचे वर्णन आहे—

*संतापुढे का ग उभी। संतापुढे का ग उभी*
*संत परमेसाचा घर। संत परमेसाचा घर*
*बाप म्हणे मारा हीला। बाप म्हणे मारा हीला*
*पाजा ईख पेला हीला। पाजा ईख पेला हीला*
*पाजा ईख मीराबाई। पाजा ईख मीराबाई*
*मीराबाईचा अभंग। मीराबाईचा अभंग*
*सुख लोळे चरणावरी। सुख लोळे चरणावरी*

'संत परमेशाचे घर'! किती उच्च कल्पना आहे ही! पुढील गीतात एक कोकणवासी पंढरीच्या वाटेवर कसकशी सेवा करील याचे वर्णन आहे—

*पंढरीच्या वाटे होइन मी रांजणी।*
*येतील साधूसंत। पाणी पेतील ओतुनी*
*पेतील ग बाई। पाणी पेतील ओतुनी ॥*

*पंढरीच्या वाटे होईन मी बाभूळ।*
*येतील साधूसंत। वर झोकीती तांदूळ*
*तांदूळ ग बाई। वर झोकीती तांदूळ ॥*

*पंढरीच्या वाटे होइन मी तुळस।*
*येतील साधूसंत। पाणी घालिती मंजूळ*
*मंजुळ ग बाई। पाणी घालिती मंजूळ ॥ ३ ॥*

पाणी ते कसे मंजूळ असणार? परंतु आदिवासींच्या कल्पनेप्रमाणे बोलण्याप्रमाणे पाणीही मंजूळ असावे!

खालील गीतात नुकतेच लग्न होऊन दूरदेशी गेलेल्या आपल्या मुलीची आठवण काढून आई दुःख करते :—

*दारि कसांडी[१] भरली । दारि कसांडी भरली*
*माझी एखळी कार[२] र । देवा एखळी कार र*
*गेली दुरल्या देशी र । देवा दुरल्या देशी र*
*माझी वसरी[३] सूनी र । देवा वसरी सूनी र*
*माझी भानोशी[४] सूनी र । देवा भानोशी सूनी र*
*माझा वटाही सूना र । देवा वटाही सूना र*

आईला आपल्या लग्न झालेल्या मुलीबद्दल नेहमी हळहळ वाटत असते. याला आदिवासी आयाही अपवाद नाहीत—

मुलीचे लग्न काढले. तिला लग्नात पेहेरण्यास दागिने पाहिजेत. ते आणण्यास मोठ्या शहरात घेऊन जाण्यास ती खालील गीतात सांगते :—

*काळ्या वावराचा[५] । वावराचा जांभळा पाणी गे*
*माला दावा व । दावा व नासीक शहर गे*
*माला घीयाला । घीयाला दंडीच्या वेळा[६] गे*
*काळ्या वावराचा । वावराचा जांभळा पाणी गे*
*माला दावा व । दावा व मुंबय शहर गे*
*माला घीयाला । घीयाला नाकीची नथ गे*

इतर शहरांची व दागिन्यांची नावे घालून हे गीत आणखी लांबवितात.

लग्नाच्या आधी गावच्या पाटलाचा, शिपायाचा वगैरे मान करावा लागतो. त्याचे वर्णन खालील गीतात आहे :—

*ताटी भरला इडा ।*
*दिला कोणया हाती र । दिला कोणया हाती*

---

१ पाण्याची तपेली. २ मुलगी. ३ ओसरी. ४ चुलीजवळील जागा. ५ शेत. ६ दंडात घालण्याचा चांदीचा दागिना.

दिला पाटला हाती र । दिला पाटला हाती
पाटील मांडवी या र । पाटील मांडवी या
मांडव सोबीत[1] दिस र । मांडव सोबीत दिस
ताटी भरला इडा ।
दिला कोणया हाती र । दिला कोणया हाती
दिला शिपाया हाती र । दिला शिपाया हाती
शिपाय मांडवी येवा र । शिपाय मांडवी येवा
मांडव सोबीत दिस र । मांडव सोबीत दिस

पाटील, कुळकर्णी यास आपल्या कुटुंबपरिवारासह लग्नास येण्याचे निमंत्रण खालील गीतात आहे :—

आरशाला डबा जोडु जोडू र । लाल मोत्या जोडू र
पाटलावर चिठी धाडु धाडू र । लाल मोत्या धाडू र
पाटला तुझ्या राण्या येति येती र । लाल मोत्या येती र
सायबावर चिठी धाडु धाडू र । लाल मोत्या धाडू र
सायबा तुझ्या राण्या येति येती र । लाल मोत्या येती र
कुळकर्ण्यावर चिठी धाडु धाडू र । लाल मोत्या धाडू र
कुळकर्णी तुझ्या राण्या येति येती र । लाल मोत्या येती र

लग्नाला लागणाऱ्या हळद, कुंकू, खोबरे वगैरे वस्तूंचे करंड व गोणी भरून आल्या आहेत असे वर्णन खालील गीतात आहे :—

भरल करंड उलंडत जाई ग
करंड म्हणीतो एखला कसा जाउ र
माग येतील हळदीच्या गोणी र
भरल करंड उलंडत जाई ग

---

१ शोभिवंत.

करंड म्हणीतो एखला कसा जाउ र
माग येतील कुंकवाच्या गोणी र
भरल करंड उळंलत जाई ग
करंड म्हणीतो एखला कसा जाऊ र
माग येतील खोबऱ्याच्या गोणी र

अशीच कल्पना खालील गीतात काव्यमय रीतीने सांगितली आहे :—

माझ्या दारीचं सात रंगी फुल ग
राती माला सपनु दिसलं ग
राती गाड्या पातळाच्या आल्या ग
येसोदे तुझ्या अहिवाच्या[1] आल्या ग
माझ्या दारीच सात रंगी फुल ग
राती माला सपनु दिसलं ग
राती गाड्या हळदीच्या आल्या ग
यसोदे तुझ्या अहिवाच्या आल्या ग
माझ्या दारीचं सार रंगी फुल ग
राती माला सपनु दिसलं ग
राती गाड्या खोबऱ्याच्या आल्या ग
यसोदे तुझ्या अहिवाच्या आल्या ग

दागिने आले. परंतु नवरी मुलगी रुसून बसली. तिची समजूत खालील गीतात केली आहे :—

राधा रागेली रुसेली । समदीराच्या हारी ग
तोंड पडल खिडकीत । घाल ग राधे पायात
तुझे पायाची शपथ

१ अहेव—सौभाग्य.

*राधा रागेली रुसेली । समदीराच्या हारी ग*
*वेळा पडल्या खिडकीत । घाल ग दंडात*
*तुझे दंडाची शपथ*
*गाठल पडल खिडकीत । घाल ग राधे गळ्यात*
*तुझे गळ्याची शपथ*
*नथ पडली खिडकीत । घाल ग राधे नाकात*
*तुझे नाकाची शपथ*

सुधारलेले लोक गळ्याची, फार झाले तर रक्ताची शपथ घेतील. पण आदिवासी आपल्या कोणत्याही अवयवावरून शपथ घेतात!

लग्नातील वऱ्हाडाची (व्याह्यांची) थट्टा करण्याकरता खालील गीत म्हटले जाते. व्याह्यांची थट्टा हा कोणत्याही लग्नातील एक नित्याचा प्रकार आहे :—

*चला पाहु ती गाडी वो कशी । गाडी वो कशी ती*
*गाडी वो कशी*
*गाडी वो पाहिलीत भवरा जसा । भवरा जसा तो*
*भवरा जसा*
*चला पाहु ते बैल वो कसे । बैल वो कसे ते*
*बैल वो कसे*
*बैल पाहलत नंदी वो जसे । नंदी वो जसे ते*
*नंदी वो जसे*
*मला पाहू त्या शिवळा कशा । शिवळा कशा त्या*
*शिवळा कशा*
*शिवळा पाहल्या त्या रंगीत जशा । रंगीत जशा त्या*
*रंगीत जशा*
*चला पाहु ते वराडी कसे । वराडी कसे ते*
*वराडी कसे*

*खांद्यावर टेमक मांग व जसे । मांग व जसे ते*
*मांग व जसे*
*चला पाहु त्या वराडणी कशा । वराडणी कशा त्या*
*वराडणी कशा*
*चुल्याशी बसल्या घुबडी जशा । घुबडी जशा त्या*
*घुबडी जशा*

वऱ्हाड्यांची संबोधना मांग म्हणून व वऱ्हाडणींची घुबड म्हणून केल्यानंतर आणखी त्यांचे स्वागत करावयाचे ते काय राहिले? वधूपक्षाची सरशी व वरपक्षाची फजिती असा अपूर्व संगम या गीताच्या वेळेस पाहावयास मिळतो.

वऱ्हाड्यांची फजिती आणखी एका खालील गीतात केली आहे :—

*खळखळ जांभळी हिलवल्या आमी हिलवल्या*
*नवऱ्याचं वराडी दमवलं आमी दमवलं*
*कोंबड्याचं कोंदड निजवलं आमी निजवलं*
*कोंबड्याचं कोलकट उडवलं आमी उडवलं*
*खळखळ जांभळी हिलवल्या आमी हिलवल्या*
*नवरीच्या वराडणी दमवल्या आमी दमवल्या*
*बोकड्याच्या गोडणी निजवल्या आमी निजवल्या*
*बोकड्याचा वेंबाट उडवला आमी उडवला*

एका पक्षाने वऱ्हाडी लपवून त्यांच्या कोंबड्या उडविल्या तर दुसऱ्या पक्षाने वऱ्हाडणी लपवून त्यांचे बोकड निजवून उट्टे काढले!

आपल्या भावी पत्नीबद्दल थट्टा केलेली कोणत्या तरुण मुलाला आवडणार नाही? बायको कशी हवी याबद्दल खालील गीतात नवऱ्या मुलाला विचारले आहे :—

*राईबाई राईबाई । तुझ्या गजऱ्याचा मोल काई*
*तुझ्या गजऱ्याचा मोल काई ।*

*गजऱ्याचा सवा रुपया। तुला दोन आन्याला देउ कशी*
*तुला दोन आन्याला देउ कशी*

*अभर[1] फोडून पथर फोडून। रस्ता बांधला आपल्या राजाचा*
*रस्ता बांधला आपल्या राजाचा*

*गाडी या मोटारी या। गाडी या माझ्या मैत्राची*
*मोटारी या माझ्या मैत्राची*

*अभर फोडून पथर फोडून। सायकल आली माझ्या मैत्राची*
*मोटार आली माझ्या मैत्राची*

*रावजीभाउ रावजीभाउ। सांगा माला तुला काय पाहिजे*
*सांगा माला तुला काय पाहिजे*

*पाटीलभाउ पाटीलभाउ। सांगा माला तुला काय पाहिजे*
*सांगा माला तुला काय पाहिजे*

*आजा नको बाजा नको। बारीकशी नवरी पाहिजे*
*लहानशी नवरी पाहिजे*

अशाच तऱ्हेचे गीत सोनकोळ्यात व वारल्यात देखील प्रचलित आहे.

आकाश-पथर (पाताळ) फोडून रस्ता करून त्यावर रावजीभाऊकरता गाडी, सायकल, मोटार आणल्या. पण त्याचे समाधान झाले नाही. त्याला लहानशी नवरी पाहिजे होती.

आणि मुलीला तरी कसला नवरा पाहिजे? आदिवासी कोकणा? छे. पाहा तरी ती काय म्हणते :

*कारवे निंबीगेळू बये ग। कारवे निंबीगेळू ॥*
*शिपाई नवरा नको बये ग। शिपाई नवरा नको*
*बुटानी मार देतो बये ग। बुटानी मार देतो*

१. आकाश.

मुसळ्या नवरा नको बये ग । मुसळ्या नवरा नको
चाहूऱ्या[1] मार देतो बये ग । चाहूऱ्या मार देतो
पारशी नवरा नको बये ग । पारशी नवरा नको
शेरानी[2] मार देतो बये ग । शेरानी मार देतो
वारली नवरा नको बये ग । वारली नवरा नको
काठीने मार देतो बये ग । काठीने मार देतो
कुळंबी नवरा नको बये ग । कुळंबी नवरा नको
जोड्यानी मार देतो बये ग । जोड्यानी मार देतो
चारणी[3] नवरा नको बये ग । चारणी नवरा नको
पथारी मार देतो बये ग । पथारी मार देतो
सायबी नवरा माला बरा ग । सायबी नवरा बरा
दुनीला[4] फेरा देतो बये ग । दुनीला फेरा देतो

अशाच तऱ्हेचे लोकगीत क-ठाकूर या जमातीतही आहे—

कारव्या लिंब्या गलां बये । गेलां बये व कारव्या लिंब्या
ठाकूर नवरा नको बये । नको बये व ठाकूर नवरा
टेमकयानी मारू देतो बये । देतो बये व टेमकयानी मारू
वारली नवरा नको बये । नको बये व वारली नवरा
छडीनी मारू देतो बये । देतो बये छडीनी मारू
कुळबी नवरा नको बये । नको बये कुळबी नवरा
हाताची थापडी देतो बये । देतो बये व हाताची थापडी
चारणी नवरा बरा बये । बरा बये व चारणी नवरा बरा

(हे गीत मी दाभोसे, तालुका मोखाडा, जिल्हा ठाणे
येथें ३०-३-१९४७ ला ऐकले होते. —लेखक)

---

१. चाबकाचा. २ दारू विकण्याच्या मापाने. ३ बंजारी. ४ दुनियेला. अशाच तऱ्हेचे लोकगीत डांगी जिल्ह्यातही प्रचलित आहे.

बायकोला क्षुल्लक कारणावरून मारणे हा जणू आदिवासी नवऱ्याचा हक्कच असतो. कोकणी तरुणीला असा मार देणारा नवरा नको. रानावनात फिरणारी ही भाबडी पोर पण तिला नवरा साहेब पाहिजे कारण त्याचेबरोबर तिला दुनिया फिरावयास मिळेल !

लग्नाचा सोहळा आनंदाने करावयाचा हे खरे. परंतु त्याला कोकण्यांची गरिबी आडवी येते ना ? दिवे लावण्यास तेलही नाही एवढी गरिबी. या गरिबीची दुःखद छटा खालील गीतात पडली आहे :—

*चवसऱ्यावर सागर भरून गेल पुर*
*नवऱ्याच्या बापा र   दिव लावा खर*
*काय लावू दिव र   दिवट्या दमतील*
*चवसऱ्यावर सागर भरून गेल पुर*
*भावजी तुमी व   दिव लावा खर*
*काय लावू दिव व   दिवट्या दमतील*
*नवरीच्या भाई र   दिवे लावा खर*
*काय लावू दिव व दिवट्या दमतील*

नातेवाईक दिवे लावू शकत नाही तेव्हा तात्या (तलाठी), पाटील, मास्तर व साहेब यास दिवे लावण्यास सांगण्यात येते. परंतु तेही लावू शकत नाहीत. गरीब बिचारे कोकणे ! तेलाच्या अभावी त्यास दिवट्या लावता येत नाही. परंतु आम्ही 'सुधारलेले' तेल असून सुद्धा काय दिवे लावतो ?

(कोकण्यांची लोकगीते मी माझ्या १९४२–४३ च्या पेठ दौऱ्यात ऐकली. —लेखक)

# सोनकोळ्यांची पूर्वजपूजा

लेखक : श्री. अनंत काणेकर

सोनकोळी जमातीच्या अभ्यासासाठी मुंबईजवळच्या त्यांच्या दांडा, वेसावे, वरली वगैरे कोळी गावात फिरत असता बऱ्याचशा घरातल्या दोन विशेष गोष्टींकडे माझे एकदम लक्ष गेले. घरातल्या ओट्यावरच्या भिंतीला किंवा आतल्या खोलीतल्या भिंतीला टांगलेला बहुधा जुनाट असा एक फ्रेम केलेला फोटो दिसतो. या फोटोत घरातली माणसे आजूबाजूला उभी असलेली आणि मध्ये भिंतीला टेकून नेहमीची पैरण, कानटोपीसारखी नाखवा टोपी, कमरेला सुर्का वगैरे कपडे अंगावर असलेला म्हातारा किंवा कोळी पद्धतीची चोळीलुगडे नेसलेली म्हातारी बसलेली दिसते. नुकतीच मृत झालेली ही म्हातारी किंवा म्हातारा असतात. मृत आईचे किंवा वडिलांचे अशा प्रकारचे फोटो घरात ठेवण्याची पद्धती हिंदु समाजात इतरत्र मला कुठे आढळलेली नाही. हा एक पूर्वज-पूजेचा-प्रकार दिसतो. जपानी लोकात बौद्ध किंवा शिंतो धर्माचा प्रसार होण्यापूर्वी पूर्वज-पूजेचा प्रघात होता असे म्हणतात.

## वीरांच्या खुणा

कित्येक घरात आणखी एक विशेष गोष्ट मला दिसली. देवघरातल्या

भिंतीला लावलेल्या फळीवर खूप जुनाट दिसणाऱ्या सहा सात इंच उंचीच्या दहा बारा खुंटया उभ्या असतात. त्यांना हळदकुंकू वाहिलेले किंवा त्यांच्यापुढे हळदकुंकू लावलेले असते. नारळ ठेवलेले दिसतात. या खुंट्यांना कोळी भाषेत 'ईर' म्हणतात. म्हणजे मराठीतले 'वीर.' एखाद्या कोळी घराण्यातल्या पुरुषाला समुद्रावर काम करताना अपघाताने किंवा वादळात सापडून मृत्यू आला अथवा जे अविवाहित मृत्यू पावले त्यांच्या स्मृत्यर्थ या खुंटया ठेवलेल्या असतात. एका प्रसिद्ध कोळी घराण्यात दोन अडीचशे वर्षांपूर्वीचे जुने 'वीर' मला दाखविण्यात आले. ते तितके जुने दिसत होते. हाही एक पूर्वज-पूजेचाच प्रकार होय.

## मृत पूर्वजांसाठी चहापाणी

अपघाताने समुद्रात बुडून किंवा वादळाच्या तडाख्यात सापडून मेलेल्या पूर्वजांच्या पूजेचा आणखी एक प्रकार म्हणजे घरात सणावाराच्या दिवशी काही गोडधोड केलेले असेल तर घराच्या छपरावर त्या पितरांसाठी एक पान वाढून ठेवायचे. त्याशिवाय मृत्यूनंतरच्या पहिल्या वर्षात दर महिन्याला त्यांचे श्राद्ध केले जाते.

आणखी एक मजेदार प्रकार बऱ्याच घरातून आढळतो. अशा प्रकारचे मरण आलेल्याची विधवा ती जिवंत असेपर्यंत नवऱ्याच्या नावाने थोडासा चहा, चहाबरोबर खायचे भजीचिवड्यासारखे पदार्थ आणि विडीकाडीही दररोज काढून ठेवते! त्या माणसाची मुलेच मुलाची मागे असली तर हा प्रकार मृत्यूनंतरच्या फक्त पहिल्या वर्षात दररोज करतात.

## बायांची पूजा

पितरांचे वर्षातून एकदा केव्हातरी श्राद्ध करण्याबाबत सोनकोळ्यांचा ठराविक असा दिवस नाही. नवऱ्याच्या आधी अहेवपणी मरणाऱ्या कोळी स्त्रीच्या नावाने अविधवा नवमीच्या दिवशी सात सुवासिनींना जेवण घालतात. इतर हिंदूप्रमाणेच सर्वपित्री अमावास्येच्या दिवशी पितरांचे श्राद्ध करतात. काही कोळी घरात आश्विनातल्या कृष्णपक्षातल्या चौथ्या दिवशी 'पितरचौती' करतात.

'बाया' हा एक कोळ्यातला पूर्वज-पूजेचाच प्रकार समजला पाहिजे. देवीच्या आजाराने मेलेल्यांच्या नावाने 'वीरा' साठी खुंट्या तशी देवघरात खेळातली चिमुकली भांडी ठेवतात. त्या भांड्यांना बायाच म्हणतात.

## गिरा निंगाला, गिरा निंगाला

आपले नेहमी बरे करणाऱ्या आणि बरे चिंतिणाऱ्या, आपला ज्याच्याशी निकट सहवास आला आहे त्या नातेवाईक पूर्वजांचे आत्मे आपल्या घराभोवती चोवीस तास भिरभिरत असणार, आणि त्यांना संतुष्ट ठेवले तर कधी कुणाला न दिसणाऱ्या निर्गुण, निराकार देवापेक्षा ते आपले भले खात्रीने करणार असे साध्याभोळ्या अनपढ आदिवासी माणसांना वाटत असले तर त्यात आश्चर्य नाही. अविवाहित किंवा अपघातात मेलेल्या नातेवाईकाचा आत्मा, त्याच्या बऱ्याचशा इच्छा अतृप्त राहिलेल्या असल्यामुळे मागे उरलेल्या एखाद्या नातेवाईकाच्या शरीरात शिरून म्हणजे त्याला 'झपाटून' आपल्या इच्छा पुऱ्या करून घेण्याचा संभव असतो, असे या लोकांना वाटते. घरातला एखादा माणूस झपाटल्यासारखा चमत्कारिकपणे वागायला लागला म्हणजे सोनकोळी लोक 'गिरा निंगाला' म्हणतात. या 'गिऱ्या'ला भगताकडून मंत्रतंत्र करवून, कोंबड्या बोकडांचे बळी देऊन संतुष्ट करावा लागतो. एकदा एक सोनकोळी मुलगी तास न् तास कोपऱ्यातच बसून राहू लागली. कुणाशी बोलायची नाही, खायला प्यायला उठायची नाही. काही तरी बडबड करून ओरडायला लागायची. तेव्हा तिच्या घरच्या माणसांची खात्री झाली आणि भगतानेही सांगितले की, संध्याकाळच्या वेळी समुद्रकाठच्या चिखलातले निवटेमासे गोळा करण्याकरिता गेलेली तिची एक तरुण अविवाहित मावशी बुडून मेली होती, त्याच 'गिऱ्या'ने पोरीला झपाटले असले पाहिजे. आपले कल्याण करून घेण्यासाठी म्हणा किंवा अशुभनिवारणाकरिता म्हणा, सोनकोळ्यांना काही ना काही प्रकारची पूर्वजपूजा करावीशी वाटते.

# आई आणि लाडकी

लेखिका : सौ. कुमुदिनी पवार

एकदा मी सहजच गच्चीत उभी होते. खालून निघाल्या होत्या दोघी बायका. दिसत होत्या खेडवळच पण नखरा विचारू नका. एकजण दुसरीला म्हणाली, "आपण निघालोय बारशाला खरं, पण काय ग झालंय सुद्धला? घरचं का बाहेरचं?"

मी कान देऊन ऐकत होते. 'घरचं का बाहेरचं' म्हणजे काय मला कळेना. तेवढ्यात दुसरी म्हणाली, "अगं, बाहेरचं झालंय. हूंदे काय पन. पैल्या खेपला लेकच आपली बरी. काय वंगाळ न्हाय."

हे ऐकल्यापासून माझ्या डोक्यात एकसारखे तेच घोळत होते. त्या बाईचे शब्द आणि त्यातला गर्भितार्थ फार मोठा होता. त्या बाईचे बोलणे मोठे अलंकारिक होते. सहज बोलून गेली, पण किती परिणामकारक. मुलगी म्हणजे बाहेरची. आईचे घर सोडून बाहेर जाणारी. आईची माया, आईचे प्रेम, आईचा आनंद सारे सोडून तिला तिच्यापासून दूर जावे लागते. तिच्या स्वतःच्याच घरी. हे सारे तिच्या आईला माहीत असते. तरीही आईला मुलीची हौस असते. लेकीची सर मुलांना नाही. मुलीला पाहिले की तिची हौस उचंबळून येते. तिच्यासाठी काय करू नि काय नको असे होऊन जाते. घरात मुलांचेही

कौतुक होते. पण का कुणास ठाऊक, तिचा मुलीकडे ओढा अधिक असतो. तिला लेकीबद्दल जास्त जवळीक वाटते. म्हणूनच आई आपल्या जिवाचे रान करून तिला लहानाची मोठी करते. आणि तिच्या मोठेपणी, तिच्या घरात, तिच्या संसारात ती माझी मुलगी म्हणून ओळखली जावी यासाठी तिचे तन मन धन लेकीच्या भोवती भोवती घोटाळत असते. अशा या आईच्या वेड्या मायेला तिची लाडकी मैना तीर्थाप्रमाणे जपते आणि तिचे पूजन करते.

मुलगी जन्मल्यावर आईला अपार आनंद होतो. त्यावेळी हे 'परक्याचे धन' ही भावना तिच्याजवळ नसते. लेकीची बाळपणीची गंमत, तिच्या पैंजणाचे बोल, तिचे चालणे, तिचे बोलणे, तिची माया साऱ्या घराला वेड लावते. आई तिच्यावर आपला जीव टाकते. म्हणूनच लेकही आपल्या गुणांनी आईला मोहून टाकते. साहजिकच आईचा जीव तिच्यावर अधिकच जडतो. याची असूया भावाच्या मनात काही वेळा उत्पन्न होते; पण लेकीचा हा दिमाख घरात अगदी लग्न होईपर्यंत असाच कायम असतो.

ही लाडकी मैना आईच्या लाडात अगदी बुडून गेलेली असते. लेकीचे गुण जरा कुठे डोळ्याला बोचले की लगेच बोलून जाते–

*माळ्याच्या मळ्यामंदी येसवंदाचा कवळा*
*तान्या या बाळजीच्या दिष्ट झालीया जावळा*

येवढ्यावर भागत नाही. लगेच तळपायाकडे तिची नजर नकळत वळते. पण तरीही रहावत नाही, एखादवेळी काम करता करता बोलून जाते—

*बारीक बांगयीडी गोऱ्या हातात चमक्या मारी*
*लाडकी बाळ माजी त्या ग हातानं खेळ करी*

मुलीच्या मैत्रिणी जमल्या की त्या घोळक्यातसुद्धा तिची लेक तिला उठून दिसते–

*माजीया अंगणी ग साऱ्या सयांची बाळं येती*
*माजी ग बाळाबाई मंदी उठून दिसयिती*

काही वेळा मात्र उगीचच वाटत असते माऊलीला; ही माझी लाडकी इथल्यासारखीच सासरीही सुखात रहावी. काही वेळा असेही वाटते, आपण

हिचे कौतुक करतो खरे पण सगळ्याचीच संवय तिला आतापासूनच लागायला पाहिजे. म्हणून ती म्हणते–

*लाडकी माजी लेक रातीची मागं दही*
*जाशील ग परघरा बाई छंद बरा नाही*

यावर लेक हासते नि म्हणते कशी–"कशाला लावलीस सवय मग असली? असला साधा छंद पुरा होणार नाही असले घर तू मला देणारच नाहीस?"

लेक मोठी होत जाते तसे आईचे काळीज तुटते. तिला घरकाम करायला ती शिकविते. तिला व्यवहाराचे चार शब्द सांगते. काही काळाने ही मैना लग्न होऊन आपल्या घरी जाणार ही भावना एकसारखी तिला सलत असते. तिचे चांगले व्हावे. ती गरतीची लेक ओळखली जावी असा प्रयत्न तिचा एकसारखा चालू असतो. आईच्या अंगचे गुण न कळतच तिच्यात उतरतात. तेव्हा आईचे मन बहरते.

लग्न होईपर्यंत लेकीच्या लाडात खंड पडत नाही. मुलीचे सणवार आई आवडीने करते. संक्रातीला वसा देते. पंचमीला खेळायला धाडते आणि हादग्याच्या वेळी तर हौसेला उधाण येते. नवी साडीचोळी, नव्या बांगड्या, नवा दागिना यांनी बाळ नटून थटून खेळायला जाते. भोंडल्याच्या वेळी दर दिवसाला खिरापतीच्या आकड्यात वाढ होते. गाण्याच्या सुरांनी अंगणात धमाल उडते. हे सारे दरवर्षी हौसेनं पार पडते. पण एक साल असे येते की त्या साली ही माहेरची लाडूबाई सासरी जाते. त्यावेळी सणासुदीच्या अगोदर बराच काळ तिच्या आईला काही सुचत नाही. बिचारीचे डोळे पाणावतात. त्यावेळी शेजीबाई दुसरीला विचारते.

*लेकीच्या आईचं डोळं कशानं झालं लाल*
*पंचमीचा सण आला न्हाई आली लेकबाळ*

हे ऐकून आई म्हणते—

*शेजारीण बाई वस म्हनाई न्हवं तुला*
*माझ्या बयाची सय आली मला*

*अंगणी मला दिसं क्षणोक्षणी माझी बाळ*
*सासरी सुखावली माहेर सुनं झालं*

हे ऐकून जवळ असलेला छोटा राजा म्हणतो, "मी नाही का ग आई तुला? मग का वरं रडतेस?" यावर आईला काय बोलावं सुचत नाही. ती त्याच्याकडे बघून म्हणते, होय रे बाळा तुझ्याकडेच बघते की रे आता! असे म्हणून या लाडक्या पाखराचा आलाबाला घेते.

मध्येच लेकीचा आठव होतो. तिची सासू फार चांगली आहे खरी; तरी मन पण म्हणते—

*आपल्या घरा आली सून घराची मालकीन*
*सासू मालयींनी सून न्हवं ती लेक भैन*

*लेक जाती सासऱ्याला आई बोले जा ग बया*
*आईची येढी माया लांब जाती बघाया*

शेजारणीच्या सुनेकडे बघून कधी कधी तिला आपल्या लेकीची याद येते. तेव्हा तिला हाक मारून ती म्हणते—

*सासूरवासिनी वस माज्या वसरीला*
*तुज्या ग शीनची मैना माजी सासऱ्याला*

आईच्या या खुळ्या भैऱ्या जिवाकडे लेकीचे वडील बघत असतात. पुष्कळ तेही अधूनमधून डोळे पुसतात आणि तिला पंचमीला नक्की आणायचे आश्वासन देऊन निघून जातात. एवढयात बांगडीवाल्याचा साद येतो तसे मग डोळ्यात अश्रू तरारतात आणि ओठी बोल उमटतात—

*वैराळ सादवितो खालच्या येशीपाशी*
*बया राहिली परदेशी छंद सांगू कुणापाशी*

*वैराळ सादयीतो चुडे लियाच्या बाया किती*
*बया माजी ती मालयीन सासरी गेली होती*

इकडे मुलगीही सण जवळ आल्याने सांगाव्यासाठी कावरीबावरी झालेली असते. सासूबाई हसतात आणि तिला सांगतात, "बाळ, सांगावा नाही आला तरी मी तुला पाठवीन हं!" तशी ती लाजून घरात पळते. सासरी आल्यापासून आपल्या अंगच्या गुणांनी साऱ्यांना तिनं आपलेसे केलेले असते. व्यवहार, शालीनता यांनी ती साऱ्यांची मने जिंकते. फुरसत मिळाली, आनंदाची घडी आली की ती अंतरीचे बोल बोलते—

*माज्या ग माहेरी सये पारिजातक घरात*
*त्याचा सुवायास दरवळला सासऱ्यात*

सासरी गेलेल्या सासूबाईंच्या लेकीची-नणंदेची जागा ही माहेरची लाडकी मैना भरून काढते. इतकी ती घराशी समरस होते. मधून मधून तिला आपल्या आईची आठवण होते. आईचे मोठेपण तिला उमगते, पटते. तिच्याच उपदेशाने हे सुख आपण भोगू शकलो हे ती विसरू शकत नाही—

*प्रेमाचं अमृत हृदयाचे पोटी*
*याची साक्ष मोठी माय माऊली*

याच वेळी तिला वडिलांचीही आठवण होते. वडिलांना ती फार मोठी लेखते. कारण आईप्रमाणेच बाबांनीही नकळत माया केली. आईप्रमाणे बोलून दाखविली नाही. पण काही वेळा वाटे, आई बोलते ते बाबांच्या मनातलेच. म्हणून न कळतच तिचे हात जोडले जातात आणि ओठातून शब्द फुटतात—

*पईली माजी ओवी गाते बापाजी चातुराला*
*माऊलीचं नाव घेता शीण मनाचा उतरला*

*दुसरी माजी ओवी गाते बापाजी गुजराला*
*बया माजी ती गौळन तुळस शेजाराला*

अंतरीची खळबळ अशी चाललेली असताना एक दिवस नणंद पंचमीला येते. सासूबाईंचा जीव सुपाएवढा होतो. दोघींना सारख्याच मोठ्या जरीकाठी साड्या मिळतात. बांगड्या भरल्या जातात. पण मन नाही रमत या सूनबाईचे!

एवढयात पायरीवर पायरव येतो. पाठोपाठ वडिलांचा आवाज कानांवर पडतो. बाळीचे मन हरकून जाते. काळीज धडधडते, आनंदाने ती डोकावून बघते, बाहेर सोप्यात. नवरा, सासू, नणंद सारी तिच्याकडे बघून हासतात. लाजून खाली मान घालून घरात पळून जाते—

आणि....आणि....माहेरी आल्यावर लेकीला बघून आई खुळी भैरी होते. तृप्त मनाने मायालेकी एकमेकींच्या डोळ्यात बघतात. यापेक्षा जीवनात आनंदाचा क्षण कोणता याचे कोडे आईला काही केल्या उलगडत नाही.

# 'जळहरजामी बाबुल माँगाँ, रातादेई मायड़'

लेखीका : डॉ. सौ. सविता जाजोदिया

प्रातःकालची पावन वेळ! वसंतऋतूतील सौम्य सुगंधाने न्हायलेली हळुवार झुळुक मन त्यावेळी प्रफुल्लित करीत होती. लेकीबाळी भल्या पहाटेच दुर्वा फुले घेऊन आल्या होत्या. आणि वस्त्रालंकारांनी नटूनथटून 'गणगौर' मातेला आळवीत होत्या—

*गोर ए गणगोर माता खोल किंवाडी*
*बाहेर ऊबी रोवाँ पूजणवाळी*
*पूजो ए पुजायो सहियो क्या फळ मांगां*
*मांगां ए म्हे अन्न धन लाछर लिछमी*
*जळहर जामी बाबुल माँगाँ, राता देई मायड़....*

—गौरी माते, धनधान्य संपत्ति वगैरे देच पण जलधरसदृश पिता आणि कार्तिक मासातील तारकायुक्त रात्रीसम माताही दे....

जलधरसदृश....पृथ्वीवर जीवनाची वर्षा करणारे, अमृताने भरलेले मेघ, चराचरात चैतन्य फुलविणारे जलद! वेदांनी पर्जन्यसूक्ते गाऊन ज्यांना विनविले असे पर्जन्याने भरलेले मेघ—किती त्यांचा महिमा! पृथ्वीवरचे जीवन

त्यांच्यामुळे विकसित होते, समस्त प्राणिमात्राला त्यांचा आधार वाटतो— त्यांच्या दर्शनाने मने प्रफुल्लित होतात, गाऊ लागतात, तप्त धरणीला थंडावा मिळतो, कवींना काव्य स्फुरते; वातावरण निर्मल होते, निर्झर वाहू लागतात, नद्या ओसंडू लागतात, वृक्षवल्लरी बहरतात, हरित तृणांचे साम्राज्य पसरते – आणि हे सर्व घडवून आणणाऱ्या पर्जन्य–युक्त जलधरसदृश पिता लाभो ही इच्छा प्रकट होते! कल्पनेची ही उत्तुंग भरारी पाहून मन थक्क होऊन जाते. म्हणून विनवणी केली जाते की, इतका अपार महिमा असलेल्या पित्याचे छत्र, गौरीमाते, शिरावर दे.

—आणि माता? नभांगणी लक्ष लक्ष तारका असलेल्या कार्तिक महिन्यातील रात्रीसारखी आई दे! तिच्या कुशीत निश्चिंत होऊन आराम करता येतो. तिच्यापाशी कसलाहि भेदभाव नाही, सर्वांना सारख्याच मायेने ती थोपटते, अंगाई गीते गाते आणि निद्राधीन झाल्यावर मायेचे पांघरूण हलक्या हाताने घालते. सहस्र अपराध पोटात घालून ती अविचल राहाते. तिच्यापाशी उष्णतेचा ताप नाही की थंडपणाची हुडहुडी नाही. कार्तिक महिन्यातील हवी-हवीशी वाटणारी गुलाबी थंडी तिच्याजवळ आहे. आणि त्या गुलाबी थंडीत ती मायेची ऊब देते. लक्ष तारकांचे वैभव जवळ असूनही जिचे प्रेम तिळमात्र कमी होत नाही अशी आई गौरीमाते दे. आकाशीच्या नक्षत्रासारखी ही कल्पना!

मन वेडावून गेले. 'जळहरजामी बाबुल माँगाँ रातादेअी मायड़'–पुनः-पुन्हा शब्द मनात घुमू लागले. देवापाशी मागणे मागू लागले. भोळ्याभाबड्या अशिक्षित मनाने जे मागितले तेच सुशिक्षित मनही मागू लागले. पण देवीला आळवायचे, प्रसन्न करायचे तर साध्या साध्या याच ओळी गाऊन कसे चालेल? स्तुतिस्तोत्रे किती मोठी असतात. आपल्याला काय हवेय ते कसे खुबीने वारंवार शब्दात, कल्पनेत फेरफार करून सांगितलेले असते. म्हणून पुन्हा लोकगीतांच्या सागरात बुडी मारली. आणखी काही मौक्तिके हाती लागतात का पाहू लागले.

मराठीमध्ये मातापित्यांचा महिमा, त्यांची थोरवी, त्यांचे प्रेम, त्यांच्याबद्दल वाटणारी कृतज्ञता, आदर, श्रद्धा, निष्ठा, आपुलकी व्यक्त करणाऱ्या कितीतरी ओव्या आढळतात. पहाटेच्या मंगल शांत समयी जात्यावर बसल्या बसल्या

संसाराची सुखदु:खे गाणाऱ्या आयाबायांनी मनाच्या देव्हाऱ्यात अधिष्ठित करून ठेवलेल्या मातृपितृ दैवताबद्दल वाटणाऱ्या साऱ्या भक्तियुक्त कोमल भावना हळुवार हातांनी उलगडून दाखविल्या आहेत. हृदयाच्या गाभाऱ्यातून हे शब्द बाहेर पडल्यामुळे त्यांच्या जिव्हाळ्यास तोड नाही. तो जिव्हाळा विश्वाला गवसणी घालणारा आहे, विश्वव्यापी कल्पना निर्माण करणारा आहे. आणि त्यामुळेच त्यामधून कल्पनांची असंख्य नक्षत्रे बाहेर पडलेली आहेत. मनातील भावना नानाप्रकारचे शब्दरूप घेऊन व्यक्त झालेल्या आहेत. ती रूपे मनाला मोह घालणारी, भारावून टाकणारी अशी आहेत.

पण मराठी ओव्यांचे हे कल्पनावैभव, आईवडिलांबद्दल वाटणाऱ्या भावनांचा हा हृद्य आविष्कार मला अन्य प्रांतातील लोकगीतांमधून फारसा आढळला नाही. वास्तविक पाहता मराठी मुलाला वा मुलीला आई-वडिलांबद्दल अधिक प्रेम वाटते आणि अन्यप्रांतातील मुलामुलींना कमी वाटते असे मुळीच नाही. त्या भावना सर्वत्र सारख्याच असतात. असे असले तरी मराठी ओव्यांसारखी गीते मात्र अन्य प्रांतातून फारशी मिळाली नाहीत. अगदीच बोटावर मोजण्याइतक्या गाण्यांमधून आईवडिलांबद्दलच्या भावना ओझरत्या, पुसटशा व्यक्त झालेल्या आढळतात. त्या गाण्यांमधून कोठे वडिलांना मानससरोवर आणि आईला वाहती गंगा म्हटलेले आढळते, तर कोठे पित्याला महादेव आणि आईला पार्वती म्हटल्याचे आढळते. पण अशा तुरळक कल्पना सोडल्यास आईवडिलांबद्दल वाटणाऱ्या भावना स्वतंत्रपणे व्यक्त करणारी गाणी फारशी पाहाण्यात आली नाहीत. जे काही वर्णन आहे ते सासर-माहेरच्या तुलनेत आणि माहेरच्या आठवणीच्या रूपाने अधिक व्यक्त झालेले आहे. सासरच्या कष्टांच्या पार्श्वभूमीवर माहेरचे सुख, आईवडिलांची माया, त्यांनी आपल्याला कसे जपून राखले याचे वर्णन आलेले आहे. उदाहरणार्थ, एका मैथिली लोकगीतात म्हटलेले आहे—

"मेणा कोठून आला आहे आणि कोठे जाणार आहे? मेणा (डोली) उत्तरेकडून आला आहे आणि दक्षिणेस जाणार आहे. मेणा जेव्हा उत्तर दिशेस जाऊ लागला तेव्हा आजोबांची आठवण झाली. आजोबा मला फेट्याच्या

वळशाप्रमाणे ठेवीत असत. हा मेणा आता मला सासरी घेऊन जाइल. तेथे मी दुधात पडलेल्या माशीसारखी होईन.

मेणा पूर्वेस जाऊ लागला तेव्हा मला वडिलांची आठवण होऊ लागली. वडील मला धोतराच्या सोग्यासारखे राखीत असत. आता सासरी मात्र मी केरसुणीसारखी होईन.

मेणा दक्षिणेस निघाला तेव्हा मला आईची आठवण झाली. आई मला पिंजऱ्यातीलपोपटासारखे ठेवीत असे. आता सासरी मात्र मी पोतेरे होईन.

मेणा पश्चिमेस निघाला तेव्हा वहिनीची आठवण झाली. वहिनी मला शिळ्या भातासारखी जपून ठेवीत असे. आता सासरी मात्र मी घरातील चाळणीसारखी होईन.

—या ठिकाणी सासरी कसले निरर्थक कवडीमोल जिणे होईल हे सांगताना आईवडील कसे सांभाळून प्रेमाने ठेवीत असत हे सांगितलेले आहे. अशाच आणखी एका लोकगीतातून सासरच्या कटू बोलांचे वर्णन करताना आईची वाणी किती गोड आहे त्याचा उल्लेख आलेला आहे. अशा तऱ्हेने सासर-माहेरच्या तुलनेत आईवडिलांना आपल्याबद्दल किती प्रेम वाटत असे हे व्यक्त झालेले आहे.

याशिवाय कन्येच्या सासरी पाठवणीच्या वेळची जी गाणी आहेत त्यांमधूनही आईवडिलांच्या अपार मायेचे वर्णन आलेले आहे. एका लोकगीतात विचारलेले आहे—

> “ककरहि कानलमें नग्र लोक कानय
> ककरहि दहलल भुइँ हे”

—कोणाच्या रडण्यामुळे अवघे गाव रडू लागले? आणि कोणाच्या रडण्यामुळे पृथ्वी कंप पावू लागली?

उत्तर दिलेले आहे—

> “बावा क कनलेमें नग्र लोग कानल
> अमा क कनल दहलल भुइँ हे”

—वडिलांच्या रडण्यामुळे सर्व गाव रडू लागला आणि आईच्या रडण्यामुळे पृथ्वीचा थरकाप झाला ?

आईवडिलांचे लेकीवर इतके प्रेम असल्यामुळेच सासरी असलेल्या मुलीला नेहमी माहेरची आठवण होत असते. तिची एकच इच्छा असते—

*" घणुं रे जीवो रे मारा दादाजी*
*माता सुवासणी होय रे "*

—माझे बाबा शतायुषी होवोत, माझी आई चिरसौभाग्यवती राहो.

ईश्वरापाशी ती विसाव्यासाठी माहेर मागते. जिच्या माहेरी कोणी नाही ती देखील मानसिक समाधानासाठी म्हणते—" सासूबाई, माझ्या माहेरी कोणीही नाही असे म्हणू नका. कारण—

*' ए राम गंगा हई हमरी ही मइया*
*त देहवा रे बहिनियाँ हई ए राम*
*ए राम चान सुरुज दुनो भइया*
*रघुनाथ हमरो बाप हवे ए राम '*

—गंगा माझी आई आहे. शरयू नदी बहीण आहे. चंद्रसूर्य दोघे भाऊ आहेत आणि रघुनाथ पिता आहेत.

सासरी सुख असलेल्या लेकीला आईवडिलांबद्दल कृतज्ञता वाटत असते. त्यांच्यामुळे सुख लाभले असे वाटत असते. पण जिच्या नशिबी सासुरवासाचा छळ आलेला आहे तिलाही मनातून माहेरचा आधार वाटत असतो. माहेरच्या सुखमय प्रेमळ आठवणींच्या शिदोरीवर ती जीवनाचा वैराण वाळवंट ओलांडत असते. सासरच्या छळांना शब्दाभिव्यक्ती देताना आईच्या कुशीत, पित्याच्या साऊलीत जाण्याची मनीषा ती व्यक्त करते. शारीरिक आणि मानसिक विसाव्यासाठी तिचे मन माहेरी ओढ घेत असते. आईवडिलांचे थोर उपकार ती विसरत नाही.

असे असले तरी सासरच्या कष्टांमुळे, पतीकडून होणाऱ्या छळामुळे अगदीच त्राहि त्राहि झालेल्या मुलीच्या तोंडून आईवडिलांसाठी शापवाणी बाहेर

पडल्याचेही लोकगीतातून आढळते. पृथ्वीवरच्या समस्त मांगल्याची मूर्तीच असलेल्या परमदैवत मातापित्यांना उद्देशून तिच्या तोंडून अनुद्गार बाहेर पडतात—

*" बिन मिलती जोट मिलाई*
*मरियो मात पिता अन्यायी*
*बिन मिलती जोट मिलाई "*

—विजोड जोडी जमविली. अन्यायी आई बाप मरोत.

मुलीचे पैसे घेऊन तिचे लग्न लावून देणाऱ्या एका आईला उद्देशून मुलगी म्हणते—

*" हे बई तू नी छ बई मेरी*
*मेरा टकोंकी नथूली पेरी !*
*सरापी जायान जिया*
*कुघरू बेवाई ! "*

—आई, तू माझी आई नव्हेस. माझ्या पैशांची नथ घालतेस. तुला माझा शाप आहे. तू माझे वाईट स्थळी लग्न लावून दिलेस.

— अगदीच जिणे असह्य झाल्याखेरीज असले शब्द बाहेर पडणार नाहीत हे खरे. पण दुःखाबद्दल नेहमी स्वतःच्या प्रारब्धालाच दोष देणाऱ्या आणि 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव'ची शिकवण मनावर रुजलेल्या भारतीय महिलेच्या तोंडून असले उद्गार बाहेर पडल्याचे लोकगीतातून क्वचित का होईना आढळणे थोडे चमत्कारिक वाटते.

पण ही गीते अपवाद म्हणून किंचित दुर्लक्षिली तरी लेकीने आई-वडिलांबद्दल एक प्रेमळ तक्रार केल्याचे मात्र कित्येक लोकगीतातून आढळते. ती म्हणजे "आम्ही दोघे बहीणभाऊ एकाच मातेच्या उदरातून जन्मलो असताना, एकाच घरी वाढलो असताना, आईबाबांनी मला मात्र दूरदेशी लावून दिले आणि भाऊरायाला मात्र बाबांचे राज्य, महाल वगैरे सारे काही मिळाले." लेक म्हणते—

*"भइया के लिखल हे अम्मा बाबा कइ राजवा।*
*हमरा लिखल ए अम्मा घर बड़ी दूर॥*

—आई, भाऊरायाच्या नशिबी बाबांचे राज्य लिहिले आणि माझ्या नशिबी मात्र दूरचे स्थळ लिहिले.

वास्तविक पाहता—

*"हम बिरना ऐ अम्मा जन्मे एक के संगी*
*संगे संगे खेलहीं ऐ अम्मा खइलीं एक संग।"*

—मी आणि भाऊराया आम्ही दोघे एकदमच जन्मलो, बरोबर खेळलो.—मग असा भेदभाव का?

गुजराती महिला देखील म्हणते—

'दादाने वाला दीकरा, अमने दीधां परदेश जो।'—बाबांना काय पुत्र आवडतात, मला त्यांनी परदेशी दिले.

गढवाली लेकीच्या मनात देखील हा सल आहे. ती म्हणते—"आई, तुझ्या मांडीवर काय तुझे पुत्रच राहतील. मी जर बाबांचा मुलगा असते तर भाऊराया-प्रमाणेच मीदेखील शाळेत गेले असते. पण मी तर बाबांची वैरीण ठरले. त्यांनी माझे दूरदेशी लग्न लावून दिले. आईचे लाडके लेक आईच्या सान्निध्यात राहतील आणि लेकीला मात्र तिने आपल्यापासून दूर सारले."

तक्रार खरी आहे. शतकानुशतके रूढ असलेल्या पितृसावर्ण्य कुटुंब-व्यवस्थेत याहून वेगळे ते काय आढळणार? पण या कटु सत्याची जाणीव लोकगीतातून मोठी मार्मिकपणे व्यक्त झालेली आहे!

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे, आईवडिलांबद्दलच्या मराठी ओव्यांच्या तोलाचे वैभव अन्य प्रांतातील लोकगीतातून निदान माझ्या पाहण्यात तरी आले नाही. मराठीमधे आढळणाऱ्या गुरूमाऊली, किंवा ईश्वरास माऊली मानणाऱ्या विठामाऊलीसारख्या जिव्हाळ्याच्या कल्पना अन्यत्र पाहण्यात आल्या नाहीत. वास्तविक पाहता भारतीय संस्कृतीनेच 'न मातुः परदैवतम्' असे म्हणून मातृवंदन केलेले आहे. कोणतेही मंगलकार्य असो आईचा आणि वडिलांचाही

आशीर्वाद लागतो. असे असताना आईवडिलांबद्दलचे भक्तिमय प्रेम व्यक्त करणारी स्वतंत्र गीते हाती लागू नयेत हे खेदजनक आहे. आईवडिलांऐवजी भावाला उद्देशून म्हटलेली गीते बरीच आढळतात. विशेषतः उत्तरेकडे सर्वत्र रूढ असलेला विवाहाच्या वेळचा 'भात भरण्याचा प्रसंग' – भाऊ भेटी घेऊन येतो तो प्रसंग – त्यावरील, भावाला उद्देशून गायिलेली असंख्य लोकगीते राजस्थानी, हिंदी आणि हिंदीच्या सर्व उपबोलींमधून हाती लागतात. शिवाय सासरी दुःखीकष्टी असणाऱ्या मुलीच्या तोंडूनही बाहेर पडते ते हेच की, 'कावळ्या, माझे दुःख वडिलांना सांगू नकोस नाहीतर ते सर्वांदेखत रडतील. आईला सांगू नकोस नाहीतर ती पावसाळ्यातील रात्रीसारखी झुरेल. त्यापेक्षा भाऊरायाला सांग म्हणजे तो लगेच निळ्या घोड्यावर बसून येईल.' आईवडिलांना आपल्यामुळे त्रास होऊ नये, त्यांनी आपले कर्तव्य पार पाडले, आता वृद्धापकाळी त्यांना दुःख नको म्हणून लेक आपले दुःख त्यांच्यापासून लपवून ठेवते. त्यांच्यापेक्षा भावाचा तिला अधिक आधार वाटतो. त्यामुळे भावाबद्दल जिव्हाळ्याने गायिलेली गाणी विपुल आढळतात. मराठीत बंधुरायाची गाणी आहेतच. पण शिवाय आईवडिलांबद्दलच्या ओव्या अगणित आहेत. त्यादृष्टीने मराठी लोकगीतांचा हा विभाग अधिक समृद्ध म्हणावयास हरकत नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६०२९९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
REFBK-0016299